## प्रस्तूत ग्रंथात...

- प्रबोधनकार ठाकरे यांचा थोडक्यात जीवनपट
- प्रबोधनकारांनी बाळ ठाकरे यांच्यावर केलेले संस्कार
- बाळ ठाकरे यांचे लहानपण आणि पारिवारीक जीवन
- व्यंगचित्रकार म्हणून करिअर
- भीष्मप्रतिज्ञा करून सुरू केलेले मार्मिक साप्ताहिक
- शिवसेना संघटना आणि 'शिवशाही' राजकारणाचा विस्तार
- बाळासाहेब ठाकरे यांच्या यशाचे रहस्य
- उद्धव ठाकरे यांना दिली शिवसेनेची जबाबदारी
- राज ठाकरे यांनी केली महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना

• बाळासाहेब ठाकरे यांची निवडक भाषणे
• विविध मान्यवरांच्या आठवणीतले बाळासाहेब




**यशराज पारखी**

एम्.बी.ए.; बी.ए.; डी.एम्.इ.
डॉक्टर ऑफ ऑनर्स इन वेलनेस अँन्ड वेलबिईंग
(मानद डॉक्टरेटने सन्मानित)


युवा नेते, लेखक, प्रेरणादायी व्याख्याते
ANNFA Award - 2007 & 2008 ने सन्मानित
Extraordinary Award 2012 ने सन्मानित
गॉडफ्रे फिलिप्स ब्राव्हेरी ने सन्मानित
राष्ट्रगौरव पुरस्काराने सन्मानित
शिवप्रताप शिवरत्न पुरस्काराने सन्मानित
अशोक सहकारी बँकेकडून,
अशोक मित्र पुरस्काराने सन्मानित
देशभरातून विविध राज्यात केलेल्या व्याख्यानांबद्दल
अनेक नागरी सत्काराने सन्मानित.
विश्वशक्ती इंटरनॅशनल फाऊंडेशन संस्थापक अध्यक्ष
''थँक्स वर्ल्ड'' एनजीओ - संस्थापक अध्यक्ष


कॉन्टिनेन्टल प्रकाशन


बाळासाहेब ठाकरे यशोगाथा : यशराज पारखी

जीवनपट, भाषणे, यशाची सूत्रे

# बाळासाहेब ठाकरे यशोगाथा


यशराज पारखी




# बाळासाहेब ठाकरे
# यशोगाथा

जीवनपट, भाषणे, यशाची सूत्रे



# बाळासाहेब ठाकरे यशोगाथा

जीवनपट, भाषणे, यशाची सूत्रे

**लेखक/संपादक**
यशराज पारखी
ऑफिस नं. २४, महाराजा कॉम्प्लेक्स, पौड रोड,
कोथरूड, पुणे - ४११०३८,
फोन :०२० २५२८३०११/९९२२६०४४४२
yeshrajparkhie@gmail.com

**© माया यशराज पारखी,पुणे**

**प्रकाशक :**
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
ऋतुपर्ण अनिरुद्ध कुलकर्णी,
देवयानी कुलकर्णी-अभ्यंकर
२१५९/२ विजयानगर, पुणे ४११०३०

**प्रथमावृत्ती**
जून २०१४

**मुखपृष्ठ व पुस्तक सजावट**
सदाशिव जंगम

**अक्षरजुळणी**
बलवंत मुद्रणालय, ता. जि. सातारा.

**मुद्रक**
योगेश जंगम, जंगम ऑफसेट प्रा. लि.
स. नं. २५/१०, नांदेड फाटा, पुणे - ४११०४१
फोन - ०२०- २४३९२७५९

**किंमत : ₹ २००/-**

ह्या पुस्तकाचे लेखन आणि
संपादन करण्यासाठी
सामर्थ्य पुरवणाऱ्या श्री सद्‌गुरूंना,
जन्मदात्या मातापित्यांना व
माझी अर्धांगिनी
माया पारखी यांना अर्पण



# उत्तम प्रयत्न



श्री. यशराज पारखी यांनी बाळासाहेबांवर पुस्तक लिहिले असून ते प्रकाशित करण्याच्या प्रयत्नात ते आहेत असे मी ऐकले होते. आणि आता मी संदेश किंवा अभिप्राय द्यावा यासाठी माझ्या हाती एक प्रत आली आहे. ती प्रत सहज चाळली तरी पारखी यांनी घेतलेले कष्ट जाणवतात. बाळासाहेब हे तसे कोणालाच आणि कधीच अजमावता आले नाहीत. एका पुस्तकात मावणारे ते व्यम्तिमत्वच नव्हे. आकाशात कडाडणारी वीज जशी दोन हातांनी पकडणे अशक्य तसे बाळासाहेबांना लेखणीद्वारे शब्दबद्ध करणे महाकठीण!

तरी सुद्धा जीवनपट, भाषणे, यशाची सूत्रे या त्रिमितीमध्ये पारखी यांनी बाळासाहेब सादर करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यांना प्रकाशकही मोठे मान्यवर लाभले आहेत ते म्हणजे 'कॉन्टिनेन्टल प्रकाशन' चे कुलकर्णी. व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीकोनातून या लिखाणाचे किंवा संकलनाचे वाचणाऱ्यांना मार्गदर्शन घडावे अशी लेखकाची अपेक्षा आहे. श्री. यशराज पारखी यांना खूप शुभेच्छा!

**उद्धव ठाकरे**
शिवसेना प्रमुख



# मनोगत !

नमस्ते....

हिंदुहृदयसम्राट, सरसेनापती, शिवसेनाप्रमुख, मराठी माणसांचे दैवत, लाखो नेतृत्वांची छत्रच्छाया, श्रीमंत श्री. बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो...

बाळासाहेबांसारख्या एवढ्या मोठ्या महामानवाचे, हिंदुहृदयसम्राटाचे, शिवसेनाप्रमुखांचे आणि शिवाजी महाराजांनंतर महाराष्ट्राचे दुसरे लढवय्ये दैवत. त्यांच्याबाबतचा जीवनपट एवढ्याशा पुस्तकातून मांडणे अशक्य आहे. श्री सद्‌गुरुकृपेने मी जो काही प्रयत्न केला आहे तो प्रत्येकालाच आवडेल याचा विश्वास वाटतो. बाळासाहेबांना करोडो लोकांचा जनसमुदाय लाभला, त्यांच्या संपर्कात जे कोणी आले त्या व्यक्तींनी त्यांच्या त्यांच्या क्षेत्रात बाळासाहेबांच्या छत्रछायेखाली नेतृत्व केले, मग ते राजकीय क्षेत्र असो अथवा कला-चित्रपटसृष्टी, व्यवसाय, सामाजिक क्षेत्र असे कोणतेही क्षेत्र.

खरं तर बाळासाहेब सागराएवढे जनमानस लाभलेल्या लीडरशिपचे उच्चतम उत्तुंग स्थान आहे. त्यांच्या लीडरशिपद्वारे प्रेरणा घेऊन अनेक लीडर्स (नेतृत्वे) तयार झालेली आहेत. सर्वसामान्य भाजीवाला, रिक्षावाला, छोटे छोटे व्यवसाय करणाऱ्या व्यक्ती अशी अनेक माणसं त्यांची प्रेरणा घेऊन; नगरसेवक, आमदार, खासदार, मंत्री झालेले दिसतात. अगदी सहजतेने बाळासाहेबांनी रेखाटलेल्या व्यंगचित्रांतून, त्यांच्या लिखाणातून, बोलण्यातून आणि मैदानी भाषणांमधून उत्स्फूर्तपणे नेतृत्वे (लीडर्स) निर्माण झाली, एवढेच नव्हे तर त्यांच्या छत्रछायेखाली त्या नेतृत्वांनीसुद्धा नेतृत्वाची शृंखला तयार करत लीडरशिपचा आदर्श निर्माण केला. म्हणून श्रीमंत श्री. बाळासाहेबांना नेतृत्वसम्राट असे संबोधले तर काही वावगे नाही.

बाळासाहेब हे राजकारणशास्त्र, माणुसकीशास्त्र, कलाशास्त्र, संस्कारशास्त्र, नेतृत्वशास्त्र, भाषणशास्त्र, समाजशास्त्र, इतिहासशास्त्र, जिद्दशास्त्र, एकवचनीशास्त्र अशा अनेक शास्त्रांचे एकत्रित शास्त्र म्हणजेच बाळासाहेब ठाकरे आहेत.

शिवसेनाप्रमुखांवर पुस्तक लिहिण्याचा विचार कसा आला ? ह्या प्रश्नाचे उत्तर खरं तर हास्यात्मक आहे. मध्यंतरी वयाच्या २७ व्या वर्षी २००९ मध्ये माझ्या मित्रपरिवारांनी मला आमदारकीच्या निवडणुकीला उभे राहण्यासाठी तयार केले. माझीसुद्धा लागलीच छाती फुगली.... मी कोथरूड विधानसभा मतदारसंघ पुणे येथून अपक्ष निवडणूक लढवली आणि जोरात आपटलो. त्या वेळेस माझे डिपॉझिट तर जप्त झालेच पण पैशाची उधळणसुद्धा झाली आणि शिवाय एक वर्ष व्यवसायात लक्ष न दिल्याने आर्थिक नुकसानही झाले. तेव्हा मला कळले की, तेथे पाहिजेत जातिवंत..... तेथे माझ्यासारख्या येरा गबाळ्याचे काय काम..... ?

मी संघर्षमय जीवनातून येथपर्यंत आलेलो आहे. लहानपणी महानगरपालिकेच्या शाळेत शिकत शिकत एका डॉक्टराच्या दवाखान्यात साफसफाई केली. पुढे माध्यमिक शिक्षण घेत असताना फूटवेअरच्या दुकानात काम केले, सकाळी घरोघरी पेपर, दूध पोहचवण्याचे काम केले. लहानपणी पाहिलेले स्वप्न पूर्ण झाले. नावापुढे पाच पदव्या लागल्या, काही सन्मान मिळाले. (शिक्षण M.B.A.; B.A.: D.M.E.D.C.N.T. Doctor of Honors in wellness and wellbeing मानद डॉक्टरेटने सन्मानित) पुढे जाऊन व्यवसायात चार पैसे मिळाले. बाळासाहेबांवरील पुस्तके वाचली, भाषणे ऐकली काही शिवसैनिकांना भेटलो, त्यांच्या आठवणींतले बाळासाहेब जाणले आणि अशा महान व्यक्तीवर Quantem Physics (पुंजगती भौतिकशास्त्र), मानसशास्त्र,

व्यक्तिनिर्मितिशास्त्र, इतिहासशास्त्र, संस्कारशास्त्र अशा विविध शास्त्रांचा आधार घेऊन पुस्तक लिहिण्याचा विचार केला.

शिवसेनेने राजकारण नव्हे तर शिवशाही कशी केली याविषयी सविस्तर मांडलेले आहे. कोणत्याही क्षेत्रातील व्यक्तींना नेतृत्व करण्याकरिता प्रभावी बोलणे असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. बाळासाहेबांना त्यांच्या भाषणकौशल्यामुळेच करोडोंचा जनाधार लाभला, म्हणून बाळासाहेबांनी केलेली निवडक भाषणेसुद्धा ह्या पुस्तकात आहेत. त्यामुळे वक्तृत्वकौशल्याकरिता हे पुस्तक मार्गदर्शकच ठरेल. तसेच पुस्तकामध्ये काही यशराज सूत्रे मांडली आहेत, ती व्यक्तिमत्त्व विकासासाठी फायदेशीर ठरतील. बाळासाहेब कसे घडले आणि त्यामागचे शास्त्रशुद्ध कारण मांडण्याचा प्रयत्न ह्या पुस्तकाच्या माध्यमातून केलेला आहे. आयुष्याच्या कोणत्याही वयोमानात असलेल्या प्रत्येकासाठी हे पुस्तक काहीतरी देऊनच जाईल. ह्या पुस्तकाच्या माध्यमातून प्रत्येकाला नवचैतन्य मिळो अशी मी परमेश्वरचरणी प्रार्थना करतो.

**यशराज पारखी**



## विशेष आभार !

सर्वप्रथम मी माझ्या आईवडिलांचा आभारी आहे, त्यांनी मला जन्म दिला म्हणूनच मी हे जीवन जगतो आहे. आजवर मी जे काही घडलो ते त्यांच्यामुळेच. मी माझी अर्धांगिनी माया हिचा अत्यंत आभारी आहे. हे पुस्तक लिहिताना तिने मला फार मानसिक प्रेरणात्मक साथ दिली. माझा चिरंजीव पृथ्वीराज तसेच परिवारातील सर्वच सदस्यांचा आणि माझ्या मित्रपरिवारांचा मी आभारी आहे.

आदरणीय शिवसेना कार्याध्यक्ष उद्धवजी ठाकरे साहेब परिवार आणि संपूर्ण शिवसेना परिवाराचा, सर्व शिवसैनिक आणि त्यांच्या अधिकाऱ्यांचा मी फार आभारी आहे.

आदरणीय मनसे अध्यक्ष श्री. राज ठाकरे साहेब परिवार आणि संपूर्ण महाराष्ट्र नवनिर्माण सेना परिवाराचा, सर्व मनसे सैनिक आणि त्यांच्या अधिकाऱ्यांचा मी फार आभारी आहे.

हे पुस्तक पूर्ण करताना १९५६ पासून यशस्वीरीत्या कामकाज करणाऱ्या जंगम ऑफसेटचे मालक श्री. सदाशिव महादेव जंगम तसेच सौ. मंजूषा संदेश केसकर (शिक्षिका), सौ. विद्या दत्तात्रय जाधव, प्रा. शीतल रसाळ, गुरुवर्य महेंद्रन खेडकर, दयानंद पवार, शुभांगीताई पारोलकर, पत्रकार जितेंद्र मैड, बलवंत मुद्रणालयाचे श्री. राजन चाफेकर तसेच डीटीपी ऑपरेटर श्री. संदीप पवार आणि प्रुफरीडिंग व एडिटिंग करणारे श्री. श्रीनिवास वारुंजीकर तसेच प्रिंटर आणि प्रकाशक अशा सर्वांचेच मी आभार व्यक्त करतो. हे पुस्तक पूर्णत्वास नेताना सर्वच सदस्याकडून दिवसरात्र मेहनत करण्यात आली. एकदा तर अक्षरश: फोनवर आठ तास सतत बोलत हे पुस्तक पूर्णत्वास नेण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. तसेच ह्या पुस्तकासाठी सौ. गीता आचार्य, सौ. कोमल पारखी, श्री. सागर पारखी, श्री. रजनीकांत सुतार, सौ. अश्विनी लोहकरे, श्री. प्रणव आचार्य अशा अनेकजणांचे सहकार्य लाभले.

**यशराज पारखी**

# अनुक्रमणिका


- 'प्रबोधन'चे प्रबोधनकार / १४
- बाळासाहेब ठाकरे यांचे लहानपण / १८
- कडवटपणाने संस्काराची पेरणी / २१
- मी बी मारली नाही, मी मार खाणार नाही म्हणजे नाही... / २३
- मातृछत्र हरपले / २९
- व्यंगचित्रसम्राट बाळासाहेब ठाकरे / ३१
- संसाराची घडी / ३३
- नोकरीला रामराम आणि मार्मिकचा 'जयश्रीराम' / ३४
- मराठी माणसाचे स्वराज्य – शिवसेना/ ३८
- शिवसेनेचा पहिला दसरा मेळावा./ ४०
- आमंत्रण पत्रिका / ४३
- शिवसेनेची घोडदौड / ४४
- मातोश्री बंगला / ४६
- राजकारण नव्हे – शिवसेनेची शिवशाही / ४९
- मा. इंदिराजीना पत्र / ५२
- मोरारजींना विरोध अन् बाळासाहेबांना अटक / ५३
- महाराष्ट्राची इज्जत मराठ्यांच्या हाती / ५६
- बाळासाहेबांचा करिश्मा / ५८
- पितृछत्र हरपले आणि शिवसेनाप्रमुख म्हणून राजीनामा / ६१
- बाळासाहेबांची आपुलकी आणि खरी परीक्षा / ६३
- गाव तेथे शाखा आणि घर तेथे शिवसैनिक / ६६
- बाळासाहेबांचा दिलदारपणा / ६९
- दैनिक सामना / ७०
- बाळासाहेब ठाकरे झाले हिंदुहृदयसम्राट / ७३
- छगन भुजबळांचा शिवसेनेला अखेरचा जय महाराष्ट्र... / ७४
- भगवा झेंडा विधानसभेवर फडकला / ७५

- एन् डी ए ची स्थापना / ७८
- अर्धांगिनी हरपली / ८०
- बाळासाहेबांनी सहन केलेले धक्के / ८१
- जीवघेणा हल्ला / ८५
- बाळासाहेबांचे आजारपण / ८७
- यमराजांना बोलाविले दिवाळी नंतर / ८९
- आखिर यमराज जीत गया! / ९२
- महामानवाची महाअंत्ययात्रा आणि महाअंत्यविधी / ९४
- पिताश्री आणि उद्धवश्री / ९८
- बाळासाहेब आणि राजसाहेब / १०३
- दिलदार मैत्री – अन् राजकारणातील वैरी / १०६
- बाळासाहेबांची भगिनी – लतादीदी गानसम्राज्ञी / १०९
- राजकारणातले बीग बी आणि सिनेसृष्टीतले बीग बी / १११
- महाराष्ट्राचे खेळाडू अन् बाळासाहेबांचे बाळकडू / ११५
- कलाकार अन् यशाचा गुणाकार / ११८
- बाळासाहेबांचे दरबार आणि भाजपचे सरकार / १२३
- महाराष्ट्राचे उद्योगपती अन् बाळासाहेब महीपती / १३१
- पुणे नाही राहिले बाळासाहेबांपासून उणे! / १३५
- गर्व आहे आम्हाला शिवसैनिक असल्याचा / १३९
- संतमहात्मे अन् बाळासाहेब धर्मात्मे / १४४
- बाळासाहेब म्हणजे स्वयंभू सरकार / १४७

**बाळासाहेब ठाकरे यांची भाषणे**
**"जशी आहेत तशी"**

- बाळासाहेब ठाकरे यांची भाषणे .../ १५२
- शिवसेना कशासाठी? प्रबोधनकार ठाकरे १५४ /

- अकोला – ४ डिसेंबर १९८८ बाळासाहेब ठाकरे / १५७
- १० एप्रिल २००२ शिर्डीमधील भाषण –बाळासाहेब ठाकरे / १७७
- ३८वा शिवसेना वर्धापन दिन मुंबई १९जून २००४ बाळासाहेब ठाकरे / १८६
- ३९वा शिवसेना वर्धापन दिन, मुंबई १९ जून २००५ बाळासाहेब ठाकरे /१९०२
- ४० वा शिवसेना वर्धापन दिन, मुंबई १९ जून २००६ बाळासाहेब ठाकरे / १९५
- १ मे २०१० बाळासाहेब ठाकरे / १९९
- १७ ऑक्टोबर २०१० दसरा मेळावा बाळासाहेब ठाकरे / २०२
- पंचलाइन्स / २१५

# ‘प्रबोधन’कार केशवराव ठाकरे
# बाळासाहेब ठाकरे
# यांचा जीवनपट

## ‘प्रबोधन’चे प्रबोधनकार

संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार, समाजसुधारक, प्रभावी वक्ते, झुंजार पत्रकार आणि नाटककार ‘प्रबोधन’कार केशव सीताराम ठाकरे कसे घडले असावेत ह्या प्रश्नाचे उत्तर संघर्षमय आहे. त्यांचे वडील सीताराम ठाकरे यांनी पनवेलमध्ये आपला प्रपंच थाटला होता. पनवेलच्या न्यायालयात बेलिफची नोकरी करत ते घरसंसार चालवीत होते. ( बेलिफ म्हणजे न्यायालयाचे निमंत्रण अथवा आदेश पोहचवणारी व्यक्ती. ) परिस्थिती तशी बेताची आणि गरिबीची होती, परंतु एक आदर्श कुटुंब म्हणून त्यांच्याकडे सर्वजण पाहत असत. न्यायालयातील असलेल्या एका शिस्तबद्ध कारभारामुळे त्यांच्या आयुष्यालासुद्धा शिस्तीचे वळण लागले होते. ह्या आदर्श कुटुंबाला १७ सप्टेंबर १८८५ या दिनी पुत्रप्राप्ती झाली, त्याचे नाव केशव असे ठेवण्यात आले. सीताराम ठाकरे यांच्या मोठ्या मुलाचे नाव केशव तर लहान मुलाचे नाव यशवंत ठेवण्यात आले. इतर लहान मुलांप्रमाणेच केशव ठाकरेंचे लहानपण गेले; परंतु अत्यंत कडक शिस्त आणि संस्कार यांच्यामुळे मात्र ते इतरांमध्ये उठून दिसत. परिस्थिती तशी गरिबीची होती, परंतु सीताराम ठाकरे यांना नेहमी वाटायचे केशवाने काहीतरी चांगले करावे, त्यासाठी त्यांच्यापरीने ते प्रयत्न करीत होते. शिक्षणासाठी पैसे पुरवत होते, तरीही परिस्थितीअभावी केवळ १० रुपये नसल्यामुळे मॅट्रिकच्या परीक्षेस केशवरावांना बसता आले नाही, आणि सीताराम ठाकरे यांचे केशवास वकील बनवण्याचे स्वप्न अधुरे राहिले. जरी मॅट्रिकचे आणि पुढील शिक्षण त्यांना शिकता आले नाही, तरीही विविध विषयांवर चालू असलेले वाचन त्यांनी तसेच पुढे चालू ठेवले. केशवरावांची बुद्धी अत्यंत तल्लख होती, ते फार हुशार होते. जरी त्यांना पैशाअभावी पुढे शिकता आले नाही तरीही पदवीधरांनासुद्धा मागे टाकतील एवढी हुशारी त्यांच्याकडे होतीच.

त्यातच मध्ये प्लेगची साथ चालू होती, गावोगावी शेकडोच्या शेकडो माणसं प्लेगच्या साथीत मरण पावत होती, ह्या मरणाच्या युद्धात सीताराम ठाकरे यांनासुद्धा आपला जीव गमवावा लागला, ज्या वेळेस केशवरावांचे वडील सीताराम देवाघरी गेले त्यावेळेस केशवरावांचे वय १७-१८ वर्षांचे असेल. अशा लहान वयातच घरची मोठी जबाबदारी त्यांच्यावर आली. लहानपणापासून वाचनाची आवड असल्यामुळे त्यांना लेखनाची- सुद्धा आवड निर्माण झाली होती. लिखाणातून समाजामध्ये परिवर्तन घडू शकते आणि त्यातून समाजाचे प्रबोधन घडू शकते, शिवाय आपल्याला त्यातून



चार पैसेसुद्धा मिळू शकतात, असा विचार करून केशवरावांनी 'प्रबोधन' नावाचे पाक्षिक सुरू केले.

'प्रबोधन'कार ठाकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार ठाकरे हे मूळ पुणे येथील भोर संस्थानातील पाली गावचे. आता हे गाव रायगड जिल्ह्यात आहे. ठाकरे या नावाबरोबर त्यांचे घोरपडकर असे आडनाव होते; पण समाजजागृतीचे महान कार्य करणाऱ्या 'प्रबोधन'कारांनी घोरपडकर हे आडनाव मागे सोडले. झुंजार किल्लेदार हा त्यांच्या घराण्याचा लौकिकही त्यांना समाजप्रबोधनाचे कार्य करताना मागे ठेवावा लागला, असा उल्लेख त्यांनी दिलेल्या माहितीत सापडतो.

लहानपणापासून कडक शिस्तीमध्ये वाढलेल्या केशवरावांची वाणी आणि लेखणीसुद्धा सडेतोड विचार कडक भाषेत बोलत होती. विचारांचे सामर्थ्य हे फार असते, आपल्या विचारांनी समाजामधील अंधश्रद्धांवर कडक वाणीने आणि लेखणीने आघात करत होते. अगदी शास्त्रशुद्धरीत्या कोणत्याही विषयांवर त्यांची रीतसर मांडणी आणि त्यासाठी आवश्यक अशा गोष्टीचा उल्लेख यामुळे 'प्रबोधन' पाक्षिक अधिकाधिक लोकांमध्ये गाजत होते. अत्यंत प्रखर अशा शब्दांत त्यांनी जुन्या चालीरीतींवर विद्रोहाची चळवळ सुरू केली. स्त्रियांना समाजात न्याय मिळवून देण्यासाठी आणि अंधश्रद्धा निमूर्लनाकरिता 'प्रबोधन' पाक्षिकात त्यांचे काम सतत चालूच होते. आपले लिखाण नेहमी लोकांचे रक्त उसळवणारे असावे असे त्यांना नेहमी वाटायचे आणि त्यावर ते ठाम होते. आपल्या प्रखर लिखाणाने त्यांनी स्त्रियांची पिळवणूक, हुंडा, धार्मिक रूढी यांच्याविरुद्ध बुलंद आवाज उठविला. 'प्रबोधन' पाक्षिक दिवसेंदिवस महाराष्ट्रात वाढले. धर्माच्या नावाखाली चाललेली भोंदूगिरी आणि विडंबन थांबावे असे त्यांना नेहमी वाटत होते.

केशवरावांची जशी लेखणी प्रखर होती, तशीच भाषासुद्धा प्रखर होती, त्यामुळे त्यांच्या भाषणाने लोकांचे रक्त उसळत असे. सामाजिक बांधिलकी असणारी व्यक्ती म्हणून त्यांची ख्याती होती. त्यामुळे 'प्रबोधन' पाक्षिक चालवून खऱ्या अर्थाने 'प्रबोधन' करून परिवर्तन घडवणारे केशव सीताराम ठाकरे प्रबोधनकार म्हणून ओळखले जाऊ लागले. प्रबोधनकार जसे बोलत तसे वागत, त्यानुसार त्यांनी विदर्भातील एका गरीब घराण्यातील गुप्ते यांच्या मुलीशी लग्न करण्याचे ठरविले. गुप्ते घराण्यातली मंजूषा आपल्या विचारांशी जुळवून घेऊन संसार करेल ह्या सर्व गोष्टींचा विचार करून हुंडा न घेता अत्यंत साध्या स्वरूपात मंदिरामध्ये देवाब्राह्मणांच्या साक्षीने त्यांचे लग्न झाले. त्यांचे लग्नानंतरचे नाव रमा असे ठेवण्यात आले. केशवराव आणि त्यांची मुले यांनी जो काही इतिहास घडवला त्यामध्ये रमाबाईंचा फार मोठा हात होता. ज्याप्रकारे जिजामातांमुळे शिवाजीराजे घडले तसेच रमाबाई तथा मातोश्रींमुळे बाळासाहेब ठाकरे घडले. बाळ

यांच्या जन्मापूर्वी ठाकरे घराण्यात चार मुली झाल्या. त्यांची नावे पमा, सुशीला, सुधा, सरला अशी ठेवण्यात आली. प्रबोधनकारांनी आणि रमाबाईंनी या चारही मुलींचे आनंदाने स्वागतच केले, त्यांना आयुष्यभर देवीप्रमाणेच वागवले आणि घडवले. मुलींबरोबरच आपल्याला पुत्र व्हावा अशी रमाबाईंची आणि केशवरावांची तीव्र इच्छा होती. म्हणून त्यांनी परमेश्वराकडे आणि कुलदेवतेपुढे आपली इच्छा व्यक्त केली, देवीपुढे प्रार्थना केल्या, नवस केले, अखेरीस प्रतीक्षा संपली. 'प्रबोधन'कार ठाकरे यांना २३ जानेवारी १९२६ रोजी महाराष्ट्र राज्यात पुण्यातील डॉ. इंदिराबाई खाड्ये प्रसूतिगृहात पुत्रप्राप्ती झाली. सगळ्यांच्या पसंतीने त्याचे बाळ नाव ठेवण्यात आले.

**'यश-राज' सूत्र**

देवापुढे तीव्र इच्छाशक्तीने कोणत्याही गोष्टीची मागणी केली असता, नवस बोलला असता, तो नवस फेडण्याच्या क्षणाचे कल्पनाचित्र पाहिले असता ती गोष्ट, ती मागणी पूर्ण होते. अशा असंख्य घटना घडतात. देव, अल्ला, जीझस किंवा इतर कोणतीही गुरुवर्य व्यक्ती म्हणजे विश्वशक्ती होय. ह्यामध्ये तुमची श्रद्धा अत्यंत महत्त्वाची आहे.

'प्रबोधन' मासिकातून विचारक्रांती होत होती परंतु कौटुंबिक अर्थक्रांतीस हातभार लागत नव्हता, म्हणून आपला स्वत:चा छापखाना आणि बरोबर 'प्रबोधन' पाक्षिक यांची आणखी वृद्धी असा विचार करून साताऱ्यामधील कूपर साहेबांच्या कंपनीचे प्रसिद्धी अधिकारी म्हणून ते काम पाहावे, त्या बदल्यात पगार आणि कूपर साहेबांच्या आर्थिक मदतीच्या साहाय्याने छापखाना असे समीकरण जुळले. परंतु ह्या समीकरणाने तत्त्वांची, विचारांची समीकरणे सुटत नव्हती, खरं तर ह्या समीकरणाने आर्थिक गणित सुटलेले होते, परंतु 'प्रबोधन'कारांना तत्त्व, विचार, प्रबोधन यांचे गणित अधिक महत्त्वाचे वाटल्याने गोडी गोडीने निरोप घेत त्यांनी पुण्यात ठिय्या मांडला.

सुदैवाने एक छापखाना त्यांना भाडेतत्त्वाने मिळाला, आणि सदाशिव पेठेमधील नातूवाड्यात त्यांना राहण्यासाठी भाडेतत्त्वावर घरसुद्धा मिळाले. पाच ते सहा वर्षे ही भावंडे पुण्याच्या नातूवाडा परिसरात वाढली. घरासमोर असलेल्या जोहारच्या (महादेव) मंदिरात ते खेळत. पुण्यात आल्यावर केशवरावांनी ब्राह्मणेतर चळवळीचे कार्य सुरू केले. त्यावर लिखाणे आणि व्याख्याने करणे हे काही ब्राह्मणांना मंजूर नव्हते. परंतु 'प्रबोधन'कार त्यामुळे डगमगले नाहीत. 'प्रबोधन' पाक्षिक हे जनमानसात पोहचलेले होते आणि समाजसुधारणावादी लोकहितवादी समाजसेवकांची मोठी फळी त्यांच्याबरोबर होती. त्यामुळे ब्राह्मणेतर चळवळ, हिंदू मिशनरी चळवळ, प्रबोधन पाक्षिकासाठी लेखन करणे, 'प्रबोधन' पाक्षिकाद्वारे त्यांचे विचार पटणारे जनसमुदाय त्यांना भाषणासाठी बोलवत असत, त्यातसुद्धा प्रबोधनकार व्यग्र होते. 'प्रबोधन'कार हे कलाप्रेमी व्यक्ती होते. 'प्रबोधन' पाक्षिकाच्या



लिखाणाबरोबर 'नाटक' लिहून त्या नाटकाद्वारे समाजप्रबोधन करण्याचे कार्यसुद्धा चालू होते. 'प्रबोधन'कारांनी काही नाटके लिहिली आणि ती फार गाजली. 'ध्रुवाचे अढळपद,' 'काळाचा काळ,' 'टाकलेलं पोर' आणि 'खरा ब्राह्मण' अशा प्रकारच्या अनेक नाटकांचे लिखाण त्यांनी केले.

त्यांपैकी 'खरा ब्राह्मण' म्हणजे विद्वान नाकी भटजी अशा प्रकारचे काही भाग त्या नाटकात असल्यामुळे दादांवर आणि नातूवाड्यातील घरांवर शेणफेक होत असे. हे सर्व मान अपमान सहन करत चळवळीचे काम 'प्रबोधन'कार चालवीतच होते. एका बाजूला समाजात परिवर्तन घडवण्याचे काम करीत होते तर दुसरीकडे 'प्रबोधन'कारांची आई म्हणजे बाळ ठाकरे यांची आजी ह्या मुलांवर संस्काररूपी परिवर्तन करीत होत्या

*(बाळ ठाकरे आणि त्यांच्या भाऊ बहिणींना उद्देशून प्रबोधनकार ठाकरे म्हणतात:) तुम्हाला काय वाटले की, मी जत्रेमध्ये खाऊ खाण्यासाठी दिलेले पैसे तुम्ही सोरटमध्ये लावले आणि भरपूर पैसे जिंकले म्हणून मी आनंदी होईन, कदापि नाही...(मोठ्या आवाजात)*

*पहा आत्ता, जुगारातून कमविलेल्या पैशाची मी होळीच करतो.*
*(पैसे पेटवून पुन्हा मोठ्या स्वरात) - खबरदार...*
*आणि एक गोष्ट आयुष्यभर लक्षात ठेवा!*
*मेहनत नसलेला पैसा नको! अडमार्गाने आणि कोणत्याही सोप्या मार्गाने पैसे कमवू नका!*




चित्रकार : घनश्याम देशमुख

# बाळासाहेब ठाकरे यांचे लहानपण

'शुद्ध बीजापोटी। फळे रसाळ गोमटी।।' बालमन हे कोवळे असते, ती एक कोरी पाटी असते, त्या पाटीवर पालक जे काही संस्कार करतील तेच संस्कार त्या मुलांचे अथवा मुलीचे भावी आयुष्य ठरवीत असतात. ह्या वयात बालकांना संस्कारित करण्याची जबाबदारी ही प्रत्येक पालकाची असते, ती जबाबदारी आणि कर्तव्ये ठाकरे कुटुंबातील रमाबाईंनी आणि दादांनी उत्तमरीत्या पार पाडली.

बाळ ठाकरे यांचे लहानपण इतर लहान मुलांप्रमाणे गेले. अत्यंत शालीन परंतु आपल्या कृतीतून खळबळ माजवून देणारे बाळ म्हणून त्यांची प्रचिती सर्वांनाच म्हणजे घरातील नातेवाइकांना, बहिणींना आली होती. आपल्याकडे फार पूर्वीपासून असे मानले जाते की, मुलगा, मुलगी होणे पूर्ण पुरुषांच्या समागमावेळी असलेल्या विचारांवर अवलंबून असते. प्रबोधनकार शिवाजी महाराजांना नेहमीच आदर्श मानायचे, कधीकाळी तासन्तास ते शिवाजी महाराजांची गाथा वाचत असत, पोवाडे ऐकत असत, मंजुळाताई म्हणजेच लग्नानंतरच्या रमाबाई यांनीसुद्धा गर्भसंस्कार पुरेपूर केलेले असणार, त्याशिवाय अशा-प्रकारचा तेजस्वी पुत्र प्राप्त होणे शक्य नाही. बाळासाहेब ठाकरे यांच्या कर्तृत्वावरून असे जाणवते की हनुमानचालिसा, रामायण, भगवद्‌गीता, तुकारामगाथा, श्रीमत् दासबोध, शिवाजी महाराजांची गाथा अशा अनेक प्रकारे रमाबाईंनी पुण्यामध्ये असताना गर्भसंस्कार केलेले असावेत. कदाचित गर्भसंस्कार करताना त्यांनी चित्रकलेचा-सुद्धा वापर केला असावा. त्याशिवाय असा तेजस्वी व्यंगचित्रकार होणे नाही. प्रबोधनकार फार कडक स्वभावाचे आणि शिस्तीचे होते. प्रबोधनकारांस त्यांच्या मुली आणि मुले दादा म्हणून हाक मारायचे.

दादांनी मुलांना नेहमी सत्य बोला हे शिकविले आणि दादासुद्धा नेहमी सत्याने वागले, चालले आणि बोलले. असे म्हटलेलेच आहे,

**"बरे सत्य बोला यथातथ्य चाला ।**
**बहू मानिती लोक तेणे तुम्हाला ।।"**

हे दादांनी बाळ ठाकरे आणि इतर मुलांच्या मनावर अगदी रेखीवपणे कोरले. त्यामुळेच ठाकरे घराण्यातील सर्वच मुलांनी नाव कमावले.



श्रीमत् दासबोधात असे म्हटले आहे,

**''वरी चांगले अंतरी गोड नाही ।**
**तया मानवाचे जिणे व्यर्थ पाही ।।**

**वरी चांगले अंतरी गोड आहे ।**
**तयालागी कोणी तरी शोधिताहे ।।**

अशाप्रकारे 'बोले तैसा चाले' वरूनही चांगले आणि अंतरीसुद्धा अशा स्वरूपाचे 'प्रबोधन'कार होते.

हळूहळू बाळ मोठा होत होता आणि 'प्रबोधन'कारांची कामांची व्याप्ती वाढतच होती. ते नेहमी कामात व्यग्र असायचे पण कधीकधी वेळात वेळ काढून मुलांच्याबरोबर मनसोक्तपणे खेळायचेदेखील. 'प्रबोधन'कारांना घरात लक्ष देण्यासाठी वेळ जरी नसला तरी कधी कधी अगदी लहान लहान गोष्टींकडे लक्ष द्यायचे. मुलांना संस्कार कसे द्यावेत, त्यांना कोणती गोष्ट शिकवली पाहिजे, कोणती सवय लावली पाहिजे यावर अत्यंत नियोजनबद्धरीत्या ते काम करीत होते. त्यानुसार लहानपणापासून कुटुंबातील मुलींवर आणि मुलांवर संस्कार करण्यासाठी ते प्रयत्नशील होते. दादांनी आयुष्यामध्ये सर्व अडचणींचा सामना मोठ्या धीराने केला. दादांचे जीवन संघर्षमय होते, खरं तर ते दादांनीच स्वीकारले होते. प्रबोधनच्या माध्यमातून चालणारे कार्य अनेक अंधश्रद्धावादी, भोंदू लोकांना पटत नव्हते; ते दादांना धर्मभ्रष्टता, अब्राह्मण अशी विविध कारणे शोधून बदनाम करण्याचा प्रयत्न करीत होते. भोंदूपणावर आपली पोती भरणारी माणसं दादांच्या नातूवाड्यावर शेणफेक कर, दगड मार अशी दुष्कृत्ये करीतच होती. शिवाय दादांचा छापखाना बंद पाडण्यासाठी प्रयत्न करीत होते. पुण्यामध्ये दादांनी भाडेतत्त्वावर चालवण्यासाठी घेतलेल्या छापखान्याची केस कोर्टात चालू होती. त्या केसचा निकाल छापखाना मालकाच्या विरोधात लागल्यामुळे छापखान्यावर जप्ती आली. आता प्रबोधन पाक्षिक छापणार कोठे असा प्रश्न पुढे उभा राहिला. इतर छापखान्यांतून छापून पाक्षिक चालवणे शक्य नव्हते कारण ते परवडणारे नव्हते आणि दुसरा छापखाना सुरू करण्याचे आर्थिक पाठबळ दादांकडे नव्हते. आणि आपली तत्त्वे गहाण ठेवून काम करण्याची त्यांची तयारी नव्हती. नाइलाजास्तव दादांना 'प्रबोधन' पाक्षिक बंद करावे लागले.

चारही बाजूंनी अडचणीच अडचणी दिसत होत्या. अखेरीस दादांनी पुणे सोडून मुंबईमध्ये दादर येथे बस्तान मांडले. नाट्यलेखनावर अधिक भर देऊ लागले. त्यातून त्यांना थोडेफार उत्पन्नसुद्धा मिळू लागले. मुंबईत असताना दादांना आणखी दोन

पुत्रप्राप्ती झाली; त्यांची नावे श्रीकांत आणि दिवाकर अशी ठेवण्यात आली. प्रेमाने श्रीकांतला शिरी तर दिवाकरला बबन्या असे सर्वजण म्हणत. परंतु अगदी लहान वयातच बबनला तापाच्या निमित्ताने देवाघरी जावे लागले. दादांना, रमाबाईंना त्याचे फार दु:ख झाले. काळाच्यापुढे कोण काय करू शकतो. त्या घटनेमुळे दादांचीसुद्धा प्रकृती खालावली, आजारपणातून बरे होण्यासाठी डॉक्टरांनी थंड हवेचे ठिकाण सुचवले. काही दिवस दादा कर्जतमध्ये सहकुटुंब राहिले. परंतु फार काळ एकान्तवासात राहणे दादांना आवडेना. तब्येतीतसुद्धा सुधार होता. त्यामुळे हट्टाने दादा भिवंडीला (मुंबई) आले. पुन्हा आर्थिक प्राप्तीसाठी जास्त दगदग करायला नको, म्हणून एका इन्शुरन्स कंपनीत नोकरीला लागले आणि नाट्यलेखनाचा छंद जोपासत राहिले.

*(सर्व शिवसैनिकांना उद्देशून... बाळासाहेब ठाकरे म्हणतात)*
*देवापुढे वाकण्यापेक्षा आई-बापापुढे वाका, त्यांनी तुम्हाला जन्म दिला आहे. देवाने जन्म दिला नाही...*



चित्रकार : घनश्याम देशमुख



# कडवटपणाने संस्काराची पेरणी

लहानपण म्हणजे मोकळेपणा, मनाला जसे वागता येईल तसे वागायचे आणि चुकून जर कोणती चूक झालीच तर शक्यतो कोणी रागे भरत नाही. जर अभ्यासाच्या पुस्तकाचा पसारा केला तर आजकाल आईवडीलच आवरताना दिसतात. कोणतीही गोष्ट कोठेही फेकली जाते त्यामुळे ती योग्य वेळी तर सापडत नाहीच परंतु ते तुमच्या स्वभावालासुद्धा तमोगुणी करते, प्रत्येक व्यक्तीस यशस्वी होण्याकरिता सत्त्वगुणी असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. खरं तर लहान मूल मोठे होऊन काय होणार हे वयाच्या १० वर्षांपर्यंत पक्के होते कारण ज्या प्रकारचे संस्कार त्यावर केले जातात, त्यानुसार ती मुले घडतात. संस्कारामध्ये सर्वप्रथम आईवडिलांची देवाप्रमाणे सेवा करणे, वडीलधाऱ्या माणसांचा आदर, तुमच्या स्वत:पेक्षा दिलेल्या शब्दाची अधिक किंमत देणे त्यानुसार सातत्याने १२ वर्षे जर कोणतीही व्यक्ती शाश्वत सत्य बोलत असेल तर 'युग सूत्रा'नुसार १२ वर्षांनंतर ती व्यक्ती जे बोलेल तसेच होईल. त्याकरिता सर्वप्रथम ऐकणे ही शिकवण आहे, ऐकण्यामुळे धीर निर्माण होतो, आणि वादामध्ये संवाद आल्यास सुसंवाद निर्माण होऊन नाती आणखी जवळ येतात. जर तुम्ही लहानलहान गोष्ट नीट सांभाळू शकत नाही, तर मोठ्या गोष्टी कधीही सांभाळू शकत नाही. जेव्हा तुम्ही कोणतेही काम शिस्तीने करत असाल, तेव्हा तुमची भाषासुद्धा शिस्तबद्ध होईल. शिस्तबद्ध भाषा अधिक प्रभावी आणि परिणामकारक आहे.

संस्कार म्हणजे खरे काय ह्याबाबतचा अभ्यास दादा तथा 'प्रबोधन'कार ठाकरे यांना असल्यामुळे प्रत्येक गोष्ट शास्त्रशुद्धरीत्या करायचे असे त्यांनी ठरविले होते, त्यानुसार प्रबोधनकार जिथली गोष्ट तिथल्या तिथे ठेवण्याकरिता सांगत. जर कोणतीही गोष्ट त्या ठिकाणी मिळाली नाही की, मग दादा नेहमी रागवायचे आणि म्हणायचे, 'जी वस्तू जिथे पाहिजे. तेथे नसेल तर बाप बदलला की काय?' त्यामुळे सुरुवातीस अशा प्रकारच्या दरडावून वागण्यामुळे जी गोष्ट जेथे आहे तेथेच ठेवण्याची, स्वच्छ राहण्याची, घर स्वच्छ ठेवण्याची सवयच ठाकरे कुटुंबातील मुलामुलींना लागून गेली.

**'यश-राज' सूत्र**

कोणतीही गोष्ट तुम्ही सातत्याने २१ दिवस केली की मग ती तुमच्या आयुष्याची सवयच बनून जाते. त्यामुळे दादांनी कडवटपणाने उत्तम संस्कारांची रोपण ठाकरे घराण्यात केली. वस्तू योग्य ठिकाणी ठेवल्यामुळे सापडण्यास वेळ लागत नाही, शिवाय हवी ती गोष्ट वेळेत मिळाल्याने कामाची गती वाढते आणि आत्मविश्वाससुद्धा

वाढतो. Law of Giving & Receiving नुसार तुम्ही जे पेराल तेच उगवेल तेच तुम्हास प्राप्त होईल. जर तुम्ही इतरांना आदर दिलात आणि तुम्ही स्वत: स्वत:चा आदर करत असाल तर तुमचा इतर लोक आदर करतील तसेच Law of Relativity नुसार जशा प्रकारचे तुमचे नातेसंबंध भौतिक गोष्टींशी असतात, त्याच पटीत तुम्हास यश:प्राप्ती होते. त्यानुसार जर तुमच्या जीवनातील छोट्या छोट्या गोष्टींवर तुम्ही प्रेम केलेत, जी गोष्ट जेथे ठेवायला हवी तेथे ठेवल्यामुळे त्या वस्तूशी तुमचे योग्य नातेसंबंध स्थापित होतात. तसेच पुंजगती भौतिकशास्त्र आणि जीवनशास्त्र ह्यांमध्ये बऱ्याच अंशी साम्यता आहे.

मनुष्यप्राण्यांचे जीवन पुंजगती भौतिकशास्त्रावर आधारित आहे. त्यानुसार कोणती गोष्ट कोठे ठेवायची हे ठरवून त्यानंतर त्या गोष्टींचा आदर करून पुन्हा ती तेथेच ठेवणे हे जमल्यास, जनमतप्राप्तीसाठी तसेच योग्य टीमवर्क साधण्यासाठी आणि त्यानुसार मोठे कार्य सिद्धीस नेण्याकरिता योग्य व्यक्तीस योग्य ठिकाणी व्यवस्थापनामध्ये ठेवणे आणि त्याचा आदर करून त्यांस सांभाळणे हेसुद्धा ह्याच सवयीशी निगडित आहे.

ज्या व्यक्तींना जीवनात टीमवर्कच्या माध्यमातून मोठे मोठे कार्य सिद्धीस नेण्याचा विचार आहे, तसे तुमचे स्वप्न आहे, तर त्याकरिता तुमच्या अंगी छोट्या छोट्या वस्तूंशीसुद्धा योग्य नातेसंबंध आणि प्रेमभावना स्थापित करण्याची सवय लावा. जीवनात यशस्वी होण्याकरिता स्वच्छतेलासुद्धा अनन्यसाधारण महत्त्व आहे. स्वच्छतेतून मनात प्रसन्नता प्राप्त होते, तसेच त्यामुळे तुमची कल्पनाशक्ती वाढते, नवनिर्मितीचे विचार तुमच्या मनात निर्माण होतात. त्यामुळे जर तुम्ही तुमच्या आयुष्यात कोठेतरी अडकले असाल, तर सर्वप्रथम काही वेळ काढून तुमचे कपाट, रूम, घर, ऑफिस, टेबल सर्व काही प्रथम स्वच्छ करा. सर्व गोष्टींची यादी बनवा, त्यांची ठिकाणे ठरवा आणि त्या यादीनुसार ती गोष्ट तेथे ठेवा, गरज लागल्यास तिचा योग्य वापर करा आणि पुन्हा आदरपूर्वक तेथे ठेवा, असे पुढील २१ दिवस सातत्याने करा आणि पहा ती तुमची सवय होऊन जाईल.



# मी बी मारली नाही,
# मी मार खाणार नाही म्हणजे नाही...

बाळ ठाकरेंचे लहानपण इतर मुलांसारखे जरी असले तरी फार मोठी शिकवण देणारे होते. लहान वयातच पुण्यात राहत असताना त्यांनी आपल्या घरांवर-घरासमोर शेणफेक झालेली पाहिली होती. काही लोक समूहाने येऊन दादांना विरोध करतानासुद्धा त्यांनी पुण्यातील नातूवाड्यात पाहिले होते. मुंबईमध्ये आल्यानंतर हे विरोधात्मक वातावरण थंडावले होते. बाळ आणि श्रीकांत यांच्यामध्ये अंदाजे चार वर्षांचे अंतर होते. बाळ ओरिएंटल शाळेमध्ये मुंबईत असताना शिकत होते.

आईच्या संस्कारातून आणि दादांच्या शिस्तप्रिय शिकवणीतून बाळ, श्रीकांत घडत होते. आळशीपणा आणि कंटाळा ह्या शब्दांशी दादांचा ३६ चा आकडा होताच, आळस आणि कंटाळा हे शिस्तीमध्ये अडथळा निर्माण करतात हे दादांना माहीतच होते, त्यानुसार आळस आणि कंटाळा शब्द दादांनी बाळ आणि श्रीकांत यांच्या डिक्शनरीतून काढूनच टाकले होते. ठाकरे घराण्यातील सर्वांचीच शरीरयष्टी ही काडीसमान परंतु चपळ स्वरूपाची होती, त्याला बाळासाहेब ठाकरेसुद्धा अपवाद नव्हते.

आई-वडिलांनी बाळच्या जीवनाला शिस्त लावली. केशवराव ठाकरे यांच्या चित्रकला, गायन, नाट्य, वक्तृत्वामुळे बाळ यांच्या जीवनात चित्रकलेची विशेष आवड निर्माण झाली. पण वडिलांची म्हणजे 'प्रबोधन'कारांची इच्छा होती, आपल्या मुलांनी संगीतकार व्हावे, म्हणून बाळ यांना एक बुलबुल वाद्य दादांनी तथा प्रबोधनकारांनी आणून वाजवण्याचे नीट समजावून सांगितले. असे म्हटलेले आहे की, ज्या गोष्टीकडे तुमचे अधिक लक्ष लागते, त्या गोष्टीकडेच ऊर्जा वाहते

बाळाचे लक्ष इतिहास आणि अधिकाधिक व्यंगचित्रे यांकडे होते. छोटा भाऊ श्रीकांत यांचे मात्र लक्ष बुलबुल वाद्याकडे म्हणजे संगीताकडे होते. त्यामुळे बाळऐवजी श्रीकांत यांना संगीतामध्ये रस निर्माण झाला व पुढे उत्तम संगीतकार म्हणून ओळखले जाऊ लागले. मात्र त्या काळातल्या प्रसिद्ध व्यंगचित्रकार दिनानाथ दलालांसारखे आणि सर डेव्हिड लो यांच्यासारखे आपणही व्यंगचित्रकार व्हावे असे बाळ केशव ठाकरे यांचे मनोमनी स्वप्न होते, ध्येय होते आणि ते स्वप्न कसे पूर्ण झाले ते रहस्य पुढे पाहू या !

त्या काळात म्हणजेच १९३५ च्या काळात व्यंगचित्रकला फारशी माहिती नव्हती. पण अंगी असलेल्या निरीक्षणशक्तीद्वारे आजूबाजूच्या माणसांच्या बोलण्यातले,

स्वभावातले आणि शारीरिक हुबेहूब दिसणारे व्यंग नेमके हेरून चित्रकलेत चित्रित करणे याला व्यंगचित्रकला म्हणतात, ते बाळ ठाकरे यांनी जाणले होते.

जीवनचरित्र वाचायचे, इतिहासाची आणि  छत्रपती शिवाजी महाराजांची पुस्तकं वाचायचे, तासन्‌तास शिवाजीराजांच्या चित्राकडे एकटक पाहत राहायचे, त्यामुळे एक प्रकारे आत्मीयतेचे नातं शिवाजी महाराजांशी निर्माण झाले होते. फक्त शिवाजी महाराजच नव्हे तर लोकमान्य टिळक यांच्या 'शेंगा आणि टरफले' ह्या सत्यकथेचाही त्यांच्या मनावर मोठा परिणाम झाला होता.

'मी शेंगा खाल्या नाहीत मी टरफले उचलणार नाही, आणि मार खाणार नाही' अशी हट्टपूर्ण न्यायाची शेंगा आणि टरफले ही घटना बाळ गंगाधर टिळक (लोकमान्य) यांच्याबरोबर घडली तसेच बाळ केशव ठाकरे यांच्याबाबतीतही घडली.

'मी गुन्हा केलेला नाही आणि मी शिक्षा भोगणार नाही म्हणजे नाही' अशी घटना घडली. बाळ ठाकरे ओरिएंटल शाळेत शिकत असताना मधली सुट्टी झाली. एका उपद्‌व्यापी मुलाने बोरं खाऊन त्यातली बी त्या मुलीला मारली, पाठीमागून मारलेली बी कोणी मारली हे कोणीच सांगेना, नाइलाजाने त्या मुलीने मधल्या सुटीनंतर तासाला आलेल्या भांगले सरांकडे तक्रार केली. भांगले तसे फारच रागीट. एकदा का एखादी गोष्ट ठरवली की ते पिच्छा सोडत नसत. त्या मुलीने केलेल्या तक्रारीमुळे रागावलेल्या भांगले सरांनी सर्व विद्यार्थ्यांना ठणकावून विचारले, ज्याने कोणी हे दुष्कृत्य केले असेल त्यांने उभे राहावे. परंतु कोणीही उभे राहिले नाही. संतापलेल्या भांगले सरांनी सर्व वर्गालाच शिक्षा करण्याचे ठरवले. सर्व विद्यार्थ्यांना त्यांनी बाकावर उभे केले आणि दणादण छडीने मार देऊ लागले.

बाळ ठाकरे यांचा नंबर आला, बाळ काही केल्या हात पुढे करेनात! भांगले सरांच्या डोळ्याला डोळे भिडवत अगदी शाश्वत सत्यपूर्ण भावनेने आणि प्रचंड आत्मविश्वासाने बाळ म्हणाले, ''सर, मी बी मारली नाही, त्यामुळे मी मार खाणार नाही, हात पुढे करणार नाही.'' हट्टाने पेटलेल्या भांगले सरांनी अखेरीस पर्यवेक्षक हेडसरांना ही घटना सांगितली. हेडसर म्हणाले, हे बघ बाळ ठाकरे, ''शिक्षा पूर्ण वर्गाला केलेली आहे, त्यामुळे तुला ही शिक्षा झालीच पाहिजे.''

अगदी निश्चयाने आणि ठामपणे डोळ्यांना डोळे भिडवत मोठ्या आत्मविश्वासाने बाळ ठाकरे म्हणाले, ''सर, मी त्या मुलीला बी मारली नाही. जर मी गुन्हाच केला नाही तर शिक्षा का म्हणून भोगू?मी बी मारली नाही, मी मार खाणार नाही म्हणजे नाही...''

हेडसरांना बाळ ठाकरे यांच्या डोळ्यातला आणि बोलण्यातला खरेपणा जाणवला. आणि त्यांनी बाळ ठाकरे यांना वर्गात जायला सांगितले.



भांगले सरांनासुद्धा बाळ यांचा सच्चेपणा समजला. त्यांना बाळ ठाकरे –मधील लोकमान्य बाळ गंगाधर टिळक दिसले, लोकमान्य टिळकांसारखाच हा मुलगा काहीतरी करील यांची जाणीव हेडसरांना आणि भांगले सरांना झाली. भांगले सर वर्गात आल्यावर कुतूहलाने स्मितहास्य करत शिकवताना अनेकदा बाळ ठाकरे यांच्याकडे बघत राहत.

**'यश–राज सूत्र'**

जागृत मन आणि अंतर्जागृत मन अशी दोन मने आहेत. यापैकी अंतर्जागृत मन हे ९०% शक्तिशाली आहे. तर जागृत मनाची ताकद ही १०% आहे. लहान मुलांचे वयाच्या ७ ते १० वर्षापर्यंत अंतर्जागृत मन हे अत्यंत प्रभावी असते. त्यामुळे जशा प्रकारच्या सवयी त्यांना लावल्या जातात, त्या गोष्टींची आवड त्यांना निर्माण होते. भविष्याचे बीजारोपण झाले असे म्हटले जाते. बाळ ठाकरे यांच्या भविष्याचे बीजारोपण दादांनी दिलेले संस्कार,वातावरण यांनी निर्माण केले.

विद्यार्थी म्हणून शाळेत असताना बाळ ठाकरे यांचे रोखठोक बोलणे, नेहमी सत्य बोलणे, मोजकेच आणि मुद्द्याला धरून बोलणे असायचे. दादांनी इतिहास घडवलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांची अनेक पुस्तके बाळ यांना आणून दिली होती. शाळेत विविध ठिकाणी व्यंगचित्र–निर्मिती ते करत असत. एकदा तर त्यांनी फळ्यावर पडलेल्या भोकामध्ये एक खडू तिरका बसवला आणि फळ्यावर त्या खडूभोवती एका माणसाच्या चेहऱ्याचे चित्र काढले. खडूच्या भोवती त्या माणसाचं तोंड–ओठ आणि त्या माणसाच्या तोंडात खडूरूपी सिगारेट आहे, असे व्यंगचित्र निर्माण केले. वर्गातील शिक्षकाने त्याचे कौतुक करून त्या कलेस खतपाणी घातले.

शाळेबद्दल बाहेर फारसे चांगले बोलले जात नसे. शाळेचे नाव सांगताच काही लोक उपहासाने म्हणत... तुम्ही ओरिएन्टलची कार्टी तर... बाळ आणि श्रीकांत (त्यांचे धाकटे बंधू) यांचे राहणे, वागणे किती अगदी साधे होते. पांढरा शर्ट व लेंगा हा या दोघांचा वेश. कधी कुठे गडबड नाही की बडबड नाही. मात्र, शाळेतील गणेशोत्सवाच्या वेळी श्रीकांत ठाकरे यांचे व्हायोलिनवादन ऐकून ही मुले साधी नसावीत असे अनेकांना वाटले होते. विद्यार्थ्यांच्या हस्तलिखित मासिकात पुढे बाळासाहेबांनी रेखाटलेली चित्रे दिसू लागली. त्या वेळी राधा–कृष्णाचे चित्र काढणे ही फॅशन होती. बाळासाहेबांची तशी चित्रे पाहावयास मिळाली. १९४२ च्या आंदोलनाच्या काळात या शाळेतील कार्टी आघाडीवर होती.

बाळ ह्यांचे व्यंगचित्राबरोबर हस्ताक्षर अगदी सर्वोत्तम होते. बाळ ठाकरे यांच्यात कल्पनाशक्तीचा मोठा पुरवठा होता. प्रत्येक वेळेस नवीन कल्पना आणायची आणि

त्यावर अंमलबजावणी करणे हे त्यांना दादांनी शिकवलेलेच होते, त्यानुसार आपण हस्तलिखित मासिक काढायचे असे त्यांनी ठरविले. दादांनीसुद्धा त्यांना हिरवा सिग्नल दिला, परंतु हे करत असताना आणखी कोणाला तरी बरोबर घे असे दादांनी सुचविले. मित्रांशी चर्चाविनिमय करताना भाई भगत यांना हस्तलिखित मासिकाची चांगली माहिती आहे हे त्यांना कळले. योग्य कामासाठी योग्य व्यक्तीला घेण्याचे कौशल्य बाळ ठाकरे यांना अवगतच होते, त्यानुसार बाळ ठाकरे आणि भाई भगत यांची चांगलीच गट्टी जमली. बाळ ठाकरे यांची व्यंगचित्रकला आणि भाई भगत यांचे आकर्षक रेखीव हस्ताक्षर यामुळे प्रवासी मासिक महाराष्ट्रभर चांगलेच प्रसिद्ध झाले. प्रवासी मासिकाबद्दल शाळेमधून शिक्षकांकडून, मित्रांकडून, घरातून आणि समाजाकडून कौतुकाची थाप मिळाली.

विद्यार्थिदशेत दादांच्या मार्गदर्शनाखाली भाई भगत या मित्रांबरोबर बाळ ठाकरे यांनी व्यंगचित्रकला आणि उत्तम हस्ताक्षर यांच्या संयोगाने 'प्रवासी' नावाचे हस्तलिखित मासिक बनवून राज्यपातळीवरील बालसाहित्य संमेलनातील स्पर्धेत प्रथम पुरस्कार मिळवला. त्या वेळच्या बाल साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्र. के. अत्रे यांनीसुद्धा फार कौतुक केले, आणि त्यांच्या स्वाक्षरीनिशी त्यांना प्रमाणपत्रसुद्धा मिळाले.

चित्रकार होण्याची बाळ ठाकरे यांची जबरदस्त इच्छा होती. आर्थिक अडचणीमुळे ६० रु. फी भरण्यासाठी नसल्यामुळे सहावीत असताना ओरिएन्टल हायस्कूलची फी भरू न शकणाऱ्या बाळ ठाकरे यांना शाळेतून काढून टाकले आणि पुढे न शिकता बाळ ठाकरे यांना खरे ज्ञान जगरूपी, समाजरूपी, व्यवहाररूपी शाळेत, गुरूच्या माध्यमातून द्यायचे असे दादांनी ठरविले. व्यंगचित्रकलेतच भरपूर प्रगती करण्याचे बाळ ठाकरे यांनीही ठरविले आणि हातात व्यंगचित्रकलेकरिता कायमस्वरूपी ब्रश घेतला. व्यंगचित्रकलेतील गुरुवर्य दीनानाथ दलाल बाळचे गुरू बनले. गुरूप्रमाणे आपणही नाव कमवावे ही तीव्र आंतरिक इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली.

**'यश-राज सूत्र'**

"Examination is not real test of man's ability' अनेकदा असे पाहायला मिळते की, शाळेत जाऊन परीक्षा देऊन माणूस शिक्षित होतो पण फार कमी लोक सुशिक्षित होतात. मुळातच शाळेतील शिक्षणापेक्षा जीवनशास्त्र हे खूपच महत्त्वाचे आहे. बाळ ठाकरे यांचे वडील प्रबोधनकार म्हणत, ''शाळेत शिक्षण मिळतं पण ज्ञान मिळतंच असं नाही. खरं ज्ञान जगरूपी, समाजरूपी, व्यवहाररूपी शाळेत, गुरूच्या माध्यमातून, अनुभव, निरीक्षणशक्तीने मिळते. ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराज याच शाळेत शिकले आणि म्हणूनच त्यांनी अनमोल कार्य केलं.'' दादांनी आपल्या मुलांनासुद्धा हेच ज्ञान दिले. प्रत्येक आईवडिलांनी एक उत्तम पालक म्हणून याकडे लक्ष द्यायला हवे.



आईचीसुद्धा इच्छा होती की बाळने खूप खूप मोठे व्हावे, भविष्यकाळात गरिबीत न जगता श्रीमंतीत जगावे. त्या वेळेस बाळ आईला म्हणाले होत, ''आई तू अजिबात काळजी करू नकोस'' मोठेपणी मी तुला खूप सुखात ठेवीन, तुझ्या आशीर्वादाने मी खूप खूप मोठा होईन. आईनेसुद्धा त्यांना आशीर्वाद दिले. आशीर्वादानंतर बाळ ठाकरे व्यंगचित्रकलेत आणि अभ्यासात भरीव प्रगती करू लागले. 'ज्याचा स्वाध्याय बुडाला, तो बुडाला'! मुलांनी सुशिक्षित व्हावे, शाळेबरोबर जगरूपी शाळेत, समाजरूपी शाळेत, व्यवहाररूपी शाळेत, गुरूच्या सान्निध्यशाळेत शिकावे म्हणून दादांनी मुलांना सवय लावली. वाचण्याची आवड निर्माण केली. अधिकाधिक संस्काररूपी पुस्तके आणून दिली.

प्रबोधनकार नेहमी शिकवायचे, की देवापुढे मस्तक झुकवण्यापेक्षा आईवडिलांसमोर मस्तक झुकवा आणि त्यांच्या आज्ञेचे पालन करा. हे बाळ आणि श्रीकांतने आयुष्यभर नेहमी जोपासले आणि इतरांनासुद्धा शिकविले. प्रबोधनकारांची आणि त्यांच्या मुलांची शरीरयष्टी ही अगदी शेवटपर्यंत सारखीच होती. सडपातळ शरीर आणि चपळपणा हा बाळ यांच्या अंगी भिनला होता. ओरिएन्टल हायस्कूल हे शिस्तीचे धडे नेहमी गिरवीत असत, विद्यार्थ्यांमध्ये बिलकूल भेदभाव केला जात नव्हता, सर्वांना समान वागणूक दिली जात होती.

दादांनी जेवढे प्रेम केले तसेच वेळप्रसंगी त्यांना दंडात्मक शिक्षा करण्यासही त्यांनी कधीच मागेपुढे पाहिले नाही. शिक्षा करताना दादा सांगत, ''शिक्षेची भीती बाळगू नका तर त्याचा धाक म्हणून वापर करा, जेणेकरून भविष्यात त्या शिक्षेपासून चुका दुरुस्तीसाठी फायदा होऊन आयुष्य प्रगतीच्या दिशेने जाईल.''

बाळ १२ वर्षांचे होते, त्या वेळेस जत्रा असल्यामुळे बाळ जत्रेत फिरण्यासाठी काही मित्रांसोबत गेले. दादांनी बाळ यांना काही पैसे दिले होते. ते पैसे आवडीचा खाऊ खाण्यासाठी, मिठाई खाण्यासाठी किंवा भेळ खाण्यासाठी दिले होते. जत्रेत एका ठिकाणी सोरट सुरू होती. सोरट म्हणजे छोट्या प्रकारचा असलेला एक जुगार. त्या सोरटनुसार कोणत्याही गोष्टीवर पैसे लावायचे आणि ती सोरट आल्यास त्यानुसार ठरलेल्या पटीप्रमाणे सोरटीवर कमी-जास्त पैसे मिळत. त्यानुसार १ रुपयाचे १० रुपये नाहीतर ती सोरट न जिंकल्यास ते पैसे गेले अशा प्रकारे छोट्या स्वरूपाचा तो जुगार होता. खरं तर जुगार म्हणजे काय हे बारा वर्षांच्या बाळ ठाकरे यांना माहीत नव्हते. परंतु दादांनी दिलेले खाऊचे पैसे वाढवायचे अशा लहान मुलांच्या लोभातून सोरटमध्ये पैसे लावले. सुरुवातीस नशिबाने साथ दिली. बाळ यांच्याकडे असलेल्या चार रुपयांचे चक्क चारशे-पाचशे रुपये झाले. सुदैवाने लागलीच त्यांनी सोरटचा खेळ थांबवला, आणि बाळ मोठ्या आनंदाने

दादांना आपण जिंकल्याचे सांगण्यासाठी आणि पैसे देण्यासाठी दादांजवळ गेले. आनंदाने नाचत वडिलांच्या हाती पैसे दिले तर त्यांनी प्रथम अगदी प्रेमाने एवढे पैसे कोठून आणि कसे आले हे जाणून घेतले; मग घरातून आगपेटी मागविली व बाळ आणि त्यांच्या सर्व बहीण-बांधवांच्या समोर ते पाचशे रुपये जाळले. त्या वेळी दादांनी क्षणाचाही विलंब न करता, कोणताही लोभ न बाळगता ते पैसे जाळले आणि सर्वांना बजावले की, मेहनत नसलेला पैसा नको, आडमार्गाने आणि कोणत्याही सोप्या मार्गाने पैसे कमावू नका. याबद्दल दादा आग्रही होते आणि बाळासाहेबांनीसुद्धा इतरांना हेच शिकवले. दादांचा हा वडिलोपार्जित विचार आणि संस्काररूपी धडा फार काही शिकवणारा होता.

प्रबोधनकारांकडे अनेक लोक वेगवेगळ्या कारणांसाठी भेटण्यासाठी येत, तेव्हा दादांनी घरातल्या सर्वांना म्हणजे मीनाताईंना आणि सर्वच मुलांना आपली खरी संपत्ती कोणती हे पुढीलप्रमाणे सांगितले.

"उंबरठ्याबाहेर जितक्या अधिक चपला असतात तीच आपली खरी संपत्ती आहे. आणि ती कायम जपा."

*ओरिएन्टल शाळेत एका उपद्व्यापी मुलाने बोर खाऊन त्याचे बी एका मुलीच्या डोक्यात मारली. त्या मुलीने भांगले सरांकडे तक्रार केली...भांगले सरांनी सर्व विद्यार्थ्यांना ठणकावून विचारले... कोणीही उभे राहिले नाही.*

*संतापलेल्या भांगले सरांनी सर्व विद्यार्थ्यांना बाकावर उभे केले व छडीने मारू लागले. बाळ ठाकरे यांचा नंबर आला. बाळ काही केल्या हात पुढे करेनात...भांगले सरांच्या डोळ्याला डोळे भिडवत आत्मविश्वासाने बाळ म्हणाले... "सर मी बी मारली नाही... मी मार खाणार नाही... म्हणजे नाही."*



चित्रकार : घनश्याम देशमुख



# मातृछत्र हरपले

ज्याप्रकारे शिवाजी महाराजांना घडवण्यामध्ये जिजामातेचा फार मोठा हातभार होता; श्याम, साने गुरुजींच्या मागेसुद्धा त्यांची आईच होती; अनेक ऐतिहासिक कामगिरी करणाऱ्या यशस्वी व्यक्तींच्यामागे त्यांची आई किंवा पत्नीच होती हे आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये अनेकदा खरे ठरले आहे.

''स्त्री ही क्षणभराची पत्नी आणि आयुष्यभराची माता असते.'' बाळासाहेबांच्या यशामागेसुद्धा त्यांच्या आई, आजी आणि त्यांच्या पत्नीचा फार मोठा वाटा आहे. श्रीमत् दासबोधामध्ये असे म्हटले आहे की, जन्माला आलेला प्रत्येकजण काही ऋणे घेऊन आलेला आहे, त्यांपैकी मातृऋण, पितृऋण, कुळऋण, गोत्रऋण, आप्तेष्टांचे ऋण, देशाचे, समाजाचे, मातृभूमीचे ऋण अशी कित्येक ऋणे प्रत्येकाच्या डोक्यावर आहेत, त्यांपैकी आईचे ऋण हे फार मोठे आहे.

केशव सीताराम ठाकरे ह्या यशस्वी पुरुषाच्या मागे त्यांच्या पत्नीचा फार मोठा हात होता. केशवराव ठाकरे ह्यांना आपण 'प्रबोधन'कार, ज्येष्ठ समाजसेवक, परिवर्तनकार असे ओळखतो, त्यामागे त्यांच्या पत्नीची फार उत्तम साथ होती. भारतीय संस्कृतीमध्ये पत्नीस 'अर्धांगिनी' म्हणून संबोधिले जाते, ते खरेच आहे. 'प्रबोधन'कारांना आपल्या अर्धांगिनीबाबत प्रचंड आदर होता. बऱ्याचदा 'प्रबोधन'कार नाटक, व्याख्याने अथवा कोणत्या ना कोणत्या कामानिमित्त बरेचसे दिवस घराबाहेर असायचे, त्या वेळेस घरची पूर्ण कामे मुलांवर, यथायोग्य संस्कार करून घडवण्याचे काम रमाबाईंनी केले, रमाबाईंनी पतीला मोठेच सहकार्य केले.

रमाबाईंनी 'प्रबोधन'कारांच्यासमोर कधीही कोणत्याही स्वरूपाची आडकाठी निर्माण केली नाही, मग तो मुंबईवरून साताऱ्याला जाण्याचा निर्णय असो आणि साताऱ्यावरून अचानक पुण्याला जाण्याचा निर्णय असो. त्यांनी नेहमीच विश्वासाने 'पती हाच परमेश्वर' हे मानून निर्णयास पाठबळ पुरविले. 'प्रबोधन'कारांनी समाजामध्ये परिवर्तनाची केलेली नांदी यामधून त्यांना अनेकदा विरोध झाला, मग तो शारदाविवाहाला केलेला विरोध असो किंवा 'खरा ब्राह्मण' स्वरूपात समाजापुढे मांडलेला नाट्य स्वरूपातील विरोध असो, त्या विरोधात समाजाने कडाडून विरोध केला. अनेकांनी तर घरावर शेणफेक, दगडफेक केली, घरातल्या व्यक्तींना शिवीगाळ केली, चारचौघांत टोमणे मारले परंतु ह्या टोमणेबाजीचा आणि घरावर होणाऱ्या शेणफेकीचा आणि विरोधाचा कोणत्याही प्रकारचा तणाव पतिपत्नीच्या नातेसंबंधांवर दिसला नाही. हे सर्व रमाबाईंनी

निमूटपणे सहन केलेच पण आपल्या पतीला पाठबळ पुरवून ह्या संकटांना सामोरे जाण्याचे धैर्यसुद्धा पुरविले. आयुष्याच्या प्रत्येक क्षणी, प्रत्येक वळणावर, अडचणींना सामोरे जात त्या खंबीरपणे पतीच्या मागे उभ्या राहिल्या. पती परमेश्वर मानत आयुष्यभर झिजल्या. तत्त्वांच्या पुढे पैशाला महत्त्व न देणाऱ्या 'प्रबोधन'कारांमुळे त्यांनी फार गरिबीत दिवस काढले. नंतर पुण्यावरून कुटुंब मुंबईला आले, परंतु 'प्रबोधन' साप्ताहिक बंद झालेल्या धक्क्यामधून केशवराव पुरते बाहेर आले नव्हते. मुंबईला आल्यानंतर त्यांची तब्येत फार खराब झाली, पुन्हा हवापालट करण्यासाठी कर्जतला गेले. पुन्हा कर्जतवरून भिवंडी-मुंबईला आले, परंतु रमाबाईंनी नेहमीच त्यांना साथ दिली.

२७ फेब्रुवारी १९४४ रोजी रमाबाई स्वर्गवासी झाल्या. आपला जीवनसाथी हरपल्यामुळे 'प्रबोधन'कार तथा दादा उदास झाले होते. आजवर आयुष्याच्या प्रत्येक प्रसंगी अडचणींना सामोरे जाण्यासाठी सामर्थ्य पुरवणारी अर्धांगिनी आता दादांबरोबर नव्हती. बाळ ठाकरे यांच्या वयाच्या साधारणपणे १६ व्या वर्षीच आईचे छत्र हरपले. मातृनिधनामुळे बाळ ठाकरे सतत उदास असत. माझे दैवतच हरपले असे त्यांना वाटत होते. पण स्वर्गवासी आईच्या आत्म्याला आनंद मिळेल, समाधान लाभेल असे भव्यदिव्य कार्य करायचे, मोठे व्हायचे, नाव कमवायचे, आईचे स्वप्न पूर्ण करायचे या निर्धाराने बाळ ठाकरे पुन्हा उभे राहिले आणि व्यंगचित्रकलेत भरीव लक्ष घालू लागले. आईवडीलांचा बाळासाहेबांनी आयुष्यभर आदर केला, त्यांना नेहमी त्यांनी देवाप्रमाणे मानले.



## व्यंगचित्रसम्राट बाळासाहेब ठाकरे

बाळासाहेबांनी जीवनातील प्रत्येक गोष्टीचा काळ ओळखून त्याप्रमाणे ते जगले. खरे तर तो काळच व्यंगचित्रांचा होता. बाळासाहेबांच्या दृष्टीने व्यंगचित्रकला ही एक वेगळी दुनिया होती. व्यंगचित्रसम्राट होण्यासाठी त्यांना फार कटू अनुभवातून जावे लागले आणि काही गोड अनुभवसुद्धा आले. बाळ ठाकरे ते हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख, महामानव, लोकहितवादी, महाराष्ट्रपिता बाळासाहेब ठाकरे होण्यासाठीचे श्रेय बाळासाहेब व्यंगचित्रकलेला देतात. बाळासाहेबांच्या हातातील कुंचल्यामुळेच ते राजकारणाच्या शिखरावर पोहोचले. बाळासाहेब व्यंगचित्रसम्राट होण्याचे श्रेय प्रबोधनकार तथा दादा आणि बाबूराव पेंटर यांना देतात. दादांनी शिक्षणाबरोबर कलागुणांना वाव देणे महत्त्वाचे मानले, आणि तेच शिकवले. घरामध्येच कलेसाठी असलेल्या प्रोत्साहनामुळे बाळासाहेब व्यंगचित्रांकडे आकर्षित झाले. प्रथमत: बाळ ठाकरे बॅनबेरीच्या व्यंगचित्रांमधून आकर्षित झाले. बॅनबेरी दुसऱ्या महायुद्धाच्या काळात 'टाइम्स ऑफ इंडिया'त व्यंगचित्रे काढत असत. एक दिवस दादांनी 'बाळ' यांना पेपरमध्ये काय पाहतोस असे विचारले असता बाळ म्हणाले की ही चित्रे पाहतो. दादांनी पुन्हा विचारले, ''आवडली का ? ''बाळ म्हणाले, हो आवडली!'' ''दादा म्हणाले, ठीक आहे आजपासून काढायला लाग. पेन्सिलने काढून ठेव. मी संध्याकाळी आल्यानंतर पाहीन.'' दादा संध्याकाळी आल्यानंतर त्यांनी हात-पाय धुऊन चहा घेऊन विचारलं,''काय रे बाळ, काही केलंस का?'' त्यावर बाळ यांनी जे केलं होतं ते दाखवलं. ते पाहिल्यावर दादांनी त्यात काही सुधारणा सुचवल्या. दादांचा हात चांगला होता. दादा स्वत:सुद्धा एक उत्तम चित्रकार होते. त्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांना व्यंगचित्रसम्राट होण्यासाठी पहिले गुरू वडिलांच्या रूपातच मिळाले. बाळासाहेब ठाकरे वडिलांनंतर दीनानाथ दलाल, डेव्हिड लो यांस गुरुस्थानी मानतात.

बाळासाहेबांनी व्यंगचित्रकला शिकण्यासाठी जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्सला ६० रु. भरून प्रवेश घेतला होता. परंतु एकदा बाबूराव पेंटर हे शतपावली घालत असताना, त्यांनी ठाकरेंच्या घरात लावलेलं पेंटिंग पाहिले, आणि त्यांनी दादांना विचारले कोणी काढलेय? 'बाळनी काढले आहे' असे दादांनी म्हटल्यावर बाबूराव पेंटर यांनी बाळ यांना बोलावले आणि काय करतोस असे विचारले. त्यावेळेस जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्मध्ये ॲडमिशन घेतल्याचे बाळ ठाकरे म्हणाले. ते ऐकून बाबूराव पेंटर दादांना म्हणाले, ''अरे या पोराचा हात चांगला आहे, स्कूल ऑफ आर्टस्मध्ये पाठवून वेळ

फुकट वाया घालवू नको ! पाहिजे तर त्याला मी कोल्हापूरला घेऊन जातो, आणि चांगला आर्टिस्ट तयार करतो.'' बाबूराव पेंटर यांच्यामुळे बाळासाहेब स्कूल ऑफ आर्टस्‌ला गेले नाहीत, अन्‌ बाळासाहेबांचा हात वाचला.

**'यशराज सूत्र'**

आज शाळांमध्ये, कॉलेजमध्ये इतकी मुले जातात परंतु अनेक ठिकाणी असे दिसून आले आहे की, ते फक्त पढतमूर्ख बनतात. परंतु खऱ्या जीवनात मात्र त्याचा फारसा उपयोग होत नाही. कारण तुमच्यामधील कौशल्यांना, कलागुणांना वाढवण्याचे, तुमच्या आतमध्ये असलेल्या सुप्त शक्तींना जागृत करण्याचे कार्य फक्त ती व्यक्तीच करू शकते. दुसऱ्यांच्या सांगण्यावरून किंवा शिकवण्यामुळे फक्त तुम्हाला माहिती मिळते, माहितीनुसार मनुष्य कृती करतो आणि त्यातून काही अनुभव प्राप्त होतो. प्राप्त अनुभव म्हणजेच खरे ज्ञान होय. अनुभवातून आणि चुकांमधून मनुष्य स्वयंसुधारणा करतो त्या वेळेस त्या अनुभवाचे रूपांतर ज्ञानामध्ये होते.

बाळासाहेब असेही म्हणतात की, जर मी 'स्कूल ऑफ आर्ट्स'मध्ये गेलो असतो, तर त्या ठिकाणी शिक्षकांनी त्यांना जे माहिती आहे ते शिकवले असते. त्यामुळे माझ्या कल्पनाशक्तीला अधिक वाव मिळाला नसता. कारण स्कूलमधील कितीजण व्यंगचित्रकार किंवा नुसते चित्रकार झाले ? त्याच काळात बाळ ठाकरे यांच्यासमोर दीनानाथ दलालांची चित्रे समोर आली. त्यांच्या रेषा अत्यंत सुबक असायच्या. दलालांमुळे बाळासाहेब व्यंगचित्रकलेकडे अधिकच आकर्षित झाले. त्या वेळेस बाळासाहेब यांनी ओळखले की, १०० अग्रलेखांची ताकद एका व्यंगचित्रात असते. त्यानुसार व्यंगचित्रकार म्हणून फ्री प्रेस 'नवशक्ती'त नोकरीला लागले, आणि तिथे त्यांची व्यंगचित्रकला अधिकच बहरली.



# संसाराची घडी

बाळासाहेब कधी २१ वर्षांचे होतात आणि लगेच त्याचे लग्न लावून देईन असे दादांना वाटत होते. परंतु बहिणीचे लग्न झाल्याशिवाय आणि जीवनात स्थैर्य येत नाही तोपर्यंत लग्न करायचे नाही असे बाळासाहेबांचे म्हणणे होते. त्यानुसार सुधाताई, पमाताई, सुशीलाताई, सरलाताई अशा चारही भगिनींची लग्ने झाली, त्यांना सुळे, टिपणीस, गुप्ते आणि गडकरी अशा आडनावाच्या घराण्यात देण्यात आले. बहिणींची लग्ने झाली आणि नवशक्ती प्रेसमध्ये उत्तम नोकरीसुद्धा मिळाली. मराठी माणसांमध्ये असलेली 'पहिली नोकरी अन् मग छोकरी' ही म्हण पक्की ठरवत, योग्य ठिकाणी नोकरी लागल्यानंतर वैद्य घराण्यातील सरला यांच्याबरोबर वयाच्या २३व्या वर्षी बाळासाहेब यांचे लग्न झाले. लग्नानंतरचे सरला यांचे नाव मीना ठेवण्यात आले. मीनाताईंनी घराला घरपण देत जन्मभर त्यांची साथ केली.

बाळासाहेब आणि मीनाताई यांचे इतर नवीन जोडप्यांप्रमाणे लग्नानंतरचे जीवन अगदी आनंदात गेले. लग्न झाल्यावर बाळासाहेब परिवारात पूर्णपणे रमले. ऑफिसमधून घरी आल्यावर फिरायला जाणे, बागेत बसणे, नाटक-सिनेमा पाहणे; तर कधी चौपाटीवरील भय्याने बनवलेली पाणीपुरी रस्त्यावर उभे राहून समुद्राचा खळखळाट ऐकत खाणे, समुद्रलाटांबरोबर मनसोक्त खेळणे, अशा प्रकारे मुंबईच्या रमणीय वातावरणात बाळासाहेब परिवारात राहिले. बाळासाहेब हे सर्व जबाबदारी सक्षमपणे पूर्ण करत वयाच्या २३व्या वर्षापासून ते वयाच्या ३४व्या वर्षापर्यंत संसारात रममाण होऊन राहिले. बाळासाहेबांची ही दहा ते अकरा वर्षे पूर्णपणे पारिवारिक सुखात गेली.

''गेलेली वेळ कधीही परत येत नाही, आजचा दिवस म्हणजे माझ्या जीवनाचा शेवटचा दिवस, असे समजून जो आनंदात जगतो, त्याचेच खरे जीवन होय.'' आयुष्यात कोणत्या वयात काय करावे हे बाळासाहेबांकडून शिकावयास हवे. आयुष्यात ज्या वयात ज्या गोष्टींकडे लक्ष केंद्रित करायला हवे तेच बाळासाहेबांनी केले. त्यामुळे बाळासाहेब हे परिपूर्ण जीवन जगले असे म्हणता येईल.

लग्नापासूनच्या आठ वर्षांच्या कालावधीत बाळसाहेब आणि मीनाताई यांच्या संसारवेलीवर तीन फुले उमलली, थोरला बिन्दुमाधव, मधला जयदेवजी आणि धाकटा उद्धव. बाळासाहेबांनी आपल्या तिन्ही मुलांची टोपण नावेसुद्धा ठेवली होती. बाळासाहेब बिन्दुमाधव यांस टोपण नावाने 'बिंदा' तर जयदेव यांस 'टिब्बा' आणि उद्धवजी यांस 'डिंगा' असे उच्चारत असत.

# नोकरीला रामराम आणि मार्मिकचा 'जयश्रीराम'

संयुक्त महाराष्ट्राची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी १०८ लोकांनी दिलेल्या आहुतीचे बाळासाहेब हे साक्षीदार होते. नोकरी म्हणजे पोट भरण्याचे साधन हे बाळासाहेब जाणून होते. नवशक्ती प्रेस मॅनेजमेंटमधील कटकारस्थानांनासुद्धा बाळासाहेब कंटाळले होते. त्या वेळेस स्वत:चा उद्योग उभारायचा अशी त्यांनी भीष्मप्रतिज्ञा केली. फ्री प्रेस सोडून न्यूज डे चा प्रयोग सुरू केला परंतु तो यशस्वी होऊ शकला नाही. मग बाळासाहेब ठाकरे आणि त्यांचे बंधू श्रीकांत ठाकरे यांच्या साथीने मार्मिक नावाने साप्ताहिक सुरू करण्याचे ठरले. 'मार्मिक' हे नावसुद्धा 'प्रबोधन'कारांनी सुचविले. संयुक्त महाराष्ट्रातील दडपून गेलेला मराठी माणूस, ह्यास प्रेरित करण्यासाठी अवघ्या तीन महिन्यांतच मार्मिक साप्ताहिक सुरू झाले. बाळासाहेबांनी वयाच्या ३४व्या वर्षी मार्मिक ह्या साप्ताहिकाची सुरुवात १३ ऑगस्ट १९६० रोजी केली. महाराष्ट्राचे विविधांगी असलेले आणि उत्तम वक्ता आणि राजकीय नेता म्हणून ओळखले जाणारे आचार्य अत्रे यांच्या वाढदिवशी म्हणजे १३ ऑगस्ट रोजी साप्ताहिकाची सुरुवात झाली. महाराष्ट्रातील मराठीतील पहिल्या व्यंगचित्र साप्ताहिकाचे प्रकाशन; तत्कालीन मुख्यमंत्री मा. श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते झाले.

महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यातून खास करून मुंबईकर तर आवर्जून मार्मिकच्या अंकाची वाट पाहत होते. एका आठवणीत छगन भुजबळ सांगतात, ''आम्हा शिवसैनिकांना जणू काही खुराकच मार्मिकच्या स्वरूपात मिळत असे. त्यामुळे कधी आम्हाला पुढचा अंक मिळतो आणि वाचतो याचे कुतूहल आणि प्रचंड जिज्ञासा शिवसैनिकांमध्ये असायची.'' मराठी माणसाला तर मार्मिक अंकातील 'बोलणं' म्हणजे आपलीच वाचा वाटायची. अशा प्रकारे मराठी माणसावरील अन्यायाला वाचा फोडण्याचे धडाडीचे प्रयत्न मार्मिकच्या साप्ताहिक अंकांतून वारंवार होत होते.

शिवाजी महाराजांची जीवनशैली, राजेशाही वचन, एकदा बोलले की बोलले, एकदा पाऊल उचलले की उचलले मग माघार नाही. त्याचप्रमाणे व्यंगचित्र काढतानासुद्धा एकदा रेघ मारली की मारली, मग त्यावर पुन्हा पांढरा रंग लावणे नाही ह्या वृत्तीमुळेच पुढे जाऊन बाळ ठाकरे हे नाव प्रसिद्धीस आले. स्वत:च्या कलागुणांच्या जोरावर स्टुडिओमध्ये आर्टिस्ट म्हणून काम केले. आचार्य अत्रेंच्या नवयुगमध्ये, लोकमान्य



टिळकांच्या केसरीमध्ये, फ्री प्रेस- नवशक्ती अशा अनेक वृत्तपत्रांत त्यांची व्यंगचित्रे प्रसिद्ध झाली. आता व्यंगचित्रकार म्हणून त्यांच्या नावाला प्रसिद्धी मिळाली. शिस्त, वक्तशीरपणा, दणकेबाज मराठी बाणा, जिद्द, टापटीप राहणीमान यामुळे सर्वजण त्यांच्याकडे आदराने पाहू लागले. अपमान आणि अन्याय सहन करायचा नाही, त्यानुसार आपला अपमान करणाऱ्या दाक्षिणात्य अधिकाऱ्यांना ते आपल्या तडफदार वाणीने फटकारून काढत. बाळ हे आपल्या विचारांवर, कृतीवर ठाम असत; आणि अशा विविध छाप पाडणाऱ्या सद्‌गुणांमुळे आणि त्यांच्या कर्तृत्वामुळे, कलागुणांमुळे बाळ ठाकरे पुढे बाळासाहेब ठाकरे म्हणून ओळखले जाऊ लागले.

दक्षिण भारतातून अधिक तरुण महाराष्ट्रात येत होते. यांचा मी लेखक म्हणून खोलवर जाऊन अभ्यास करताना लक्षात आले की, पूर्वीपासून दक्षिण भारतात आईवडिलोपार्जित प्रॉपर्टीमध्ये अधिकार फक्त मुलीलाच होता. त्यामुळे लग्न झाल्यानंतर मुलगी वडिलानंतर आईवडिलोपार्जित प्रॉपर्टीमध्ये राहण्यास जात असे. मुलीची इच्छा झाल्यास ती काही प्रॉपर्टी भावास देत असे, पण त्यासाठी दिलेच पाहिजे अशा प्रकारची कायद्यामुळे कोणतीही तरतूद नव्हती. त्यामुळे मुलगा मोठा झाला की निरुपायास्तव नोकरीच्या शोधात घराबाहेर पडे. त्यामुळे भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत सर्वच वरिष्ठ पदांवर दक्षिण भारतीयांचे वर्चस्व होते. नंतरच्या काळात वडिलोपार्जित संपत्तीत मुलालासुद्धा अधिकार देण्याचे कर्नाटक, तामिळनाडूमध्ये केंद्र सरकारच्या वतीने ठरवले, तसेच महाराष्ट्रात मुलांबरोबर मुलीलासुद्धा समान हक्क देण्याचे केंद्र सरकारने ठरविले.

महाराष्ट्रात मात्र उलटा नियम होता. त्या वेळी आईवडिलोपार्जित प्रॉपर्टीमध्ये मुलाचा हक्क मोठा होता. बहिणीस साडी चोळी दिली तरी ती खूश असायची. परंतु ज्यांच्याकडे प्रॉपर्टीच नाही अशा तरुणांना मात्र दक्षिण भारतीयांच्या वर्चस्वाचा फार मोठा त्रास होत असे. क्षमता असतानासुद्धा मराठी माणसाला डावलले जात होते. मराठी माणसांस घाटी म्हणून सर्व ठिकाणी हिणवले जात होते. घाटी हा शब्दसुद्धा अभिमानाने घेण्याची प्रेरणा बाळासाहेब देत होते.

मराठी माणसाचे स्वत:चे, स्वतंत्र राज्य स्थापन झाले होते, पण मुंबईतील व्यापार-उदीम, कारखानदारी, कापडगिरण्या अशा अनेक संस्थांची खरी महत्त्वाची निर्णय घेणारी व्यवस्थापकीय सूत्रे खासकरून दक्षिण भारतीय कम्युनिटीकडे होती. सार्वजनिक उद्योगातील वरिष्ठ पदेसुद्धा दक्षिण भारतीय लोकांकडे होती. त्यामुळे वरिष्ठ पदावरील नोकऱ्या खासकरून दक्षिण भारतातून आपल्या जवळील लोकांना बोलावून मोठे

पदाधिकारी देत होते. कालांतराने बाळासाहेबांनी ती अनोखी घोषणा दिली, ती घोषणा प्रचंड लोकप्रिय झाली. महाराष्ट्रात मद्रासवरून येणाऱ्या लोकांचे लोंढे थांबावेत म्हणून - ''हटाव लुंगी - बजाव पुंगी'' ही घोषणा बाळासाहेबांनी दिली. त्यामुळे महाराष्ट्रातली संपूर्ण मराठी माणसे एकजुटीने उभी राहिली.

कोणत्याही गोष्टीची निर्मिती किंवा प्राप्तीसाठी सर्वप्रथम विचारांचे बीजारोपण करावे, खत-पाणी घालावे, त्या विचारांस अधिकाधिक प्रबळ बनवावे. त्या विचारांस पचवावे आणि नंतर अंतर्मनातील प्रेरणेनुसार पाऊल उचलावे, यश तुमचेच आहे.

**'यश-राज सूत्र'**

योग्य वेळी योग्य पाऊल उचलणे आणि त्या गोष्टीची पूर्तता करण्यासाठी अंतर्मनातील प्रेरणेनुसार कृती करणे हे महत्त्वपूर्ण आहे. बाळासाहेब यांनी अंतर्मनातील प्रेरणेनुसार प्रथम 'वाचा आणि थंड बसा'द्वारे जनतेत विचारांचे बीजारोपण केले. त्यास खत-पाणी घातले; आणि त्या बीजाचे रोपटे होईपर्यंत त्याची काळजी घेतली आणि पक्का निर्धार निर्माण झाल्यानंतर, बीजाचे रोपटे सुरक्षित झाल्यानंतर 'वाचा आणि थंड बसा' ऐवजी 'वाचा आणि उठा' असे वादळ निर्माण केले.

मराठी तरुणांना कोठेही नोकरी मिळत नव्हती म्हणून मार्मिक मधून बाळासाहेबांनी 'वाचा आणि थंड बसा', 'मराठी माणसाच्या मुंबईत परप्रांतीय येतात' या विषयावर लिहिण्यास सुरुवात केली. आपल्या जातभाईंना, गाववाल्यांना वशिल्याने नोकरी लावतात आणि मराठी माणूस मात्र हे चूपचाप सहन करतो. पण आता शांत होऊन यावर विचार करा असे उद्दिष्ट्य लक्षात घेऊन यावर अग्रलेख लिहिण्यास सुरुवात केली. काही दिवसांनी बाळासाहेबांनी 'वाचा आणि थंड बसा' ऐवजी 'वाचा आणि उठा' हे अर्थपूर्ण नाव स्तंभाला दिले आणि महाराष्ट्रातील तमाम मराठी तरुणांना अन्यायाविरुद्ध पेटून उठण्याचा आदेशच दिला. अनेक मराठी तरुण याकडे आकर्षित झाले.

मुंबईत परप्रांतीयांचा भरणा वाढत चालला, त्या वेळी मराठी माणसाचा कैवार घेऊन ठाकरे उभे राहिले, त्यांना अनेक सवंगडी येऊन मिळाले. त्याच दरम्यान पुण्यात धार्मिक तणावाचे वातावरण होते. सन १९६५ च्या सुमारास कसबा पेठेतील जय महाराष्ट्र मंडळाने सामाजिक देखावा मांडला होता. मंडळाचे प्रमुख कार्यकर्ते काका वडके यांनी 'मार्मिक'चे संपादक या नात्याने ठाकरे यांना देखाव्याच्या उद्घाटनासाठी बोलाविले होते. ती बाळासाहेबांची पुण्यातील पहिली जाहीर सभा होती. ती सभाही वैशिष्ट्यपूर्ण ठरली. संघटना उभारायची याचे सूतोवाच ठाकरे यांनी कसब्यातील त्या सभेत केले. मराठी माणसासाठी संघटना बांधायला हवी, असे ठाकरेंनी त्या सभेत



सांगितले. त्यानंतर शिवसेना स्थापन झाली.

बाळासाहेबांचे ज्वलंत राष्ट्रनिष्ठेचे विचार ऐकण्यासाठी महाराष्ट्रातील ठिकठिकाणी गणेशोत्सव मंडळे त्यांना निमंत्रण देऊ लागली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत बाळासाहेबांच्या सभा होऊ लागल्या. मराठी माणसाच्या अस्मितेचा, जीवनाचा, अन्यायाचा विषय असल्याने बाळासाहेब महाराष्ट्राला आपले वाटू लागले आणि सभेला प्रचंड गर्दी होऊ लागली.

**'यश–राज सूत्र'**

लहानपणी लागलेल्या अगदी छोट्या छोट्या सवयी, नियम, संस्कार, भविष्याचे बीजारोपण करीत असतात. दादांनी बाळ यांना शिकवलेली शिस्त, टापटीप, एकदा केलेली गोष्ट परत परत करायची गरज नाही, आपल्या निर्णयक्षमतेवर ठाम राहणे, एकदा टाकलेले पाऊल मागे घ्यायचे नाही, एकदा केले म्हणजे केले त्याच्यात बदल नाही याच संस्कारांमुळे बाळ ठाकरे हे बाळासाहेब ठाकरे झाले आणि पुढे जाऊन करोडो लोकांनी त्यांना स्वीकारले.

स्वत:चे कोणतेही काम सुरू करणे त्यासाठी मनातील दृढ संकल्प अत्यंत महत्त्वाचा आहे. अनेक वर्षे नोकरी केल्यानंतर मनातील दृढ संकल्पामुळेच बाळासाहेब ठाकरे यांनी स्वत:चे मार्मिक साप्ताहिक सुरू केले.

मार्मिकच्या छपाईच्या, प्रकाशन सोहळ्याच्या आयोजनाच्या धावपळीत २७ जुलै १९६० रोजी बाळासाहेबांना तिसरा मुलगा झाला, त्याचे नाव उद्धव ठेवण्यात आले.

व्यंगचित्रांच्या माध्यमातून प्रभावी लेखणीच्याद्वारे सुस्त जनतेला पुनश्च जागृत करण्याचे कार्य बाळासाहेबांनी आपल्या मार्मिकद्वारे सुरू केले. 'मार्मिक' नावाचे प्रचंड वादळ उभे केले. मार्मिकला प्रचंड मोठा वाचकवर्ग लाभला. मराठी माणसांवर होणाऱ्या अन्यायाशी लढणारे मार्मिक साऱ्या महाराष्ट्रभर प्रसिद्ध झाले. प्रचंड आत्मविश्वास आणि धैर्याने निर्भीड पत्रकारिता करत त्यांनी थोरामोठ्यांचे ढोंग उघडकीस आणले.

# मराठी माणसाचे स्वराज्य – शिवसेना

महाराष्ट्र हे मराठी माणसांचे राज्य आणि मुंबई महाराष्ट्राची राजधानी. आपल्याच मुंबईत मराठी माणूस अवमानित जिणे जगत होता. शहरात मराठी लोकांचे प्रमाण फारच कमी झाले होते. अ–मराठी माणसे सरकारी नोकऱ्यांवर खुलेआम डल्ला मारत होती. काँग्रेस पुढाऱ्यांना मुंबईची आणि मुंबईतल्या मराठी माणसांची पर्वा नव्हती. नेतेमंडळीचे सगळे राजकारण ग्रामीण भागात रुजलेले होते, मराठी मन अस्वस्थ होते. ह्या विषयावर 'मार्मिक'ची चळवळ तुफान होती, रक्त गरम करून सोडणारी होती. विचारांचे जाळे पेटतच होते, व्याख्याने, सभा असा तडाखेबंद कार्यक्रम होतच होता. चळवळीचा व्याप वाढतच होता; संघटना झाली पाहिजे असे काळ खुणवत होता; त्यातून ठाकरे कुटुंबीयांच्या ''७७ कदम मॅन्शन, शिवाजी पार्क, दादर मुंबई–२८'' या पत्त्यावरील घरात मराठी माणसांची ये जा सुरू झाली. बाळासाहेबांच्या स्वभावामुळे त्यांच्याशी हजारो लोक मनापासून जोडले गेले. हजारो लोकांचे चाहते झालेले बाळासाहेब, यांना पुढे 'प्रबोधन'कारांनी प्रश्न विचारला आणि अगदी जवळील लोकांच्या चर्चेमधून संघटना सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. संघटनेला काय नाव द्यायचे हा प्रश्न बाळासाहेबांना पडला. बाळासाहेबांची शिवाजी महाराजांवर प्रचंड निष्ठा जडली होती. अर्थात शिवाजी महाराजांची पुस्तके वाचावी असा आग्रह 'प्रबोधन'कारांचा होता. त्यामुळे बाळ यांचे शिवाजी महाराजांवर असलेल्या प्रेमाबद्दल 'प्रबोधन'कार जाणून होते. बाळ लहानपणी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेकडे तासन्‌तास बघत असताना 'प्रबोधन'कारांनी पाहिले होते. कधी कधी शिवकालीन राजेशाही भाषेत बोलण्याची कलासुद्धा बाळासाहेब शिकले होते. पुढे जाऊन राजेशाही थाटातील भाषणशैली त्यामुळेच प्राप्त झाली असावी. ह्या सर्वांच्या पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांना आदर्श मानून त्यांच्या विचारांवर आणि कार्यावर प्रेरित होऊन संघटना निर्माण करायची असे ठरले आणि काम सुरू केले. दादांनी बाळ ठाकरेंना त्या दिवशी विचारले, ''काय रे बाळ, हे व्याख्यान, दौरे, भाषण असं सगळं तुझं सुरू आहे, मराठी मन ढवळून निघतं आहे. ह्या सगळ्याला काही आकार देणार आहेस की नाही?'' बाळ उद्‌गारले, ''विचार तर करतो आहेच...'' ''किती दिवस नुस्ता विचारच करत बसणार आहेस? ''लवकर पाऊल टाक, नाव ठरवलयंस संघटनेचं?'' त्यावर बाळासाहेब म्हणाले – ''अजून काही डोक्यात पक्कं नाही?''

मी सांगतो संघटनेचे नाव ''शि–व–से–ना''.

हे नाव बाळासाहेबांना अत्यंत आवडले.



तो दिवस १९ जून १९६६. रविवारचा सुट्टीचा मुहूर्त आखून बाळासाहेबांनी त्यांचे आदर्श असलेले 'प्रबोधन'कार ठाकरे यांच्या हस्ते नारळ फोडून 'शिवसेना झिंदाबाद' मंत्र पुकारला. जणू काही आपल्या निवडक साथीदारांसह आपल्या शिवाजी पार्कवरील छोटेखानी घरात म्हणजेच घरमंदिरात शिवसेनेची शपथ घेतली.

बाळासाहेबांनी आयुष्यभर शिवसैनिकांना आदेश दिला की,

''देवापुढे वाकण्यापेक्षा आईबापांपुढे वाका, त्यांनी तुम्हाला जन्म दिला आहे. देवाने जन्म दिला नाही.''

हे बाळासाहेबांनी आपल्या आयुष्यातही पाळले - आपल्या आईवडिलांचे एक आज्ञाधारी पुत्र म्हणूनच ते आयुष्यभर राहिले; म्हणूनच की काय त्यांना लाखो आज्ञाधारी शिवसैनिक लाभले. शिवसेनाप्रमुख म्हणजे वाघ आणि शिवसेनेचे चिन्ह म्हणजे धनुष्यबाण. ज्याप्रकारे शिवाजी महाराजांनी त्यांच्या निवडक मावळ्यांसह स्वराज्याची शपथ रायरेश्वराच्या मंदिरात देवापुढे घेतली; तशाच प्रकारे आपल्या निवडक शिवसैनिकांसह घररूपी मंदिरात आपल्या देवापुढे (वडिलांपुढे) त्यांनी मराठी स्वराज्याची शपथ घेतली. सुरुवातीस मराठी माणसांची संघटना म्हणून ती स्थापन झाली. मराठी माणसांची संघटना स्थापन झाल्यानंतर मार्मिक साप्ताहिकाच्या अंकात बाळासाहेबांनी असे जाहीर केले की, मराठी माणसांच्या हक्कावरील आक्रमण परतवून लावण्यासाठी शिवसेनेची सदस्यनोंदणी लवकरच सुरू होणार, त्यासाठी अधिक माहितीकरिता मार्मिकचा पुढील अंक पहा.

शिवसेना सदस्य नोंदणीचे फॉर्म छापून तयार झाले, पुढील अंकात बाळासाहेबांनी 'शिवसेनेचे-मराठी माणसाच्या संघटनेचे नोंदणीकृत सदस्य व्हा' असे आवाहन केले आणि सदस्यनोंदणीच्या फॉर्मच्या विक्रीचे काम धडाक्यात सुरू झाले. बाळासाहेबांच्या दादरच्या घरासमोर शेकडो तरुणवर्गाने गर्दी केली. अवघ्या दोन दिवसांत २० हजार सभासद सदस्य नोंदणी फॉर्मची विक्री झाली. मोठ्या संख्येने मराठी तरुण सभासद सदस्य नोंदणी फॉर्म मिळवण्याकरिता मार्मिकच्या कचेरीकडे गर्दी करू लागले. ज्या वेळेस शिवसेना संघटनेची सभासद नोंदणी सुरू झाली तेव्हा शेकडो मराठी माणसे उपस्थित होती. पुढे जाऊन त्या संघटनेमध्ये काही तरतूद करून राजकीय पक्षात रूपांतर करण्यात आले. शेकडो मराठी तरुण शिवसेनेचे सभासद झाले. मी शिवसेनेचा नोंदणीकृत सभासद झालो असे मोठ्या अभिमानाने आपल्या इतर मराठी बांधवांना सांगू लागला आणि तुम्हीसुद्धा शिवसेनेचे सभासद व्हा असे आवाहन करू लागले, त्यामुळे शेकडो मराठी तरुणांच्या झुंडीच्या झुंडी येऊन शिवसेनेच्या सदस्य होऊ लागल्या.

## शिवसेनेचा पहिला दसरा मेळावा.

शिवसेना म्हणजे तरुणांची संघटना असे समीकरण बनले. ह्या तरुणांना एकसंध ठेवणारा बाळासाहेबांच्या विचारांचा धागा होता.

संघटनेची कार्यप्रणाली आणि उद्दिष्टे ही सर्व शिवसैनिकांपर्यंत पोहोचली पाहिजेत असा 'प्रबोधन'कारांचा आग्रह होता. कारण 'प्रबोधन'कार सतत म्हणत एकी हेच बळ, त्यानुसार सर्व शिवसैनिकांचे आभार मानण्याकरिता आणि 'शिवसेना' संघटनेची उद्दिष्टे आणि कार्यप्रणाली सर्व शिवसैनिकांपर्यंत पोहचवण्याकरिता दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर जाहीर सभा घ्यावी असा निर्णय बाळासाहेबांनी घेतला.

त्यांचे मित्र प्रख्यात विचारवंत धों. वि. देशपांडे यांनी ही सभा एखाद्या छोट्या हॉलमध्ये घ्यावी असे सांगितले; बाळासाहेबांनी मान डोलावली. त्यांचा सल्ला ऐकून घेतला, त्यावर कोणतेही उत्तर दिले नाही.

जाहीर सभेचा निर्णय बाळासाहेबांनी 'प्रबोधन'कारांना ऐकवला. 'प्रबोधन'कारांना ते आवडले आणि पुढील प्रश्न त्यांनी विचारला की ही जाहीर सभा करणार कोठे?

बाळ लागलीच उद्गारले – ''शिवाजी पार्कवर!'' त्यांच्या ह्या उत्साहाच्या भरात उद्गारलेल्या वाक्याचे 'प्रबोधन'कारांना आश्चर्य वाटले. ते म्हणाले शिवाजी पार्क हे मैदान फार विस्तीर्ण आहे, जर तेवढ्या प्रमाणात माणसं जमली नाहीत तर उगाचच फजिती होईल, शिवाय कोणाच्या भरवशावर तुम्ही एवढा मोठा निर्णय घेत आहात, असा प्रश्न 'प्रबोधन'कारांनी हटकून विचारला.

बाळ उद्गारले – ''शिवाजी पार्कवर आजवर अनेक ऐतिहासिक सभा झाल्या. पंडित जवाहरलाल नेहरू, महात्मा गांधी अशा अनेक बड्या नेत्यांच्या येथे जाहीर सभा यशस्वी झाल्या आहेत, त्यामुळे येथील जाहीर सभा यशस्वी होईल. शिवाय शेकडो मराठी तरुण शिवसेनेचे नोंदणीकृत सभासद झाले आहेत, त्यानुसार मराठी तरुणांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे ही सभा यशस्वी होईल. त्याशिवाय शिवसेना संघटनेची व्याप्ती वाढवण्याकरिता आणि शिवसेनेत अधिकाधिक तरुणांना, मराठी माणसांना सामील होण्याचे आवाहन करण्याकरिता मी महाराष्ट्राचा दौरा आखणार आहे. ठिकठिकाणी कोपरा सभा करून शिवसेनेत सामील होण्याचे आवाहन करणार आहे. त्यामुळे मला खात्री आहे की, शिवाजी पार्कवरील जाहीर सभेसाठी हजारो मराठी लोक येतील आणि शिवसेनेचे शिवसैनिक होतील.''

बाळासाहेबांचा प्रचंड आत्मविश्वास आणि नियोजन पटल्यामुळे प्रबोधनकारांनी



शिवाजी पार्कवर मैदानाच्या मध्यभागी स्टेज उभारून जाहीर सभा घेण्यास हिरवा कंदील दाखविला.

प्रबोधनकार म्हणजे बाळासाहेबांचे दैवत, खुद्द देवानेच हिरवा कंदील दाखवल्याने आत्मविश्वास आणखीनच बळकट झाला. बाळासाहेबांनी बोलल्याप्रमाणे आणि आखलेल्या नियोजनानुसार अंमलबजावणी केली. बाळासाहेबांनी शिवसेनेच्या वाढीकरिता, प्रसारासाठी, प्रसिद्धीसाठी महाराष्ट्राचा दौरा आखला. महाराष्ट्राचा दौरा झाल्यावर शिवाजी पार्कवरील दसरा मेळाव्याची जय्यत तयारी सुरू केली. त्या काळात मोबाईल नव्हते. संपर्काची साधनेही नव्हती. तरीही ठिकठिकाणी माउथ टू माउथ पब्लिसिटीनुसार सर्व नोंदणीकृत शिवसैनिकांपर्यंत ही जाहीर सभेची बातमी पोहचली. आपल्या मराठी माणसांची संघटना, आपल्या शिवसेनेची मराठी माणसांची जाहीर सभा. त्यांचे मराठी माणसांमध्ये फार कुतूहल होते, जिज्ञासा होती. बाळासाहेब अगोदरच सर्वांचे आदर्श बनले होते. विविध कोपरा-सभांमधून बाळासाहेबांच्या विचारपूर्वक भाषणांची त्यांना प्रेरणा मिळत होतीच. त्यामुळे बाळासाहेबांच्या विचारांचे सोने लुटण्याची ही सुवर्णसंधीच आहे असेच सर्व मराठी तरुणांना वाटत होते. त्यामुळे स्वयंस्फूर्त होऊन एक मराठी माणूस दुसऱ्या मराठी माणसांना शिवसैनिक म्हणून जोडत होता. दसरा मेळाव्याच्या जाहीर सभेची माहिती देत होता. मार्मिक साप्ताहिकाचा अंक २७ ऑक्टोबर रोजी प्रकाशित झाला. त्यामध्ये सर्वांसाठी पुढीलप्रमाणे आमंत्रण बाळासाहेबांनी दिले.

बाळासाहेबांनी जसे ठरवले होते अगदी तसेच झाले. शिवाजी पार्क खच्चून भरले होते. दसरा म्हणजे आपल्या जवळच्या नातेवाइकांना, शेजाऱ्यांना, मित्रपरिवारांस भेटणे असे ह्या सणाचे महत्त्व होते. दसरा मेळावा म्हणजे आपल्या मराठी माणसांना भेटण्याची सुवर्णसंधीच असे समजून हजारो लोक शिवाजी पार्कवर आलेले होते.

आपल्या बाळचे हे कार्य आणि लोकप्रियता पाहून 'प्रबोधन'कारांचे डोळे आनंदाने पाणावले आणि ते म्हणाले, ''आजवर ठाकरे कुटुंबाचा असलेला हा बाळ मी तुम्हाला ह्या महाराष्ट्रातील मराठी माणसाला आज देऊन टाकला आहे.'' आता त्याच्या पाठीशी उभे राहण्याचे कार्य तुम्हाला पार पाडायचे आहे, अशा शब्दात 'प्रबोधन'कारांनी आवाहन केले.

**'यश-राज सूत्र'**

जर तुम्हाला जे पाहिजे ते मिळवण्याची मागणी तुम्ही रात्री झोपण्यापूर्वी डोळे बंद करून चित्र निर्माण केले असता; आणि ते प्रत्यक्षात झालेलेच आहे असा विश्वास ठेवला असता ती गोष्ट अगदी सहजतेने पूर्ण होते. येथे कळत नकळत बाळासाहेबांच्या

तीव्र इच्छाशक्तीमुळेच आणि प्रचंड विश्वासामुळेच बहुसंख्य गर्दी शिवसेनेच्या पहिल्या सभेला झाली आणि त्या सभेतून उद्दिष्टाची प्राप्ती झाली.

बाळासाहेबांच्या वेगवेगळ्या वक्तव्यांतून असे जाणवते की त्यांना यशाच्या रहस्याची कळत नकळत माहिती होती. म्हणूनच ते म्हणतात, 'विश्वास दिल्याने विश्वास मिळतो. प्रेम दिल्याने प्रेम मिळतं.' म्हणजेच या ठिकाणी दान-धर्म, निसर्गनियमांबाबत बाळासाहेबांना कल्पना होती असे म्हणता येईल.

बाळासाहेबांनी त्यांच्या भाषणात 'राजकारण हे गजकरण' त्यामुळे 'शिवसेना म्हणजे ८० % समाजकारण, २० % राजकारण' असे उद्‌गार काढले. त्या पहिल्या जाहीर सभेत रामराव आदिक, 'प्रबोधन'कार ठाकरे आदी व्यक्तिमत्त्वे व्यासपीठावर होती. बाळासाहेबांनी त्या जनसागराला नम्रपणे हात जोडले आणि विनम्रपूर्वक ठाकरी शैलीत 'मीसुद्धा तुमच्यासारखाच एक शिवसैनिक आहे' असे सांगत शिवसेनेची कार्यप्रणाली आणि उद्दिष्टे सर्व शिवसैनिकांमध्ये ठसवली. बाळासाहेबांचे भाषण झाले. संपूर्ण मैदानात 'बाळासाहेब ठाकरे झिंदाबाद ! झिंदाबाद !!' अशा घोषणा देण्यात आल्या. शिवसैनिकांचा प्रमुख शिवसैनिक म्हणजे शिवसेनाप्रमुख म्हणून पुढे त्यांना ओळखले जाऊ लागले.

दिनांक । ३० ऑक्टोबर १९६६

# आमंत्रण पत्रिका

''जय महाराष्ट्र''

वि. वि.

महाराष्ट्राचे दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्फूर्तिदायक चरणांवर माथा ठेवून, महाराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी सिद्ध झालेल्या शिवसैनिकांचा मेळावा रविवार दि. 30 ऑक्टोबर १९६६ रोजी सायं. ५.30 वा. शिवाजी पार्क दादर येथे भरणार आहे.

मराठी माणसांच्या न्याय्य हक्कांसाठी लढणाऱ्या शिवसेनेचा भव्य मेळावा. आपण महाराष्ट्राचे निष्ठावंत अभिमानी, आपण या मेळाव्याला जातीने हजर राहावे, अशी मी सर्व शिवसैनिकांच्या वतीने आपणास विनंती करीत आहे.

आपला नम्र महाराष्ट्र सेवक

**बाळ ठाकरे**

# शिवसेनेची घोडदौड

शिवसेना हळूहळू मुंबईभर आणि पुढे पुण्यातही पसरली. १९६६ साली सुभाष सर्वगौड, नंदू झेंडे, बाळ हंबीर आणि दिगंबर राऊत यांनी साथ दिली. १९६६ साली सुभाष सर्वगौड, नंदू झेंडे, बाळ हंबीर आणि दिगंबर राऊत यांनी अपोलो चित्रपटगृहात सुरू असलेला तामिळ चित्रपट आंदोलन करून बंद पाडला. त्या वेळी बाळासाहेबांनी या युवकांना मुंबईत बोलावून घेतले आणि पुण्यात शिवसेनेची शाखा सुरू करण्यात आली. शिवसेनाप्रमुख स्वत: कामगार नेते दत्ताजी साळवी, वामनराव परब यांच्याबरोबर राज्यभरात गावोगाव मैलोन्मैल तुडवत फिरत होते. त्यांना मराठीजनांनी ताबडतोब साथ दिली.

संयुक्त महाराष्ट्र एकीकरण समिती अस्तित्वात येऊन बेळगाव, कारवार, निपाणी, भालकी, बिदरसाठी तीव्र लढा देत असतानाही फक्त रोजी-रोटीच्या चिंतेत असणाऱ्या मराठीजनांना कानडी अत्याचार समजवायला तेव्हा शिवसेना नेत्यांना तीन वर्षे खर्ची घालायला लागली होती. अर्थात 'मराठी माणसांच्या न्याय्य हक्कासाठी लढा' महत्त्व समजायलाही त्या वेळी अनेक प्रसंग घडले होते. प्रथम शिवसेनाप्रमुखांची अन्य दैनिके, साप्ताहिके, मासिके यातून प्रसिद्ध होणारी, फटकारे देणारी व्यंगचित्रे मराठी माणूस पाहत होता, त्यावर गंभीर विचार करीत होताच.

मराठी तरुणांकडून मुंबईसह आसपासच्या उपनगरांमध्ये शाखा स्थापन करण्यात आल्या. मराठा सेक्शन उल्हासनगर कॅम्प-४ येथे सर्वप्रथम शाखा स्थापन करण्यात आली. या शाखेचे वैशिष्ट्य असे की, १९६९ रोजी स्वत: बाळासाहेबांनी या शाखेचे उद्घाटन केले होते. त्यानंतर शांतीनगर, सुभाषनगर आणि लालचक्की परिसरात शाखा स्थापन करण्यात आल्या. त्यांची पहिली सभा मराठा सेक्शन परिसरातील जिजामाता उद्यानात झाली, तेव्हा त्यांनी शहर आणि शिवसैनिकांबद्दल व्यक्त केलेले मत आणि हिंदुत्त्वाचे ज्वलंत विचार यांमुळे येथील मराठी माणूस व सगळ्यात मोठा समाज असलेला सिंधी समाजही भारावून गेला. उल्हासनगरमधील सिंधी बांधवांना बाळासाहेबांच्या नेतृत्वाचे नेहमीच आकर्षण होते.

पाकिस्तानच्या सिंध प्रांतातून निर्वासित झालेला हा समाज हिंदू होता. आपल्या धर्माचे खरे रक्षक बाळासाहेबच आहेत अशी त्यांची खात्री पटली आणि हा समाज शिवसेनेकडे आकर्षित झाला. आज उल्हासनगरात शिवसेनेच्या जोडीला सिंधुसेना कार्यरत आहे. शिवसेनेच्या उमेदीच्या काळात साहेबांच्या एकूण तीन सभा झाल्या.



त्याची परिणती अशी झाली की उल्हासनगर नगरपालिकेवर भाजपाची सत्ता आली, तेव्हा शिवसेना संघटना होती. पक्ष नव्हता. जेव्हा शिवसेना या संघटनेचे पक्षात रूपांतर झाले आणि उल्हासनगर नगरपालिका महानगरपालिका झाली तेव्हा म्हणजे १९९७ ते १९९९ मध्ये महानगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकला. त्यानंतर मधला सात वर्षांचा काळ सोडला तर त्यानंतर २००७ ते २०१२ पर्यंत आजही उल्हासनगरवर महायुतीची सत्ता आहे.

बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेना ही संघटना बांधताना कार्यकर्त्यांची निष्ठा, प्रामाणिकपणा आणि क्षमता याच गुणांना प्राधान्य देऊन कार्यकर्ते गोळा केले. तसे करताना त्यांनी कार्यकर्त्यांची कधी जातपात बघितली नाही. संघटनेला उपयोगी पडणाऱ्या कार्यकर्त्यांचा धर्म कधी त्यांनी पाहिला नाही. कल्याणचे शाबीर शेख आणि परळचे दादी गोबाडिया ही याची उत्तम उदाहरणे. शाबीर शेख युतीच्या सरकारमध्ये कामगारमंत्री होते आणि गोबाडिया हे पारशी गृहस्थ कट्टर शिवसैनिक म्हणून त्या वेळी ख्यातनाम होते.

बाळासाहेबांचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे, समाजातील ज्या घटकांचा त्या वेळी राजकारणाशी काही संबंध नव्हता अशा घटकांना त्यांनी राजकारणात आणले आणि त्या घटकांतील तरुणांना व्यापक समाजाचे नेतृत्व करण्याची संधी दिली. दत्ताजी साळवी, दत्ताजी नलावडे, वामनराव महाडिक, लीलाधर डाके, गजानन कीर्तिकर अशी किती तरी नावे यासंदर्भात पुढे करता येतील. हे एक प्रकारचे सामाजिक अभिसरणाचे काम होते आणि बाळासाहेबांनी ते उत्तम प्रकारे केले.

बाळासाहेबांच्या राजकारणाचे तिसरे वैशिष्ट्य असे की, त्यांनी महिलांना संघटनेत सामावून घेतले आणि अनेक महिलांवर संघटनेचे नेतृत्व सोपवले. गोरेगावच्या सुधा चुरी, नायगावच्या स्नेहलता कोरडेबाई अशा अनेक जणी त्या काळी महिला आघाडीच्या माध्यमातून पुढे आल्या. विशेष म्हणजे या काळात राजकीय पक्ष महिलांसाठी असे काही करत नव्हते त्या काळात बाळासाहेबांनी ही दूरदृष्टी दाखवली. त्या वेळी शिवसेना राजकीय संघटना नव्हती तर सामाजिक कार्य करणारी संस्था होती. एकाच माणसाच्या नेतृत्त्वाखाली एखादी संघटना तब्बल ३५ वर्षे काम करते ही भारतातच नव्हे तर जगात अलौकिक गोष्ट होती.

# मातोश्री बंगला

बाळासाहेबांनी मराठी माणसाला प्रेरित केले, त्यास घडवले, आपल्या अनुयायांना नेते बनायचे ह्या हेतूनेच सतत मार्गदर्शन केले. पुढे दसरा म्हणजे शिवसेनेचा जाहीर मेळावा असे समीकरणच पुढील ४० ते ४५ वर्षे संपूर्ण महाराष्ट्राने अनुभवले. पुढे जाऊन 'एक पक्ष-एकच नेता आणि एक शिवतीर्थ' असे समीकरण रचले गेले.

बाळासाहेब हे फक्त लीडर नव्हे तर ते लीडरशीपचे एक उत्तुंग उदाहरण आहेत. लीडर बरोबर लीडर निर्माण होणे हे फार अवघड असते. परंतु लीडरशिपच्या संभावनेतून अनेक लीडर तयार होऊ शकतात. त्यांचे जिवंत उदाहरण म्हणजे बाळासाहेब.

बाळासाहेब ठाकरे यांनी लोळागोळा झालेल्या मराठी माणसांमध्ये स्फुल्लिंग चेतवून त्यांच्यामध्ये मराठी अस्मिता जागी केली. त्यानंतर प्रत्येक मराठी माणूस हा ढाण्या वाघ बनला. त्याने संयुक्त महाराष्ट्र खेचून आणला. याच मराठी माणसांनी पंडित जवाहरलाल नेहरू आणि क्रूरकर्मा मोरारजी देसाई यांच्या तोंडाला फेस आणला. बाळासाहेबांची व्यंगचित्रे मराठीद्वेष्ट्यांचे वस्त्रहरण करायची. त्यानंतर बाळासाहेबांनी शिवसेना हा राजकीय पक्ष स्थापन करून भल्याभल्या राजकीय पक्षांची दाणादाण उडवून दिली. मराठी माणूस आणि मराठी माणसांचे हित हेच ध्येय डोळ्यांसमोर ठेवून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्रात मराठी अस्मितेची संजीवनी फुंकली. त्यानंतर समस्त मराठी माणूस शिवसेनेच्या भगव्या झेंड्याखाली एकवटला.

मराठी माणसांच्या हिताच्या आड येणाऱ्या सर्वांना शत्रू मानून बाळासाहेबांनी त्यांना अंगावर घेतले. जे कोणी मराठी माणसांच्या अंगावर धावून आले त्यांना बाळासाहेबांनी शिंगावर घेतले. मराठी माणूस आणि बाळासाहेब यांच्या एकजुटीमुळे मराठी शत्रू गारद झाले.

बाळासाहेब ठाकरे यांनी देशप्रेम व देशहिताच्या बाबतीत कधीच तडजोड केली नाही. ते जितक्या परखडपणे टीका करीत तेवढेच ते प्रेमही करत असत. ते आपले परखड मत व्यंगचित्रे आणि लेखणीतून मांडत असत.

शिवसेनेची स्थापना झाल्यापासून अवघ्या साडेचार महिन्यांच्या कालावधीत नवीन सदस्यांची नोंदणी आणि लागलीच हजारोंच्या उपस्थितीत झालेला पहिला दसरा मेळावा यावरून बाळासाहेबांच्या नियोजनबद्ध कामकाजाचा करिश्मा कळतो. त्यांच्या लीडरशीपमधून स्वयंस्फूर्तपणे लोकांनी नेतृत्व स्वीकारले असे दिसून येते.

आपले जुने घर हे अगदी लहान होते, त्यामुळे मोठ्या घराची आवश्यकता आहे



अशी चर्चा नेहमीच होत असे. शिवाय बाळासाहेबांना आईने सांगितलेले तिचे स्वप्न आठवले, त्या वेळेसच मी आईसाठी स्वत:च घर बांधेन असे अगोदरच ठरवले होते. त्या बंगल्यामध्ये सर्वसामान्य माणसाला कधीही भेटता आले पाहिजे. बाळासाहेब नेहमी म्हणत ''मराठी माणसाने रात्री अपरात्री २४ तासांत कधीही माझं दार ठोठवावं त्यासाठी मी नेहमीच सहकार्यासाठी तयार आहे.'' त्यानुसार सर्व गोष्टींचे नियोजन करून बाळासाहेबांनी स्वप्नात ठरवलेला बंगला प्रत्यक्षात उतरवला.


**'यश-राज' सूत्र**

असे म्हणतात कोणतीही गोष्ट ही दोनदा घडते. एकदा तुमच्या अंतर्जागृत मनात आणि दुसऱ्यांदा प्रत्यक्षात, तुमच्या आयुष्यात जर तुम्हाला मोठे व्हायचे असेल तर छोट्या छोट्या गोष्टींकडे अधिक बारकाईने लक्ष केंद्रित करा.

तशाच प्रकारे बाळासाहेबांनी बंगला बांधला आणि अगोदरच ठरवल्याप्रमाणे त्या बंगल्याचे नाव 'मातोश्री' ठेवण्यात आले. 'मातोश्री' ह्या बंगल्याचे महत्त्व बाळासाहेबांच्या आणि शिवसेनेच्या सर्वांसाठीच फार होते. अगदी शिवसेना भवन हे जरी पुढे जाऊन शिवसेनेचे कार्यालय झाले असले तरीसुद्धा 'मातोश्री' वरून आलेल्या आदेशाला फार महत्त्व शिवसेनेत नेहमी राहिलेले आहे आणि पुढेही राहील असे वाटते. 'मातोश्री' हे सर्वच शिवसैनिकांचे स्वत:चे घरच होते. मातोश्रीवर आलेल्या सर्वांनाच कधीही बाळासाहेब पाहुणचाराशिवाय सोडत नसत. बाळासाहेब नेहमी प्रत्येकास काही नाही तर पेढा तरी द्यायचे. मातोश्रीवर आले की घरामधील मोठा माणूस जशी बारीकसारीक चर्चा करतो तसे बाळासाहेब प्रत्येक शिवसैनिकाची नेहमी विचारपूस करत. रात्री ३ ते ५ ह्या वेळेस प्रवास करू नका. शक्यतो रात्री प्रवासच करू नका असे ते सांगत. मातोश्रीवर एकदा एक शिवसैनिक त्याच्या नवीन गाडीचे पूजन करवून घेण्यासाठी बाळासाहेबांकडे आला. तेव्हा नारळ फोडल्यानंतर बाळासाहेब त्यास म्हणाले, ''गाडी नेहमी सावकाश आणि नीट चालव. 'लक्षात घे गाडी तुझ्यासाठी आहे', तू गाडीसाठी नाहीस.'' बाळासाहेबांची खासियत म्हणजे लहानसहान, छोट्या छोट्या गोष्टींवर ते लक्ष केंद्रित करत.

मातोश्रीवर आल्यावर प्रत्येकास ते मोठ्या भावाचे किंवा वडिलांचे घर असल्यासारखे वाटायचे. शिवसैनिक बाळासाहेबांना भेटायला जाताना नेहमी कुटुंबासमवेत जात असत त्या वेळेस अगदी आजोबा प्रमाणे बाळासाहेब लहान मुलांबरोबर गप्पागोष्टी करत, त्यांना गिफ्ट देत असत. जसे शिवाजी महाराजांच्या दरबारात महिलांना मानसन्मान मिळत, स्त्री म्हणजे भगिनी आणि मातेसमान तसेच बाळासाहेबांकडून मातोश्री दरबारात त्यांचा मानसन्मान होई.

शिवसेनाप्रमुख, मातोश्री बंगला आणि शिवसेना भवन यांचे जसे अतूट नाते होते, तसेच मातोश्री बंगल्याचे आर्किटेक्ट शशी प्रभू आणि शिवसेनाप्रमुख यांचे जवळचे नाते होते. शशी प्रभू यांच्या डिझाइननुसार जुना मातोश्री बंगला पाडून नवीन तीनमजली मातोश्री बंगला बांधण्यात आला. जुना मातोश्री बंगला सोडताना शिवसेनाप्रमुखांबरोबर माँसाहेब मीनाताई ठाकरे होत्या. जुन्या मातोश्री बंगल्यासमोर तुळशी वृंदावन होते. त्याच्याकडे बोट दाखवून बाळासाहेब म्हणाले, ''प्रभू हे तुळशी वृंदावन तसेच ठेव.'' पुढे चाफ्याच्या फुलांचे झाड होते त्याच्याकडे बोट दाखवतही बाळासाहेबांनी काम करत असताना चाफा मरू देऊ नकोस असे शशी प्रभूंना सांगितले. नवीन मातोश्री बंगल्यात प्रवेश करताना बाळासाहेबांचे डोळे पाणावले होते. बंगल्याचा निरोप घेताना मीनाताई त्यांच्यासोबत होत्या. मात्र  बंगल्यात गृहप्रवेश करताना मीनाताई नव्हत्या. ही सल बाळासाहेबांच्या मनात कायमची लागून राहिली होती.





# राजकारण नव्हे – शिवसेनेची शिवशाही

शिवाजी महाराजांच्या कालावधीत शिवशाहीचा अवलंब करण्यात आला होता. तसेच राजकारण म्हणजे गजकरण अशा प्रकारची प्रतिमा समाजात झाली होती म्हणून समाजकारणासाठी शिवशाहीचा अवलंब करणार असे बाळासाहेबांचे म्हणणे होते.

शिवसेनेचे कार्य फार मोठे होते. त्यानुसार मानवरूपी पहाडात्मक एकात्मता असणाऱ्या एकनिष्ठ माणसांशिवाय हे कार्य अशक्य होते. बाळासाहेबांचे विचार हेच आमचे ध्येय आणि बाळासाहेबांचा आदेश हीच आमची कृती असे मानणारी माणसे बाळासाहेबांच्या एकवचनी स्वभावामुळे जोडली गेली.

सुरुवातीपासून शिवसेनेबरोबर धों. वि. देशपांडे, भाई प्रधान, बळवंतराव मंत्री, दत्ता प्रधान, प्रभाकर देशपांडे, बेधडक वक्ते दत्ताजी साळवी, सुधीर जोशी, मनोहर जोशी, मधुकर सरपोतदार, छगनराव भुजबळ, वामनराव महाडिक, दत्ताजी नलावडे, नारायणराव राणे, गणेश नाईक, वसंतराव मराठे, सतीश प्रधान अशा अनेक मान्यवर मंडळींसमवेत दिवसेंदिवस शिवसेना वाढू लागली.

''सत्तेपुढे शहाणपण नाही'' याची जाणीव जणू काही बाळासाहेबांना झाली होती आणि सत्ता मिळवण्याकरिता कृती हवी, कृतीशिवाय विकास नाही, कृतीशिवाय यश नाही, कष्टाविना फळ नाही असे ठरवून आपल्या शिवसेनेची राजकीय ताकद अजमावून पाहण्यासाठी १९६७ साली ईशान्य मुंबई लोकसभा पोटनिवडणुकीत प्रसिद्ध सनदी अधिकारी मराठी व्यक्तिमत्त्व असलेले श्री. स. गो. बर्वे यांना बाळासाहेबांनी जाहीर पाठिंबा दिला. त्यांच्या विरुद्ध कम्युनिस्ट पक्षाचे नेते कृष्णमेनन उभे होते. प्र. के. अत्रे यांच्या पाठिंब्याद्वारे ते कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने निवडणूक लढवित होते. खरे तर ह्या निवडणुकीचा रंग बर्वे विरुद्ध कृष्णमेनन न राहता ठाकरे विरुद्ध प्र. के. अत्रे अशा स्वरूपाचा झाला होता. दोन्ही नेत्यांनी अनेकविध ठिकाणी प्रचारसभा घेतल्या. भगव्या झेंड्याविरुद्ध – लाल बावटा झेंडा असे हे स्वरूप ह्या निवडणुकीचे होते. एका बाजूला राजकारणी मुत्सद्दी असणाऱ्या नेत्याचा पाठिंबा म्हणजे प्र. के. अत्रे आणि दुसऱ्या बाजूला एका समाजकारणी प्रतिभावंत मार्मिकचे संपादक आणि अवघ्या नऊ महिन्यांपूर्वी सुरू केलेल्या शिवसेना संघटनेचे प्रमुख म्हणजे बाळ ठाकरे असे चित्र होते.

निवडणुकीचे वातावरण अधिकाधिक तापू लागले, संपूर्ण मुंबईकर खासकरून मराठी माणूस अगदी आवर्जून जोमाने बाळासाहेबांच्या आदेशानुसार काम करत होता. ११ फेब्रु. १९६७ साली निकाल जाहीर करण्यात आला. स. गो. बर्वे बाळासाहेबांच्या पाठिंब्यामुळे प्रचंड बहुमताने निवडून आले. अवघ्या नऊ महिन्यांमध्ये बाळासाहेबांनी शिवसेनेचा पहिला राजकीय पुत्र म्हणून स. गो. बर्वे यांना लोकसभेत पाठवले.

ठाणे महानगरपालिकेच्या निवडणुकीनंतर लागलीच १९६८ मध्ये मुंबई महानगर–पालिका निवडणुकीत प्रजा समाजवादी पक्षाबरोबर युती करत निवडणूक लढवली. १२० जागांपैकी ४२ जागा जिंकल्या.

हे सर्व असे घडत होते, जसे की पुढे काय होणार, निवडणुकीचा निकाल काय लागणार त्यासाठी काय करावे या सगळ्या घटनांची बाळासाहेबांना अगोदरपासूनच कल्पना होती की काय, कोणास ठाऊक ?

समाजकारणाने आपला पाया पक्का करून राजकारणात ठेवलेल्या पावलापुढे सर्व काही अगदी सहजच शक्य वाटत होते. शिवसेनाप्रमुखांनी दिलेल्या इशाऱ्याप्रमाणे सीमाप्रश्नावर सन १९६९ मध्ये शिवसेनेचे तीव्र आंदोलन सुरू होते. या आंदोलनाची आग एवढी पेटली की, साऱ्या देशात शिवसेनेचा प्रकाश पडला. शिवसेनेची खरी ओळख म्हणजे सीमाप्रश्नावर केलेले तीव्र आंदोलन; मात्र हे आंदोलन करण्यापूर्वी शिवसेनाप्रमुखांनी केंद्र सरकारला हा प्रश्न सोडविण्याची पूर्णपणे संधी दिली. २० जानेवारी रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांना शिवसेनाप्रमुखांनी पत्र पाठविले. त्या इंग्रजी पत्राचे मराठी भाषांतर :–(*पुढील ५४ पानावर*)

याच सुमारास शिवसेनेचे नेते दत्ताजी साळवी व मनोहर जोशी यांची बेळगावात सभा झाली. आपल्या भाषणात ते म्हणाले, ''मुंबईच्या विमानतळावर कोणताही केंद्रीय मंत्री २६ जानेवारीनंतर उतरल्यास त्याला विमानतळापासून राजभवनापर्यंत शिवसैनिक जाऊच देणार नाहीत. सीमाप्रश्नासाठी निधड्या छातीने त्यांच्या मोटारीसमोर आडवे पडतील. पोलिसांनी खुशाल गोळीबार, लाठीमार करावा, आम्ही पर्वा करीत नाही.''

त्याच वेळी बाळासाहेबांनी पुण्यात जाहीर सभेत सांगितले की, ''सीमाप्रश्न सोडविण्याची निश्चित मुदत ठरवेपर्यंत पंतप्रधान, उपपंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, काँग्रेस अध्यक्ष निजलिंगाप्पा व म्हैसूरचे मुख्यमंत्री वीरेंद्र पाटील यांच्याविरोधी 'मुंबई बंद'चा कार्यक्रम तारीख २६ जानेवारीनंतर घेण्यात येईल. हे श्रेष्ठी मुंबईत येतील, त्या वेळी शिवसैनिक त्यांच्या मोटारीसमोर आडवे पडतील.''



या पार्श्वभूमीवर हुबळी, बेळगावमध्ये मराठी विरुद्ध कानडी असे तंग वातावरण झाले. हुबळी येथील मराठी भाषिकांवर कन्नड विद्यार्थ्यांनी हल्ले केले. मराठी व कन्नडी विद्यार्थ्यांच्या परस्परविरोधी घोषणा सुरू झाल्या. स्वाभाविकच महाराष्ट्रातच संतापाची लाट उसळली. 'नवाकाळ' मधून इशारा देण्यात आला की, 'म्हैसूर शहरातील मराठी भाषिकांना ओलीस ठेवल्याप्रमाणे मानून त्यांचा छळ सुरू झाला तर ते एक अत्यंत नतद्रष्ट व भेसूर प्रकरण ठरेल व त्याचे दारुण परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीत.

## मा. इंदिराजी,

अत्यंत जड अंत:करणाने मी हे पत्र आपल्याला लिहित आहे. असे पत्र आपल्याला लिहिण्याची वेळ माझ्यावर यावी ही माझी मोठी व्यथा आहे.

सीमाभागातील मराठी बांधवांच्या भावनांचा उद्रेक आता सर्व महाराष्ट्रभर फैलावू पाहत आहे. केंद्र सरकारने याबाबतीत तत्काळ निश्चित पावले टाकून न्यायाला साजेशोभेशी या प्रश्नाची सोडवणूक करून दिली पाहिजे. यासाठी शिवसेनेने असा निर्धार केला आहे की, यापुढे आपण पंतप्रधान, आपले उपपंतप्रधान वा कोणीही केंद्रीय मंत्री त्याचप्रमाणे म्हैसूरचे मुख्यमंत्री व काँग्रेसचे अध्यक्ष यांना २६ जानेवारी १९६९ नंतर मुंबई शहरात पाऊल टाकताच कडवा विरोध करायचा. या श्रेष्ठांपैकी जो कोणी येथे येईल, त्याला शिवसेनेचे स्वयंसेवक ठिकठिकाणी त्यांच्या मार्गावर आडवे पडून त्यांच्या मोटारी अडविल्यावाचून राहणार नाहीत. केंद्रीय श्रेष्ठींविरुद्ध पुकारलेला 'मुंबई बंद'चा कार्यक्रम केंद्र सरकार सीमाप्रश्नाबाबत तोंड उघडून त्याच्या सोडवणुकीची मुदत ठरवेपर्यंत वाढत्या निर्धाराने चालविला जाईल.

महाशया पंतप्रधानजी, सीमावाद न्याय्य मार्गाने सोडविला जाईल, अशी आपण मऱ्हाटी जनतेला वारंवार आश्वासने दिली आहेत. लोकशाही मार्गाने आपण हा प्रश्न लोकेच्छेनुसार सोडवाल अशी आशा सीमावासी गेली बारा वर्षे आपल्या उराशी बाळगून बसले आहेत.

आपण, आपले अधिकारी आश्वासन पूर्ण करून सीमावासी मऱ्हाटी जनतेचा आपल्याबद्दलचा विश्वास आणि आदर सार्थ कराल, तसेच त्यांनी बाळगलेला लोकशाही पद्धतीवरील विश्वास अनाठायी नव्हता एवढे सिद्ध कराल, अशी शिवसेनेला अजून आशा आहे.

आपला नम्र,

बाळ ठाकरे (शिवसेनाप्रमुख)



# मोरारजींना विरोध अन् बाळासाहेबांना अटक

भारताचे उपपंतप्रधान ना. मोरारजी देसाई रात्री मुंबईत आले आणि त्यांची मोटार अफाट पोलिस बंदोबस्तात कोठेही न थांबता अक्षरश: भरधाव वेगाने माहीम येथे शांततेने निदर्शने करण्याऱ्या शिवसैनिकांना उडवून जबर जखमी करून निघून गेली. शिवसेनेचे छायाचित्रकार अशोक करंबळेकर जबर जखमी झाले. त्यांची मांडी दणकली. बेशुद्धावस्थेत त्यांना टॅक्सीने 'मार्मिक' कचेरीवर नेण्यात आले. आणखी एक शिवसैनिक सत्यकांत पेणकर यांच्या तर अंगावरून गाडी गेली आणि शिवाजी पार्क, दादर भागात तुफान चकमकी होऊन रणकंदन माजले; पोलिसांनी लाठीमार केला व अश्रुधूर सोडला.

महापौरांच्या घराजवळील एका पोलिस चौकीला आग लावण्यात आली. सिटीलाईट सिनेमाजवळच्या तीन पोलिस चौक्या भस्मसात करण्यात आल्या. शिवसेनाप्रमुखांनी रात्री सांगितले की, ''आमचा पोलिसांनी संपूर्ण विश्वासघात केला आहे. मोरारजी देसाई ज्या गुर्मीत भरधाव मोटारीतून गेले ती गुर्मी अनपेक्षित आणि चीड आणणारी आहे. संयमाचा कडेलोट झाला. आता मुंबईसाठी जसा उग्र लढा दिला तसाच दिला जाईल आणि परिणामांची जबाबदारी आमची नाही. पोलिस कमिशनर श्री. मोडक आणि डी. सी. पी. श्री. डफळे यांच्यात आणि आमच्यात असं ठरलं होतं की मोरारजी देसाईंनी गाडी थांबवायची आणि आम्ही सीमा भागासंबंधी निवेदन द्यायचं; परंतु पोलिसांनी वचनभंग केला आहे.''

मोरारजींच्या उर्मट अरेरावी वृत्तीमुळे आणि पोलिसांच्या विश्वासघातामुळे शिवसैनिक भडकले. लालबाग, दादर येथे भीषण रणकंदन माजले. अनेक बसेस जाळण्यात आल्या. पोलिसांनी गोळीबाराच्या अकरा फैरी झाडल्या. संपूर्ण वाहतूक बंद पडली. लाठीमार व अश्रुधुराचे सत्र चालूच राहिले. रात्री दहानंतर भयंकर दृश्य दिसत होते. चित्रा टॉकीजसमोर बसेस जळत होत्या. एका मागोमाग तीन बसेस जळाल्या. डॉ. आंबेडकर मार्गावर व दादर भागात ट्यूबलाइट्स सर्रासपणे फोडण्यात येत होत्या व पोलिस लाठीमार करीत पाठलाग करीत होते. दगडफेक करून बस थांबवायची. आतील उतारू, वाहक-चालक यांना खाली उतरवायचे व नंतर बस पेटवून द्यायची, असे प्रकार सर्रास दिसत होते.

रात्री ८.४५ वाजता शिवसेना नेते श्री. दत्ताजी साळवी व इतर शिवसैनिकांनी भोईवाडा मैदानाजवळ १४४ कलम मोडले व त्यांना अटक झाली. मनोहर कोकाटे,

ज्ञानेश तांडेल, घाणेकर, शाहीर पांडुरंग पवार हे कार्यकर्ते त्यांच्याबरोबर होते. 'बेळगावसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे', 'शिवसेना झिंदाबाद' अशा घोषणा ते देत होते. शिवसेनेचे हे आंदोलन जवळजवळ चार दिवस चालू होते. सर्व मुंबईत तुफानी दंगल झाली. सुरुवातीलाच गोळीबारात ७ ठार व ३५ जखमी झाले. वरळी ते माहीम तीन रात्री कर्फ्यू जारी करण्यात आला. माहीम रेल्वे स्टेशन जाळण्यात आले. सेंच्युरी बाजाराच्या काचा फोडण्यात आल्या आणि दंगल हळूहळू गिरगाव व उपनगरातही पोचली. ठाण्यातही सत्याग्रह आणि दंगल करण्यात आली.

१० फेब्रुवारी रोजी सैन्य सज्ज ठेवण्याचे आदेश सरकारने काढले आणि गोळीबारात ३० ठार, १५१ जखमी झाल्याचे अधिकृतपणे सांगण्यात आले. दिवसा गिरगाव, माहीम भागात कर्फ्यू जारी करण्यात आला. सरकारने कडक उपाययोजना करण्याचा इशारा दिला; परंतु त्याच सुमारास प्लाझा सिनेमासमोर पोलिसांना पकडून बांधून ठेवून ॲटोमिक एनर्जीच्या बसेस जाळण्यात आल्या. रस्त्यात अडथळे निर्माण करून वाहने अडविण्यात आली. मुंबईतील सारी वाहतूक थांबली आणि अचानक शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे ताबडतोब शांतता प्रस्थापित करण्याचे आदेश तुरुंगातून काढण्यात आले. त्यामध्ये शिवसैनिकांना उद्देशून म्हटले होते की, ''कोणत्याही परिस्थितीत आपल्या लढ्याचा फायदा कम्युनिस्टांना उठवू देऊ नका.'' ११ तारखेला जे आकडे प्रसिद्ध झाले ते मृतांची संख्या ४० आणि जखमींची १५० असे होते. इंदिरा गांधी यांनी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना सूचना दिल्या की, लष्कर किंवा केंद्रीय राखीव पोलिस दल बोलावून दंगल शमवावी; परंतु त्याची जरूर पडली नाही. वणवा विझला. कारण शिवसेनाप्रमुखांचे शांततेचे आवाहन हेच त्याचे कारण होते. दादरमध्ये तर ट्रान्सफर सीनच दिसला. दुपारनंतर आश्चर्यच आश्चर्य झाले. हळूहळू दुकानदारांनी दुकाने उघडली. केरोसिनच्या रांगा लागल्या; पण विशेष म्हणजे रस्ते साफ करण्यात शिवसेनेचे लोक आघाडीवर होते. रस्ते साफ करण्याचे आदेश शिवसेनेच्या फलकांवर दिसू लागले. सुमारे चार दिवस पेटत राहिलेली मुंबई विझली आणि नागरिकांनी शांततेचा नि:श्वास टाकला. एकूण ६९ जण आंदोलनात हुतात्मे झाले,

### शिवसेनाप्रमुखांना अटक –

मोरारजी देसाई यांची गाडी अडविली त्याच दिवशी रात्री उशिरा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे, शिवसेनेचे नेते दत्ताजी साळवी आणि मनोहर जोशी यांना पोलिसांनी अटक केली. या तिघांनाही पोलिस आयुक्तांच्या कार्यालयात ९ तारखेला पहाटे नेण्यात आले. प्रचंड पोलिस बंदोबस्तात आणि नेहमीचे सर्व मार्ग टाळून या तिघांनाही



पहाटेच्या सुमारास पुण्याच्या येरवडा मध्यवर्ती कारागृहात नेण्यात आले. तिघांना तीन वेगवेगळ्या बराकीत ठेवले. त्यांना प्रथमवर्ग कोठडी देण्यात आली; परंतु सुरुवातीला बाहेरून जेवण आणण्यास मनाई केली. त्यांची कोठडी फाशी यार्डला लागूनच होती; परंतु केवळ या तीन नेत्यांनाच अटक केली होती असे नाही, शेकडो शिवसैनिकांना पकडून वेगवेगळ्या तुरुंगांत डांबण्यात आले. त्यांत सुधीर जोशी आणि शिवसेनेचे अन्य नेतेसुद्धा होते. आंदोलनावेळी अटक झाल्यानंतर येरवडा तुरुंगात वृक्षारोपण करून आपली आगळीवेगळी छाप त्यांनी निर्माण केली. मुंबईच्या दंगलीचा वृत्तांत कानांवर येत होता आणि ही दंगल आटोक्यात येईल असे वाटत नव्हते. रात्री खूप उशिरा स्वतंत्र पक्षाचे नेते मधु मेहता व मनू अमरसे आणि त्यांचे सहकारी तुरुंगात येऊन शिवसेनाप्रमुखांना आणि इतर नेत्यांना भेटले. त्यांनी पुढे असेही सांगितले की, ‘‘तुमचं सुरू झालेलं आंदोलन आता कम्युनिस्टांच्या हातात जात आहे. तुमच्या शांततेच्या आदेशाची आवश्यकता आहे.’’ शिवसेनाप्रमुखांनी शिवसेना नेत्यांजवळ चर्चा करून शिवसैनिकांना आंदोलन स्थगित करण्याचे आदेश दिले. म्हणूनच मुंबई वाचली. प्रजासमाजवादी पक्षाचे नेते खासदार बॅ. नाथ पै यांनी शिवसेनाप्रमुखांची तुरुंगात भेट घेतली. मुंबईतील दंगलीत झालेली प्राणहानी आणि वित्तहानीबद्दल आपणांस दु:ख होत असल्याचे बाळासाहेबांनी सांगितले.

# महाराष्ट्राची इज्जत मराठ्यांच्या हाती

'महाराष्ट्राची इज्जत मराठ्यांच्या हाती' असे आवाहन बाळासाहेबांनी ९ फेब्रुवारी १९६९ मध्ये मार्मिकमधून खालीलप्रमाणे प्रसिद्ध केले.

आजकाल राष्ट्रीय एकात्मता (नॅशनल इण्टिग्रेशन) या मुद्द्यावर एकजात साऱ्या काँग्रेसी मुत्सद्द्यांची आणि राजकारण्यांची तोंडे तंबाखूमिश्रित विडा खाल्ल्यासारखी रंगलेली दिसतात. जुन्या जमान्यातल्या साधु-संतांनी परमेश्वरप्राप्तीसाठी जसा जितका जिवाचा आटापिटा केला त्याउलट हे सत्तालोलुप लोक राष्ट्रीय एकात्मतेसाठी तिन्ही त्रिकाळ तथाकथित हलकल्लोळ माजवत असतात.

सत्ताधारी काँग्रेस पक्षीयांनी राज्य कारभारात उचललेले प्रत्येक पाऊल जनतेच्या सर्वांगीण असंतोषाला कारण झाले नि नित्य होतेच आहे. आंग्लाईतला जनतेचा असंतोष आणि काँग्रेसी राजवटीत सर्वत्र भडकलेला असंतोष या दोघांची जात एक नाही. पहिला केवळ स्वातंत्र्यप्राप्तीसाठी होता. हा दुसरा पदोपदी जनतेच्या जीवनावर होणाऱ्या शतमुखी अन्यायाच्या प्रतिकारासाठी आहे. भाषावार राज्यरचनाच घ्या. पहिल्या धडाक्याला १३ भाषिक राज्ये बनवली, मग पोट्टू रामुलूचा बळी पडेपर्यंत आंध्रला तोच हक्क का दिला नाही? महाराष्ट्रालासुद्धा १०५ नरबळींचा घास काँग्रेसी केंद्राला चारावा लागला, तेव्हा ते राज्य बनवण्याची अक्कल त्यांना आली. तेही पुन्हा अर्धेमुर्धेच सीमा भागांवरील कोटिगणती मऱ्हाठाभाषी जिल्ह्याचे नि तालुक्याचे तुकडे तोडून त्यांचे घास इतर भाषिक राज्याच्या पोटात रिचवले!

स्वातंत्र्यासाठी बंगाल, पंजाब आणि महाराष्ट्र आपापल्या उमलत्या पिढ्यांचे बलिदान करत होते, त्या वेळी इतर प्रांत काय करत होते? राष्ट्रावर परचक्राची संकटे आली की हाका मारायच्या पंजाबला नि महाराष्ट्राला. गोळीला हे पुढे आणि पोळीच्या जावई सोहळ्याला बाकीचे सारे तांब्या-भांडे घेऊन धावणारे! असल्याच जावयांच्या मिजासी राखण्यासाठी महाराष्ट्राच्या सीमाभागांची बिर्याणी केंद्राने त्यांना चारली. एरवी भाषावार राज्यरचनाच करायची होती तर बेळगाव-कारवारादी प्रदेश तिकडे बस्तर-बऱ्हाणपुरादी विभाग उघडाउघड मऱ्हाठभाषी असताही त्यांचे लचके म्हैसूर नि मध्य प्रदेश राज्यांत कोणत्या न्यायाच्या आधारावर कोंबण्यात आले? लक्षावधी मऱ्हाठे गेली १२-१३ वर्षे भिन्नभाषी भिन्न संस्कृतीच्या राज्ययंत्रणेच्या चरकात पिळून पिचत असताना, कोणत्या तोंडाने हे काँग्रेसी राज्यकर्ते राष्ट्रीय एकात्मतेचा उपदेश लोकांना करतात? जनतेत असंतोषाचा वणवा भडकावून, नव्हे तो सारखा फुलता ठेवून, कसल्या शांती



नि सुव्यवस्थेच्या भ्रमात ते वावरत आहेत? लाठीमार, अश्रुधूर नि गोळीबार एवढ्याच पाशवी शक्तीवर 'लॉ अ‍ॅण्ड ऑर्डर' साधायची असेल तर बाप हो, पाकिस्तानच्या सध्याच्या अवस्थेला नजरेआड करू नका. राष्ट्र आणि जनता सनातन असते. राज्यसत्तेचे आयुष्य औटघटकचे असते. प्रत्येक प्रांताच्या विशिष्ट परंपरा असतात. महाराष्ट्रालाही तशीच एक विशेष परंपरा आहे, इतिहास आहे, ज्वलंत अभिमान आहे. त्या अभिमानाने भारताच्या अभिमानासाठी अनेक वेळा हाक येताच प्राणांची कुरवंडी केली आहे. अन्याय सहन करण्याची अवकळा त्याच्या बापाने – छत्रपती शिवरायांनी – त्याला शिकवलेली नाही. न्यायासाठी सामोपचाराची तो शिकस्त करेल; पण त्याच्या अस्मितेला डिवचणाऱ्यांना तो क्षमा करणार नाही.

त्यातच पुन्हा पक्षीय नि वैयक्तिक हेव्यादाव्यांचे लांडगे यांनी येथे कुत्तरओढ चालवलेली आहे. स्वार्थाला नाळगुदी सूज चढली की परमार्थ बोंबलला, हे त्या लांडग्यांना उमगेल तो सुदिन. काहीही असो. सीमावादाचा प्रश्न अखिल महाराष्ट्राने आपल्या सामुदायिक इज्जतीचा प्रश्न केला पाहिजे. एकजूट सगळीकडून, ठिकठिकाणी एल्गाराची उठावणी झाल्याशिवाय तो विभाग महाराष्ट्र राज्यात सामील होत नाही, ही काळ्या दगडावरची रेघ. महाराष्ट्र राज्यात सगळे कारभारी जातिवंत मऱ्हाठेच आहेत. त्यांना या जबरदस्तीच्या विभागणीची तिडीक, तळमळ नाही असे कोण म्हणेल? पण आता त्यांनी मऱ्हाठी जनतेच्या पाठीशी एकजूटीने उभे राहून या प्रश्नाच्या वाजवी सोडवणुकीसाठी केंद्रावर दबाव आणण्याच्या कामी कुचराई केल्यास पुढच्या निवडणुकीत जनता योग्य तो धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी. अन्यायाच्या चटक्यांनी उफाळलेल्या जनतेला दाबायला सरकारपाशी बुलेट्स असल्या, तरी जनतेच्या हाती मदमस्त राज्यकर्त्यांना घरोघर ठाणबंद करण्यासाठी बॅलेट्सचेही शस्त्र आहे. हेही त्यांनी विसरता कामा नये. सीमाबद्ध मऱ्हाठ्यांची वेळीच सोडवणूक झाली नाही तर महाराष्ट्र सरकारच्या अब्रूचेच खोबरे होणार आहे. सुज्ञांस अधिक ते काय सांगणार?

अशा प्रकारे मार्मिकच्या ९ फेब्रुवारी १९६९ च्या अंकात बाळासाहेबांनी विचार मांडला.

## बाळासाहेबांचा करिश्मा


बाळासाहेबांची शिवसेना मुंबईमध्ये सुरू होण्यापूर्वी कम्युनिस्ट कॉम्रेडचा बालेकिल्ला म्हणून मुंबईस ओळखले जायचे. बाळासाहेब ठाकरेंनी ह्या बालेकिल्ल्यास सुरुंग लावला. त्या काळात ५ जून १९७० साली कृष्णा देसाई यांच्या हत्येनंतर झालेल्या पोटनिवडणुकीत बाळासाहेबांचा करिश्मा दिसून आला. वामनराव महाडिक यांचा दणदणीत विजय झाला. जे शिवसैनिक बाळासाहेबांचे सच्चे अनुयायी झाले ते पुढे जाऊन नेते झाले. प्रत्येक मोठी व्यक्ती आपल्या अनुयायांना आपल्यापेक्षा मोठं होऊ देत नाही परंतु बाळासाहेब सत्तेपासून चार हात लांब राहिल्यामुळे बाळासाहेबांचा अनुयायी हा नेता झालाच, परंतु तसतसे बाळासाहेबांची उंचीसुद्धा जनमानसात अधिक उंचावली गेली. शिवसेनेचा पहिला आमदार झाला.

गर्दी हे बाळासाहेबांसाठी टॉनिक होते. त्यांनी कधी तयारी करून भाषण केले नाही किंवा मुद्दे ठरवून गर्दीसमोर ते बोलले नाहीत. गर्दीच त्यांना प्रेरणा द्यायची आणि विषयसुद्धा पुरवायची. गर्दीला नेमके काय हवे आणि गर्दीच्या मनात नेमके काय आहे, ते त्यांना कळत होते. मजेची गोष्ट म्हणजे त्या गर्दीलाही त्यांचे म्हणणे नेमके कळत असे.

एका व्यक्तीमध्ये अनेक व्यक्तिमत्त्वे एकत्र नांदत होती, असेच म्हणता येईल आणि त्या प्रत्येक व्यक्तिमत्त्वामध्ये एक निरागस मूल लपलेले असते. खोडकर मुलासारखा त्यांचा स्वभाव होता. वय कितीही वाढले, तरी त्यांनी आपल्यातले हे मूल व निरागसता कधी मरू दिली नाही. ती आहे तशी जिवापाड जपली. पण, म्हणूनच एकविसाव्या शतकातला चमत्कार आजच्या पिढीला बघायला मिळाला. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे अलौकिक नेते आजच्या पिढीने किंवा आधीच्या पिढीने बघितले नव्हते. जनमानसावर अधिराज्य गाजवणारा असामान्य नेता स्वातंत्र्योत्तर काळानंतर जन्मलेल्या पिढीला बघायला मिळालेला नव्हता. त्याचा साक्षात्कार बाळासाहेबांनी एकविसाव्या शतकात तरुण व प्रौढ झालेल्या पिढीला घडवला. म्हणून मी त्याला इतिहास म्हणतो.

**'यशराज सूत्र'**

'मॅनेजमेंट थॉट्स इज बत्राज बायबल' नावाच्या एका पुस्तकात मी वाचले होते की, ''एखादा व्यवस्थापक यशस्वी किंवा अपयशी हे त्यानं काय काम केलं यावर नाही, तर त्याला दुसऱ्यांकडून काम करून घेणे जमले किंवा नाही यावर अवलंबून आहे.''



हा जादुई विचार जणूकाही बाळासाहेबांच्या रक्तारक्तात भिनला होता म्हणूनच की काय बाळासाहेबांनी आपल्या अनुयायांना नेते बनवावे आणि त्यांनी आपल्या मार्गदर्शनानुसार स्वयंस्फूर्तीने काम करावे; आणि ते यशस्वी करावे हे सूत्र बाळासाहेबांना छानच जमू लागले होते. त्यांचा करिश्मा यात दिसतो. बाळासाहेबांनी जसे स्वत: शिवसेनेसाठी वाहून घेतले, तसेच शिवसेनेला वाहून घेणाऱ्या शिवसैनिकांची जमवाजमव केली. म्हणूनच १९७१ मध्ये डॉ. हेमचंद्र गुप्ते हे शिवसेनेचे पहिले महापौर झाले. त्यांच्या कालावधीत उत्तम कामे झाली, त्यामुळे शिवसेनेचा नेता म्हणजे काम करणारा नेता असे सूत्र स्थापित होऊ लागले. पुढे प्रमोद नवलकर विधानसभा निवडणुकीत १९७२ मध्ये शिवसेनेच्या माध्यमातून विजयी झाले. पुढे तर थेट नगराध्यक्ष निवडणुकीतच बाळासाहेबांचा करिश्मा दिसून आला आणि ठाण्यातून शिवसेनेचे सतीश प्रधान विजयी झाले.

शिवसेनाप्रमुखांनी गोरेगाव (पूर्व) येथील शिवसैनिकांच्या सभेत शिवसैनिकांना पुढील शपथ दिली.

''श्री शिवरायांचे व माझ्या कुलदैवताचे स्मरण करून मी शपथ घेतो की, माननीय शिवसेनाप्रमुख हिंदुहृदयसम्राट श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी मला शाखाप्रमुखपदी नियुक्ती केल्यामुळे माझ्यावर असलेल्या मोठ्या जबाबदारीची जाणीव मला झाली आहे. हे पद म्हणजे केवळ एक मानाचे पान मी समजत नाही तर ते एक जनसेवेचे साधन मानतो. माझ्या विभागातील जनतेची अहोरात्र सेवा करणे हे माझे पवित्र कर्तव्य समजतो. कोणत्याही प्रसंगी मी जनहित डोळ्यांआड होऊ देणार नाही. शाखेतील शिवसैनिकांमध्ये मी भेदभाव करणार नाही व शाखेत गटबाजी माजू देणार नाही. माझे व्यक्तिमत्त्व मी वाढवणार नाही. शिवसेना माझ्यामुळे नव्हे तर शिवसेनेमुळे मी आहे याचा विसर मी कदापि पडू देणार नाही. सार्वजनिक पैशात माझ्याकडून कोणतीही गडबड मी होऊ देणार नाही व भ्रष्टाचाराचा डाग माझ्यावर पडू देणार नाही. उद्या कोणतंही पद मला मिळालं नाही तरीही एक शिवसैनिक म्हणून मी सदैव निष्ठेने कार्य करीत राहीन.''

बाळासाहेबांनी विविध क्षेत्रांतील लोकांना त्यांच्या लोकांच्या स्वप्नपूर्तीकरिता प्रेरित केले. म्हणून मराठी चित्रपट व्यवसायाला उच्चतम स्थानावर पोहोचवण्यासाठी 'शिवसेना चित्रपट शाखा' काढली आणि त्यांना स्थैर्य प्राप्त करून दिले. वाढती महागाई आणि काळ्या बाजाराविरोधात १९७२ मध्ये 'शिवसेनेचे दर' हे आंदोलन झाले. शिवसैनिकांनी ठरविलेल्या दरात जीवनावश्यक वस्तूंची विक्री व्यापाऱ्यांना करावी लागत होती. पुण्यातील हे आंदोलन महाराष्ट्रभर गाजले. त्यामुळे शिवसेनाप्रमुख

बाळासाहेब ठाकरे यांनी नेतृत्व करणाऱ्या नंदू घाटे यांच्या पाठीवर थाप दिली.

बाळासाहेब नेहमी आवाहन करत की, ''पूर्वी भाजीवाले वसईहून यायचे, दूधवाले लाल टोपी घालून तिथूनच येत. कोळणीही आमच्या मराठी होत्या. पूर्वी आम्ही दादरला मिरांडा चाळीत राहायचो तेव्हा आमच्या मागे भंडारी समाजाचे लोक राहात. ते ताडी काढत, माडी काढत, आज ते माड सुकलेले दिसतात, कुठे गेले ते भंडारी, त्या कोळणी, दूधवाले, भाजीवाले, मराठी माणसं गेली कुठे? ती सगळी माणसं कारकुनीकडं वळली असावीत. माझं एकच सांगणं आहे... कारकुनीसाठी लेखण्या हाती घेऊ नका, काहीतरी नवं घडवा.'' अशा प्रकारे आवाहन करत बाळासाहेब मराठी माणसांमध्ये प्रेरणा चेतावत होते.



# पितृछत्र हरपले आणि शिवसेनाप्रमुख म्हणून राजीनामा

बाळासाहेबांचे परमगुरू – वडील दादा संयुक्त महाराष्ट्राचे एक शिल्पकार, समाज–सुधारक, प्रभावी वक्ते, झुंझार पत्रकार, नाटककार, प्रबोधनकार केशव सीताराम ...ठाकरे यांचे २० नोव्हेंबर १९७३ ह्या दिवशी दु:खद निधन झाले. बाळासाहेबांना आईंच्यानंतर आपले दुसरे छत्र हरपल्यासारखे वाटले. लहानपणापासून शिवसेना उभी राहीपर्यंत प्रत्येक वेळी प्रबोधनकारांचा सिंहाचा वाटा होता. दादांचे आपल्या मुलांबरोबर अगदी मैत्रींचे संबंध होते. दादांच्या जाण्याने बाळासाहेबांच्या आयुष्यात फार मोठी पोकळी निर्माण झाली होती. काळापुढे आजवर कोणाचेच चालले नाही आणि चालणार नाही. प्रबोधनकारांच्या उणिवेने त्यांना पुढे मार्गच दिसत नव्हता. परंतु मीनाताईंच्या सामर्थ्यांने आणि शिवसैनिकाच्या बळाने बाळासाहेब पुन्हा उभे राहिले.

१९७५ मध्ये इंदिरा गांधी यांनी जारी केलेल्या आणीबाणीस बाळासाहेबांनी शिवसेनेचा पाठिंबा दिला. खरे तर त्या काळातील हा बाळासाहेबांचा निर्णय कोणालाच पचला नाही, परंतु साहेबांचा आदेश हा आदेशच. खरे तर मराठी माणसांवरील अन्यायास त्यांनी तत्कालीन काँग्रेस राजवाटीला जबाबदार धरले होते हे मार्मिकच्या अंकांतून वेळोवेळी जाणवले होते, परंतु अशा परिस्थितीत अशा काँग्रेस पक्षाच्या सर्वोच्च नेत्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इंदिरा गांधी यांना पाठिंबा, असे का? असा प्रश्न अनेकाच्या मनात निर्माण झाला. पण बाळासाहेबांनी इंदिरा गांधींना नव्हे तर इंदिरा गांधींच्या योग्यवेळी आणीबाणीच्या जाहीर केलेल्या निर्णयास पाठिंबा दिला होता.

''मतभेद असावेत पण मनभेद नसावेत'' असे म्हटले जाते. बाळासाहेबांचा विरोध आयुष्यभर सर्वांशी मतभेदाच्या स्वरूपात झाला परंतु त्यांचे रूपांतर मनभेदात होण्यापूर्वीच बाळासाहेब ते नाते सावरत असत. परंतु अनेकांना बाळासाहेब शेवटपर्यंत समजले नाहीत, आणि ज्यांना समजले ते समजले; परंतु आपल्याच प्रतिमेविषयी गोंधळणारी परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे सातत्याने चालणारी धारदार शिवशाही (राजकारण) १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत करिश्मा दाखवू शकली नाही आणि मुंबई महापालिका निवडणुकीत शिवसेनेच्या नेत्यांचा दारुण पराभव झाला. त्या पराभवाची संपूर्ण जबाबदारी बाळासाहेबांनी स्वत:च्या खांद्यावर घेत शिवाजी पार्कवरील सभेत मी शिवसेनाप्रमुख म्हणून राजीनामा देण्यास तयार आहे. त्या वेळेस जरी काही

गोष्टींना आधारून बाळासाहेबांचे विचार शिवसैनिकांना समजले नव्हते, पटले नव्हते परंतु त्यांच्यावर त्यांची प्रचंड निष्ठा होती त्यामुळे प्रचंड गदारोळ झाला आणि शिवसैनिकांच्या आग्रहास्तव बाळासाहेबांनी राजीनामा मागे घेतला.

ह्यावरून शिवसेना म्हणजे माझ्या घरची नसून सर्वसामान्य मराठी माणसांची आहे आणि मराठी माणसांच्या हितासाठी मला राजीनामा देण्यास तयारी दाखवल्याने बाळासाहेब जे म्हणत की मीसुद्धा तुमच्यासारखा शिवसैनिक आहे. ते फक्त बोलणे नव्हते तर सत्य होते म्हणून बाळासाहेबांविषयी असे म्हणावे लागेल.

''बोले तैसा चाले, त्याची ''वंदावी पाऊले''



# बाळासाहेबांची आपुलकी आणि खरी परीक्षा

पुण्यातील नाना पेठेतील जगन्नाथसिंह परदेशी यांचे तर बाळासाहेबांशी १९७० पासूनचे संबंध. तेव्हा पक्षवाढीसाठी बाळासाहेब ठिकठिकाणी फिरत असत. १९७८ च्या सुमारास एकदा ते पुण्याहून शिरूरला चालले होते. जीपमध्ये बाळासाहेब आणि मुंबईचे कार्यकर्ते होते. त्या वेळी त्यांना कोणतीही सुरक्षा अथवा बंदोबस्त नव्हता. त्यांच्यापुढे जगन्नाथ परदेशी व त्यांचे कार्यकर्ते टॅक्सीतून चालले होते. बाळासाहेबांच्या जीपला इतर वाहनांनी जागा द्यावी यासाठी ते व त्यांचे कार्यकर्ते टॅक्सीच्या खिडक्यांतून हात बाजूला काढत 'बाजूला व्हा' 'बाजूला व्हा' असे म्हणत चालले होते. नगर रस्त्यावर बाळासाहेबांच्या जीपने ओव्हरटेक करून या टॅक्सीला जीप आडवी घातली. बाळासाहेब कमालीचे चिडले होते. 'तुम्ही आपापल्या घरी जा. माझ्या बरोबर येऊ नका' असे ते रागाने म्हणत होते. अखेर बाळासाहेबांनीच खुलासा केला. मला मावळे पाहिजेत; पण हाततुटके मावळे नव्हेत. शिवसेना हा केवळ पक्ष नाही, तर हे माझे कुटुंब आहे. आपणच एकमेकांची काळजी घ्यायला पाहिजे. तुम्ही ज्या पद्धतीने गाडीच्या खिडकीतून हात काढून चाललाय ते चुकीचे आहे. एखाद्या गाडीमुळे कुणाचा तरी हात कापण्याची, तुटण्याची शक्यता आहे. तुम्ही असे बेजबाबदार वागून चालणार नाही. मी चिडलो; पण तुमच्या भल्यासाठी असे म्हणताना त्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळले होते.

पुण्यामधील शिवसेनेचे विद्यमान नगरसेवक प्रशांत बधे कार्यकर्त्यांच्या दशेत असताना १९८६ च्या सुमारास त्यांनी बाळासाहेबांच्या वाढदिवसानिमित्त आठवडाभराच्या कार्यक्रमांचे आयोजन केले होते. त्याची माहिती द्यायला ते मुंबईत संपर्कप्रमुख सुधीर जोशी यांच्याकडे गेले होते. तेथून बाळासाहेबांच्या भेटीसाठी ते 'मातोश्री'वर गेले. त्या वेळी, माँसाहेब बाहेरच भेटल्या. त्यांनी आपुलकीने चौकशी केली. शिवसेनेचे विद्यमान नगरसेवक बधे आणि त्यांचे कार्यकर्ते मित्र मोटारसायकलवरून मुंबईला आल्याचे समजल्यावर माँसाहेब अवाक् झाल्या. त्यांनी बैठकीत असलेल्या बाळासाहेबांना बाहेर बोलावले व त्यांना ही बाब सांगितली. त्यावर बाळासाहेबांनी आस्थेवायिकपणे त्यांची चौकशी केली. आज मुंबईतच रहा असे आपुलकीने सांगून त्याची व्यवस्थाही केली. पुण्याला परतताना सावकाश जा, पोचले की कळवा असे काळजीने आवर्जून सांगितल्याची आठवण बधे यांनी सांगितली.

१९७५ ते १९८५ पर्यंतचा कालावधी हा शिवसेनेचा पडता काळ होता, असेच

कदाचित म्हणावे लागेल किंवा महाराष्ट्राच्या राजकारणाचा खऱ्या अर्थाने अभ्यास करण्यास लावणारी संधीच ह्या १० वर्षांत बाळासाहेब ठाकरे, त्यांच्या शिवसेनेला आणि शिवसैनिकांना मिळाली होती. ह्या पडत्या कालावधीतसुद्धा बाळासाहेबांनी आपल्या प्रत्येक शिवसैनिकाशी नातेसंबंध जोडून ठेवले. महाराष्ट्रभर कोणत्या ना कोणत्या कारणास्तव ते जनमानसात होते. बाळासाहेबांनी जरी कोणतीही निवडणूक लढविली नसली, मंत्र्याप्रमाणे सरकारी लाल दिवा त्यांच्या गाडीवर नसला तरी शिवसैनिकांनी बाळासाहेबांना नेहमी राजाप्रमाणे अगदी भारताच्या पंतप्रधानाएवढी आदरपूर्वक वागणूक दिली. खरे तर बाळासाहेब त्याच योग्यतेचे होते. म्हणतात ना – Give Respect - to Get Respect त्यानुसार बाळासाहेबांनी जेवढा आदर, प्रेम शिवसैनिकांना दिला, तो त्यांना त्याच्या अधिकपटीने शिवसैनिकांकडूनसुद्धा मिळाला.

कोल्हापुरात शिवसेना स्थापनेचा पहिला प्रयत्न १९८० मध्ये आजगेकर यांनी केला; पण तो उधळून लावण्यात आला होता. पुढे कालांतराने ९ मे १९८६ रोजी कोल्हापुरात कपिलतीर्थ मार्केट येथे शिवसेनेच्या पहिल्या शाखेची स्थापना बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते झाली. यात साळोखे–चव्हाण परिवारांचा पुढाकार होता. उद्घाटनानंतर शहरात मोठी रॅली काढण्यात आली. बिंदू चौकात बाळासाहेब ठाकरे यांची पहिली जाहीर सभा झाली. या सभेला अलोट गर्दी झाली होती. बाळासाहेबांच्या वाणीने तमाम कोल्हापूरवासीयांना शिवसेनेशी कायमचे जोडले. तशाच परिस्थितीत १९८०च्या दरम्यान शिवसेनेने काँग्रेस पक्षाचाच थेट प्रचार केला आणि त्या बदल्यात विधानपरिषदेच्या दोन जागा शिवसेनेला मिळाल्या. इंदिरा गांधींच्या विचारांना परखडपणे पाठिंबा देणाऱ्या बाळासाहेबांनी इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत पुन्हा काँग्रेसविरोधी भूमिका साकारत भारतीय जनता पक्षाबरोबर युती केली.

त्या वेळेसही बाळासाहेबांचे राजकारण जनतेला समजले नाही, इंदिरा गांधी यांना पाठिंबा देणारे बाळासाहेब भाजपाबरोबर म्हणजे नक्की काय? खरे तर बाळासाहेब पोलादी निर्णयक्षमता असणाऱ्या इंदिरा गांधींना पाठिंबा देत होते. काँग्रेस मधील विचारांना नव्हे तर व्यक्तीस तो पाठिंबा होता. इंदिरा गांधीच जर नाहीत तर काँग्रेस पक्षामधील पुढील नेतृत्वावर बाळासाहेबांचा विश्वास नव्हता, त्यापेक्षा अटलबिहारी वाजपेयी यांची शिस्त, त्यांचे नेतृत्व त्यांना अधिक भावले होते. परंतु हे जनतेपर्यंत पोहचू शकले नाही आणि सहानभूती लाटेचा काँग्रेस पक्षाने फायदा उचलत काँग्रेसमधील उमेदवार विजयी झाले, मात्र युतीचे सर्वच उमेदवार पराभूत झाले.

त्याच वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजप शिवसेनेची साथ सोडून



पुलोद काँग्रेसमध्ये सामील झाले, त्यामुळे कमळाबाई आम्हांस सोडून गेली असे बाळासाहेबांनी उद्‍गार काढले. त्यामुळे शिवसेनेने १९८५ मध्ये स्वबळावर विधानसभा निवडणुका लढवल्या, त्यातून शिवसेनेचा एकच आमदार निवडून विधानसभेत गेला आणि तो म्हणजे छगन भुजबळ.

बाळासाहेबांनी कर्तव्यनिष्ठ देशप्रेमी शिवसैनिकांना आपल्या मनशक्तीने आकर्षित केले. ८० % समाजकारण आणि २० % लोकाधिकार घेऊन सुधीर जोशी यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने 'स्थानीक लोकाधिकार समिती' तर महिलांच्या प्रगतीसाठी शिवसेना महिला आघाडी, विद्यार्थ्यांसाठी 'भारतीय विद्यार्थी सेना' स्थापन केली. आपली सार्वजनिक कामांची पूर्तता करण्याकरिता 'तोडा, झोडा, फोडा नाही तर दे टोला' ही एक नवीन वेगळी पद्धत अवलंबली आणि ती पद्धत शिवसैनिकांमध्ये यथासांग उतरवून अप्रत्यक्षरीत्या आंदोलने यशस्वी केली आणि मराठी माणसांच्या प्रगतीचा मार्ग निर्माण केला. आपल्या आगळ्या वेगळ्या मराठी बाण्याद्वारे मराठी तरुणांना रोजगारांची संधी उपलब्ध करून दिली. स्वयंरोजगारासाठी त्यांना प्रेरित केले. शिवसेनापुरस्कृत छोटे छोटे उद्योगधंदे वाढवले.

## गाव तेथे शाखा आणि घर तेथे शिवसैनिक

१९८५ मध्ये मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी करण्याचा डाव काही काँग्रेसी राज्यकर्त्यांनी मांडला, त्या वेळेचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील ह्यांना ते मंजूर नव्हते; परंतु ते सर्वांसमोर जाहीर करू शकले नाहीत कारण इतर काँग्रेस राज्यकर्त्यांचा त्यांच्यावर दबाव होता. त्यामुळे नकळत छुप्या स्वरूपाचा पाठिंबा देत बाळासाहेबांना पुढे करण्यात आले. त्याचे चित्र असे झाले की, मुंबई महापालिकेत प्रथमच सर्वांत मोठा पक्ष म्हणून विजयी झाला. शिवसेनाप्रमुखांचा लाडका अनुयायी छगन भुजबळ यांना बाळासाहेबांनी महापौर केले.

महापौर म्हणून काम करताना बाळासाहेब नेहमी वर्तमानपत्र वाचून झाल्यावर तसेच वाचकांच्या पत्रव्यवहारात असलेल्या समस्या जाणल्यावर ते सकाळी फोन करून छगन भुजबळ यांना 'काय महापौर वाचकांचा पत्रव्यवहार वाचलात का? त्याचे काय करणार? त्या माणसाची अडचण सोडवली का?' असे विचारत आणि योग्य ती विचारपूस करत पुढील आदेश देत असत. परंतु तो आदेश म्हणून न वाटता शिवसैनिकांना नेहमी प्रेमाचा, फायद्याचा आणि प्रगतीचा सल्लाच वाटायचा.


त्या वेळेस छगन भुजबळ आणि शिवसेनाप्रमुख यांचे नाते अगदी निकटवर्तीय झाले, त्यामुळे छगन भुजबळांच्या सांगण्यानुसार मुंबई, नाशिक बरोबरच महाराष्ट्रभर आणि गावागावात शिवसेना पोहचवण्याचा निर्णय घेण्यात आला. १९८५ मध्ये झालेल्या राज्यस्तरीय अधिवेशनात तर आता 'घौडदौड महाराष्ट्राची' अशी घोषणाच करण्यात आली. 'गाव तेथे शाखा आणि घर तेथे शिवसैनिक' असा मंत्रच बाळासाहेबांनी महाराष्ट्रभर फुंकला.

बाळासाहेबांच्या दिव्यशक्तीमुळे, विचारशक्तीद्वारे शिवसेना ज्यांच्या बाजूने, ती व्यक्ती हमखास विजयी होणारच हे राजकीय यशाचे समीकरण बनले.

**'यश-राज सूत्र'**

स्वप्न पाहायचे, त्याची मागणी करायची नि त्या स्वप्नपूर्तीसाठी आपल्या सहकाऱ्यांमध्ये तीव्र इच्छा निर्माण करायची, स्वत: तर परिपूर्ण पूर्तीसाठी विश्वास ठेवायचाच तसेच सहकाऱ्यांनासुद्धा विश्वास द्यायचा आणि स्वप्ने खरे करायचे ही बाळासाहेबांची कार्यपद्धती होती हे यावरून समजते.

ज्या गोष्टीकडे सर्वांचे लक्ष असते, त्या दिशेने ऊर्जा वाहते. ज्या गोष्टीवर आपण लक्ष केंद्रित करतो त्या गोष्टीस त्या गोष्टीस ऊर्जा मिळते. आपण भ्रष्टाचाराचा विरोध



करत राहिलो तर आपण भ्रष्टाचाराला नकळत  पाठिंबा देऊ लागतो. जर आपण भांडण, तंटा, तिरस्कार यांचा विरोध केला तर तीच गोष्ट आपण आपल्या जीवनात आकर्षित करतो. त्यामुळे जर तुम्ही युद्धविरोधी असाल तर त्याच्या विरोधी नेत्याची किंवा पक्षाची बाजू घ्या. म्हणजेच ऊर्जेची दिशा बदलावी.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीला बाळासाहेब ठाकरेंनी सत्ताधारी काँग्रेसकडे असलेली लोकांची ऊर्जा, लोकांचे ध्यान शिवसेनेकडे वळवले आणि शिवसेना त्या वेळेस प्रचंड बहुमतांनी जिंकली. हे सर्व कळत नकळत घडते पण कदाचित हा बोध समजल्यावर नक्कीच हे सातत्याने आणि सहजतेने प्राप्त करता येईल. हे सिद्ध करताना असंख्य मतदारांची ऊर्जा आपल्याकडे वळवत ७८ नगरसेवक निवडून आणून सत्ताधारी काँग्रेसला शिवसेनेचे पाणी पाजले. आणि महापौर म्हणून छगन भुजबळांची निवड झाली. बाळासाहेबांनी प्रत्येक निष्ठावंत कार्यकर्त्याला फार मोठे केले.

१९८५ मध्ये सोडून गेलेली कमळाबाई म्हणजेच भाजप आणि शिवसेना यांचे पुन्हा पुनर्मिलन झाले. दोन्ही पक्ष हिंदुत्वाचा पुरस्कार करत असल्यामुळे आणि अटलबिहारी हे बाळासाहेबांचे आवडते नेतृत्व असल्यामुळे त्या वेळी भाजप नेते प्रमोद महाजन यांनी पुढाकार घेत भाजपा-शिवसेनेच्या युतीसाठी पुढाकार घेतला. बांधलेली युतीची गाठ ही प्रमोद महाजन असेपर्यंत आणि प्रमोद महाजन देवाघरी गेल्यानंतर बाळासाहेब असेपर्यंत अभेद्य राहिली आणि कदाचित पुढेही अभेद्य राहील असे वाटते. ही अभेद्य युती आणि हिंदुत्वाचा पुरस्कार यांमुळे लोकसभा निवडणुकीत घसघशीत यश मिळवत महाराष्ट्रातून चार खासदार युतीतर्फे लोकसभेत गेले. खरे तर त्यानंतर भाजपाने शिवसेनाप्रमुखांच्या निर्णयाला कधीही डावललेले नाही. त्यांनी घेतलेला प्रत्येकच निर्णय, मग तो काँग्रेसवर्तीय 'राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील' यांना मराठी असल्यामुळे दिलेला पाठिंबा असेल वा कधीकधी बाळासाहेबांचे निर्णय भाजपास पटले नसतील तर त्यांनी त्यास पाठिंबा दिला नाही मात्र विरोध कधीच केला नाही.

बॉम्बस्फोट, देशविघातक कृत्ये घडविणाऱ्या धर्मांधांना या देशात राहण्याचा अधिकार नाही, मतपेटीचे राजकारण करीत अशा मुस्लिमांचे लांगूलचालन कोणी करू नये, भारताला आपला देश मानणाऱ्या राष्ट्रवादी मुस्लिम लोकांना आपला कोणत्याही प्रकारचा विरोध नाही, असे स्पष्ट विचार त्यांनी शिवसैनिकांसमोर व जनतेसमोर मांडले. या स्पष्ट व रोखठोक भूमिकेमुळेच 'हिंदुहृदयसम्राट' ही त्यांना प्राप्त झालेली उपाधी सार्थ ठरते. 'गर्व से कहो हम हिंदू हैं' या घोषणेला खरा अर्थ महाराष्ट्रात प्राप्त झाला तो शिवसेनाप्रमुखांमुळेच.

खरे तर हिंदुत्वाचे पुरस्कार करणारे नेते म्हणून बाळासाहेबांची ओळख झाली होती. त्यांनी जर ठरवले असते तर देशभर शिवसेना वाढवू शकले असते. परंतु बाळासाहेबांचे अधिक लक्ष महाराष्ट्रभरच होते. 'बाळासाहेबांचा निर्णय म्हणजे अंतिम निर्णय अशा प्रकारची भूमिका भाजपाची होती'. महाराष्ट्रात बाळासाहेबांना पाठिंबा आणि इतर राज्यात हिंदुत्वाचा पुरस्कार करून जिंकायचे अशीच भाजपाची भूमिका होती.

बाळासाहेबांच्या आयुष्याचा आणि राजकारणाचा दुसरा टप्पा सुरू होतो तो १९८५ नंतर, जेव्हा त्यांनी हिंदुत्वाचे राजकारण सुरू केले. खरे तर हिंदुत्व अगदी सुरुवातीपासूनच बाळासाहेबांच्या नसानसांत भिनले होते कारण बाळासाहेबांचे दैवत शिवाजी महाराज ज्यांनी आयुष्यभर हिंदुत्व टिकवण्यासाठी मोलाचे कार्य केले. त्या काळात बाबरी मशिदेचे प्रकरणही ज्वलंत होते, त्या पार्श्वभूमीवर हिंदुत्वाच्या लाटेवर महाराष्ट्रात स्वार होण्याचा निर्णय बाळासाहेबांनी जाहीर केला. १९८७ मध्ये त्यांनी विलेपार्ले येथील पोट निवडणुकीत 'गर्व से कहो, हम हिंदू है' असे म्हणत भाजपवर कुरघोडी केली. त्या वेळी भाजप जनता दल बरोबर होती. नंतर भाजपाने शिवसेनेबरोबर युती केली. हिंदुत्वाची जादुई तलवार उपसत शिवसेना नेते आणि विलेपार्ल्याचे डॉ. रमेश प्रभू विजयी झाले. छगन भुजबळांनंतर डॉ. रमेश प्रभू यांना महापौर बनवण्यात आले.



## बाळासाहेबांचा दिलदारपणा

बाळासाहेबांचे अनेकांबरोबर मतभेद झाले परंतु मनभेदांत रूपांतर होण्यापूर्वीच ते नातेसंबंध सांभाळत. बाळासाहेब जसे तडफदार वागत तसेच ते दिलदारपणे वागत याचा अनुभव अनेकांना आला. मतभेद असावेत पण मन-भेद नको हे बाळासाहेबांनी आयुष्यभर जपले.

ज्येष्ठ साहित्यिक 'सोबत'कार ग. वा. बेहेरे यांच्याशी बाळासाहेबांचा वैचारिक वाद एकेकाळी बराच गाजला होता. दोघांनी परस्परांवर बरीच जहरी टीका केली होती. वयानुरूप त्यांचे मतभेद मावळले. एकदा उभयतांच्या फोनवर गप्पा झाल्या. तुमच्याशी प्रत्यक्ष गप्पा मारायची इच्छा आहे, पण वय झाल्याने कुठे हिंडू फिरू शकत नाही असे बेहेरेंनी सांगितले. बाळासाहेबांनी पुण्यात कार्यकर्त्यांना फोन करून बेहेरेंना मुंबईत 'मातोश्री'वर घेऊन येण्यास सांगितले. तेव्हा रमेश बोडके आणि रामभाऊ पारीख शिवसेनेचे पदाधिकारी होते. बेहेरेंना मुंबईला घेऊन जाण्यासाठी कोणाकडेच गाडी नव्हती आणि बेहेरेंकडेही गाडी नव्हती. बरीच शोधाशोध केल्यावर अखेर पक्षातर्फे जिल्ह्याप्रमुखांना देण्यात आलेली एक जुनी जीप त्या दोघांनी पैदा केली. पण इलाज नव्हता. त्याच जीपमधून बोडके आणि पारीख बेहेरेंना घेऊन मातोश्रीवर दाखल झाले. बाळासाहेबांशी त्यांच्या बऱ्याच गप्पा झाल्या. बाळासाहेबांनी तुम्ही कोणत्या वाहनातून आलात? अशी पृच्छा केली. बेहेरे म्हणाले, 'जीपमधून'. वयोवृद्ध बेहेरेंना आरामदायी वाहनातून आणण्याऐवजी जीपमधून का आणले? असे बाळासाहेबांनी बोडके व पारीख यांना विचारले. बेहेरे यांच्याकडे कोणतीही गाडी नाही आणि आम्हाला अन्य कोणते वाहन उपलब्ध नसल्यामुळे जीपमधूनच आलो असे त्या दोघांनी सांगितले. ही मंडळी पुण्यात परतल्यानंतर अवघ्या तीन दिवसांतच बाळासाहेबांनी बेहेरेंच्या निवासस्थानी नवी कोरी अँबेसिडर भेट म्हणून पाठवून दिली. बेहेरेंना फोनवरून आग्रह करून ती गाडी वापरायला सांगितली. बेहेरेंनीही या दिलदार मित्राचा मान ठेवला. त्यांनी अखेरपर्यंत ही गाडी वापरल्याची आठवण पारीख यांनी सांगितली.

# दैनिक सामना

मार्मिक साप्ताहिकाच्या माध्यमातून बाळासाहेबांनी मराठी तरुणांची मने जिंकली आणि अत्यंत प्रभावी अशी शिवसेना स्थापित केली. दिवसेंदिवस लाखो शिवसैनिकांपर्यंत पोहचण्याकरिता, जनमानसात आपले विचार पोहचविण्याकरिता स्वत:चे वर्तमानपत्र काढण्याचे स्वप्न दोन दशकापासून बाळासाहेबांचे होतेच, खरं तर 'प्रबोधन'कारांनी अनेकदा आपले विचार लोकापर्यंत बीजरूपात पोहचवण्याकरिता स्वत:चे दैनिक वर्तमानपत्र असावे असे बोलून दाखवलेलेच होते. त्यामुळे स्वप्नपूर्तीची ही योग्य वेळ आहे, असे लक्षात घेऊन २२ जानेवारी १९८९ च्या मध्यरात्री बरोबर बाराच्या ठोक्याला म्हणजे २३ जानेवारी १९८९ रोजी दैनिक सामना प्रकाशित झाला. आपली ठाकरी भाषाशैली, विचार, तत्त्वाच्या जोरावर 'सामना' जनमानसात पोहचवला. शिवसैनिकांना तर ही फार आनंदाची बातमी होती. कारण आता साहेब आमच्याशी दररोज बोलणार. पूर्वी फक्त सभेच्या वेळी साहेबांचे विचार ऐकावयास मिळायचे, परंतु 'दैनिक सामना'च्या रूपात साहेब भेटणार. थोड्याच कालावधीत मुंबईसह महाराष्ट्रभर सामना प्रकाशित झाला आणि दिवसेंदिवस दैनिक सामनाच्या विक्रीमध्ये विक्रमी वाढ होऊ लागली. तेव्हापासून शिवसेनेचा कट्टर शिवसैनिक आणि बाळासाहेबांचा चाहता म्हणजे त्यांच्या घरी दैनिक सामना असणारच असे सूत्र तयार झाले. पूर्वी बाळासाहेबांच्या फार मोठ्या सभा होत, परंतु दुसऱ्या पक्षाशी लागेबांधे असलेली वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्या त्यांची दखल घेत नसत, परंतु दैनिक सामनाच्या रूपातून फक्त सभाच नव्हे तर शिवसेनेच्या माध्यमातून चांगले काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची दखल घेतली गेली. दैनिक सामनामुळे भावी राजकीय घोडदौड करण्यासाठी फार मोठा फायदा शिवसेनेला झाला.

दैनिक सामना सुरू झाल्यानंतर, बाळासाहेबांचे लक्ष विधानभवनाकडे लागले. विधानभवनावर युतीचा झेंडा फडकला असे स्वप्न बाळासाहेबांनी पाहिले. एकदा गाडीमधून जात असताना श्री. मनोहर जोशी यांनी बाळासाहेबांना प्रश्न केला की शिवसेनेचा झेंडा विधानभवनात फडकावयाचा असे आपण सांगितले पण कसे शक्य आहे?

तेव्हा बाळासाहेबांनी ठाकरी शैलीत सांगितले की, आत्मविश्वास आणि जिद्द असेल तर कोणतीही गोष्ट अवघड नाही.

विचारांती बाळासाहेबांनी पक्का निर्धार केला. 'मुंबई आपल्या ताब्यात येऊ



शकते तर महाराष्ट्र का नाही' हे प्रेरणादायी विचार साऱ्या महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात असलेल्या शिवसैनिकांच्या मनात रुजविले, पेरले आणि वाढवले. १९९० च्या दरम्यान ''आता लक्ष्य विधानभवन'' अशी घोषणा झाली. बाळासाहेबांचा झंझावाती प्रचार सुरू झाला. गाव तेथे शाखा आणि घर तेथे शिवसैनिक अगोदरच होता, बाळासाहेबांनी महाराष्ट्रभर झंझावाती प्रचारसभा घेतल्या.

सन १९९० च्या सुमारास पुण्यातील अलका टॉकीज चौकात सभेला तुडुंब गर्दी होती. व्यासपीठावर छायाचित्रे काढण्यासाठी छायाचित्रकारांची गर्दी होती; आणि त्यांची धांदल चालली होती. त्या छायाचित्रकारांमध्ये अंजली इंगवले ही एकमेव महिला छायाचित्रकार होती. त्या गोंधळात ती मागे पडली होती. बाळासाहेबांच्या नजरेस ही गोष्ट आली. त्यांनी माइकवरून सांगितले की, ''पहिला फोटो काढण्याचा मान महिला छायाचित्रकाराचा, या क्षेत्रात महिला येताहेत त्यांना वाव द्यायला हवा.'' बाळासाहेबांच्या या आवाहनानंतर व्यासपीठावरील गोंधळ थांबला, महिला पत्रकाराने मनसोक्त फोटो काढले. बाळासाहेब हे शिवाजी महाराजांप्रमाणे महिलांचा प्रचंड आदर करत.

बाळासाहेबांनी नाशिकमध्ये शिवसैनिकांना सक्रिय करणाऱ्या गोल्फ क्लब मैदानावर सभा गाजविल्या, त्या सभांसारख्या जाहीर सभा आजपर्यंत कोणत्याही नेत्यांना गोल्फ क्लब मैदानावर गाजविता आल्या नाहीत. नाशिककरांना बाळासाहेबांच्या रोखठोक वक्तृत्वाची आठवण कायम येत राहील. नाशिकमध्ये ज्या वेळी दादा कोंडके यांच्या चित्रपट प्रदर्शनाची अडचण निर्माण झाली त्यावेळी स्वत: बाळासाहेब नाशिकच्या विजयानंद थिएटरसमोर गाडीच्या बॉनेटवर उभे राहून भाषण करताना नाशिककरांनी पाहिले होते.

बाळासाहेबांच्या सहज बोलणाऱ्या भाषणाने मराठी माणसांच्या मनात महाराष्ट्राच्या सर्वधर्मीयवर्तींना आणि जातीपातींना न मानता जवळ करणाऱ्या शिवसेनेच्या उद्दिष्टांमुळे शिवसेना-भाजप युती जिंकणार असे वातावरण महाराष्ट्रभर निर्माण झाले. विधानभवनावर भगवा फडकणारच असेच वाटतंच होते. युतीचे ५२ उमेदवार विजयी झाले आणि विधानसभेचे सदस्य झाले. खरे तर हा फार मोठा विजय मिळाला परंतु प्रत्यक्षात सत्तेने मात्र हुलकावणी दिली. परंतु बाळासाहेबांच्या उद्‌गारांप्रमाणे महाराष्ट्रभर भगवा झेंडा फडकवायचा ! हे खरे होऊ शकते असा विश्वास मात्र सर्व शिवसैनिकांमध्ये आणि भारतीय जनता पार्टीमध्ये निर्माण झाला. ह्या विश्वासामुळे भारतीय जनता पार्टीने शिवसेनेचा हात घट्ट पकडून धरला आणि त्यामुळे १९९५ साली झालेल्या

विधानसभा निवडणुकीत त्याचा फायदा झाला.

बाळासाहेबांचे पुण्यावर म्हणजेच त्यांच्या जन्मभूमीवर अत्यंत प्रेम होते, म्हणून १९९३ मध्ये पुण्यामध्ये शिवसेनेच्या कार्यक्रमानिमित्ताने आल्यानंतर त्यांनी नातूवाड्याला भेट दिली, त्या वेळी त्यांनी वाड्यातील त्यांच्या बालपणीच्या आठवणी शिवसैनिकांना सांगितल्या. तेथील जोहाऱ्याच्या महादेव मंदिरात ते खेळायचे. वयाची ७-८ वर्षे होईपर्यंत ते तेथे होते, हे सर्व सांगताना ते अत्यंत भावनिक झाले आणि दाराच्या चौकटीवर डोके ठेवून त्यांनी नमस्कार केला.



# बाळासाहेब ठाकरे झाले हिंदुहृदयसम्राट

अयोध्येची बाबरी मशीद आणि श्रीराम मंदिर हे प्रकरण फार काळापासून चालू होते, परंतु ६ डिसेंबर १९९२ रोजी अयोध्येत बाबरीकांड करण्यात आले. हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या कार्यकर्त्यांनी बाबरी ढाचा पाडला. त्या वेळेला हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या शेकडो सामाजिक संस्था, संघटना कार्यरत होत्या आणि आहेत, परंतु हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे राष्ट्रीय पक्ष म्हणून भाजप आणि शिवसेनेस ओळखले जायचे. त्यामुळे लोकसभेत अधिवेशनात गदारोळ झाला. भाजपाचे १० खासदार लोकसभेत होते परंतु त्यांच्यापैकी कोणीही त्याची जबाबदारी स्वीकारण्यास तयार नव्हते. खरे तर भाजपा शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी ते केलेच नसावे, कोणा एका हिंदत्ववादी संघटनेचे ते काम असावे. बाळासाहेबांनी अगदी जाहीरपणे असे सांगितले, आयोध्येतील बाबरीकांड माझ्या शिवसैनिकांनीच केले आहे आणि त्याबद्दल मला त्याचा अभिमान आहे. 'गर्वसे कहो हम हिंदू है'। संपूर्ण भारतभर हे प्रकरण फारच गाजले.

बाळासाहेबांना स्वामी विवेकानंदांचे आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार पटत होते. बाबरी मशीद ही शिवसैनिकांनीच पाडल्याची जबाबदारी बाळासाहेबांनी स्वीकारली. त्याचा परिणाम असा झाला, शेकडो हिंदुत्ववादी छोट्या संघटना, त्यांच्याकडे चेहरा नव्हता, नेतृत्व नव्हते अशांना हिंदुत्ववादी नेतृत्व मिळाले. भारतभर जरी भाजपा पक्ष असला तरी हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे कट्टर नेतृत्व म्हणून जगभर बाळासाहेबांना ओळख मिळाली. सर्व जण बाळासाहेबांना 'हिंदुहृदयसम्राट' म्हणू लागले. देशातल्या करोडो हिंदुत्ववादी जनमानसाला एक नेतृत्व मिळाले. १९८५ पासून हिंदुत्वाचा जाहीरपणे बाळासाहेबांनी पुरस्कार सुरू केला होता, त्यानुसार भाजपाबरोबर युती झाली होती. संपूर्ण हिंदूंना एक तडफदार चेहरा बाळासाहेबांच्या रूपात मिळाला होता. बाळासाहेब हे आता महाराष्ट्राचे नव्हे तर देशाचे नेते झाले होते. कित्येकांनी तर त्यांना 'इंडिया टायगर' म्हटले होते. हिंदुहृदयसम्राट म्हणून निर्माण झालेल्या ओळखीमुळे बाळासाहेबांचे नेतृत्व देशभर गाजले, तसेच शिवसेना प्रादेशिक पक्षाऐवजी राष्ट्रीय पक्ष म्हणून जनमानसात समोर आला. शिवसेनेचे कार्य जम्मू-कश्मीर, पंजाब, हरयाणा, दिल्ली, गुजरात, कर्नाटक अशा प्रांतांत वाढले. शिवसेना पक्षाच्या वतीने अनेकजण निवडणुकीलादेखील उभे राहिले.

# छगन भुजबळांचा शिवसेनेला अखेरचा जय महाराष्ट्र...

विधिमंडळाच्या नागपूर अधिवेशनात छगन भुजबळ यांची कोंडीच झाली. १९८५ पूर्वी मराठी समाजाला आधारून असलेले राजकारण आणि १९८५ नंतर हिंदुत्वाचा पुरस्कार हा कोठेतरी छगन भुजबळांना मान्य नव्हता. परंतु ज्यांनी आपल्याला कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना नगरसेवक केले, महापौर केले, आमदार केले त्यांच्याविरुद्ध जाण्यास छगन भुजबळांची मनाची तयारी नव्हती, परंतु ओबीसी समाजालासुद्धा आरक्षण मिळालेच पाहिजे आणि बाळासाहेबांच्या तत्त्वानुसार मेरिटनुसारच प्राधान्य मिळालेच पाहिजे ही विचारामध्ये असलेली तफावत, त्यामुळे ओबीसी समाजाचे पुरस्कृत नेते म्हणून समजले जाणारे छगन भुजबळ यांनी नागपूर अधिवेशनात शिवसेनेला अखेरचा जय महाराष्ट्र केला. १२ आमदारांसह भुजबळानी शरद पवार साहेबांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

त्यामुळे शरदबाबूने भुजबळ पळवले असा आरोप बाळासाहेबांनी केला. आरोप झाले, त्यावर शरद पवार काहीही बोलले नाहीत. छगन भुजबळांकडूनसुद्धा प्रत्यारोप झाले. परंतु मनामध्ये बाळासाहेबांविषयी असलेल्या आदरामुळे त्यांनी माघार घेतली.

परंतु छगन भुजबळ गेल्यामुळे १९९२ च्या मुंबई महापालिका निवडणुकीत काँग्रेसचा विजय झाला आणि सत्ता काँग्रेसकडे गेली.

खरे तर बाळासाहेबांनी आपल्या प्रत्येक शिवसैनिकांवर फार प्रेम केले. त्यांना नेते बनविले. बाळासाहेबांचे छगन भुजबळांवर अत्यंत प्रेम होते. परंतु विचारांमधील मतभेदामुळे दोघांची ताटातूट झाली. आजही मी जो काही आहे, तो बाळासाहेबांमुळेच आहे असे छगन भुजबळांनी अनेकदा सांगितले.



# भगवा झेंडा विधानसभेवर फडकला

१९९० मध्ये अधिक थोड्या फरकामुळे सत्तेने हुलकावणी दिली होती, परंतु ह्यावेळेस विधानभवनावर भगवा झेंडा १००% फडकणार याची खात्री शिवसेना-भाजपा युतीला होती. मागील निवडणुकीमध्ये ज्या चुका झाल्या होत्या त्यावर सर्वांनी चर्चा करून १९९५ दरम्यानच्या विधानसभा निवडणुकीचे नियोजन केले. ह्यावेळेस विधानभवनावर भगवा झेंडा फडकणारच असा विचार प्रत्येकाच्या मनात रुजू झालेलाच होता. हिंदुत्वाचा पुरस्कार करण्यासाठी आणि मंत्रालयावर भगवा ध्वज फडकवण्याकरिता अंतर्मनाच्या प्रेरणेनुसार पुढचा राजकीय कार्यक्रम ठरविला. शिवसैनिकाच्या आणि मतदार बंधू भगिनींच्या मनात आपले हिंदूंचे राज्य म्हणजे युतीची सत्ता, अशी विचाराची पेरणी केली. हिंदुत्वाचा भगवा विचार रुजवण्याकरिता सभेच्या वेळी भगवे व्यासपीठ, भगव्या पताकांची गर्दी आणि भगव्या रंगाचे धनुष्यबाण, भगव्या रंगाचे कमळ आणि खाली भारताच्या झेंड्यामधील हिरवा रंग. तसेच शिवसैनिकांच्या आणि भाजपा कार्यकर्त्यांच्या डोक्यावर भगवी टोपी, आणि छातीवर भगव्या चिन्हाचा बॅच. भगव्या रंगाचा कपाळावर टिळा. अशा स्वरूपाच्या हिंदुत्ववादी पुरस्काराचा अवलंब करण्यात आला. एवढेच काय तर शिवसेनाप्रमुखांनी ह्या काळात पांढऱ्या रंगाच्या ठाकरे स्टाइलच्या सलवार कुर्त्याबरोबर भगव्या रंगाचे उपरणे तर कधी संपूर्ण भगव्या रंगाचेच ठाकरी स्टाइलमधील सलवार कुर्ता आणि उपरणे आणि हिंदुत्वाची जपमाळ म्हणजे रुद्राक्षाची गळ्यात माळ आणि हाताभोवती रुद्राक्षाची गुंडाळलेली माळ अशा स्वरूपाची शिवसेना- प्रमुखांची प्रतिमाच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात अगदी वाऱ्यासारखी पोहचवली आणि हिंदूंनी ती मनापासून स्वीकारली.

प्रचारसभेमध्ये खासकरून बाळासाहेब ठाकरे हे लोकांना हिंदुस्थानच्या भगव्या हिंदुत्ववादी भावविश्वात घेऊन जायचे. महाराष्ट्रात समर्थ शिवशाही स्थापन करणे त्याकरिता सर्वांत महत्त्वाचे आहे. मंत्रालयावर भगवा झेंडा प्रत्यक्षात साकार करण्याची जबाबदारी ही माझ्या हातात नसून तमाम महाराष्ट्राच्या हिंदू लोकांच्या हातात आहे आणि हे स्वप्न साकार करण्याकरिता मला तुमची साथ हवी! अशी आवाहने करत बाळासाहेबांनी झंझावती प्रचारसभा केल्या. तहानभूक विसरून अगदी हजारोंच्या उपस्थितीत दिवसभरात चार-चार प्रचारसभा करण्यात आल्या. दिवसभरातून चार चार मोठ्या प्रचारसभांचे नियोजन आणि त्या गाजवणे हे आजपर्यंत बाळासाहेबांनाच साधता आले आहे. शिवसेनेच्या स्थापनेनंतर तब्बल २९ वर्षांनी महाराष्ट्र राज्याची

सत्ता शिवसेनेकडे भाजपाच्या सहकार्याने आली. मार्च १९९५च्या विधानसभा निवडणुकीत शिवसेनेने १५० जागा जिंकल्या. त्या निवडणुकीत शिवसेनेला १,६३,१५,४९५ एवढी भरघोस मते मिळाली आणि शिवसेना महाराष्ट्रातील नंबर १चा पक्ष झाला. ह्या निवडणुकीत भाजपाला ४९,३२,७६७ एवढी मते मिळाली. त्या वेळेस महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बाळासाहेब ठाकरेच होतील असे कित्येकांना वाटले, परंतु सत्तेपासून दूर राहून आपल्या शिवसैनिकांच्याच मार्फत उत्कर्ष घडवून आणायचा या निर्णयावर बाळासाहेब शिवसेना स्थापन झाल्यापासून ठाम होते आणि ते आयुष्यभर ठाम राहिले. शिवसेनेच्या सुरुवातीच्या काळापासून जडलेले, उच्च, सुशिक्षित हुशार, तज्ज्ञ व्यक्ती म्हणून श्री. मनोहर जोशी यांची ओळख होती. त्यामुळे मनोहर जोशी यांना मुख्यमंत्री करण्यात आले. कदाचित त्या वेळेस छगन भुजबळ असते तर ते मुख्यमंत्री झाले असते. छगन भुजबळ हे मुंबईमधील माझगाव मतदारसंघातून निवडणूक लढवत होते. त्यांच्या विरुद्ध कट्टर शिवसैनिक म्हणून ओळखले जाणारे बाळा नांदगावकर हे उभे होते. बाळा नांदगावकर हेच बाळासाहेबांच्या पाठिंब्याने निवडून आले. शिवसेनेतून इतर पक्षात गेलेल्या व्यक्तीचा पराभव असे सूत्र स्थापित झाले.

झुणका-भाकर केंद्रांची योजना, वृद्धाश्रमांची साखळी, वृद्धांना सवलती, झोपड-पट्टीवासीयांना घरे, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबईतील उड्डाणपूल, बॉम्बेचे 'मुंबई' असे नामकरण अशा अनेक योजना-प्रकल्पांची मूळ संकल्पना ही बाळासाहेबांचीच. 'व्हॅलेंटाइन डे'सारख्या संस्कृतिविघातक पाश्चिमात्य उत्सवांना विरोध, परप्रांतीयांच्या तसेच बांगलादेशींच्या विरोधातील आंदोलने यांमागचा विचारही बाळासाहेबांचाच. बाळासाहेबांनी राजकारणात (सत्ताकारणात) जात या घटकाचा अजिबात विचार केला नाही. तसेच त्यांनी तरुणांच्या आकांक्षांना पंख लावले. त्यामुळेच अनेक जातिपातींच्या मराठी तरुणांना विविध सत्तापदे प्राप्त झाली, होत आहेत. हाच इतर पक्षांत व शिवसेनेत आणि इतर नेत्यांत व बाळासाहेबांमध्ये असलेला फरक होय. जातिपातीचे राजकारण, सहकारी संस्था, साखर कारखाने स्थापन करून केलेले सत्ताकारण, कुटिल राजकीय डावपेच असे महाराष्ट्रातील परंपरागत राजकारण बाळासाहेब ठाकरे यांनी केले नाही. तरुणांची मने महाराष्ट्राच्या अभिमानाने भारून टाकणे, जनतेच्या मनातील विचार नेमके ओळखून, त्यांची नाडी ओळखून ते वक्तृत्वशैलीच्या साहाय्याने मांडणे आणि आक्रमक संघटनेच्या माध्यमातून विविध आंदोलने करणे अशी कार्यपद्धती बाळासाहेबांनी अवलंबिली आणि अशा कार्यपद्धतीमुळेच शिवशाही प्रत्यक्षात आली आणि विधानभवनावर भगवा फडकला.

**'यश-राज सूत्र'**

कोणत्याही छोट्या-मोठ्या कामाची स्वप्नपूर्तता करण्यासाठी जे पाहिजे त्या



दिशेने सर्वांची ऊर्जा मिळविणे हे गरजेचे आहे. निवडणुकीमध्ये बाळासाहेबांनी जनतेला मंत्रालयावर शिवसेनेचा झेंडा फडकविलेलाच आहे असे चित्र दाखविले आणि जेथे जेथे प्रचारसभा लागल्या तेथे तेथे शिवसेनामय वातावरण निर्मिती केली. भगवा ध्वज, भगवे व्यासपीठ आणि मंत्रालयावर भगवा फडकल्याचे चित्र याचा वापर केला आणि यामुळे स्वप्न पूर्ण होणारच हा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाला. सर्वांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण झाले. महाराष्ट्रात विधानसभेवर शिवसेना बहुमताने निवडून आली.

बाळासाहेबांची शिवशाही सरकारच्या बाजूने उभी राहिली. शिवशाहीचे कौतुक केले आणि जर कुणी चुकला तर त्यास दटावलेसुद्धा. वेळप्रसंगी विरोधकांचा कडक शब्दांत समाचारही घेतला. चार वर्षांच्या या सुवर्णकाळात शिवसेनाप्रमुखांच्या विचारांचे सुवर्णकण म्हणजे शिवशाहीचे भाग्य. त्यांचे सारेच विचार देणे कठीण, परंतु १९९५ ते ९९ कालखंडातील भारतीय स्वातंत्र्याला ५० वर्षे झाल्याबद्दल राष्ट्रध्वजाचे आरोहण करण्यात आले, तो प्रसंग विसरता येणार नाही. रात्री बरोबर १२ वाजून ५ मिनिटांनी शिवसेनाप्रमुखांच्या हस्ते शिवसेना भवनावर ध्वजारोहण झाले तेव्हा हजारो राष्ट्रभक्त शिवसैनिकांच्या हातातील पेटत्या मशालींनी स्वातंत्र्याचा हा सुवर्ण सोहळा उजळून निघाला. डोळे दिपवणारी विद्युत् रोषणाई, फटाक्यांची तुफानी आतषबाजी, ढोल-ताशांचा गजर, सनईचे मंगल सूर आणि गगनाला भिडणाऱ्या जयघोषाच्या साक्षीने शिवसेनाप्रमुख म्हणाले, ''अवघ्या हिंदुस्थानातील हा एकमेव असाच सोहळा आहे. जिवंत मनाची, जिवंत मनगटांची, जिवंत मशालींसारखी ही मावळेमंडळी म्हणजे साक्षात शिवरायांचा इतिहासच आहे. पूर्वी दिल्लीच्या मोगल सम्राटालाही हा शिवरायांचा इतिहास पुसता आला नाही. अलीकडच्या दिल्लीश्वरांनीही असा प्रयत्न करण्याचे धाडस करू नये. (प्रचंड टाळ्या). मराठी माणूस पेटत्या मशालीसारखा असतो. अगोदर तो पेटत नाही आणि पेटला तर विझत नाही. (पुन्हा प्रचंड टाळ्या). त्यामुळे या मऱ्हाठी माणसाच्या भानगडीत कोणी पडू नये. आम्ही भगवा हातात घेतला आहे तो शिवरायांचा. आम्ही व्रतस्थ आहोत या देशाच्या रक्षणासाठी.'' आपल्या आवाहनानंतर त्यांनी हजारो शिवसैनिकांना धार्मिक भेदाभेद न करण्याची शपथ दिली. राष्ट्र उभारणीच्या आणि विकासाच्या कार्यात यापुढे हिंदू आणि बिगरहिंदू असा भेद केला जाणार नाही असे सांगून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी हजारो शिवसैनिकांना धार्मिक भेदभाव न करण्याची शपथ दिली होती.

## एन् डी ए ची स्थापना

१९९५ नंतरच्या लोकसभा निवडणुकीत कोणत्याही पक्षास स्पष्ट बहुमत मिळत नव्हते म्हणून National democratic Alliance ची स्थापन करण्यात आली. १९९८ मध्ये भारतीय जनता पार्टी, शिवसेना, समता पार्टी, बिजू जनता दल, ऑल इंडिया अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम, ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस, पट्टलीमक्कल काची, लोक शक्ती मरुमलार्ची द्रविड मुन्नेत्र कळघम, हरयाना विकास पार्टी, जनता पार्टी, मिझो नॅशनल फ्रन्ट इत्यादी पार्टींचा समावेश होता. १९९८ मध्ये स्पष्ट बहुमत न मिळवता आल्यामुळे पुन्हा १९९९ मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांना पंतप्रधान म्हणून घोषित करत आणि वरील पार्टींबरोबरच तेलगू देसम पार्टीचा बाहेरून पाठिंबा आणि सिक्कीम डेमोक्रॅटिक फ्रन्टचा समावेश करण्यात आला. १९९९ मध्ये शिवसेनेतर्फे संपूर्ण भारतातून लोकसभेकरिता ६३ उमेदवारांना उभे करण्यात आले होते. त्यापैकी १५ खासदार निवडून आले आणि त्या निवडणुकीत शिवसेनेला ५६ लाख ७२ हजार ४१२ मतदारांनी मते दिली.

१९९६ च्या दरम्यान शिवसेनेने लोकसभेकरिता १३२ जागा लढवल्या होत्या त्यांपैकी एकूण १५ जागी शिवसेनेला विजय मिळाला. परंतु ह्या सर्वच निवडणुकीमध्ये शिवसेनेची भाजपाबरोबर युती होती. १९९९ मध्ये एन.डी.ए.ची सत्ता केंद्रात आली. एन.डी.ए.चे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी झाले. १९९९ च्या निवडणुकीत मनोहर जोशी खासदार तर झालेच तर बरोबर केंद्रीयमंत्रीसुद्धा झाले.

ह्या काळात अनेक सुधारणा करण्यात आल्या. सर्वप्रथम रस्ते वाहतूक सुधारणे हे अत्यंत महत्त्वाचे आहे आणि त्यावर अंमलबजावणी करून राष्ट्रीय महामार्ग करण्याचे फार मोठे आणि महत्त्वपूर्ण काम ह्याच कालावधीत झाले. १९९९ ते २००४ च्या कालावधीत एनडीएची सत्ता होती.

खरंतर विधानसभा निवडणुका २००० साली होणार होत्या. १९९८ मध्ये लोकसभा निवडणुका होणार होत्या. प्रमोद महाजन यांच्या आग्रहाखातर सहा महिने अगोदरच लोकसभा निवडणुकीबरोबर विधानसभा निवडणुका घेण्याचा निर्णय करण्यात आला. परंतु त्यामुळे राष्ट्रीय स्तरावरील निवडणुकीच्या मुद्द्यावरच फोकस करण्यात आला. त्या काळात २५ मे १९९९ रोजी शरद बाबू पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची स्थापना करण्यात आली होती. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे मुख्य ध्येय महाराष्ट्र असल्यामुळे त्यांना त्याचा अधिक फायदा होत काँग्रेस आणि राष्ट्रवादी



काँग्रेस पार्टीची सत्ता महाराष्ट्रात आली. काँग्रेसने २४९ जागा लढवल्या, त्यापैकी ७५ जागा जिंकल्या. राष्ट्रवादीने २२३ जागा लढवल्या, त्यापैकी ५८ जागा जिंकल्या. शिवसेनेने १६९ जागा लढवल्या, त्यापैकी ६९ जागा जिंकल्या. शिवसेना ह्या निवडणुकीत दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष झाला. विधान-सभेत विरोधी पक्षाची भूमिका शिवसेना-भाजपाकडे आली. त्याकाळात शिवसेनेचे कोकणातील वर्चस्व असणारे नारायण राणे विरोधी पक्षनेते झाले.

मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना त्यांनी शिवसेना पक्षाच्या वतीने लोकसभेची निवडणूक लढवली, आणि प्रचंड बहुमताने निवडून खासदार झाले. मनोहर जोशी खासदार होऊन केंद्रीय मंत्रिमंडळात गेल्याने काही कालावधीत नारायण राणे यांनी मुख्यमंत्री म्हणून काम केले.

बाळासाहेबांच्या मनाच्या मोठेपणाचे उदाहरण खालील संदर्भावरून जाणवते. शून्यांतून विश्व निर्माण केलेल्या राज्यातील सर्व क्षेत्रांतील मान्यवरांच्या मुलाखतींचे, व्याख्यानांचे शिवउद्योग सेनेतर्फे 'जिगर २०००' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याच्या अखेरच्या दिवशी ज्येष्ठ पार्श्वगायिका आशा भोसले व बाळासाहेब मार्गदर्शन करणार होते. बाळासाहेब संध्याकाळी पुण्यात पोचले. मुकुंदनगर येथील निवासस्थानी ताजेतवाने झाल्यावर त्यांनी कार्यक्रमस्थळी कूच केले. त्या वेळी बाळासाहेबांसाठी मोठी सुरक्षा व्यवस्था होती. बाळासाहेब निघाले, तेव्हा आशा भोसले यांचे भाषण चालू असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले. ते लक्षात घेऊन बाळासाहेबांनी पोलिस प्रमुखांना बोलावून घेतले व ''सर्व गाड्यांचे सायरन बंद करा. आशाताई श्रेष्ठ गायिका आहेत. आपल्यामुळे त्यांच्या भाषणात व्यत्यय नको. सायरनच्या आवाजाने लोक बाहेर येतील. तो आशाताईंचा अवमान ठरेल. मला ते नको आहे'' असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सांगितले. त्यांच्या इच्छेनुसार पोलिसांनी आशाताईंचे भाषण चालू असतानाच बाळासाहेबांना मागील दाराने गेस्टरूममध्ये नेले. आशाताईंचे भाषण होईपर्यंत बाळासाहेब तेथेच बसले. त्यानंतर मिनिटभरातच त्यांची व्यासपीठावर झोकात एन्ट्री झाली.

# अर्धांगिनी हरपली

बाळासाहेबांच्या प्रभुत्वामागे सर्वांत मोठी ताकद मीनाताईंची होती. शिवसैनिकांना मीनाताई नेहमी कुटुंबाचा हिस्सा मानत, त्यांचे बालणे आपुलकीचे आणि जवळीकीतेचे वाटे. मीनाताईंनी सर्व कुटुंबाला एकत्रित ठेवण्याचे मोठे काम केले.

घरामध्ये दररोज शेकडो शिवसैनिक आणि बाळासाहेबांचे चाहते भेटण्यासाठी येत असत, मीनाताईंनी त्यांचे नेहमीच हसतखेळत स्वागत केले. कधीही कोणत्याही स्वरूपाचा तिरस्कार किंवा रागे भरण्याची घटना कोणासही अनुभवास आली नाही. मीनाताई सुरुवातीपासून असंख्य अडचणींना सामोरे गेल्या, बाळासाहेबांना सातत्याने त्यानी फक्त आणि फक्त प्रोत्साहनच दिले. म्हणतात ना स्त्री ही क्षणभराची पत्नी आणि आयुष्यभराची आई असते. आई म्हणून बिंदुमाधव, जयदेव आणि उद्धव ह्या सर्वांवर संस्कार करण्याचे अत्यंत महत्त्वाचे कार्य मीनाताईंनी केले. सर्वजण मीनाताईना माँसाहेब म्हणून संबोधित.

१९८२ मध्ये कर्जत-चौक रस्त्यावर भिलवले येथे पाझर तलावाच्या परिसरात शिवसेनाप्रमुखांचे फार्महाऊस झाले. त्या वेळी प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक बी. जी. शिर्के यांनी शिवसेनाप्रमुखांना भेट दिलेले फार्महाऊस साडेसहा एकरमधील ५ गुंठे क्षेत्रामध्ये आहे. शिवसेनाप्रमुख मीनाताईंसह अनेकदा तेथे विश्रांतीसाठी येत. बंगला खालापूर तालुक्यामध्ये असला तरी तो कर्जतचा बंगला म्हणूनच प्रसिद्ध होता. साहेब त्या दिवशी मीनाताईंबरोबर बंगल्यावर विश्रांतीसाठी आले होते. दुपारी १२.०० वाजता शिवसेनाप्रमुखांनी मातोश्रीवर उद्धव यांच्याबरोबर बोलणे केले, तोपर्यंत त्यांची प्रकृती व्यवस्थित होती, मात्र त्यानंतर प्रकृती बिघडली. मीनाताईंना याच बंगल्यात हृदय-विकाराचा झटका आला. आयत्यावेळी आवश्यक औषध मिळाले नाही आणि मीनाताईंना पनवेल येथील इस्पितळात हलविण्याचे ठरविले. मात्र इस्पितळात जाण्यापूर्वीच त्यांची प्राणज्योत विझली. त्या वेळी शिवसेनाप्रमुख भावनाप्रधान होऊन म्हणाले, ''मी अनेक लढाया जिंकल्या, परंतु ही लढाई मात्र हरलो.''

बाळासाहेबांचे नेहमी जाणे-येणे असलेला हा बंगला ६ सप्टेंबर १९९६ नंतर ओस पडला. बाळासाहेब ठाकरे यांचे पत्नीवर प्रचंड प्रेम होते. मीनाताईंच्या निधनानंतरही त्यांचा फोटो कायम बाळासाहेबांच्या कुर्त्याच्या खिशात असायचा.



## बाळासाहेबांनी सहन केलेले धक्के

आजवर बाळासाहेबांनी खूप धक्के सहन केले. बाळासाहेबांनी वयाच्या ३४ व्या वर्षी मार्मिक साप्ताहिक; तर वयाच्या ४० व्या वर्षी शिवसेनेची स्थापना केली. सन २००३ साली बाळासाहेब ७७ वर्षांचे झाले होते. वयोमानानुसार बाळासाहेबांना जास्त दगदग सहन होत नसे. शिवसेनाप्रमुखांसमोर शिवसेनेचा कार्याध्यक्ष म्हणून बाळासाहेबांपुढे उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे अशी दोन नावे होती. बाळासाहेबांनी विचारांती उद्धवनाच कार्याध्यक्ष करायचे ठरविले.

राज ठाकरे यांनी बाळासाहेबांचे मन जाणले, आणि उद्धव ठाकरे यांस कार्यकारी प्रमुख करा असे सुचविले. महाबळेश्वर अधिवेशनात उद्धव ठाकरे यांची शिवसेनेचे कार्यकारी प्रमुख म्हणून निवड करण्यात आली. खरे पाहता–बाळासाहेबांची जसजसी उतरती स्थिती सुरुवात झाली तसतसा शिवसेनेचा विस्तार झालेलाच आहे, परंतु तरीही २००४ मध्ये विधानसभा निवडणुकीत शिवसेना–भाजपा सत्ता येऊ शकली नाही आणि लागलीच नारायण राणे यांनी पक्षातून बाहेर पडून बंडखोरी केली. एका म्यानामध्ये एकापेक्षा अधिक तलवारी बसू शकत नाही हे खरेच आहे, त्यामुळे शिवसेनेच्या नेतेपदी असलेले आणि बाळासाहेबांच्या भावांचे चिरंजीव राज ठाकरे यांनी २७ नोव्हेंबर २००५ मध्ये राजीनामा दिला. १८ डिसेंबर २००८ मध्ये राज यांनी शिवसेनेला केला ''जय महाराष्ट्र''.

त्या वेळी बाळासाहेब पुत्रप्रेमाने आंधळे झाले असे म्हणून मिडियाने त्यांना महाभारतातील आंधळ्या पुत्रप्रेमी धृतराष्ट्राची उपमा दिली. त्यावर बाळासाहेबांनी उपहासात्मक उत्तर देऊन लोकांना खदखदून हसवले. मी काळ्या रंगाचा गॉगल घालत असलो तरी मी महाराष्ट्रातील धृतराष्ट्र नाही असा खुलासा बाळासाहेबांनी केला.

राज ठाकरे यांनी शिवसेना सोडल्याचे आपल्याला अजिबात दु:ख झाले नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले होते; परंतु दुसऱ्याच दिवशी बाळासाहेबांनी शिवसेना सोडलेल्यांनी पक्षात परत यावे, असे आवाहन केले होते. 'या चिमण्यांनो परत फिरा रे घराकडे आपुल्या...' या लोकप्रिय मराठी लोकगीतातील काव्यपंक्ती उद्धृत करत त्यांनी हे आवाहन केले होते. राजच्या शिवसेनात्यागाचा आपल्याला धक्का बसला असून त्यामुळे वेदनाही झाल्या असल्याची भावना नंतर बाळासाहेबांनी व्यक्त केली होती. राजकडून आपल्याला ही अपेक्षा नव्हती, असे त्यांनी म्हटले होते. राज असे काही करेल अशी आपण स्वप्नातही कल्पना केली नव्हती, असे त्यांनी नमूद केले

होते. राजला हवे असलेले सारे काही देण्याचे आपण व उद्धव यांनी मान्य केले होते; परंतु कोणत्या गुरूने त्याला सल्ला देऊन त्याचे मन कलुषित केले ते आपण सांगू शकत नाही, असेही त्यांनी म्हटले होते.

बाळासाहेबांनी शिवसैनिकांना जबर धक्का १९९०च्या दशकात दिला होता. माधव देशपांडे या त्यांच्याच जुन्या सहकाऱ्याने त्यांच्यावर घराणेशाहीचा आरोप केला तेव्हा त्यांनी आपल्या सर्व कुटुंबियांसमवेत 'शिवसेनेला अखेरचा जय महाराष्ट्र केला' त्या वेळेस शिवसैनिकांनी त्यांना पुन्हा परत आणले. परंतु राज ठाकरे यांनी शिवसेनेपुढे मोठे आव्हान उभे केले, तेव्हा मात्र शिवसैनिकांनी राज यांना परत आणण्याऐवजी लाखो शिवसैनिक शिवसेनेतून मनसेमध्ये गेले. राज हा बाळासाहेबांना सर्वार्थाने जवळ होता आणि शिवसैनिक तर राज यांच्याकडे बाळासाहेबाचे प्रतिरूप म्हणूनच बघत होते. पण शिवसेनेची सूत्रे उद्धव यांच्याकडे गेल्यानंतर राज यांची कोंडी झाली होती. एका पत्रकाराच्या मुलाखतीत 'राज यांस मी खाऊ पिऊ घातलं आणि मोठा केला, परंतु त्यानेच मला मोठा धक्का दिला' असे बाळासाहेब उद्गारले, ह्या कोंडीमुळे राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्ष सुरू केला, पक्ष सुरू केल्यावर बाळासाहेबांनी राज ठाकरे यांना बिजवत एक पत्र आणि एक प्रकाराचे आव्हान देत राज ठाकरे यांना प्रेरणा दिल्या. परंतु राज यांनी बाळासाहेबांना आपले नेहमी विठ्ठल मानले आणि मानत राहिले असे दिसते. बाळासाहेबांना मानणारा जनसमुदाय हा आयुष्यभर सततच वाढत राहिला– वाढत राहिला, अन् वाढतच राहिला. शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना हे दोन्ही पक्ष बाळासाहेबांचेच प्रतीक आहे. एक प्रत्यक्ष तर दुसरे संस्कार – अप्रत्यक्ष.

हिंदुत्वाचा पुरस्कार आणि शिवसेना भाजप यांची अभेद्य युती,बाळासाहेबांनी केलेली जनमानसातली प्रतिमा, त्यांचे तडफदार विचार, दैनिक सामनातून शिवसैनिकांना प्रसिद्धीच्या स्वरूपात मिळालेली कामाची पावती, त्यामुळे शिवसैनिकाची ताकद आणखीनच वाढत होती. 'दैनिक सामना' हे शिवसेनेचे एक मुखपत्र आहे आणि असेल. दैनिक सामना मुखपत्रातून आपले विचार ठामपणे मांडत असत आणि आपण व्यक्त केलेल्या ठाम विचारांवर आलेल्या प्रतिक्रियांनासुद्धा उत्तर बाळासाहेब तत्परतेने देत असत.

एकदा शिर्डीच्या साईबाबांना सोन्याचे सिंहासन करायचे असा प्रस्ताव काही साईबाबा प्रेमींनी मांडला, परंतु बाळासाहेबांचे मत अगदी ठाम होते की, साईबाबा देवस्थानाच्या माध्यमातून जमा झालेला पैसा लोककल्याणासाठी वापरावा कारण साईबाबांनी आपले आयुष्य अगदी फकिराप्रमाणे जगून लोककल्याण केले आणि



म्हणूनच त्यांना देवत्व प्राप्त झाले. बाळासाहेबांनी शिवसेनेच्या मुखपत्रातून असा प्रश्न उपस्थित केला की, शिर्डीच्या साईबाबांना सोन्याचे सिंहासन काय करायचे आहे, त्यावर लोकमत मराठी वृत्तपत्राने बाळासाहेबांवर तोफ डागली. त्यांची ही सामाजिक हिताची भूमिका 'लोकमत'ने पहिल्या पानावर मांडली होती. त्यावर राज्यभरातून प्रतिक्रियाही उमटली होती. मात्र याची दुसरी बाजूही 'लोकमत'ने ठामपणे मांडली होती. बाळासाहेबांनी २००२ साली शिर्डीतील भारतीय कामगार सेनेच्या कामगारांनी दिलेले भलेमोठे चांदीचे सिंहासन स्वीकारले होते. काही साईभक्तांनी त्याचे छायाचित्र 'लोकमत'ला दिले आणि बाळासाहेब, तुमच्या चांदीच्या सिंहासनाचे काय, असा सवाल थेट शिवसेनाप्रमुखांना करताच शिवसेनाही हादरली. 'लोकमत'ने थेट 'वाघा'च्या जबड्यात हात घातला होता. बाळासाहेबांनी या विषयाचा खास त्यांच्या शैलीत सोक्षमोक्ष लावला. त्यांनी दुसऱ्याच दिवशी लोकमतकडे त्या चांदीच्या सिंहासनाचे गूढ उकलले. त्यांनी लोकमतचे संपादक दिनकर रायकर यांना फोन करून आपल्या चांदीच्या सिंहासनाचे गुपित उघड केले. ते म्हणाले होते की, ''शिर्डीच्या महाशिबिरात शिवसैनिकांनी दिले ते चांदीचे सिंहासन नव्हे! आतून सारे लाकूड आणि वरून मुलाम्याचा पत्रा ठोकलेला... तो वारंवार निघतो आणि हाताला लागतो. म्हणून त्यावर आच्छादन घालून मी बसतो... शेवटी माझ्या गोरगरीब शिवसैनिकांनी मोठ्या प्रेमाने ते मला भेट दिलेले आहे. पण शिर्डीतील कोट्यवधी रुपयांचे सिंहासन रोखण्याचा मोठा विचार मी मांडला. त्यातही हे 'चांदी'चे सिंहासन आडवे येत असेल तर पाठवून देतो तुमच्याकडे... पत्ता द्या! मी स्वत: व्यवस्था करून तुमच्याकडे पोहोचते करतो. त्यावर शिपाई बसवला तरी चालेल.''

बाळासाहेबांनी आपला शब्द खरा करून दाखवला. त्यांचे 'रौप्य' सिंहासन स्वखर्चाने मुंबई लोकमतच्या चिंचपोकळी कार्यालयात धाडून दिले. तेव्हा साऱ्या माध्यमांमध्ये खळबळ उडाली होती. सर्व वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्यांनाही याची दखल घ्यावी लागली होती.

माध्यमांच्या इतिहासात प्रथमच अशी घटना घडली होती. परंतु लोकमतने बाळासाहेबांचे हे सिंहासन आदरपूर्वक त्यांना परत करण्याचा निर्णय घेतला. शिवसैनिकांचे आणि त्यात आता भर पडलेल्या लोकमतच्या प्रेमाचे प्रतीक बाळासाहेब अव्हेरणार नाहीत, याची खात्री होतीच... त्याचा प्रत्यय लगेच दुसऱ्या दिवशी आला.

लोकमत वृत्तपत्रसमूहाचे अध्यक्ष व मुख्य संपादक खा. विनयबाबू दर्डा, संचालक करण दर्डा व संपादक दिनकर रायकर यांनी तितक्याच सन्मानाने ते चांदीचे सिंहासन मातोश्रीवर नेऊन दिले. बाळासाहेबांनीही ते स्वीकारले आणि सिंहासनपर्व संपले. मात्र

यातून लोकमत समूह आणि बाळासाहेब यांच्यातील नाते आणखी दृढ झाले. ते आजही टिकून आहे.

या सिंहासनपर्वाची चर्चा देशभरात झाली. या साऱ्या पर्वाची दखल सामनासह महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, रत्नागिरी टाइम्स, बेळगाव तरुण भारत, नवभारत टाइम्स, नवशक्ती, इंडियन एक्स्प्रेस, मुंबई मिरर, मिड डे, द नवहिंद टाइम्स या मराठी आणि इंग्रजी वृत्तपत्रांसह काही इंग्रजी-हिंदी वेबसाइट्सनीही घेतली होती.

या सर्व घडामोडींदरम्यान शिर्डीच्या साई संस्थानने सुवर्ण सिंहासन न बसवण्याचा निर्णय जाहीर केला. आता युद्ध संपले असे वाटावे आणि तेवढ्यात आक्रमण व्हावे... असेच झाले. शिर्डीच्या सिंहासनाचा अध्याय संपल्यानंतर दुसऱ्याच दिवशी सिंहासनपर्व सुरू झाले.



## जीवघेणा हल्ला

१९६९ चे साल होते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची नागपूर येथे जाहीर सभा झाली. काही महत्त्वाचे काम असल्यामुळे ते सभा संपल्यावर रात्रीच मुंबईस यायला निघाले. रात्री दीडचा सुमार होता. शिवसेनाप्रमुखांनी नागपूर विमान-तळावरच बुक-स्टॉलवरून पं. नेहरूंची प्रस्तावना असलेले 'वाइल्ड लाइफ इन इंडिया' हे पुस्तक विकत घेतले आणि ते आवडल्यामुळे वाचनात रंगून गेले. इतक्यात दिलीप देवधर घाबऱ्या घाबऱ्या सांगू लागले की, 'नागपूरच्या कुप्रसिद्ध लालभाईपैकी नायडू, चौबे, यादव, पाटील इ. दहाजणांचे टोळके तिथे आले आहे.' त्यामुळे अर्थात चौघेही 'तय्यार' होतेच. परंतु सावधगिरी म्हणून बाळासाहेब तिथे उभ्या असलेल्या पोलिस अधिकाऱ्याला ती माणसे दाखवून त्यांचा बंदोबस्त करायला सांगून पुन्हा आपल्या जागी आले. एवढा प्रकार होतो तो टोळके त्यांच्याजवळ आले. त्यांच्या म्होरक्याने नायडूने आपल्याशी चर्चा करायची शिवसेनाप्रमुखांजवळ मागणी केली. विमानाला अगदीच थोडा अवधी होता आणि चर्चा करणे हा निव्वळ बनाव होता. ते आले होते निराळ्याच इराद्याने. अर्थात त्यांनी नकार दिला. त्याबरोबर 'इतना बडा नेता होकर चर्चा नही कर सकते, तो अपमान करना पडेगा' असे म्हणून त्याने काही संशयास्पद हालचाल करताच त्याला पहिला तडाखा खुद्द शिवसेनाप्रमुखांनी हाणला. मग इतर अवघे तीनच शिवसैनिक असले तरी गप्प बसतात की काय? त्यांनी मग परिणामाची क्षिती न बाळगता त्या टोळक्याला खरपूस रगडून काढले. शिवाय तिथे बघ्यांच्या भूमिकेत उभ्या असलेल्या पोलिसांच्या हवाली केले. त्यांच्यातला सर्वांत धोकेबाज समजला जाणारा चौबे याची अशी खातरजमा शिवसैनिकांनी पटवून दिली की, तो अक्षरश: ढुंगणाला पाय लावून कुंपणावरून सरड्यासारखा पळाला! दहा विरुद्ध चार शिवसैनिकांचा हा सामना पाहून सर्वजण स्तिमित झाले. हे सर्व चालले असता स्टुडंट युनियनचे कार्यकर्ते मात्र एका कोपऱ्यात उभे राहून भेदरट नजरेने पाहत होते. या तरुण रक्ताची शिवसेनाप्रमुखांना अत्यंत कीव आली.

हा सर्व प्रकार नागपूरची पोलिस मंडळी सिनेमासारखी पाहत बसली होती. कमाल आहे! अशा बघ्या लोकांची नेमणूक सरकार का करते हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. या प्रकरणात शिवसैनिकांची ताकद काय 'कसाची' आहे याचा प्रत्यय तर लालभाईंना आलाच; पण त्यांचा सेनानीदेखील तसाच धडाडीचा नि साहसी आहे याचेही प्रत्यंतर मिळाले. या लढाईमुळे नागपुरातल्या तथाकथित भयंकर लालभाईची

अब्रू अक्षरश: उघड्यावर आली... नागपुरात त्याना तोंड दाखवायला जागा उरली नाही. शिवसेनेशी दिलेला सामना किती गरम पडतो हेही त्यांच्या चांगले लक्षात आले असेल!

दुसरी घटना माहीमची आहे. शिवसेनाप्रमुख सपत्नीक दादरहून वांद्र्याला जाण्यासाठी रात्री निघाले होते. माहीम चर्चजवळ गाडी आली आणि एका टॅक्सी ड्रायव्हरने त्यांच्यासमोर गाडी काढण्याचा प्रयत्न केला. शिवसेनाप्रमुखांनी गाडी उभी करून त्याला जाब विचारला. हा ड्रायव्हर मुसलमान/पाकिस्तानी/बांगलादेशी असल्यामुळे आणि माहिमची वस्ती मुसलमानांची असल्यामुळे ताबडतोब त्या भागातील अनेक मुसलमान गाडीजवळ गोळा झाले. हे दृश्य बघून शिवसेनाप्रमुखांनी आपले रिव्हॉल्व्हर जमावावर रोखले आणि तेथून सरळ पोलिस स्टेशनला गेले. त्या ठिकाणी त्या ड्रायव्हरला पकडून आणण्यात आले व त्या वेळेस भारतदेशाला सर्वस्व मानणाऱ्या मुसलमानांनी बाळासाहेबांना सहकार्य करून देशप्रेम दाखवले.



## बाळासाहेबांचे आजारपण

श्वसनाचा त्रास हा बाळासाहेबांचा मुख्य विकार. डॉ. जलील परकार हे त्यांच्या रोगाचे तज्ज्ञ. तपासणीसाठी ते बाळासाहेबांच्या संपर्कात आले आणि नंतर तेच त्यांच्या तब्येतीचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार झाले. २०जूनपासूनच बाळासाहेबांचे गंभीर आजारपण सुरू झाले, दिवसेंदिवस पोटाच्या तक्रारी वाढत गेल्या, बद्धकोष्ठाचा विकार त्यांना सतत त्रास देत असे. पोटाच्या आजारपणाचा तपशील घेण्यासाठी–तपासणी करण्यासाठी एंडोस्कोपी करण्याचा निर्णय झाला. एंडोस्कोपीच्या रिपोर्टनुसार परिस्थिती अतिशय गंभीर आहे असे जाणवले आणि त्याबाबतची डॉ. जलील परकार, भूलतज्ज्ञ सतीश कुलकर्णी आणि उद्धव ठाकरे यांना कल्पना आली.

बाळासाहेब २४ नोव्हेंबर २०११ रोजी त्यांचे मित्र व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांच्या राहत्या घरी आले होते. सुमारे २० ते २५ मिनिटे बाळासाहेबांनी आर. के. लक्ष्मण व त्यांच्या पत्नी कमला लक्ष्मण यांच्याशी गप्पा मारल्या होत्या. त्यांना कॉफी टेबल पुस्तक भेट दिले होते. यांनीही बाळासाहेबांना ‘कॉमन मॅन’चे चित्र काढून भेट दिले होते. श्री. लक्ष्मण यांना अर्धांगवायूचा झटका आल्याने त्यांना बोलता येत नव्हते. मात्र, खूप वर्षांनी बाळासाहेबांना पाहिल्यानंतर लक्ष्मण यांच्या डोळ्यांत पाणी आले होते.

पुणेभेटीदरम्यान बाळासाहेब म्हणाले होते, ‘‘आर. के. लक्ष्मण आणि मी काढलेल्या व्यंगचित्रांमुळे त्या वेळच्या राजकीय व्यक्ती थरथर कापत होत्या. परंतु आमच्या दोघांचेही हात थरथरत आहेत. शंभर अग्रलेख व एक व्यंगचित्र सारखे आहे. अग्रलेख सर्वसामान्यांना समजत नाही. मात्र, व्यंगचित्र सर्वसामान्यांना सहज समजते. डेव्हिड लो याने हिटलरची व्यंगचित्रे काढली होती. त्यावर त्याला जिवंत किंवा मारून पकडा, असा आदेश हिटलरने काढला होता. एवढी खोली व्यंगचित्रात पाहिजे, अशी त्यांच्यात चर्चा झाली.

जणू काही बाळासाहेबांनासुद्धा त्यांच्या शेवटाची चाहुल लागलीच होती. त्यांनाही त्यांचे भविष्य माहीत झाले होते. किती दिवस हॉस्पिटलमध्ये राहायचे, इथे मला असह्य होते आहे असे बाळासाहेबांनी डॉ. परकारांना सांगितले. डॉक्टरांनी बाळासाहेबांना आपण मातोश्रीवरच ISU अति दक्षता विभाग करावा असे सुचविले. बाळासाहेबांना ‘मातोश्री बंगला’म्हणजे जणू काही आईच्या कुशीप्रमाणेच होता. बाळासाहेबांनी होकार दर्शविला. परकारांनी सारी उपकरणे हजर केली आणि मातोश्रीवरच खउण सुरू करण्यात

आला. इन्टेसिव्ह केअर युनिटमधील तज्ज्ञ डॉ. अब्दुल समद अन्सारी हे परिचारक म्हणून सतत लक्ष ठेवून असायचे. पूर्वीपासूनच असलेल्या हृदयरोगाच्या आजारामुळे सतत कॉर्डिऑलॉजिस्ट डॉ. अजित मेनन ये जा करीत असत.

बाळासाहेबांच्या तब्येतीमुळे मातोश्रीवरील सर्व वातावरण चिंताग्रस्त झाले होते. मातोश्री बंगल्यावर पहिल्या मजल्यावर येणाऱ्या जाणाऱ्यास फार परवानगीपूर्वकच पाठवले जायचे. तितक्यात २२ ऑक्टोबर २०१२ रोजी दसरा मेळावा आला. इतकी वर्षे थाटामाटात प्रचंड गर्दीत साजरा केलेला दसरा मेळावा अशा परिस्थितीत कसा संपन्न होणार असा प्रश्न उभा राहिला. बाळासाहेब उत्तरले – शिवसेनेचा दसरा मेळावा हा झालाच पाहिजे. सर्व शिवसैनिक, कार्याध्यक्ष उद्धवजी कामाला लागले. दसरा मेळावा करण्यासाठी शिवाजी पार्कवर परवानगी मिळेना, पण बाळासाहेबांच्या जादुई ठाकरी बाण्यापुढे फक्त २०१२ मध्येच दसरा मेळावा शिवाजी पार्कमध्येच होईल. पुढील वर्षी नाही. असा निर्णय दिला गेला.

पुढील वर्षी दसरा मेळावा पाहण्यास या जगात आपण नसू अशी माहिती कदाचित बाळासाहेबांना होती. त्यांनी शिवाजी पार्कच्या व्यवस्थापकीय कमिटीचा आदेश स्वीकारला. दसरा मेळावा २०१२ शिवतीर्थावर म्हणजेच शिवाजी पार्कवर झाला. डॉ. जलील परकार यांच्या सल्ल्यानुसार बाळासाहेबांनी न जाण्याचा निर्णय घेतला. आय.सी.यू.मध्येच बाळासाहेबांनी आपले ठाकरे शैलीतील झंझावाती पण मावळते भाषण व्हिडिओ रेकॉर्डच्या माध्यमातून शिवसैनिक आणि महाराष्ट्राच्या जनतेपर्यंत पोहचवले. त्यांच्या त्या भाषणातून सूर्य मावळतो आहे याची एक कल्पना संपूर्ण देशाला आली. जणू काही ह्या दसरा मेळाव्यासाठीच मी जाणाऱ्या श्वासास रोखून ठेवले आहे असेच वाटत होते. दसरा मेळाव्याचा हा सोहळा बाळासाहेबांनी मातोश्रीवरूनच न्यूज चॅनेलच्या माध्यमातून पाहिला. दसरा मेळावा झाला तरी बाळासाहेबांची प्रकृती आणखीनच खालावली गेली. दर वर्षी संपूर्ण देश दिवाळी रोषणाई साजरा करीत होता. शिवसेना भवनसुद्धा दिवाळीच्या झगमगाटात उजळून निघाले होते. धनत्रयोदशीदिवशी सर्वजण आपल्या लाडक्या नेत्याला दीर्घायुष्य लाभावे यासाठी प्रार्थना करीत होते.



# यमराजांना बोलाविले दिवाळी नंतर

दिवाळीमध्ये जसा पाऊसरूपी फटाका-झगमगाट करून हळूहळू विझू लागतो, तशीच काही स्थिती आयुष्यभर पाऊसरूपी झगमगाट करून हळूहळू विझण्याच्या दिशेने सुरू झाली होती. रविवारपासूनच म्हणजेच ११ ऑक्टोबर २०१२ पासूनच बाळासाहेब अधूनमधून कोमात जाऊ लागले होते. त्यांच्या डोळ्यासमोर अधूनमधून अंधारी येत होती. त्यांच्या तल्लखपणाच्या सीमारेषा पुसट होत होत्या. ऐन दिवाळीत माझ्या शिवसैनिकांना दु:खाचे ओझे नको, असंच काहीतरी मनात ठेवून बाळासाहेब देवाला प्रार्थना करीत असावेत. यमराजाला दिवाळी झाल्यावर येतो असेच सांगितले असावे. यमराजाला माहीत होते बाळासाहेबांचा शब्द म्हणजे काळ्या दगडावरील रेघ. त्यामुळे यमराजाने आणखी एक आठवडा दिला असावा. संपूर्ण देशाने दिवाळी साजरी केली, पण ऐन दिवाळीत बाळासाहेबांच्या शुभेच्छा आम्हांस आल्या नाहीत याचा अर्थ साहेबांची तब्येत ठीक नाही याची जाणीव शिवसैनिकांना झालीच. गेली चार दशके ज्यांच्याबरोबर भारतीय दसरा सण साजरा केला, विचाररूपी सोनं घेतलं आणि मराठी माणसांच्या आयुष्याची प्रगतशील दिवाळी केली....

अशा बाळासाहेबांना शिवसैनिक कसा विसरू शकतो? आमचा तळपता ऊर्जा देणारा सूर्य मावळतो आहे हे जाणून स्वयंस्फूर्तीने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतून साहेबांच्या तब्येतीची विचारपूस करण्यासाठी 'मातोश्री'जवळ शिवसैनिक आणि बाळासाहेबांचे चाहते गर्दी करू लागले. सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्रीपर्यंत, तरुणांपासून वृद्धांपर्यंत सर्वचजण मातोश्रीजवळ गर्दी करू लागले होते. ''आम्हांला बाकी काही नको, फक्त आमच्या बाळासाहेबांना दीर्घायुष्य लाभो. आई जगदंबा त्यांना उदंड आयुष्य देवो।।'' अशीच प्रार्थना सर्वजण करीत होते. बाळासाहेबांची प्रकृती स्थिर आहे, शिवसैनिकांनी संयम आणि शांतता राखावी, चिंतेचे कारण नाही अशा बातम्या येत असतानासुद्धा शिवसैनिक मात्र बाळासाहेबांची स्थिती जाणून होता.

बाळासाहेब म्हणजे शिवसेना, शिवसैनिक म्हणजे बाळासाहेब. अशा एकजीव झालेल्या शरीराला कोठेही जखम झाली तरी ती कळणारच ! आजवर शिवसैनिकांची काळजी शिवसेनाप्रमुखांनी एखाद्या बापाप्रमाणे घेतली. तो महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात असू देत, त्याच्या तब्येतीची, घरच्यांची विचारपूस करायचे. गरज पडल्यास त्यांस भेटावयास जायचे. जाताना एखादा आयुर्वेदिक लेप बरोबर घेऊन जायचे. स्वत:च्या हाताने लेप लावायचे आणि पुढे तसाच लेप लावण्याचा आदेश द्यायचे. अशा प्रकारचा

आपल्या शिवसैनिकांच्याप्रती काळजीवाहू असणारा नेता शिवसैनिक कसे विसरणार !

म्हणतात पेराल तसेच उगवते.

आयुष्य हे बूमरँग होऊन तुम्हास परत मिळते. जे द्याल तेच मिळते.

तसेच बाळासाहेबांच्या सभोवताली मातोश्रीच्या आवारात पाच दिवसांपासून दिवसेंदिवस हजारो शिवसैनिकांची गर्दी वाढतच चालली होती. गर्दी कमी होण्याचे नावच घेत नव्हती. प्रत्येकाला चिंता होती बाळासाहेबांची. पोलिसांनासुद्धा अखेरीस मोठी फोर्स तैनात करावी लागली. मातोश्रीसभोवतालच्या रस्त्यांच्या वाहतुकीमध्ये बदल करण्यात आले. ज्येष्ठ गायिका लता मंगेशकर यांनाही त्यांच्या मोठ्या भावाप्रमाणे असणाऱ्या बाळासाहेबांच्या सूर्यास्ताची चाहूलच लागली होती. त्यांच्या एका म्युझिक कंपनीचे काम त्यांनी पुढे ढकलले आणि बाळासाहेबांना भेटण्यासाठी त्या मातोश्रीवर आल्या. डॉक्टरांनी सांगितले, बाळासाहेब एखाद्या योद्धाप्रमाणे लढत आहेत. त्यांची प्रकृती उपचारांना छान प्रतिसाद देत आहे. हे ऐकूनही लतादीदींचे समाधान झाले नाही. त्या बाळासाहेबांना प्रत्यक्ष भेटल्या.

बाळासाहेबांच्या हृदयाचे ठोके सुरू होते. नाडी सुरू होती. मात्र आजारपणाची व्याप्ती एकेक अवयव गाठून पुढे सरकत होती. दोन दिवस मूत्रविसर्जनाचा प्रश्नसुद्धा गंभीर झाला होता. गुरुवारी सकाळपासूनच अचानकपणे मातोश्रीवर गर्दी वाढू लागली. सिनेकलाकार, अमिताभ बच्चन, सलमान खान त्यांच्या बंधूंसह, दिग्दर्शक मधुर भांडारकर, मराठी सिनेकलाकार विक्रम गोखले, ऋषी कपूर त्यांच्या बंधूंसह, प्रसिद्ध उद्योगपती राहुल बजाज अशा सर्वच क्षेत्रांतील मान्यवर मंडळींची गर्दी वाढू लागली. सर्वच टीव्ही चॅनेलवर याची बातमी होऊ लागली, अर्थात भारतातला एक जनमत असणारा नेता आणि त्यांना भेटायला येणारी प्रत्येक क्षेत्रातली यशस्वी माणसं येतात म्हटल्यावर टीव्ही चॅनेलवाल्यांना दखल घ्यावीच लागेल. टीव्ही चॅनेलवरील सर्वच इतर बातम्या डावलल्या गेल्या आणि हेडलाइन्स म्हणून बाळासाहेबांची तब्येत आणि फ्लॅशन्यूज त्यांच्या तब्येतीमध्ये होत असलेल्या सुधारणा हीच होती.

हजारो शिवसैनिकांची संख्या आता लाखोमध्ये पोहोचली. भारताच्या कानाकोपऱ्यांत लोक एकत्रित होऊन प्रार्थना करू लागले. 'मातोश्री' बंगल्याजवळ शिवसैनिक संकटविनाशक गणपतीची आरती म्हणू लागले, बाळासाहेबांच्या नावाने घोषणा होऊ लागल्या, कदाचित आमच्या घोषणांनी साहेबांना आणखी मृत्यूशी लढण्याची ताकद मिळेल आणि आम्हास प्रार्थना थांबवण्यासाठी उजव्या हाताने आदेश देतील. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात कुठे मृत्युंजय मंत्र, पूजा, महाआरती, देवाला साकडे घालणे, मुस्लिम बांधवांकडून दुवा केली गेली, अशा देशातून प्रत्येक जातिधर्मीयांच्या लोकांकडून



बाळासाहेबांच्या प्रकृतीमध्ये जादुई चमत्कार झाला. बाळसाहेबांची प्रकृती पुन्हा प्रार्थनारूपी दुवांनी सुधारली. ठाकरे कुटुंब पुन्हा आनंदी झाले, सर्वांमध्ये उत्साह संचारला. शिवसैनिकांमध्ये जल्लोष निर्माण झाला, शिवसेनाभवन लाइटच्या माळाच्या रोषणाईत पुन्हा उजळून निघाले. शिवसेना-प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे आम्हाला पुन्हा दर्शन मिळणार अशी बातमी आणि विश्वास बाळासाहेबांचे अत्यंत निकटवर्तीय आणि शिवसेनेचे खासदार असलेले संजय राऊत यांनी दिली.

देवाच्या दर्शनासाठी सर्व शिवसैनिक आसुसलेले होते. कदाचित बाळासाहेबांनी यमराजाला दिलेल्या वचनाची माहिती त्यांना नव्हती. पूर्वापर चालत आलेली दिवाळी महाराष्ट्राच्या जनतेने नेहमी साजरी करावी, श्रीमंत माणसाची दिवाळी ही दररोजच असते. परंतु मध्यमवर्गीय आणि गरीब माणसं, वर्षातून एकदाच दिवाळी साजरी करतात आणि ऐन दिवाळीत मी गेल्यावर माझे शिवसैनिक पुन्हा दिवाळी साजरी करणार नाहीत असा विश्वासच बाळासाहेबांना असावा.

पूर्वी असेच त्या वेळचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी अमेरिकहून येणाऱ्या तांबड्या गव्हावर निर्बंध जाहीर केला होता. अमेरिकेत जनावरांनासुद्धा खाण्याच्या लायकीचा नाही म्हणून हा तांबडा गहू भारतात पाठवला जातो अशी माहिती लालबहादूर शास्त्री यांना मिळाली, म्हणून त्यांनी हा निर्णय घेतला, पण जर हा तांबडा गहू आपण घेतला नाही तर अन्नाचा तुटवडा होईल अशी माहिती अनुभवी सचिवाने दिली. त्यावर राजेंद्रप्रसाद यांनी संपूर्ण भारतीय जनतेला आवाहन केले की, दर सोमवारी उपास करावा आणि त्यावर भारतातील संपूर्ण जनतेने त्यांना प्रतिसाद दिला आणि आज आपण पाहत आहोत की, करोडो लोकसुद्धा सोमवारी उपवास करताना दिसतात. त्यांना उपवासाचे कारण विचारले असता सांगता येत नाही परंतु पूर्वापर चालत आला आहे म्हणून आम्ही हा उपवास करतो असे ते सांगतात. अशी शब्दाला जागणारी जनता भारतातच आहे !

# आखिर यमराज जीत गया!

बाळासाहेबांना माहीत होते आणि आपणाससुद्धा माहिती आहे की, बाळासाहेबांच्या प्रत्येक आदेशाची अंमलबजावणी शिवसैनिकांनी केली.

दिवाळी झाली, बाळासाहेबांना यमराजाला दिलेल्या वचनाची आठवण झाली. अन् शनिवारी सकाळी नेहमीप्रमाणे डॉ. जलील परकार ९.१५ च्या सुमारास मातोश्रीवर आले आणि तपासणी करून पुन्हा ९.४५ वाजता गेले.

सकाळी १०.४५ वा. शेतकरी संघटनेचे खासदार राजू शेट्टी यांचे आगमन झाले. त्यांनी शिवसेनाप्रमुखांचे दर्शन घेतले.

सकाळी ११.१५ च्या सुमारास मनोहर जोशी यांचे आगमन.

सकाळी ११.३० च्या सुमारास डॉक्टरांची टीम मातोश्रीवर दाखल झाली.

दुपारी १२ च्या सुमारास डॉक्टरांची टीम बाहेर गेली.

दुपारी ३.३३ मिनिटांनी बाळासाहेबांनी अखेरचा श्वास घेतला आणि ते श्वासापलीकडे गेले.

अन् रस्तोरस्ती अंधार पसरत गेला.

बाळासाहेब ठाकरे हे श्वासाच्या पलीकडे गेले ही बातमी भारतभर अवघ्या पाच ते दहा मिनिटांत अगदी वादळाप्रमाणे पसरली. जणू काही एखादे प्रचंड मोठे वादळ झाल्यावर जशा प्रकारची शांतता निर्माण होते तशा प्रकारची शांतता आणि वादळानंतर असलेला एकान्तवास हा मुंबईसह महाराष्ट्रभर सर्वत्र दिसत होता. संपूर्ण भारत देश जणू काही शोकसागरात बुडाला होता.

मराठी मन सुन्न झाले होते. संपूर्ण महाराष्ट्र हळहळला ! जवळजवळ संपूर्ण महाराष्ट्रभर स्वयंस्फूर्तपणे व्यापारी संकुले बंद झाली, मोठ्या मोठ्या कंपन्यांची इंजिने थांबली, सर्व कामे बंद करून आपल्या लाडक्या लोकनेत्याच्या बाबतीत आणखी जाणून घेण्याबाबत जो तो न्यूज चॅनेलसमोर बसू लागला. एरवी १० मिनिटांच्या न्यूजनंतर दाखवणाऱ्या जाहिराती पूर्ण बंद झाल्या. देशाच्या सर्वच न्यूज चॅनेलवर एक आणि एकच बातमी होती, ती फक्त बाळासाहेबांची. जणू काही एवढ्या मोठ्या घटनेपेक्षा देशात इतरत्र काहीच घडत नव्हते. मातोश्रीबाहेर गेले दहा दिवस महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तळ ठोकून बसलेल्या शिवसैनिकांच्या अश्रूंचा बांध फुटला.



महाराष्ट्रात चांद्यापासून ते बांद्यापर्यंत आणि इतरत्र काही राज्यांतही सगळेच वातावरण स्तब्ध झाले, दुकाने, मॉल, बाजार तासा दीड तासात उत्स्फूर्तपणे बंद झाले. महाराष्ट्राच्या रस्त्यारस्त्यावर प्रचंड शांतता पसरली. राज्यांमध्ये दिवाळीमध्ये झगझगाटाने उजळून निघणारा महाराष्ट्र आणि काही राज्ये यामध्ये घराघरांपुढे लावण्यात आलेले आकाशकंदील, लाइटच्या माळा काढण्यात आल्या. एरवी रस्तोरस्ती गाड्यांच्या प्रकाशझोतामुळे रात्र आहे की नाही असे न कळणारे पण आज मात्र सर्व ठिकाणी अंधार पसरत गेला.


# महामानवाची महाअंत्ययात्रा आणि महाअंत्यविधी

बाळासाहेबांचे पार्थिव दुसऱ्या दिवशी म्हणजेच १८ नोव्हें. रोजी सकाळी ७ वा. मातोश्रीवरून निघेल तसेच सकाळी १० वा. शिवसेनाभवनात शिवसैनिकांसाठी काही वेळ ठेवण्यात येईल, नंतर शिवसेनाप्रमुखांचे पार्थिव शिवतीर्थावर लाखो शिवसैनिकांना दर्शन घेता यावे म्हणून दुपारी २ ते ५ ह्या वेळेत ठेवण्यात येईल आणि सायंकाळी ६ वा. अंत्यविधी असा कार्यक्रम ठरवण्यात आला. हे सगळे नियोजन ऐकायला फार बरे वाटत होते. परंतु लाखो लोक जमा होतील, अंत्ययात्रा कोठून कशी निघणार? कोठे थांबणार? शिवतीर्थावरील ही सर्व तयारी रात्रीतून कशी होणार? असे अनेक प्रश्न माझ्यासमोर होते. परंतु बाळासाहेब जे बोलले, ते त्यांनी केले आणि त्यांनी जसे ठरवले तसेच झाले.

बाळासाहेब एका भाषणामध्ये म्हणाले होते, ‘‘चार चौघांसारखा मृत्यू ही कल्पना मला असह्य  वाटते. मला मृत्यू असा हवा की तो अविस्मरणीय ठरावा.’’

आपल्या आवडत्या नेत्याला आज निरोप द्यायचा ही कल्पनासुद्धा असहनीय होती, परंतु हृदयावर दगड ठेवून बाळासाहेबांचे दर्शन, अंत्ययात्रा व अत्यंविधीच्या कार्यक्रमाला उपस्थित राहायचे म्हणून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो शिवसैनिक, कलाकार, बाळासाहेबांना मानणारा सर्वसामान्य माणूस असे सर्वच रात्रीच मुंबईच्या दिशेने निघाले. पहाटे ५वाजल्यापासून मुंबई आणि राज्यभरातून आलेल्या शिवसैनिकांनी मातोश्रीपाशी शिवसेनाप्रमुखांच्या पार्थिवाचे दर्शन घेण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती. सकाळी ८.४०च्या सुमारास शिवसेनाप्रमुखांचे पार्थिव मातोश्रीतून बाहेर आणण्यात आले. राज ठाकरे यांनी सर्व व्यवस्थेची पाहणी केली. उद्धव ठाकरे, आदेश बांदेकर आणि अन्य नेत्यांनी खांदे दिले. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे पार्थिव मोठ्या फुलांनी सजवलेल्या रथावर ठेवण्यात आले. ठाकरे कुटुंबीयही रथावर होते.

सकाळी ९.३०च्या सुमारास शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची अंत्ययात्रा ९.२४ मिनिटांनी पोलिसांनी दिलेल्या मानवंदनेनंतर बंगल्यावरून निघाली. रस्त्यावर दुतर्फा लाखो शिवसैनिकांची आणि चाहत्यांची गर्दी वाढतच होती. जसजशी वेळ पुढे सरकत होती तसतशी लोकांची गर्दी आणखीनच वाढत होती. पोलिसांच्या अंदाजानुसार १९ लाख लोकांच्या आसपास गर्दी होईल असा अंदाज होता, परंतु हा अंदाज पूर्णपणे मोडीत निघाला. जवळपास २३ लाखांपेक्षा अधिक लोक स्वयंस्फूर्तपणे त्या अंत्ययात्रेत सामील झाले.



बाळासाहेबांच्या उशाशी उद्धव ठाकरे उभे होते, मनसे अध्यक्ष राज ठाकरे रथाच्या मागून पायी चालत निघाले होते. रथावर उद्धव ठाकरे यांच्या पत्नी रश्मी ठाकरे, राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे, बाळासाहेबांचे दोन नातू आदित्य आणि तेजस ठाकरे तसेच इतर नातेवाईक आणि शिवसेनानेते एकनाथ शिंदे, खासदार अनिल देसाई हजर होते. अंत्ययात्रा सुरू होताच जमलेल्या शिवसैनिकांना अश्रू आवरणे कठीण झाले. सर्व शिवसैनिक घोषणा देऊ लागले. 'कोण गेला रे कोण गेला, शिवसेनेचा वाघ गेला!' अशा घोषणांचा प्रतिध्वनी कलानगर परिसरात सर्वत्र उमटत होता.

८६ मीटरचा भगवा झेंडा, गर्दीमध्ये राज्यातील विविध भागांतून आलेल्या शिवसैनिकांचा आणि बाळासाहेबांच्या चाहत्यांचा समावेश होता. प्रत्येकजण आपल्या परीने बाळासाहेबांना श्रद्धांजली वाहत होता. धुळे येथील शिवसैनिकांनी ८६ मीटरचा भगवा झेंडा आणला होता. हा झेंडा शेकडो शिवसैनिकांनी हात वर करून पकडलेला होता. ह्या झेंड्याची लांबी बाळासाहेब ८६ वर्षी गेले म्हणून ८६ मीटर ठेवण्यात आली होती. शिवसेनाप्रमुखांच्या अंत्ययात्रेसाठी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त केला होता. जवळजवळ २० हजार, राज्य राखीव पोलिसदलांच्या १५ कंपन्या आणि शीघ्र कृतिदलाच्या तीन कंपन्या अशी कुमक तैनात ठेवण्यात आली होती.

मातोश्री बंगला ते सेनाभवन हे १० कि.मी. अंतर पार करण्यासाठी अंत्ययात्रेला जवळजवळ सहा तास लागले, दुपारी तीनच्या सुमारास अंत्ययात्रा सेनाभवनजवळ पोहोचली. २३ लाख शिवसैनिकांच्या संयमाचे अनोखे दर्शन, कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार तर सोडाच अगदी साधी धक्काबुक्कीसुद्धा झाली नाही.

मातोश्री बंगल्यापासून सेनाभवनापर्यंत अनेक ठिकाणी विविध मंडळींनी देवाची गाणी लावलेली होती. काही काळासाठी बाळासाहेबांचे पार्थिव शिवसेनाभवनात नेण्यात आले. त्यानंतर ही अंत्ययात्रा शिवतीर्थाच्या दिशेने निघाली. दुपारचे कडक उन्हाचे तडाखे सर्वांनाच बसत होते. तरीसुद्धा गर्दी कमी होत नव्हती. ती सातत्याने वाढतच होती.

सायंकाळी ४ वा. ५० मि. बाळासाहेबांचे पार्थिव शिवाजी पार्कमध्ये येताच दिवसभर डोळ्यात प्राण आणून मैदानात जमलेल्या शिवसैनिकांच्या मुखातून घोषणांवर घोषणा उमटू लागल्या – 'अमर रहे, अमर रहे, बाळासाहेब अमर रहे', 'कोण आला रे, कोण आला, शिवसेनेचा वाघ आला', 'परत या, परत या, बाळासाहेब परत या' या घोषणांनी संपूर्ण शिवाजी पार्क हेलावून गेले.

एवढी मोठी प्रचंड अंत्ययात्रा पाहिल्यानंतर अनेकांना लोकमान्य टिळक आणि

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या लोकोत्तर महापुरुषाच्या अंत्ययात्रेची आठवण झाली.

महात्मा गांधींनंतर एवढा मोठा जनाधार लाभलेला नेता म्हणजे बाळासाहेब ठाकरे असाही उल्लेख तज्ज्ञ पत्रकारांनी केला. शिवसेनाप्रमुखांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार शिवतीर्थावर होईल असे शिक्कामोर्तब झाले. परंतु शिवाजी पार्ककडून प्रथम अधिकृत परवानगी दिलेली नव्हती. अंत्यविधीचे व्यवस्थापन नितीन देसाई आणि माजी महापौर श्रद्धा जाधव यांचे पती व मनोहर डेकोरेटर्सचे प्रमुख श्रीधर जाधव यांच्यावर सोपवली होती. त्यांच्यासोबत मदतीस राजू सावलासुद्धा होते. रात्रीतूनच ही सर्व तयारी करण्यात आली होती. पहाटे ६ वाजता राज ठाकरे यांनी शिवाजी पार्कमध्ये जाऊन पाहणी करून काही सूचना केल्या होत्या. अंत्यविधीसाठी बांधल्या जाणाऱ्या चौथऱ्याची दिशा पाहण्यापासून सगळ्याच सूचना त्यात होत्या.

शिवाजी पार्कवरच अंत्यसंस्कार होणार असल्याचे शनिवारी रात्री मुख्यमंत्र्यांच्या संमतीमुळे निश्चित झाल्यानंतर अवघ्या आठ तासांतच शिवाजी पार्कवर सिमेंटचा चौथरा बांधण्यापासून, पाच हजार अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या बसण्याची सोय अगदी नेटकेपणाने करण्यात आली होती. हे सर्व व्यवस्थापन जगप्रसिद्ध दिग्दर्शक नितीन चंद्रकांत देसाई यांच्यावर सोपवण्यात आले होते.

अंत्यसंस्कारासाठी पावणेदोनशे किलो चंदनाची लाकडे आणि इतर वृक्षांची ३०० किलो लाकडे आणण्यात आली होती. अग्निसंस्कारासाठी उभारण्यात आलेला चौथरा साहेबांना आवडणाऱ्या चाफ्याच्या फुलांनी सजविण्यात आला होता. त्यासाठी २० हजार चाफ्याची फुले मागविण्यात आली होती. याशिवाय शेवंती, गुलाब आणि गोंड्याची दीड हजार टन फुले मागविण्यात आली होती. जमलेल्या तमाम जनसागराला ही फुले वाटण्यात आली.

मुख्य मंडप, व्ही.व्ही.आय.पी. मंडप, पत्रकार कक्षावर सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याची नजर, शिवतीर्थावर जमलेल्या शिवसैनिकांना अंत्यविधीचे थेट प्रक्षेपण दिसावे म्हणून मैदानात सहा एलसीडी स्क्रीन लावण्यात आले होते.

पालिकेचा चोख बंदोबस्त, पाण्याचे १० टँकर, मोबाइल टॉयलेट आणि रुग्णवाहिनीची व्यवस्था, धार्मिक विधीपूर्वक अंत्यविधी करणारे ब्राह्मण.

बाळासाहेबांविषयीचे मुंबईच्या कानाकोपऱ्यात आवाज घुमत होते. प्रचंड भव्य अशा होणाऱ्या अंत्यविधीचे व्यवस्थापन अत्यंत थोड्या कालावधीत करण्यात आले होते.

बाळासाहेब ठाकरे अमर रहे !

जब तक सूरज चाँद रहेगा तब तक बाळासाहेबका नाम रहेगा !



परत या, परत या, बाळासाहेब परत या !

मुंबई आमच्या साहेबांची, नाही कोणाच्या बापाची !

शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्याबाबत राज्यशासनाचे शिष्टाचाराचे काही नियम आहेत, पण काही विभूती एवढ्या महान असतात की, त्यांच्यासाठी नियमाला अपवाद करावा लागतो. श्री. बाळासाहेब ठाकरे हे देखील या नियमाला अपवाद ठरले आहेत. ज्यांनी राजकारणात मोठे पद भूषवलेले असते केवळ अशाच व्यक्तीच्या निधनानंतर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्याचे नियम आहेत. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी कोणतेही सरकारीपद भूषविलेले नाही तरीसुद्धा हा सन्मान देण्याचा निर्णय मुख्यमंत्री ना. श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी जाहीर केला. असा सन्मान होणारे महाराष्ट्रभूषण पु. ल. देशपांडे, सद्‌गुरू वामनराव पै, कवी विंदा करंदीकर, पांडुरंगशास्त्री आठवले आणि पंडित भीमसेन जोशी, कवी नारायण सुर्वे आणि समाजसेवक बाबा आमटे यांना लाभला होता, त्यामुळे बाळासाहेब ठाकरे यांनाही हा सन्मान देण्याचा निर्णय घेण्यात आला.

१९५६ साली प्रचंड मोठी अंत्ययात्रा महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची झाली. त्यापेक्षा अधिक मोठी अंत्ययात्रा संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर बाळासाहेबांची झाली. बाळासाहेबांच्या मृत्युदिवशी आणि दुसऱ्या दिवशी संपूर्ण महाराष्ट्रभर उत्स्फूर्तपणे नागरिकांकडून, व्यापाऱ्यांकडून बंद पाळण्यात आला. मुंबईमध्ये अशा प्रकारची अंत्ययात्रा कधीही झाली नाही. मुंबईकर रस्त्यावर उतरले. करोडो लोकांनी त्यांच्या त्यांच्या ठिकाणी श्रद्धांजली व्यक्त केली.

दिनांक १८ नोव्हेंबर २०१२ रोजी सायंकाळी ६ च्या सुमारास उद्धवजी ठाकरे यांनी मुखाग्नी देत बाळासाहेबांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

मराठी माणसाच्या मनातला, हृदयातला सच्चा वाली निघून गेला.

# पिताश्री आणि उद्धवश्री

भीष्मप्रतिज्ञा करून बाळासाहेबांनी मार्मिक साप्ताहीक सुरू केले. मार्मिकची सुरूवात आणि बाळासाहेबांच्या तिसऱ्या चिरंजीवाचा जन्म जवळजवळ एकच वेळ. २७ जुलै रोजी उद्धवजींचा जन्म आणि १३ ऑगस्ट १९६० रोजी मार्मिकचे प्रकाशन. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे एक शिलेदार प्रबोधनकार ठाकरे यांची ओळख होती. त्यानिमित्ताने वारंवार लोकांची वर्दळ घरी चालूच होती. प्रबोधनकारांच्या दृष्टीने दरवाजाबाहेरील अधिकाधिक चपला म्हणजे खरी संपत्ती आणि तीच शिकवण त्यांनी बाळासाहेबांनाही दिली होती. बाळासाहेबही त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत होते. त्यामुळे लहानपणापासून गर्दी बघत आणि गर्दीमधील लोकांचा अनुभव घेतच उद्धव ठाकरे यांच्या जीवनाला सुरूवात झाली होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीनंतर महाराष्ट्राला दिशा देण्यासाठी आणि चर्चाविनिमय करण्यासाठी अनेकविध मंडळी घरी येत असत. बाळासाहेब जसे गर्दीतले तसेच दर्दीतले, त्यामुळे सातत्याने गर्दीमध्ये असताना सुद्धा साहेब कुटुंबापासून कधीच दूर गेले नाहीत. मार्मिक साप्ताहीकाच्या काळात त्यांच्या आवृत्तीचे काम मंगळवारी संपायचे. त्यावेळेस मंगळवारी सायंकाळी ४ नंतर बाळासाहेब सर्व कुटुंबांना ऑफिसवरच बोलावून घ्यायचे आणि मग स्वत: ॲम्बसिटर गाडी चालवत ते कुटुंबातील सर्वांना वरळीच्या समुद्रकिनारी म्हणजेच सीफेसला घेवून जायचे. त्याठिकाणी गेल्यावर मात्र साहेब अगदी वेगळे असायचे. तेथे कुटुंबासमवेत भेळपुरी खायची, खेळायचे, गप्पा मारायच्या असा त्यांचा बेत असायचा. बाळासाहेब जेवढे कडक वाटायचे, तसेच ते घरातील सर्वांशी अगदी मनमोकळेपणे, खेळीमेळीच्या वातावरणात बोलायचे आणि वागायचे. परंतु त्याचप्रमाणे मुलांनी शिस्तभंग केल्यानंतर ते त्यांच्याशी बोलत नसत, अशाप्रकारे न बोलणे करता नाराजी व्यक्त करणाऱ्या दुर्मिळ पिताश्रीमध्ये बाळासाहेबांचा देखील नंबर लागतो. बिन्दुमाधव, जयदेव आणि उद्धव ह्यांना साहेब कधी ओरडले किंवा मारले असे कोठेही ऐकीवात नाही.

पिताश्री म्हणून बाळासाहेबांनी नेहमी आपली भूमिका आदर्शपणे निभावली. बाळासाहेब आवर्जुन मुलांची प्रगतीपुस्तकं स्वत: पाहत आणि सह्या करत. अभ्यासाचे प्रगतीपुस्तक दाखवताना मुलांना शक्यतो भिती वाटते. परंतु ठाकरे घराण्यात मात्र मुलांना त्यांची भिती कधीही वाटली नाही. बाळासाहेबांची आणखी एक खासियत म्हणजे ते आपल्या जवळच्या माणसांचे वाढदिवस आपल्या डायरीमध्ये नेहमी लिहून



ठेवत, आणि त्यानुसार त्या त्या दिवशी अगदी आवर्जुन ते त्यांना भेटवस्तू देवून शुभेच्छा देत. बिन्दुमाधव, जयदेव आणि उद्धव यांना देखील बाळासाहेब त्यांच्या वाढदिवसाला आवर्जुन कोणती ना कोणती भेटवस्तू देत असत. लहानपणी उद्धवजींना भेट दिलेली पिंगपाँगची चेंडू भरलेली स्टेनगन विशेष आठवते. त्यावर उद्धवजी असेही म्हणतात की, ''खरंतर त्याचवेळी साहेबांनी माझ्या हातात स्टेनगन दिली होती.''

अशी म्हण आहे, 'कुंभार तसा लोटा आणि बाप तसा बेटा.' बाळासाहेबांना जशी क्रिकेटची आवड होती तसेच उद्धवजींनादेखील क्रिकेटची आवड. उद्धवजी त्यांच्या आठवणीत सांगतात की, लहानपणी मी क्रिकेट खेळत असताना कधी कधी साहेबही आमच्या खेळात सामील व्हायचे. आणि त्यावेळेस बाळासाहेबांना भेटायला आलेली मंडळी क्षेत्ररक्षण करायचे आणि मग आमचा मजेशीर वातावरणात तो खेळ बराचसा वेळ रंगायचा.

बाळासाहेबांचा समाजामध्ये असलेला दबदबा त्यांनी कोठेही गैरपणे वापरला नाही. बिन्दुमाधव, जयदेव आणि उद्धव यांच्या शाळेत त्यांनी असे बजावले होते की, इतर मुलांप्रमाणेच ह्यांना वागवा. चुकल्यास शिक्षा करा. एकदा तर क्रिकेट खेळत असताना उद्धवजींना वेळेचे भानच राहिले नाही. आणि उशीरा शाळेत गेल्यावर इतरांप्रमाणेच उद्धवजींना देखील चार रट्टे देवून शिक्षा केली. बाळासाहेबांना नेहमी वाटायचे की माझ्या मुलांनी क्रिकेटर व्हावे, व्यंगचित्रकार व्हावे, संगीतकार व्हावे आणि समाजामध्ये त्यांनी मानाने आणि सन्मानाने जगावे. त्यानुसार बाळासाहेबांनी केलेल्या संस्कारांनुसार उद्धवजी घडले आणि पुढे जाऊन त्यांनी शिवसेना पक्षाची धुरा सांभाळली आणि सांभाळत राहतील, याची खात्री वाटते. शिवसेना पक्ष महाराष्ट्रातील बलाढ्य पक्ष करण्याचे कार्य उद्धवजींनी सुरू ठेवले आहे.

उद्धवजी असे म्हणतात की, बाळासाहेबांनी आणि माँसाहेबांनी त्यांच्या आयुष्यात अनेक धक्के पाहिले परंतु त्यांची कोणत्याही प्रकारची झळ त्यांनी मुलांपर्यंत कधीही येवू दिली नाही. जशाप्रकारे मोटर गाडी शॉक ॲब्झॉर्बर. सर्व धक्के सोसून त्या धक्क्याची झळ गाडीत बसलेल्यांना जाणवून देत नाही अगदी तशाप्रकारे साहेबांनी आणि माँसाहेबांनी शॉक ॲब्झॉर्बरप्रमाणे कार्य केले. बाहेर त्यांच्या आयुष्यात अनेक चढउतार आले, आंबेडकरांविषयीच्या उद्गारावरून गदारोळ उठला, नंतर महात्मा गांधी यांच्याविषयीच्या वक्तव्यावरून देखील गदारोळ उठला. अनेक चुकीच्या नकारात्मक बातम्या छापून आल्या. अशा अनेक घटना घडल्या. परंतु त्यांच्या घरातील वातावरण मात्र त्यांनी बिघडू दिले नाही. घरचे काम घरी आणि बाहेरचा व्याप बाहेर.

आजवर सगळ्यांना ते हुकुमशहाप्रमाणे वाटले परंतु उद्धवजींच्या भूमिकेतून त्यांचे पिताश्री म्हणजे मनमोकळे, साधेभोळे. आपली भूमिका ठामपणे पोहचवणारे वाटतात. बाळासाहेब कोणत्याही माणसाला बरोबर ओळखत आणि तो योग्य असल्यास त्यावर विश्वास ठेवत, परंतु एखाद्याने चुक केल्यानंतर मात्र बाळासाहेब त्या व्यक्तीला सहजासहजी माफ करत नसत. अशाप्रकारे वेळप्रसंगी दरारा आणि मायाही. अशाप्रकारे पिताश्री बाळासाहेब ठाकरे आणि उद्धवजी ठाकरे असे यांच्याविषयी सांगता येईल.

तसेच काही बाळासाहेबांनी काहीसे सकारात्मक राजकारण खेळून आपल्या मुलांसाठी कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी दिली असे म्हणता येईल. बाळासाहेबांनी फक्त सांगितले असते, तर राज ठाकरे यांना कार्याध्यक्ष पद दिले असते. तर कदाचित उद्धव ठाकरे सारखा नेता महाराष्ट्राला लाभला नसता, आणि राज ठाकरे यांना कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी देखील मिळाली नसती. त्यामुळेच राज ठाकरे ह्यांना शिवसेनेतून काढता पाय घ्यावा लागला. राज यांच्या विषयी पेचप्रसंग निर्माण करून, मनाविरूद्ध राज ठाकरे यांच्याविषयी कडवट प्रतिक्रिया देवून डिवचले आणि राज ठाकरे यांनी त्यांचे कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी नवचेतना दिली. त्यामुळे राज ठाकरे यांच्यामध्ये अत्यंत कमी कालावधीत प्रचंड चांगले बदल घडले. राज ठाकरे यांनी ‘महाराष्ट्र नवनिर्माण सेना’ नावाने महाराष्ट्राच्या सर्वधर्मीय जनतेपुढे एक नवीन नवनिर्माण करणारा पक्षाचा पर्याय उपलब्ध केला. ह्या पक्ष उभारणीच्या कालावधीत राज ठाकरे यांच्यामध्ये फार चांगले बदल घडले, पक्ष चालविण्यासाठी आवश्यक ती कौशल्ये राज ठाकरे शिकले, तसेच अनेक महत्त्वपूर्ण सवयी त्यांनी स्वत:ला लावून घेतल्या. त्यामुळेच की काय, राज ठाकरे यांचा पक्ष कमी कालावधीत महाराष्ट्रातील नवतरुणांचा आवडता पक्ष म्हणून उदयास आला. काँग्रेस राष्ट्रवादी, रिपब्लिकन पार्टी, बहुजन समाज पार्टी, भारतीय जनता पार्टी अशा अनेक पक्षाची सलग्नित असलेले अनेक पदाधिकारी आणि मतदार महाराष्ट्र नवनिर्माणसेनेकडे वळले आहेत. हे सगळे बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादानेच घडले, असे राज ठाकरे स्वत: म्हणतात. फक्त ह्या अशाप्रकारच्या आशीर्वादास कडवट-गोड आशीर्वाद म्हणता येईल.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची सुरुवात करताना राज ठाकरे यांनी स्वत:च्या भाषणात असे स्पष्टपणे सांगितले की बाळासाहेब ठाकरे हे दैवत होते, आहे आणि ह्यापुढेही देखील राहील. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या स्थापनेनंतरही शिवसेनेच्या मतदानाच्या संख्येवर म्हणावा तसा परिणाम झाला नाही. परंतु त्यामुळे मात्र शिवसेना आणि भाजपा पुन्हा सत्तेवर २००९ च्या निवडणुकीत येवू शकले नाहीत. परंतु महाराष्ट्र नवनिर्माण सेना महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचली.



असे म्हणतात जेवढी मोठी जबाबदारी एखाद्या माणसावर पडते, तेवढी मोठी ताकद परमेश्वर त्या व्यक्तीस देतो. एका बाजूला आपल्या कडवट आशीर्वादाने राज ठाकरेंना मोठे केले तर दुसऱ्या बाजूला उद्धवला जबाबदारी देऊन उद्धव ठाकरेंनासुद्धा मोठे केले आणि महाराष्ट्रासमोर दोन मोठे पक्ष दिले. राज ठाकरे यांनी सामंजस्यपणे उद्धव ठाकरेंना शिवसेनेची जबाबदारी दिली. एवढ्या मोठ्या पक्षाची जबाबदारी सांभाळताना उद्धव ठाकरेंना सुरुवातीलाच जरी अवघड गेले असले तरी शिवसेनेची मुंबईवरील सत्ता टिकवण्यास उत्तम यश मिळाले आहे आणि उद्धव ठाकरे हे स्वत:च्या वेगळ्या कार्यपद्धतीनुसार शिवसेनेचा वाघ तसाच पुढे घेऊन जातील असे दिसते. ह्या जगामधील जन्मलेली प्रत्येक व्यक्ती ही जन्मत:च विजेती आहे. एखाद्या सर्वसामान्य माणसाने जर ठरवले तर आत्मविश्वास, जिद्द यांच्या जोरावर कोणतीही गोष्ट शक्य आहे. त्यानुसार बाळासाहेब ठाकरे यांचा प्रदीर्घ सहवास लाभलेले उद्धव ठाकरे यांचे नेतृत्व महाराष्ट्रभर गाजेल असे दिसते. विकत घेतलेल्या प्रसारमाध्यमांच्या द्वारे सुरुवातीच्या काळात २००३ ते २०११ पर्यंत वेगवेगळ्या मार्गाने उद्धव ठाकरे यांचे कुचकामी नेतृत्व असे म्हटले गेले होते. परंतु हा आरोप पूर्णपणे चुकीचा ठरवत फेब्रुवारी २०१२ च्या मुंबई महानगरपालिका निवडणुकीत पुन्हा एकदा शिवसेनेचा आणि भाजपाचा भगवा झेंडा फडकला. ''हे आम्ही करून दाखवलं'' अशा प्रकारे मागील पाच वर्षांत केलेल्या कामाची पूर्तता लोकांपर्यंत पोहचवली आणि मुंबईच्या विकासासाठी आम्ही योग्य आहोत, भारतातील सर्वांत मोठी आर्थिक उलाढाल असलेली मुंबई महापालिका आम्हीच सक्षमपणे सांभाळू शकतो हे सर्व मुंबईकरांनी स्वीकारले आाणि २०१२ चा सत्तेचा कौल शिवसेनेच्या वाघाकडे दिला.

असे म्हटले जाते की, प्रत्येक व्यक्तीकडे प्रचंड शक्तीचा सागर असतो. फक्त त्यांच्या अंतर्मनातील शक्तीला ओळखून बोलेल तैसाच चालेल अशा व्यक्तीस यशस्वी होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. बाळासाहेबांच्या उपस्थितीत उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाने मुंबई जिंकली. त्यामुळे देशभर शिवसेना आणखी चांगले कार्य करेल असे दिसते.

उद्धव ठाकरे यांची एक वेगळी स्टाईल काम करण्याची आहे. ती बाळासाहेबांच्या रोखठोक अशा प्रकारची नाही, परंतु त्याचे राजकारण शिवसेनेला बलाढ्य आणि शक्तीशाली राष्ट्रीय पक्ष करेल यात तीळमात्र सुद्धा शंका नाही. खरंतर बाळासाहेब ठाकरे हे राष्ट्रीय नेतेच आहेत. केवळ आणि केवळ त्यांच्यामुळेच भारतीय जनता पार्टी शक्तीशाली राष्ट्रीय पक्ष निर्माण झाला. बाळासाहेबांचे राजकारण महाराष्ट्रभर चालले.

परंतु त्यांच्या काही रोखठोक विरोधामुळे ते राष्ट्रीय स्तरावर अधिक करिश्मा दाखवू शकले नाही. बदलत्या काळानुसार शिवसैनिकांने बदललेच पाहिजे असे बाळासाहेबांना नेहमी वाटे. त्यानुसार शिवसैनिक आणि शिवसेना पक्ष प्रमुख उद्धवजी ठाकरे यांनी राष्ट्रीय स्तरावरील राजकारणात लक्ष घालण्यास सुरुवात केलेली आहे. २०१३ चा अनुभव पाहता त्यांचे राष्ट्रीय स्तरावरील राजकारण सफल होताना दिसते आहे. त्यामुळे उद्धवजी ठाकरे एक राष्ट्रीय नेतृत्व झाले आणि त्यांचा करिश्मा राष्ट्रीय स्तरावर नक्कीच चालेल असे जाणवते. शिवाय नेतृत्व निर्माण करण्याची आणि ते घडविण्याची क्षमता बाळासाहेबांप्रमाणेच उद्धव ठाकरे यांच्याकडे नक्कीच आहे. उद्धवजींनी तळागाळातल्या अनेक नवनेतृत्वांना पारखले, त्यांना जबाबदारी दिली, आणि त्यांची पारख खरी ठरली, आणि त्या नवनेतृत्वांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आणि ते मोठे झाले. उद्धवजींच्या आणि बाळासाहेबांच्या सहवासात वाढलेले आदित्य उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेब असतानाच युवा सेना स्थापन केली. सध्या अनेक घराघरात वडील आणि मुलगा यांच्या विचारांमध्ये विरोधाभास दिसून येतो. परंतु आदित्य आणि उद्धवजींमध्ये असलेले मुलगा व वडीलांचे आदर्शवादी नातेसंबंध सर्वांसाठी आदर्श निर्माण करणारे आहे.

बाळासाहेबांचा हिंदुत्ववादी करिश्मा तर जनमाणसात पोहचलेलाच होता. परंतु पुन्हा एकदा राज ठाकरे यांच्या भूमिकेतून बाळासाहेब रुपी करिश्मा चमकला असे दिसून येते.

अत्यंत कमी कालावधीत महाराष्ट्राच्या राजकारणाचा अविभाज्य घटक म्हणून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची ओळख निर्माण झालेली दिसते. येथून पुढे महाराष्ट्राच्या राजकारणात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांचा प्रंचड प्रभाव राहणार आहे. सध्या शिवसेना आणि मनसे दोन्ही मतदानाची संख्या मोजली असता ती अधिक दिसते. यावरून बाळासाहेबांचा करिश्मा ते गेल्यावरही चालूच आहे आणि चालू राहील असे जाणवते.



# बाळासाहेब आणि राजसाहेब

स्वरराज श्रीकांत ठाकरे यांचा जन्म १४ जून, १९६८ रोजी झाला. एका बाजूला स्वरराज यांचा पाचवीचा कार्यक्रम आणि दुसऱ्या बाजूला १९ जून, १९६८ शिवसेनेचा दुसरा वर्धापन दिन. ह्यावरून असे लक्षात येते की राज ठाकरे यांच्या पाचवीलाच बाळासाहेबांच्या राजकारणाचे धडे पुजलेले आहेत.

श्रीकांतजी ठाकरे म्हणजेच बाळासाहेबांचे लहान भाऊ. बाळासाहेबांप्रमाणे श्रीकांतजी हे संगातकार, दिग्दर्शक, पत्रकार, व्यंगचित्रकार म्हणून ओळखले जायचे. मार्मिक साप्ताहीक सुरु करतेवेळी श्रीकांतजींचे मोलाचे सहकार्य बाळासाहेब ठाकरे यांना लाभले.

बाळासाहेबांच्या धर्मपत्नी मीना ठाकरे तर श्रीकांतजींच्या धर्मपत्नी कुंदा ठाकरे. मीनाताई आणि कुंदाताई ह्या बहिणी बहिणीच. आपल्याप्रमाणे मुलांने देखील संगीतकार व्हावे म्हणून श्रीकांतजींनी आवडीने आपल्या मुलाचे नाव स्वरराज ठेवले. पुढे जावून स्वरराज राजसाहेब ठाकरे म्हणून ओळखले जावू लागले.

एकत्र कुटुंबपद्धतीमुळे यांचे जीवनदेखील गर्दी बघत आणि गर्दीतील लोकांचा अनुभव घेत सुरु झाले. राज ठाकरे शाळेत असताना त्यांचे काका कोण आहेत? त्यांचे मोठेपण काय आहे? त्यांच्या अवती-भवती एवढी विशाल गर्दी का आहे? ह्या प्रश्नांची उत्तरे राज ह्यांना लहानपणी माहीत नव्हती. परंतु बाळासाहेबांच्या अवती-भोवती असलेल्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाकडे आणि असलेल्या विशाल गर्दीकडे पाहून आपले काका बाळासाहेब ठाकरे ही कोणीतरी खास आणि महत्वपूर्ण व्यक्ती आहे याची प्रचिती राज ठाकरे यांना लहानपणी जाणवली होती. बाळासाहेब राज यांच्यावर अत्यंत प्रेम करत. शिवसेनेची घौडदौड चालू असताना अनेक ठिकाणी दौरे, सभा, विविध कार्यक्रम ह्या निमित्ताने बहुतांश वेळेला राजसाहेब ठाकरे बाळासाहेबांच्या बरोबर असायचे.

यशराज सूत्र लहानपणी वयाच्या १० वर्षापर्यंत लहान मुलांत अंत:जागृत मन हे पूर्णत: जागृत असते. त्यावेळी तोलू (तुलना करणारे) मन हे चालू स्थितीत नसते त्यामुळे लहानपणी ज्या वातावरणात लहान मूल वाढते, त्यानुसारच ते मूल मोठेपणी कोणत्याही क्षेत्रात प्रगती करेल त्यांची संस्काररुपी बीजे ही वयाच्या १० वर्षांपर्यंतच रोवली जातात. त्यानुसार योग्य वातावरण आणि संस्कार देण्याची पूर्णपणे जबाबदारी आई-वडीलांची असते. आई-वडीलांबरोबर सभोवतालचे वातावरण, समाज आणि सभोवतालची मंडळी सुद्धा संस्कार देण्याचे कार्य कळत नकळत करत असतात. त्यामुळे पालकांनी १० वर्षापर्यत योग्य संस्कारांचे बीजारोपण होण्यासाठी वेळ द्यावा,

जशाप्रकारे संस्कार तुम्हाला मुलाला/मुलीला द्यावेसे वाटतात त्या वातावरणात लहानांना घेवून जावे.

बाळासाहेबांच्या सर्व प्रकारच्या वागणुकीवर राज साहेबांचे अगदी बारीक लक्ष असायचे. ते कसे बोलतात, ते कसे चालतात, कसे राहतात, कसे शिस्तीचे जीवन जगतात, विविध व्यक्तीबरोबर कशाप्रकारे संपर्क साधतात ह्या सर्वच गोष्टी राज ह्यांनी अगदी बारकाईने अनुभवल्या आणि प्रत्यक्षात त्या आपल्या जीवनात त्यांनी आणण्याचा प्रयत्न केला आणि बाळासाहेबांच्या जीवनाचा त्यांच्यावर पडलेल्या प्रभावामुळे ते पुढे जावून तसेच घडले असे जाणवते.

जशाप्रकारे लहानपणी बाळासाहेब तासन्तास अगदी बारकाईने शिवाजी महाराजांकडे बघायचे. शिवाजी महाराजांची अनेक ऐतिहासिक पुस्तके वाचल्यामुळे शिवाजी प्रेरीत बाळासाहेब घडले अगदी तसेच लहानपणी बाळासाहेबांच्या प्रत्येक गोष्टीकडे अगदी बारकाईने पाहात बाळासाहेब प्रेरीत राजसाहेब घडले. म्हणूनच की काय? बाळासाहेबांचे राजकीय वारस राजसाहेब ठाकरे यांना ओळखले जाते. बाळासाहेबांच्या मार्मिकमधील व्यंगचित्राकडे राज अगदी बराच वेळ पाहत बसायचे. राज हे पाचवीत असताना एका दुर्घटनेमुळे त्यांचा हात भाजला होता. त्यावेळी काही दिवस राज शाळेतून घरीच होते. त्यावेळी बाळासाहेबांना अनेक व्यंगचित्रे काढताना राज ठाकरे यांनी पाहिले आणि त्यामुळे व्यंगचित्रकाराबरोबर आणखी जवळची गट्टी जमली. हळूहळू राज वेगवेगळी व्यंगचित्रे काढण्याचा प्रयत्न करु लागले.

राज ठाकरे यांनी सातवीमध्ये असताना वॉल डिझ्नेची कार्टून्स हुबेहूब काढण्याचा प्रयत्न केला होता. ते हुबेहूब चित्रीकरण पाहून बाळासाहेबांनी खूश होवून बक्षीस म्हणून प्रसिद्ध जगप्रसिद्ध व्यंगचित्रकार डेव्हीड लो यांचे पुस्तक दिले आणि त्यानुसार सराव करण्यास सांगितले. खुद्द बाळासाहेबांनी थाप दिल्यावर राज ह्यांची उमेद आणखी वाढली. आणि फार बारकाईने काटेकोरपणे राज व्यंगचित्रे काढू लागले. बाळासाहेब मार्मिकची व्यंगचित्रे काढताना राजसुद्धा शेजारी बसून व्यंगचित्रे काढत असत. त्यावेळेस बाळासाहेब राजसाहेबांना व्यंगचित्रे काढण्याच्या विविध सूचना करत आणि चुकल्यास कान धरण्यासाठी मागेपुढे पाहत नसत. बाळासाहेब म्हणजे राज ठाकरे यांचे दैवतच. खुद्द देवानेच मार्ग दाखविल्याप्रमाणे राज ठाकरे सुधारणा करत गेले. व्यंगचित्रे शिकवताना राज यांना बाळासाहेब हाडाचे शिक्षक दिसायचे. तर राजकारणाचे धडे देताना राजकीय गुरुवर्य दिसायचे. बाळासाहेबांनी व्यंगचित्रे काढताना कधीही कोणत्याही व्यक्तीच्या शारीरिक व्यंगावर चित्रे काढली नाहीत आणि तोच संस्कार त्यांनी राज आणि उद्धव यांनाही दिला. बाळासाहेबांचे आणखी एक वैशिष्टये म्हणजे त्या व्यक्तीमधील चांगल्या गुणांचे, स्वभावाचे, कौशल्याचे, कौतुकाचे धडे ते इतरांसोबत गिरवायचे आणि अगदी वाईट किंवा कमतरता त्या व्यक्तींपुढे दिलखुलासपणे मांडायचे. ज्यावेळी बाळासाहेबांचे आपल्या विषयीचे



कौतुकोद्गार दुसऱ्या व्यक्तीकडून ऐकण्यास मिळाल्याने ती व्यक्ती जाम खुश होत असे.

राज ठाकरे यांचे एखादे व्यंगचित्रे बाळासाहेबांना आवडले तर ते तोंडावर स्तुती करत नसत, तर इतरांकडे कौतुकाद्गार काढत. ते कानावर आल्यावर राज ठाकरे यांचे मन आनंदाने भरुन जायचे.

बाळासाहेबांकडे दूरदृष्टी होती. एका व्यंगचित्रकाराने चित्र कसे काढले तर चांगले दिसेल, त्याचा लोकांवर काय प्रभाव पडेल आणि त्यामुळे कसे प्रबोधन घडेल ह्या विषयीचे ज्ञान बाळासाहेबांकडे होते, त्यामुळेच बाळासाहेबांना दूरदृष्टीचा नेता म्हणून ओळखले जाते.

निर्णय घ्यायचा आणि तो खरा करायचा अशा भूमिकेचे बाळासाहेब. त्यामुळे राज ठाकरे यांच्यामध्ये कळत–नकळत त्याचा प्रभाव पडला. एका मुलाखतीत तर राज ठाकरे म्हणतात की, भविष्याचा वेध घेणारी साहेबांची नजर ही अत्यंत विलक्षण होती. त्यांच्यासारखा चाणाक्ष प्रभावी राजकारणी मी पाहीला नाही. त्यामुळे शिवसेनेनंतर कोणत्याही इतर पक्षात जाण्याच निर्णय राज यांनी घेतला नाही. बाळासाहेबांप्रमाणेच स्वत:चे नाविन्यपूर्ण विश्व निर्माण करण्यासाठी स्वत:चा नवीन पक्ष काढण्याचे त्यांनी ठरवले.

बाळासाहेबांच्या व्यंगचित्रामध्ये सुस्पष्ट रेषा असायच्या आणि त्यातून नेमकी चेहरेपट्टी ते तयार करायचे. चेहऱ्यावरील बारीक सारीक हावभाव बाळासाहेब हुबेहूब व्यंगचित्रातून प्रकट करायचे. त्यामुळेच राज ठाकरे ह्यांना बाळासाहेब मोठे व्यंगचित्रकार वाटतात. राजसाहेबांचे बाळासाहेब ठाकरे हे राजकारण आणि व्यंगचित्रकला ह्या दोन्ही क्षेत्रामधील दैवत आहे आणि येथूनपुढेही असेल.

बाळासाहेबांनंतर आजही उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या संस्काराच्या रुपात जनमानसात आहेत. ह्यामध्ये तीळमात्रही शंका नाही. राज ठाकरे ह्यांनी बाळासाहेबांच्याच विचारधारेमध्ये, पण काळानुसार बदल करत आणि महाराष्ट्र परिवर्तनाच्या भूमिकेतून कार्य सुरु केले आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना ह्या नावाने पक्ष सुरु केला.

इतिहास साक्षी आहे की आजवर अनेक महान व्यक्तींनी आपल्या मागे आपल्या मुलांसाठी काही पेचप्रसंग निर्माण केले, कारण त्यातून त्यांना संघर्षातून त्यांचे कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी मिळावी. शिवाजी महाराजांनी हेच संघर्षमय आयुष्य संभाजीराजांना दिले आणि संभाजीराजांनी त्यांचे कर्तृत्व सिद्ध केले. तसेच काही बाळासाहेबांनी पेचप्रसंग निर्माण करून राज ठाकरे यांना त्यांचे कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी दिली. बाळासाहेबांनी घेतलेली परिक्षा राज ठाकरे पास झाले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने कमी कालावधीत एक महत्त्वाचे स्थान महाराष्ट्राच्या राजकारणात निर्माण केले आहे. ●

## दिलदार मैत्री - अन् राजकारणातील वैरी

शरदचंद्र पवार साहेबांचा जन्म १२ डिसेंबर १९४० रोजी पुणे जिल्ह्यातील बारामती येथे झाला. इ. स. १९५६ साली शाळेत असतांनाच त्यांनी गोवामुक्ती सत्याग्रहाला पाठींबा देण्यासाठी विद्यार्थ्यांचा मेळावा आयोजित केला होता. त्यावेळेलाच हा मुलगा पुढे जाऊन देशाचे नेतृत्व करील अशी जाणीव सर्वांना झाली होती. बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवार यांच्या वयातील अंतर १४ वर्षांचे आहे. बाळासाहेब १४ वर्षांने शरद पवारांच्या पेक्षा मोठे आहेत. वयाच्या अवघ्या २४ व्या वर्षीच शरद पवारांनी यशवंतराव चव्हाणांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्षपद भुषविले होते.

बाळासाहेब एक व्यंगचित्रकार म्हणून प्रसिद्ध होतेच परंतु त्यांच्या स्वत:च्या विश्वनिर्मितीला सुरुवात झाली वयाच्या ३४ व्या वर्षी. मार्मिक साप्ताहीक जेव्हा सुरु झाले तेव्हापासून मार्मिकच्या विषयी प्रचंड (उत्कंठा) सर्वांना लागून राहीलेली असायची. त्या उत्कंठतेची निर्मिती दिवसेदिवस जनमाणसात वाढतच होती आणि त्याचदरम्यान शरद पवारांशी बाळासाहेबांची भेट झाली. त्यानंतर हळूहळू त्यांच्यामधली जवळीक वाढतच गेली. काँग्रेसचे पदाधिकारी असूनही पवार साहेब बाळासाहेबांच्या पहिल्या दसरा मेळाव्याला उपस्थित होते. त्या दसऱ्या मेळाव्यात पवार साहेबांना बाळासाहेबांचे संयुक्त महाराष्ट्र आणि मराठी माणसावर असलेले प्रेम आणि मराठी माणसाविषयी असलेली तळमळ स्पष्टपणे जाणवली होती. त्या विचारांनी पूर्वीपासून राजकारणामध्ये असलेले शरद पवार साहेब अत्यंत प्रभावी झाले होते. त्यामुळेच शरद पवार साहेबांचा आणि बाळासाहेब ठाकरे यांचे एकमेकांमधील नातेसंबंध अधिकच जवळचे झाले. दोघांचे एकमेकांच्या घरी येणे-जाणे सुरु झाले. शिवसेना स्थापन झाल्यानंतर तीन वर्षांनंतर शरद पवारांना पहिले अपत्य मुलगी झाली तेव्हा बाळासाहेबांनी आवर्जुन शरद पवारांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर वर्षभरांनी अगदी वेळ काढून शरद पवार बाळासाहेबांच्या घरी सहपरिवार गेले होते. त्यावेळेला सुप्रिया सोबत होत्या. त्यावेळेस मीनाताईंनी सुप्रियाताईंना अंगाखांद्यावर खेळवले. हळूहळू शिवसेनेची ताकद वाढू लागली तसतसे दोघा दिलदार मित्रांमधील मैत्री आणि राजकारणामधील वैर देखील रंगू लागले.

शरद पवारांचे लेखन हे उत्तम होते, लेखनाची आणि वाचनाची आवड त्यांना शाळेत असतानाच लागली होती. सामाजिक आणि राजकीय नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीने लेखन हे केलेच पाहिजे असे शरद पवारांचे गुरु यशवंतराव चव्हाण यांचे म्हणणे होते.



त्यांच्या मार्गदर्शनानुसार शरद पवार कृती करत होते. अनेक न्यूजपेपरमध्ये विविध विषयांवर त्यांचे लेख आणि प्रतिक्रिया छापून येत असत. त्यामुळे ह्या दोन हाडांच्या लेखकांनी, संपादकांनी आणि त्यांचे मित्र बी. के. देसाई ह्यांनी मिळून एक दर्जेदार मासिक देखील सुरु करण्याचे ठरविले होते. त्या मासिकाचा शुभमुहूर्त एका ब्राह्मणाला विचारून ठरविला होता. ते मासिक देखील निघाले होते, त्या शुभमुहूर्ताला त्यांनी पहिला अंक सिद्धीविनायकाला अर्पण देखील केला होता. परंतु त्या पहिल्या अंकाच्या शुभमुहूर्तानंतर, दुसऱ्या अंकाचा शुभमुहूर्त कधी जुळूनच आला नाही. त्यांनी ठरविलेल्या शास्त्रशुद्ध विचारांपासून ते तिघेही कळत नकळत अनवधानाने दूर गेले याची खंत त्यांना वाटली आणि पहिल्या अंकानंतर त्यांनी ते प्रकाशन बंद केले. शरद पवार साहेब स्वत: सांगतात की, बाळासाहेबांसारखा स्पष्टपणे विचार मांडणारे आणि आपल्या भूमिकेवर ठाम राहून सार्वजनिक क्षेत्रात शिस्त निर्माण करणारे राजकीय सत्तेपासून पदापासून दूर राहून कार्य करवून घेणारे व्यक्तिमत्त्व अजून घडलेले नाही आणि पाहिले देखील नाही. अनेक पानांचा विचार प्रवर्तक लेख एका बाजूला आणि बाळासाहेबांचे व्यंगचित्र एका बाजूला अशी ताकद बाळासाहेब ठाकरे यांची होती असे पवारसाहेब सांगतात. बाळासाहेब यांच्या मधील नातेसंबंध अत्यंत जिव्हाळ्याचे होते. शिवसेनेने राजकारणात प्रवेश केला तेव्हा त्यांच्यामध्ये राजकीय मतभेदांचे वैर निर्माण झाले. बाळासाहेबांनी ठाकरी भाषेत शरद पवारांच्या राजकीय कर्तृत्वावर, कामगिरीवर, विचारांवर अनेक ठाकरेरुपी प्रहार केले, तसेच शरद पवार साहेबांनी देखील त्यांच्या स्टाईलमध्ये बाळासाहेबांना प्रत्युत्तर दिले. परंतु राजकीय कारकीर्द, विचार यांच्यामध्ये असलेल्या राजकीय वैराचा त्यांनी वैयक्तिक मैत्रीवर परिणाम होवू दिला नाही. हे बाळासाहेबांचे वैशिष्ट्य होते.

शरद पवार साहेब बाळासाहेबांचे कौतुक करताना म्हणतात की, बाळासाहेब हे राजकीय धाडसाचे परमोच्च उदाहरण आहे. राजकीय निर्णय घेताना, बाळासाहेबांनी राजकीय परिणामाची, समिकरणाची कधीही चिंता केली नाही. ते त्यांच्या भूमिकेवर नेहमीच ठाम राहीले. त्यामुळेच की काय? बाळासाहेबांच्या मागे करोडोचा जनाधार उभा राहीला. बाळासाहेबांनी गरीब कुटुंबातल्या सामान्य कार्यकर्त्याला राजकीय प्रतिष्ठेबरोबर राज्याच्या सर्वोच्च सत्तेच्या खुर्चीतही नेऊन बसवले, हे करत असताना व्यक्तिगत चारित्र्यापेक्षा संघटनात्मक गुणवत्तेला विशेष असे महत्त्व दिले.

परिणामाची पर्वा न करणारा, मनाला हे पटेल त्यानुसार राजकारण करणारा लोकनेता म्हणजे बाळासाहेब. इंदिरा गांधींच्या आणीबाणीला पाठिंबा देणारे, राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत प्रतिभाताई पाटील ह्या काँग्रेसच्या असतानादेखील एक महाराष्ट्राची व्यक्ती

म्हणून पाठिंबा देणारे, मैत्री चारित्र्यसंपन्न म्हणून प्रणवदा मुखर्जी यांना राष्ट्रपतीपदासाठी पाठिंबा देण्याचे कार्य बाळासाहेब आणि फक्त बाळासाहेबच करु शकतात असे शरद पवार साहेब सांगतात.

शरद पवार साहेब आणि बाळासाहेब ठाकरे यांनी जसे राजकीय वैर केले आणि आयुष्यभर जोपासले तसेच त्यांनी एकत्र एका व्यासपीठावर येवून काही चांगली कामगिरी देखील केली. महाराष्ट्र, कर्नाटक सीमाप्रश्नाच्या वेळेस, तसेच दत्ता सामंतांच्या गिरणी कामगारांच्या अस्तित्त्वाच्या प्रश्नाच्या वेळेस बाळासाहेब आणि पवारसाहेब एकत्र आले आणि एकमेकांना साथ देत त्यांनी प्रश्न सोडविले.

शिवसेनेचा प्रतिस्पर्धी म्हणून बाळासाहेबांनी शरद पवारांचा उल्लेख कधी बारामतीचा म्हमद्या तर कधी मैद्याचे पोते अशा शब्दातही केला, मात्र प्रसंगी ते त्यांच्या वैयक्तिक मैत्रीला देखील मनापासून जागले असे पवार साहेब म्हणतात.

२००६ मध्ये ज्यावेळी सुप्रियाजींनी शरद पवार साहेबांच्या सल्ल्यानुसार राजकारणात सक्रिय होण्याचे ठरविले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने सुप्रिया सुळे यांचे नाव राज्यसभेसाठी जाहीर केले गेले, सुप्रियांचा उमेदवारी अर्ज भरण्याचे ठरले होते. साहजिकच शिवसेना - भाजपा युतीच्या वतीने कोणाचातरी उमेदवारी अर्ज भरला जाणार होता असा अंदाज शरद पवार साहेबांचा होता, त्यावेळी बाळासाहेबांचा फोन आला, ते म्हणाले, ''काय शरदबाबू सुप्रियांच्या उमेदावारीबाबत सांगायचे होते ना!'' शरद पवार म्हणाले, ''बाळासाहेब तुमचा उमेदवार उभा राहणार म्हणून सांगितले नाही. त्यावर बाळासाहेब म्हणाले, ''सुप्रियाची पहिली निवडणूक आहे आणि आमचा उमेदवार उभा राहणार? शरदबाबू हे काही तुम्ही योग्य केले नाही. तुम्ही सांगायला पाहिजे होते.'' त्यावर शरद पवार साहेब म्हणाले, ''पण भाजप तुमचा मित्रपक्ष आहे'', त्यावर बाळासाहेब म्हणाले, ''ते काही नाही, सुप्रिया बिनविरोध निवडून येणार, शिवसेना-भाजपचा उमेदवार उभा राहणार नाही. दुसरा कुणी उमेदवार उभा राहीला तर माहीती नाही. पन शिवसेना-भाजपचा उमेदवार उभा राहणार नाही.

अशाप्रकारे दिलदार मैत्रीचे संबंध दोघांच्यामध्ये होते, ज्यावेळेस बाळासाहेबांचे तब्येत ठीक नव्हती त्यावेळेस मातोश्रीवर जावून जवळजवळ दीड ते दोन दोन तास पवारसाहेबांनी त्यांच्याशी गप्पा मारल्या होत्या. पण अखेरीस बाळासाहेब देवाघरी गेले त्यावेळी शरद पवारांना त्यांचा एक जवळचा दिलदार मित्र गमावल्यासारखे वाटले.



# बाळासाहेबांची भगिनी - लतादीदी गानसम्राज्ञी

गानसम्राज्ञी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लता मंगेशकर ह्या व्यंगचित्रसम्राट बाळासाहेब ठाकरे ह्यांच्या कुटुंबातील सदस्याप्रमाणेच होत्या. वर्षातून कधी जाणे-येणे शक्य झाले नाही तर आवर्जुन लतादीदी आणि बाळासाहेब एकमेकांच्या वाढदिवसानिमित्त एकमेकांच्या घरी येत जात असत. बाळासाहेब ज्यावेळेस कलानगर ह्याठिकाणी त्यांच्या जुन्या घरी राहत होते, त्यावेळेस हृदयनाथ, लतादीदी, आशाताई, उषाताई, मीनाताई असे सारे मंगेशकर बंधु-भगिनी बाळासाहेबांच्या बंगल्यावर गेले होते. त्यावेळेस त्या भेटीचा आनंद दोन्ही कुटुंबांच्या व्यक्तींच्या चेहऱ्यावर झळकत होता. गोष्ट छोटी मोठी असू देत बाळासाहेब आवर्जुन त्याचे कौतुक करत असत. त्यावेळेस मंगेशकर बंधु-भगिनींनी बाळासाहेबांना एकत्रित असलेल्या श्रीराम, लक्ष्मण, सीता व हनुमान यांची सुंदर रेखीव मूर्ती दिली होती. त्यावेळेस नेहमीप्रमाणे हसतमुखाने प्रेमाने बाळासाहेबांनी ती स्वीकारली आणि आवर्जुन कौतुकाने म्हणाले, ''भेट आवडली बरं का!'' साहेबांकडे गेलेल्या प्रत्येकाला कौतुकाची थाप ही आवर्जुन पडत असे. मंगेशकर आणि ठाकरे कुटुंबातील सर्वांचे संबंध हे कौटुंबिक सलोख्याचे झाले होते. सणावारीला आणि सुख-दुःखाच्या निमित्ताने दोन्ही कुटुंबातील व्यक्तींचे जाणे-येणे होत असते, बाळासाहेब हे मुळातच विनोदबुद्धीचे, त्यामुळे सर्वजण अगदी खदखदून हसायचे. भेटीमध्ये बाळासाहेब जोक्स सांगत आणि छान छान गप्पा मारीत असत. त्याकाळात लतादीदींचे ए मेरे वतन के लोगों, आयेगाऽऽ आयेगा ऽऽ आयेगा आनेवाला हे गाणे भारतभर प्रसिद्ध झाले होत. तीच गाणी एका कार्यक्रमात लतादीदी गायल्या होत्या, त्या कार्यक्रमात बाळासाहेबांची सुद्धा उपस्थिती होती. आणि तुमची गाणी मला फार आवडली असे त्यांनी सांगितले होते. तीच दोघांची पहिली भेट होती. त्यानंतर कालांतराने हळूहळू मंगेशकर कुटुंबातील सर्वांचीच बाळासाहेबांनी ओळख करुन घेतली होती. त्यानंतर जेव्हा जेव्हा कोणत्याही कार्यक्रमात लतादीदींनी बाळासाहेबांना बोलावले, तेव्हा तेव्हा वेळात वेळ काढून बाळासाहेब कार्यक्रमाला जात असत. पुण्यामध्ये लतादीदींनी वडीलांच्या नावाने दीनानाथ मंगेशकर हॉस्पिटलसाठी निधी गोळा करण्याचे भूमिकेतून लतादीदींनी एक गाण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता, त्यामध्ये लतादीदींनी बाळासाहेबांना बोलाविले होते. त्या कार्यक्रमात बाळासाहेब आवर्जुन गेले आणि त्यांनी त्यामध्ये १ लाख रुपयांची देणगी देण्याचे जाहीर केले आणि मुंबईला पोहचल्या पोहचल्या आवर्जुन देणगी रकमेचा धनादेश पाठवून दिला आणि दिला शब्द खरा केला.

बाळासाहेबांच्या तब्येतीची विचारपूस लतादीदी अधूनमधून आवर्जुन करत असत. एकदा असेच लतादीदी कोल्हापूरमध्ये होत्या, तेव्हा त्यांनी बाळासाहेबांची तब्येत ठीक नाही असे कळले तेव्हा कोल्हापूरहून लतादीदींनी मातोश्रीवर फोन केला आणि तब्येतीबाबत विचारले की, तेव्हा बोलता बोलता बाळासाहेबांनी लतादीदींना विचारले की, मासळी बिसळी (उर्फ छोटे मासे) खाता की नाही, त्यावर लतादीदी म्हणाल्या, ‘‘मी मासळी खाते पण जास्त तिखट खात नाही.’’

त्यावेळेस मुंबईला आल्यावर मासळी जेवणाचे आमंत्रण बाळासाहेबांनी आवर्जुन दिले होते.

बऱ्याचदा नातेसंबंधामध्ये प्रत्येक व्यक्ती कोणत्या कोणत्या स्वरुपात एकमेकांच्यातून स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करीत असते. सुरुवातीच्या काही भेटीनंतर ज्यावेळेस कौटुंबिक सलोख्याचे नाते जेव्हा निर्माण झाले त्यावेळेस एकदा बाळासाहेबांनी लतादीदींना राजकारणामध्ये येण्याचे निमंत्रण दिले होते. त्यावर लतादीदी म्हणाल्या की, राजकारण हा आमचा प्रांत नाही. त्यानंतर कधीही बाळासाहेबांनी राजकारणाचा विषय काढला नाही. त्यांनी प्रत्येक भेटीमध्ये एक व्यंगचित्रकार कलाकार म्हणूनच गानसम्राज्ञी लतादीदी यांना भेटत राहीले. शिवसेनेच्या एखाद्या कार्यक्रमाला बोलावल्यास लतादीदी जात असत. एकदा शिवउद्योग सेनेच्या कार्यक्रमामध्ये लतादीदींना बोलावले होते, लतादीदींनी कार्यक्रमात जावून काही गाणी गायिली, तो कार्यक्रम नाही नाही म्हणता आणि श्रोत्यांच्या आग्रहास्तव घेण्यात आलेल्या वन्स मोर, वन्स मोर म्हणत त्यांनी अनेक गाणी गायिली. तो कार्यक्रम जवळ जवळ तीन-साडेतीन तास चालला. बाळासाहेबांना त्यातील बरीच गाणी आवडली. कार्यक्रम संपल्यावर त्यांनी आवर्जुन लतादीदींचे कौतुक केले होते. प्रत्येक शिवसेनेच्या कार्यक्रमात त्यांना एक कलाकार म्हणूनच सन्मान मिळाला. जेव्हा जेव्हा बाळासाहेबांना लतादीदींची गाणी ऐकाविशी वाटत, तेव्हा तेव्हा राज ठाकरे यांना लतादीदींकडून कॅसेटस् आणण्यासाठी ते पाठवत असत.

बाळासाहेबांची तब्येत जेव्हा खूपच खालावली होती, तेव्हा बाळासाहेब मरणाच्या दारात उभे आहेत, ह्याची चाहूल लतादीदींना झाली होती. त्यानुसार लतादीदींनी त्यांच्या गाण्यांच्या अल्बमचा कार्यक्रम सोहळा कॅन्सल केला होता.

अशाप्रकारे बाळासाहेबांची मानलेली भगिनी म्हणून गानसम्राज्ञी लता मंगेशकर आणि साहेब यांचे नातेसंबंध आपुलकीचे होते.



# राजकारणातले बीग बी आणि सिनेसृष्टीतले बीग बी

फिल्म इंडस्ट्रीचे बीग बी म्हणजे अमिताभ बच्चन यांचा जन्म ११ ऑक्टोबर १९४२ मध्ये अलाहाबाद उत्तरप्रदेश येथे एका हिंदू कुटुंबात झाला. डॉ. हरिवंश राय बच्चन सुप्रसिद्ध कवी म्हणून ओळखले जायचे. डॉ. हरिवंश राय बच्चन यांच्या पत्नी तेजी बच्चन ह्यांना रंगभूमीची आवड होती. त्यांना एका फिल्ममध्ये भूमिकाही मिळाली होती. परंतु घरच्यांना प्राधान्य देत त्यांनी ती नाकारली होती. परंतु पुढे जावून त्यांचे स्वप्न त्यांच्या मोठ्या मुलाने सिनेमासृष्टीतील उच्चतम स्थान निर्माण करुन पूर्ण केले. दिल्लीमधून शिक्षण पूर्ण झाल्यानंतर, नोकरीनिमित्त अमिताभ कोलकत्त्याला गेले, त्यावेळेस ते फक्त २० वर्षांचे होते. एका जहाज वाहतूक कंपनीत ते एजंट म्हणून नोकरी करत होते. परंतु फिल्म इंडस्ट्रीचे विशेष आकर्षण असल्यामुळे त्यांनी मुंबईकडे धाव घेतली. सुरुवातीची काही वर्ष संघर्षामध्ये गेली आणि १९६९ साली त्यांना पहिल्या हिंदी चित्रपटात भूमिका करण्याची संधी मिळाली. त्या कालावधीत त्यांनी सात हिंदुस्थानी, परवाना, आनंद, गुड्डी, प्यार की कहानी, संजोग, बावर्ची, रास्ते का पत्थर, जंजिर अशा काही त्यांच्या फिल्म सुपरहिट झालेल्या होत्या. त्यामुळे त्यांची अँग्री यंग मॅन म्हणून ओळखही निर्माण झाली होती.

बाळासाहेबांनी १९ जून, १९६६ रोजी शिवसेना स्थापन केली आणि अत्यंत कमी कालावधीत त्यांचे नाव भारताच्या कानाकोपऱ्यात पोहोचले होते. हजारो तरुण मराठी बांधव बाळासाहेबांच्या भाषणाला गर्दी करत होते. १९७० च्या दशकात सुरुवातीला मुंबई नाव घेतले की अगदी सहजच बाळासाहेबांचे नाव पुढे यायचे. अशा मुंबईत सिनेकलाकाराची भेट बाळासाहेबांबरोबर न घडणे म्हणजे नवलच. सिनेसृष्टीतील अनेक मंडळी बाळासाहेबांना भेटत. अशा एका समारंभात बाळासाहेबांची आणि अमिताभ बच्चन यांची प्रत्यक्ष भेट झाली. दोघेही अगोदरच एकमेकांविषयी जाणत होते. परंतु प्रत्यक्षात भेटण्याचा योग त्या समारंभात आला होता. त्यावेळी त्यांच्या चांगल्याच चर्चा रंगल्या आणि दोघे कधी मित्र झाले कळलेच नाही. बाळासाहेब-अमिताभ बच्चन यांच्यामध्ये जवळ -जवळ १५ वर्षांचे अंतर होते. अमिताभ बच्चन बाळासाहेबांना मोठ्या भावाचा दर्जा देत होते. त्यावेळेस बाळासाहेब शिवसेनेच्या ८ व्या दसरा मेळाव्याच्या तयारीत होते. दसरा मेळावा १९ जून, १९७३ रोजी होणार होता. त्या दरम्यान ३ जून, १९७३ रोजी अमिताभ बच्चन यांचे फिल्म इंडस्ट्रीमधीलच सुप्रसिद्ध

हिरोईन जया भादोरी यांच्याबरोबर लग्न झाले. त्यावेळेस लग्न झाल्यानंतर बाळासाहेबांनी आणि माँ साहेबांनी (उर्फ मीनाताईंनी) नवीन जोडप्याचे स्वागत केले. घरामध्ये नवीन सून आल्यानंतर जसा पाहुणचार केला जातो, तसाच पाहुणचार मातोश्री बंगल्यावर जया बच्चन यांचा करण्यात आला.

खरं तर बच्चन घराणे आणि गांधी घराण्यातील नातेसंबंध पूर्वीपासूनच जवळकीचे होते. परंतु बाळासाहेबांनी त्याचा विरोध कुठेही जाणवून दिला नाही. राजकारण राजकारणाच्या ठिकाणी आणि नातेसंबंध नातेसंबंधांच्या ठिकाणी! हे कसे जोपासावे हे बाळासाहेबांकडून शिकावे. बाळासाहेबांनी ज्या व्यक्तीबरोबर नातेसंबंध जोडले ते सातत्याने सांभाळले ते कधीही कमकुवत होवू दिले नाहीत. त्या व्यक्तीच्या सुख-दुःखात आवर्जुन बाळासाहेब सामील व्हायचे.

१९८२ मध्ये मनमोहन देसाईंच्या कुली चित्रपटाचे शुटींग चालू होते. अमिताभ बच्चन यांची त्यामध्ये प्रमुख भूमिका होती. त्या चित्रपटाच्या शुटींगच्या दरम्यान एका ॲक्सीडेंटमध्ये अमिताभजी गंभीर जखमी झाले होते. ही बातमी शिवसेनाप्रमुखापर्यंत पोहचली, त्यावेळेस तातडीने शिवसेनेची ॲब्युलन्स आली, अमिताभजींना ब्रीच कँडी रुग्णालयात अतिदक्षता विभागात ॲडमिट केले. खरं तर ती अमिताभजींच्या जीवनमरणाचीच झुंज होती. त्यावेळेस बाळासाहेबांनी आणि ठाकरे परिवारातील सर्वांनीच विशेष देखभाल केली. पुण्यामध्ये जन्मलेल्या बाळासाहेबांना दगडूशेठ गणपतीचा महीमा माहीत होता. श्रीमंत दगडूशेठ गणपती हा नवसाचा गणपती आहे. त्यामुळेच बाळासाहेबांच्या सांगण्यावरून जया बच्चन यांनी पुण्याकडे दगडूशेठ गणपतीकडे धाव घेतली. जया बच्चन यांनी नवस केला आणि नवसाचा दगडूशेठ गणपती पावला. अमिताभ बच्चन मरणाच्या दारातून परत आले. ठरल्याप्रमाणे जया बच्चन यांनी सोन्याचे कान श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीला नवसफेड म्हणून दिले. हॉस्पिटलमध्ये बाळासाहेब, अमिताभ बच्चन यांना आवर्जुन भेटायला गेले होते. त्यावेळेस त्यांच्या गप्पा चांगल्याच रंगल्या होत्या. त्या हॉस्पिटलमधील भेटीदरम्यान बाळासाहेबांनी एक अनोख्या स्वरुपाचे व्यंगचित्र अमिताभ बच्चन यांना गिफ्ट दिले. आखिर यमराज हार गया! असे नाव असलेले व्यंगचित्र होते. त्या व्यंगचित्रातून बाळासाहेबांचे बच्चन कुटुंबावर प्रेम - जिव्हाळा, आपुलकीची भावना व्यक्त होत होती.

असे म्हणतात, ज्या व्यक्तीच्या संगतीमध्ये आपण असतो त्यासारखेच आपण बनण्याचा प्रयत्न करतो. बाळासाहेब ठाकरे यांचा प्रभाव अमिताभ बच्चन यांच्यावर पडला होता. त्यानुसार अमिताभ बच्चन यांनी १९८४ मध्ये फिल्म इंडस्ट्रीमधून बाहेर पडून राजकारणामध्ये उतरण्याचे ठरविले. अमिताभ बच्चन यांनी ह्यांचे जन्मस्थान



असलेल्या अलाहाबादमध्ये निवडणूक लढविण्याचे ठरविले. महाराष्ट्राच्या बाहेर शिवसेनेचे कार्य त्यावेळेला नव्हते. राजीव गांधी यांच्यासोबत अमिताभ बच्चन यांची त्या वेळेला मैत्री होतीच. त्यामुळे अगदी सहजतेने काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांना ८० व्या लोकसभा निवडणुकीत तिकीट मिळाले. त्यावेळचे उत्तरप्रदेश मुख्यमंत्री बहुगुणा यांचा दारुण पराभव करत अगदी फिल्मी स्टाईलमध्ये अमिताभ बच्चन यांची हिरोसारखीच राजकारणात सुद्धा एन्ट्री झाली.

राजीव गांधी आणि बच्चन कुटुंब यांच्यावर बोफोर्स घोटाळ्यात आरोप झाले. पत्रकार आणि मिडीया चॅनेलवर सगळीकडे त्यांच्या बातम्या झाल्या. त्याकाळात राजकारणात नवीन असलेल्या अमिताभ बच्चन यांना ते प्रकरण सहन होणारे नव्हते. शिवाय इतर काही बेशरम आणि गेंड्याची कातडी असणाऱ्या राजकारणी नेत्यासारखा स्वभाव नव्हता. अमिताभ बच्चन यांच्यावर फार मोठे डोंगररुपी संकटच कोसळले होते. आरोपांच्या चक्रात अमिताभजी अगदी पिसले. कोणीही त्यांच्यावर विश्वास ठेवायला मानत नव्हते. परंतु त्या कसोटीच्या क्षणी बाळासाहेबांनी अमिताभ बच्चन यांची पूर्ण बाजू समजून घेतली, त्यांना मानसिक आधार दिला. काहीही होणार नाही. मला खरं काय ते सांग. जर तुझी बाजू खरी असेल, सत्याची असेल तर मी बाळासाहेब ठाकरे तुझ्या पाठीशी आहे असे बोल बाळासाहेबांनी अमिताभ बच्चन यांना सुनावले. बाळासाहेबांनी दिलेल्या मानसिक आधारामुळे अमिताभ बच्चन यांचा आत्मविश्वास वाढला. बाळासाहेबांच्या पाठिंब्यामुळे बाळासाहेबांच्या सांगण्यानुसार अमिताभजी अगदी धाडसाने प्रसारमाध्यमांना भेटले, त्यांची बाजू सांगितली. आपली भूमिका सत्याची आहे हे पटवून देण्यासाठी अमिताभजींना कोर्ट-कचेऱ्या देखील कराव्या लागल्या. परंतु अखेरीस अमिताभ बच्चन यांची सत्याची भूमिका जिंकली. ह्या सगळ्या कसोटीच्या क्षणी बाळासाहेबांनी अगदी मोठ्या भावाप्रमाणेच त्यांना साथ दिली. बाळासाहेबांच्या सांगण्यानुसार अमिताभ बच्चन यांनी राजकारणातून पूर्णपणे काढता पाय घेतला आणि पुन्हा अमिताभजींनी नव्याने त्यांच्या आयुष्याला सुरुवात केली. आज अमिताभ बच्चन हे बॉलीवूड आणि हॉलिवुडमधील सर्वांत मोठे नाव आहे. करोडो लोकांचा चाहता म्हणजे अमिताभ बच्चन. परंतु ह्यामध्ये अमिताभ बच्चन ह्या यशाच्यासाठी बाळासाहेब ठाकरे यांना विशेष श्रेय देताना दिसतात. अमिताभ बच्चन यांना अत्यंत कसोटीच्या क्षणी बाळासाहेबांनी साथ दिली. परंतु त्या मागचे कारण म्हणजे अमिताभ बच्चन यांची बाजू सत्याची होती. बाळासाहेबांच्या जे मनात असते तेच त्यांच्या तोंडात असते. म्हणूनच की काय, त्यांच्या मनातील आणि सहज तोंडातील निघणाऱ्या भाषणांना, लाखोंचा जनसमुदाय लाभायचा.

खरं तर दोन्हीही व्यक्तिमत्व बीग बी. बाळासाहेब आणि बच्चनसाहेब गर्दीमध्ये जगणारी माणसं. अतूट प्रेमाचं नातं जोपासणारी जोडी.

खरं तर दोन्हीही व्यक्तिमत्व बीग बी आणि बीग बी. सिनेमासृष्टीतील बीग बी म्हणजे अमिताभ बच्चन आणि राजकारणातील व्यंगचित्रातील बीग बी म्हणजे बाळासाहेब ठाकरे होत. दोघेही गर्दीमध्ये जगणारी आणि राहणारी दर्दी जोडी, ऐकमेकांशी निव्वळ आपुलकीचे आणि प्रेमाचे नातं जोपासणारी जोडी.



# महाराष्ट्राचे खेळाडू अन् बाळासाहेबांचे बाळकडू

भारतीय लोकांना क्रिकेटविषयी अतोनात प्रेम आहे, क्रिकेटसाठी काहीपण. क्रिकेट पाहण्यासाठी/ खेळण्यासाठी ज्येष्ठ, श्रेष्ठ, कनिष्ठ, मानिष्ठ अशा सर्वच मंडळींमध्ये प्रचंड उत्साह असतो. लहानांपासून म्हातारवयापर्यंत तर पुरुषांबरोबर स्त्रियांनादेखील क्रिकेट ह्या खेळाचे खूप खूप कौतुक. मी पाहिले आहे, क्रिकेटचा मनसोक्त आनंद लुटण्यासाठी अनेक व्यवसायिक मंडळी त्यांचा व्यवसाय बंद करतात. तर नोकरदार वर्ग काहीतरी कारणाने कामावरून रजा घेतात. सध्या क्रिकेट हा भारताचा राष्ट्रीय खेळ झाला आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही. आणि त्यातल्या त्यात भारत पाकिस्तानची क्रिकेट मॅच चालू असेल तर भारताच्या गल्ली बोळात सगळीकडे कळपाच्या स्वरुपात एकत्रित मॅच पाहण्याची प्रथाच रूढ झालेली दिसते. क्रिकेटमध्ये काही भारतीय खेळाडूंनी अविस्मरणीय अशी कामगिरी केलेली आहे. त्या खेळाडूंमध्ये कपिलदेव, अझरुद्दिन, अजय जडेजा, नवजितसिंग सिद्धू, चंदू बोर्डे, अजित वाडेकर, कांबळी अशी अनेक नावे जगभर प्रसिद्ध आहेत. त्यातल्या त्यात क्रिकेटसम्राट सचिन तेंडूलकर हा जगभरात कोणाला माहीत नसेल अशी मंडळी फारच थोडी असतील असे मला वाटते. सन २००० सालानंतर वर्ल्ड कप आणल्यानंतर तर महेंद्रसिंग धोनी, युवराज सिंग, राहुल द्रविड, विरेन्द्र सहवाग, गौतम गंभीर आणि टीमचे तर गल्लीबोळात फटाके वाजवून त्यांचे कौतुक केले गेले.

असा क्रिकेट खेळ जो भारतीयांना आवडतो तो बाळासाहेब ठाकरे यांचा सुद्धा खूप खूप आवडीचा खेळ. क्रिकेट बाळासाहेबांच्या अतिशय जिव्हाळ्याचा विषय. जवळ जवळ प्रत्येक मॅच साहेबांनी मन लावून पाहीली असेल. क्रिकेट पाहण्यासाठी बाळासाहेब काही जिवलग मित्रांना मातोश्रीवर बोलावून घेत असत आणि एकत्रित मॅच पाहण्याचा आनंद लुटत असत. क्रिकेट पाहण्याबरोबर बाळासाहेबांना खेळायला देखील खूप खूप आवडे. साहेब लोणावळ्याला जेव्हा जेव्हा जात तेव्हा काही शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत जात असत, तेव्हा लोणावळ्याला जाताना क्रिकेट खेळण्याचे संपूर्ण सामान आवर्जुन बरोबर घेत. साहेबांची बॅटींग तर बाकी शिवसैनिक बॉलिंग आणि फिल्डींग करायला असत. क्रिकेट मध्ये आणि त्यांच्या संपूर्ण जीवनामध्ये साहेबांनी नेहमीच बॅटींग केली. क्रिकेट खेळताना शिवसैनिकांना आणि साहेबांना कसा वेळ गेला हे कोणालाच कळायचे नाही.

भारताची आर्थिक राजधानी म्हणून मुंबईला विशेष ओळख आहे. मुंबईमध्ये मोठे मोठे क्रिकेटर मंडळी झाली त्यामध्ये सचिन तेंडूलकर, अजित वाडेकर, चंदू बोर्डे व

इतर. बाळासाहेबांचे इतर क्षेत्रातील मंडळींबरोबर, क्रिकेटर मंडळी बरोबर अगदी खास प्रेमाचे नाते होते. सर्व मोठी मोठी क्रिकेटर मंडळी साहेबांना अधूनमधून 'मातोश्री' वर भेटण्यासाठी जात असत. भारतात लहानमुलांना क्रिकेट खेळायला ग्राऊंड सहजासहजी मिळाले नाही, तर ते रस्त्यालाच क्रिकेटचे ग्राऊंड समजून क्रिकेट खेळतात. बाळासाहेब दादरमध्ये राहात असताना, रस्त्यावर मुले क्रिकेट खेळायचे. खेळता खेळता बाळासाहेब ठाकरे यांच्या घराच्या काचा फुटायच्या. प्रबोधनकार (दादा) मग मुलांना खूप ओरडायचे, रागवायचे आणि त्यांना हाकलून द्यायचे, पण बाळासाहेब मात्र पुन्हा मुलांना खेळण्यास प्रोत्साहन द्यायचे. ह्या प्रोत्साहनातून अजित वाडेकर हे मोठे क्रिकेटर झाले, त्यांनी काही काळ भारतीय टीमचे कर्णधारपद सुद्धा सांभाळले. बाळासाहेबांचे अजित वाडेकर, सचिन तेंडूलकर, चंदू बोर्डे, बापू नाडकर्णी अशा खेळाडू लोकांबरोबर वैयक्तिक मैत्रीचे संबंध होते. बाळासाहेबांच्या वाढदिवसाला ह्या सर्वांना विशेष बोलावणे असायचे, सर्व क्रिकेटर मंडळी त्यांच्या कुटुंबासह बाळासाहेबांना भेटण्यासाठी जात असत.

एखादी गोष्ट बाळासाहेबांना पटली नाही, तर ते आवर्जुन सांगायचे. अजित वाडेकर यांच्या पत्नी रेखाताई ह्या कपाळाच्या खालच्या बाजूला कुंकू लावायच्या. बाळासाहेबांच्या जेव्हा हे लक्षात आले, तेव्हा बाळासाहेब म्हणाले, हे बघ तू माझ्या मुलीसारखी आहेस. तुला एक गोष्ट सांगतो, कुंकू हे नेहमी कपाळाच्या मध्यभागीच लावले पाहिजे. बाळासाहेबांच्याकडे गेल्यावर बाळासाहेबांचा मातोश्रीवर दरबारच भरायचा, त्या दरबारात बसून बराच वेळ साहेब गप्पा मारत. एकदा माजी कर्णधार चंदू बोर्डे बाळासाहेबांना भेटण्यासाठी मातोश्रीवर गेले होते, तेव्हा गप्पांच्या ओघात चंदू बोर्डे म्हणाले की, आम्हा महाराष्ट्राच्या रणजी संघासाठी तुमच्या 'बॉम्बे'शी खेळणे नेहमीच चॅलेंजींग असते. तेव्हा बाळासाहेब चंदू बोर्डे यांना लगेच थांबवून म्हणाले, 'चंदू, बॉम्बे म्हणू नकोस. मुंबई म्हण! पण ती सूचना केल्यावर थोडावेळ चंदू बोर्डे यांना थोडसे घाबरल्यासारखे वाटले, पण बाळासाहेबांनी त्यांच्याशी तशाच गप्पा चालू ठेवल्या. अनेक जुन्या सामन्यांविषयी त्यांनी गप्पा मारल्या आणि पुन्हा चंदू बोर्डे त्यांच्याबरोबर मिक्सअप झाले. अशाप्रकारे वेळप्रसंगी सूचना करणारे आणि पुन्हा त्या व्यक्तिला बाळासाहेब सावरत आपले नातेसंबंध जोपासत असत.

बाळासाहेब काही मॅचेस पाहण्यासाठी स्टेडियमला जात असत. मग तो शिवाजी पार्क जिमखाना आणि दादर युनियन यांच्यातील कांगा लीगचे सामने असोत की मुंबईमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचा एखादा सामना असोत. बाळासाहेब वेळात वेळ काढून क्रिकेटचे सामने पाहण्यासाठी जात असत.

अशाप्रकारे खेळाडू वृत्तीचे आणि खेळावर विशेष प्रेम करणारे बाळासाहेब क्रिकेट




ह्या खेळाबरोबर इतर खेळातील खेळाडूंना देखील विशेष प्राधान्य देत असत. बाळासाहेब प्रत्येक न्यूजपेपर तासन्तास बसून वाचत असत. कोणत्याही ठिकाणी बोलावणे आल्यानंतर बाळासाहेब शेरोशायरी सांगत नसत, तर लोकांच्या दैनंदिनीमध्ये असलेल्या अडचणींना, वेळप्रसंगानुसार बोलत असत. आजवर चांगल्या प्रकारे भाषण करणारे, शेरोशायरी करून, एखादी कथा सांगून, गोष्ट सांगून, कविता म्हणून, आदर्श व्यक्तीमत्त्वावर बोलणारे वक्ते अनेक होऊन गेले, पण बाळासाहेब हे नेहमी आजूबाजूला घडत असणाऱ्या घटनांना धरून बोलत असत. कदाचित त्यामुळेच त्यांच्या भाषणांना प्रचंड मोठ्या प्रमाणात गर्दी होत असे. त्यामुळेच विविध क्षेत्रातील मंडळी सर्व ठिकाणी लक्ष देणाऱ्या बाळासाहेबांना आवर्जुन कार्यक्रमाला बोलावत असे. असाच एका कार्यक्रमामध्ये बाळासाहेबांची बॅडमिंटनपटू नंदू नाटेकर आणि त्यांच्या पत्नी डॉ. उल्का नाटेकर यांच्याबरोबर भेट झाली. ती मेजवानी जहूमध्ये अरूण दाते आणि रवि दाते ह्यांनी आयोजित केली होती. त्या भेटीमध्ये नंदू नाटेकरांना बाळासाहेबांनी मातोश्रीवर निमंत्रण दिले. बोलावल्याप्रमाणे नंदू नाटेकर त्यांच्या अविनाश वाडदेकर मित्रासोबत मातोश्रीवर गेले, तेव्हा बाळासाहेब नंदू नाटेकरांना म्हणाले,

''नंदू तू बॅडमिंटनचे क्षेत्र गाजविले आहेस, तुझ्या यशाचा मला खूप खूप अभिमान वाटतो. जीवनात तुला काहीही अडचण आली तरी माझ्याकडे ये. काहीही गाऱ्हाणे असले आणि त्याचे कुठेच निरसन होत नसेल तर माझ्याकडे यायला अजिबात संकोच करायचा नाही. त्यानंतर नंदू नाटेकरांना तशी वेळ कधीच आली नाही. परंतु बाळासाहेबांचे नंदू नाटेकर यांना मिळालेले प्रेम सदैव  लक्षात राहीले.

# कलाकार अन् यशाचा गुणाकार

बाळासाहेब त्यांच्या जीवनातील यशाचे रहस्य व्यंगचित्रकला असे म्हणतात. बाळासाहेबांनी व्यंगचित्रकार म्हणून त्यांच्या जीवनाला सुरुवात केली. त्यावेळी व्यंगचित्रे काढणारी चित्रकार मंडळी कमी होती. त्यामध्ये आर. के. लक्ष्मण, मंगेश तेंडूलकर, शि. द. फडणीस, तसेच चित्रकार म्हणून रवि परांजपे आणि आणखी काही व्यंगचचित्रकार होते. त्यामधील मुंबईमध्ये राहणारा कलाकार बाळासाहेबांच्या सहवासात आलेलेच असायचे. त्याकाळात व्यंगचित्रकार म्हणून बाळासाहेब ठाकरे एवढेच उच्चतम स्थान आर. के. लक्ष्मण यांना होते. बाळासाहेब आणि आर. के. लक्ष्मण म्हणजे अत्यंत जिवलग मित्र, दोघेही एकमेकांबरोबर अगदी मनमोकळेपणाने वागायचे. त्यांची मैत्री सच्ची होती, व्यंगचित्रकलेपासून हळूहळू बाळासाहेब राजकारणाकडे वळले आणि मग राजकारणात गेल्यावर मात्र बाळासाहेबांना व्यंगचित्रकलेकडे फारसे लक्ष देता आले नाही, परंतु त्यांच्या जुन्या कलाकार मित्राबरोबर बाळासाहेबांनी आयुष्यभर त्या परिवारातील लोकांबरोबर असणारे मित्रत्वाचे व कौटुंबिक जिव्हाळ्याचे नातेसंबंध कमी होऊ दिले नाहीत. एखाद्या घटनेकडे चाणाक्षपणे पाहण्याचा दृष्टीकोन, रागीट, शिस्तप्रिय आणि मनमिळाऊ स्वभाव ही सर्व वैशिष्टये बाळासाहेब ठाकरे आणि आर. के. लक्ष्मण यांच्यामध्ये अनेकांना सारखीच जाणवली, कदाचित त्यामुळेच की काय, बाळासाहेब आणि आर. के. लक्ष्मण ह्यांची मैत्री आयुष्यभर टिकली आणि वाढली. आर. के. लक्ष्मण आजारी असताना, बाळासाहेबांनी त्यांच्यासाठी अनेक भेट वस्तू पाठविल्या, गाडीने प्रवास करताना लक्ष्मण यांना त्रास होऊ नये म्हणून त्यांनी खास उशी पाठवली होती. बाळासाहेबांनी आर. के. लक्ष्मण यांना प्रसन्नता निर्माण करून उर्जा देणारी साईबाबांची मूर्ती भेट म्हणून दिली होती. तसेच ती मूर्ती अशा ठिकाणी ठेवा, जेणेकरून घरात कुठेही बसलात तरी ती मूर्ती तुमच्या नजरेस पडेल, अशी सूचना देखील कमला लक्ष्मण म्हणजेच आर. के. लक्ष्मण यांच्या पत्नी यांना दिली होती. आर. के. लक्ष्मण आजारी असताना जेव्हा ते मृत्यूच्या दारात उभे होते त्यावेळेस आर. के. लक्ष्मण यांना बोलण्याचा त्रास होत होता, परंतु बाळासाहेबांनी आर. के. लक्ष्मण यांना बोलण्यास भाग पाडले, त्यावेळेस आर. के. लक्ष्मण यांचा आवाज फारसा स्पष्ट येत नव्हता, शिवाय तो आवाज खूपच हळू होता तरीही दोघेही एकमेकांशी बोलले, तो फोन झाल्यावर आर. के. लक्ष्मण आणि बाळासाहेब यांच्या चेहऱ्यावर तृप्तीचा आनंद अगदी सहज दिसत होता. अशाप्रकारे जसे आर. के.



लक्ष्मण ह्या व्यंगचित्रकारासोबत जसे नाते संबंध होते तसेच काही नाते त्यांचे मंगेश तेंडूलकर यांच्यासोबत होते. मंगेश तेंडूलकर आणि बाळासाहेब ठाकरे यांची स्नेहपूर्ण मैत्री तब्बल पन्नास वर्षापूर्वीची होती. १९६०-१९६१ च्या दरम्यान एक व्यंगचित्रकार म्हणून दुसऱ्या व्यंगचित्रकाराबरोबर त्यांचे नातेसंबंध जुळले. त्यावेळेला मंगेश तेंडूलकर दिशा ठरवण्याच्या आणि दुष्टचक्रात अडकलेल्याप्रमाणे त्यांची स्थिती होती. त्यावेळेस मंगेश तेंडूलकरांचे नाव फार काही प्रसिद्ध नव्हते. कदाचित त्यामुळेच त्यावेळेस मंगेश तेंडूलकर यांना व्यंगचित्रे काढण्यास कोणीही संधी देत नव्हते. त्यावेळेस मंगेश तेंडूलकरांना बाळासाहेबांचा खूप खूप आधार मिळाला.

अशा शब्दात मंगेश तेंडूलकरांनी विविध पत्रकारांबरोबरच्या मुलाखतीत तसेच त्यांच्या ठिकाणी झालेल्या भाषणात सांगितले. मंगेश तेंडूलकरांना त्यांची व्यंगचित्रकला त्यांच्या हातातून सुटते की काय असे वाटत होते तेव्हा बाळासाहेबांनी त्यांना संधी दिली, कदाचित ती संधी मिळाली नसती तर ते मंगेश तेंडूलकर एक व्यंगचित्रकार म्हणून जगभर सुप्रसिद्ध झाले नसते. एक व्यंगचित्रकार कलाकारच दुसऱ्या कलाकाराचे दु:ख जाणू शकतो. कारण बाळासाहेब देखील त्या प्रवासातून शिखरावर पोहचलेले एक प्रतिभावंत, परिवर्तनकर्ते, प्रबोधनकर्ते असे उत्कृष्ट व्यंगचित्रकार होते. खरं तर कलाकार म्हणजे एकाच विशिष्ट दिशेने विशिष्ट एक गोष्ट हातात घेऊन त्याला आकार देणारा असा कल + आकार. कलाकार मंडळी ही अत्यंत वेडी असतात, एखाद्या गोष्टींचे त्यांना वेड लागले की लागले, ती गोष्ट पूर्णत्वास नेण्याविना त्यांना चैनच पडत नसते. त्यासाठी ते सर्व बाजी पणाला लावत असतात. तशाच प्रकारे बाळासाहेब घडले आणि त्यांनी कलेची पूजा करणाऱ्या मंडळींच्या हृदयात प्रेमाचा गुणाकार निर्माण केला. बाळासाहेबांच्या राजकीय क्षेत्रातील उत्तुंग यशाचे कारण ते कलाकार होते. असे अनेकदा बाळासाहेबांनी त्यांच्या भाषणात सांगितले आहे. त्यामुळेच मंगेश तेंडूलकर म्हणतात की, बाळासाहेब ठाकरे म्हणजे वाघाचे हृदय असणारा एक संवेदनशील कलावंत म्हणूनच मी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाकडे पाहात आलेलो आहे.

मंगेश तेंडूलकर तसेच इतर व्यंगचित्रकारांनी बाळासाहेबांची व्यंगचित्रे काढली, परंतु ते कधीही कोणत्याही कलाकारावर रागी भरलेले आढळून आलेले नाही, उलट त्यांना कलाकारांविषयी विशेष आदर होता, त्यांच्याविषयी प्रचंड आपुलकी होती. कोणताही कलाकार बाळासाहेबांच्या दरबारात गेला की आदराने स्वागत केले जायचे, आणि आलेल्या प्रत्येक कलाकारांची बाळासाहेब आस्थेने चौकशी करत असत. कलाकाराचे जेव्हा उत्तुंग शिखरांवर असलेल्या बाळासाहेबांकडून जेव्हा कौतुकाची

थाप मिळत तेव्हा त्यांना त्यांच्या जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटते. एकदा पुण्यामध्ये बाळासाहेबांना अभियान प्रतिष्ठानच्या वतीने 'पुणे रत्न' हा पुरस्कार देण्यात आला. सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांच्याहस्ते बाळासाहेबांना पुणेरी पगडी घालून तो सत्कार करण्यात आला होता. त्यावेळेला शि. द. फडणीस म्हणाले, की बाळासाहेबांनी आम्हा कलाकारांना वेळोवेळी प्रोत्साहन दिले, त्यांच्या हस्ते मी काही सत्कार स्वीकारले आहेत. बाळासाहेबांचा माझ्या हस्ते सत्कार झाल्याने, पूर्वीच्या सत्काराची अशंत: परतफेड झाली असे मी मानतो.

कलाकारांची नाडी बाळासाहेबांना माहीती होती, कारण ते कलाकारांचे डॉक्टर होते. कलाकारांचे नेमके दुखणे काय असते ते बाळासाहेबांना कोणत्याही कलाकाराला पाहताक्षणीच बाळासाहेब ओळखायचे. बाळासाहेबांच्या कलाकारांच्या गुणाकारात रवि परांजपे ज्येष्ठ जगप्रसिद्ध चित्रकार ह्यांचा देखील विशेष अंक येतो. रवि परांजपे ह्यांना बाळासाहेब ठाकरे ह्यांचे व्यक्तिमत्त्व हवेहवेसे वाटायचे. मर्मिक साप्ताहीक सुरु झाल्यानंतर ४ वर्षांनी आणि शिवसेनेची सुरुवात होण्यापूर्वी २ वर्षे अगोदरच रवि परांजपे यांची एक चित्रकार म्हणून बाळासाहेबांबरोबर भेट झाली होती. तेव्हा पासून जे त्यांचे नातेसंबंध जुळले ते गुणाकारांप्रमाणे गुणितच होत गेले. रवि परांजपे ह्यांचे रेखांकन बाळासाहेबांना फार आवडायचे, बाळासाहेब जेव्हा पुण्यात येत तेव्हा रवि परांजपे यांनाही भेटायला बोलावून घेत असत. आणि पाठीवर थाप मारून प्रोत्साहन देत असत. रवि परांजपे यांनी जेव्हा पहिले प्रदर्शन हॉटेल ओबेरॉय ह्या ठिकाणी भरवले होते, तेव्हा त्यांनी बाळासाहेबांना उद्‍घाटनासाठी बोलावले होते. परांजपेची चित्रकारीता त्यांना अत्यंत आवडली आणि त्यांना रवि परांजपे ह्यांचे दु:ख देखील लक्षात आले. एका चित्रकाराची चित्रे जेव्हा योग्य किंमतीत विकली जावून जेव्हा त्यांस उत्तम आर्थिक मोबदला मिळतो त्यावेळेस त्याचा उत्साहाचा गुणाकार होत असतो. नुसत्याच शब्दरुपी कौतुकांनी आयुष्याच्या आर्थिक भागाकाराची भर त्यामधून कधीच भरून येत नसते. त्यासाठी कलाकारांच्या कलेसाठी योग्य आर्थिक मोबदला मिळणेच त्यासाठी गुणाकार ठरतो. प्रदर्शन पाहून झाल्यावर बाळासाहेबांनी फोन करून ओबेरॉय हॉटेलच्या महाव्यवस्थापकांना बोलावून घेतले होते. त्यांनी रवि परांजपे ह्यांची १० चित्रे त्यावेळेस विकत घेतली. पहिल्याच प्रदर्शनात १० चित्रे विकली जाणे ही सर्वात मोठी गोष्ट बाळासाहेबांमुळे शक्य झाली होती. त्यानंतर रवि परांजपे यांच्या यशाचा गुणाकार जगभर द्विगुणितच होत गेला. आज रवि परांजपे चित्रकार म्हणून जगप्रसिद्ध झाले आहेत. अनेक देशामध्ये त्यांची प्रदर्शने झाली, त्या प्रदर्शनामध्ये त्यांच्या अनेक चित्रांची विक्री झाली. त्यांचे चित्र आपल्या घरात आवर्जुन असावे, असे अनेकांना



अभिमानाने वाटते.

बाळासाहेबांनी कलाकारांचा स्नेह आणि खासकरून चित्रकारांचा स्नेह कायम स्वरुपी जपला. याची अनेक उदाहरणे आहेत. बाळासाहेबांच्या मुळे जशाप्रकारे कलाकारांचा यशाचा गुणाकार द्विगुणित होत होता, तसेच बाळासाहेबांच्या राजकारणातील उत्तुंग यशाचा गुणाकार देखील द्विगुणित झाला. त्यासाठी कलाकारांचा विशेष सहभाग आहे. असे म्हणतात, ''प्रेम दिल्याने वाढते.'' बाळासाहेबांनी जेवढे प्रेम दिले आणि त्याच्या यशासाठी जेवढे सहकार्य केले, ते त्यांना द्विगुणित होवून राजकारणातील जनमाणसातील पकड मजबूत करण्यासाठी फायद्याचे ठरले. हे आपल्याला क्षणोक्षणी दिसून येते. बाळासाहेब हे जसे राजेशाही थाटात राहीले, तसेच अनेकदा ते साधेपणाने देखील राहीले. बाळासाहेबांकडे फार सुरुवातीलाच ॲम्बेसिटर मोटारगाडी होती, ती ॲम्बेसिटर काळी-पांढरी अशी दुरंगी होती. बाळासाहेब अनेकदा मुंबईजवळील भागात त्यांच्या ॲब्मेसिटरनेच जात असत. एकदा बाळासाहेब शिवसेनेच्या कार्यक्रमासंदर्भात श्रीकांतजी (भाऊ) ठाकरे आणि परिवारांसोबत पुण्यात आले होते. आप्पा बळवंत चौकातील गोखले वाडयात आले होते. त्यावेळेस हरिश्चंद्र लचके यांच्याशी भेटण्यासाठी ते गेले होते. प्रचंड पावसामुळे वाड्यात फूटभर पाणी साचलेले होते, बाळासाहेबांची गाडी आली, तेव्हा अनिल लचके यांचे वडील हरिश्चंद्र लचके आतूनच म्हणाले, ''थांबा मी जरा छत्री घेवून येतो त्यावेळेस हजरजबाबी बाळासाहेब म्हणाले, ''अहो मी आधीच भिजलो आहे, तेव्हा छत्री राहू द्यात. एखादी होडी असेल तर पाठवून द्या.'' असा बाळासाहेबांचा इलेक्ट्रिफाइंग स्वभाव होता. अनेक भेटीगाठींच्या संदर्भावरून लक्षात येते की बाळासाहेब ज्या ज्या ठिकाणी जात त्यावेळेस अधिकाधिक कुटुंबांशी नातेसबंध वाढवून गुणाकार करणे करिता ते त्यांच्या घरी जावून भेटीगाठी करत आणि भोजन करीत असत. आणि घरच्या भेटीगाठी नंतर जेव्हा जेव्हा त्याभागात जायचे तेव्हा त्यांना भेटीसाठी बोलावत असताना बाळासाहेब आले आणि त्यांचे बोलावणे आले असे कळल्यावर सहकुटुंबासह त्यांना भेटायला जात असत. आणि त्यांना कोणत्याही स्वरुपाचे सहकार्य मागण्यासाठी कधीही मागपुढे पाहात नसत. आणि सर्वमंडळीसुद्धा त्यांना भरभरून सहकार्य करीत होते, कारण त्यांना माहीत होते, की बाळासाहेब जे काही करतात ते देशहितासाठी करत आहेत.

साधारणत: १९६८ सालच्या दरम्यान बाळासाहेब शिवसेनेच्या घौडदौड वाढवण्यासाठी पुण्यात आले होते, तेव्हा पुण्यात ऑफीस नसल्यामुळे सर्व शिवसेना शिवसैनिकांमधील महत्त्वाची पदाधिकाऱ्यांची बैठक मंदाकिनी बंगल्याच्या छोट्याशा हॉलमध्ये होत असे. मंदाकिनी बंगला कर्वे रोड इन्कमटॅक्स बिल्डींगच्या लेनलाच

आहे. त्यावेळी पुण्यातून सुधीर जोशी, मनोहर जोशी, प्रमोद नवलकर, दत्ताजी साळवी अशा मंडळींची बैठक बसायची, त्यावेळी बाळासाहेबांचा मुक्काम जवळच्या पालेकर बंगल्यातच असायचा. त्यावेळी निघताना अनेकदा हरिश्चंद्र लचके यांचे चिरंजीव अनिल लचके यांनी बाळासाहेबांना स्कूटर वर सोडले आहे. अशा प्रकारे बाळासाहेब अगदी साधेसुधे जीवन जगले आणि राजेशाही थाटाप्रमाणे जीवन जगले. जशाप्रकारे छत्रपती शिवाजी महाराज आपले खरं राज्य कसे आहे, ते जाणण्यासाठी साध्या सरळ वेषात जनमाणसात जात, तशाप्रकारे बाळासाहेबही शिवाजी राजाचा आदर्श घेवून जीवन जगले.



# बाळासाहेबांचे दरबार आणि भाजपचे सरकार

भारतीय जनता पार्टीची स्थापना ६ एप्रिल १९८० मध्ये झाली, तर शिवसेनेची स्थापना १९ जून १९६६ मध्ये झाली. जशाप्रकारे श्रीराम आणि भरत आणि अयोध्यावासियांना १४ वर्षे वनवासानंतर श्रीरामाचे दर्शन घडले तसेच काही १४ वर्षेनंतर शिवसेनेला भाजपाच्या रुपाने बंधू भेटला असे जाणवते. सुरुवातीला त्यांच्यामधील असलेल्या विचारांच्या मतभेदामुळे एकी होवू शकली नाही, परंतु प्रमोद महाजन ह्यांनी १९८७ मध्ये शिवसेना भाजपाची अभेद्य युती निर्माण केली आणि ती अजूनही टिकून आहे.

भारतीय जनता पार्टीचा इतिहास सांगावलाच हवा. डॉ. श्यामा मुखर्जी ह्या स्वातंत्र्यसेनानी नेत्याने १९५१ मध्ये राष्ट्रवादास पाठींबा देत भारतीय जनसंघाची स्थापना केली. भारतास स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेस पक्षाला बरखास्त करा अशी मागणी महात्मा गांधीजींची होत. परंतु त्यांच्या मागणीकडे लक्ष न देता काँग्रेस नेत्यांनी काँग्रेसची वाटचाल त्यांच्या नेतृत्वखाली सुरु केली. त्यामुळेच मुखर्जींनी भारतीय जनसंघाची स्थापना केली. त्यांनी कार्यकर्त्यांची सक्षम फळी निर्माण केली. त्यामध्ये दिनदयाल उपाध्याय सारखे सक्षम नेतृत्व होते, दुर्दैवाने डॉ. श्यामा मुखर्जी यांचा १९५३ मध्ये मृत्यू झाला. आणि भारतीय जन संघाला सक्षम करण्याची जबाबदारी दीनदयाल उपाध्याय यांच्यावर आली. १५ वर्षे महासचिव म्हणून कामगिरी करत त्यांनी संघाची संपूर्ण विचारधारा निर्माण करून ती हजारो कार्यकर्त्यांच्या जनी, मनी, ध्यानी उतरवली आणि समाजामध्ये सक्षम राजकीय नेतृत्व घडविण्यासाठी त्यांनी प्रशिक्षण देवून हजारो कार्यकर्त्यांना भारतीय जन संघाचे सक्षम सदस्य बनविले. त्यामधून अनेक राजकीय नेतृत्व पुढे आली. त्यामध्ये विशेषत: श्री. अटलबिहारी वाजपेयी आणि लालकृष्ण अडवाणीसारखे सक्षम नेते घडले आणि पुढे आले. भारतीय जनसंघाचे १९५२ मध्ये लोकसभेचे ३ उमेदवार निवडून आले होते. परंतु त्यानंतर मुखर्जींचा मृत्यू झाल्यानंतर सरसेनापतीच नसल्यामुळे आणि जनसंघाची विचारधारणा कार्यकर्त्यांमध्ये खोलवर न रुजल्यामुळे उतरती कळा चालू राहिली. दीनदयाल उपाध्याय ह्यांनी ही गोष्ट लक्षात घेऊन दहा वर्षात देशाच्या कानाकोपऱ्यात संघ परिवाराशी अनेक कार्यकर्ते जोडले, त्यांच्यामध्ये संघाची विचारधारा पोहवचली आणि जन संघाची ताकद वाढवली, त्यामुळे एक प्रभावी विपक्ष पार्टी म्हणून भारतीय जन संघाची ओळख निर्माण झाली. त्याचा परिणाम अनेक राज्यांच्या निवडणूकांमध्ये दिसून

आला. समान नागरिक संहिता, गोहत्या, जम्मू काश्मीरला विशेष दर्जा मिळावा, हिंदी भाषेचा प्रचार व्हावा असे अनेक मुद्दे घेवून संघ जनमाणसात पोहचला आणि त्यामुळे अनेक राज्यात संघाने चांगलीच टक्कर दिली. १९६७ मध्ये इतर राजकीय संघटनेबरोबर एकत्रितरित्या निवडणूका लढवून भरघोस यश मिळवले आणि उत्तरप्रदेश आणि दिल्ली मध्ये सरकार बनवले. दरम्यान १९६८ मध्ये दीनदयाल उपाध्याय ह्यांची निर्घृण हत्या करण्यात आली. परंतु संघाची भूमिका आणि विचारधारेची मुळे जनमाणसात खोलवर रुजल्यामुळे जन संघ आणखीच मोठा झाला. दीनदयाल उपाध्याय यांच्यानंतर श्री. अटलबिहारी वाजपेयी भारतीय जन संघाचे अध्यक्ष म्हणून सर्वानुमते निवडण्यात आले. त्यावेळी अटलबिहारी वाजपेयी ४५ वर्षाचे होते, कॉलेजमध्ये शिकत असतानाच भारतीय जन संघामध्ये छात्र संघटनासाठी सक्रीयपणे कार्य करण्यास सुरु केले होते. त्यानंतर भारतीय जन संघाच्या माध्यमातून बदल करून पंतप्रधान पदापर्यंत अटलबिहारी वायपेयी पोहचले.

अटलजींचा जन्म २५ डिसेंबर २००४ मध्ये मध्यप्रदेश ग्वालियरमध्ये झाला होता, वाजपेयी कुटुंबात अटलजींचा सातव्या क्रमांकावरील जन्म, त्यांना तीन भाऊ आणि तीन बहीणी होत्या. लहानपणापासून एक हुशार विद्यार्थी म्हणून नावलौकिक करत आले होते, तसेच एक उत्तमवक्ता म्हणून लहानपणापासूनच शाळेत असताना ओळख निर्माण झाली होती, कॉलेजजीवनापासूनच त्यांनी राजकीय क्षेत्रात छात्र संघठन ह्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एकत्रिकरणात ते सक्रीय कार्य करीत होते. त्यावेळेस नारायणराव तरटे म्हणून राष्ट्रीय स्वयं सेवक संघाचे प्रमुख म्हणून कामकाज पाहत होते. प्रचंड उत्साह उत्तम वक्ता म्हणून अटलजींची शाखाप्रमुख म्हणून नियुक्ती झाली होती. कॉलेजमध्ये असताना वक्तृत्वाबरोबरच अटलजींनी कविता लिहण्यास सुरुवात केली होती. त्यांच्या काव्यात्मक भाषणामुळे ते हळूहळू उत्तम वक्ता म्हणून प्रसिद्ध झाले होते. १९४३ मध्ये वयाच्या २० व्या वर्षी ते कॉलेज युनियनचे सचिव म्हणून कामकाज पहात होते. १९४४ मध्ये ते कॉलेज युनियनचे उपाध्यक्ष म्हणून निवडून आले होते. नंतर च.अ., ङ.ङ.इ.  पर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी दीनदयाल उपाध्याय यांच्या 'राष्ट्रधर्म' ह्या नावाने (दैनिक) न्यूजपेपर सुरू केले, तेव्हा कमी कालावधीत 'राष्ट्रधर्म' समाजामध्ये पोहचले होते. त्यानंतर अटलजींनी 'भारत प्रेस' ह्या नावाने स्वत:चे दैनिक सुरू केले. त्यामाध्यमातून भारत प्रेस मध्ये योग्य कामगारांच्या सहाय्याने कमी कालावधीत जनमाणसात पोहचले. भारतप्रेसचे अधिकाधिक कार्य हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्यासाठी होत असे.  नथूराम गोडसे ह्यांनी महात्मा गांधींना गोळ्या घालून ठार केले. नथूराम गोडसे हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यात सहभागी होते.



त्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्यांच्याशी संलग्नित संस्था आणि प्रेसवर बंदी घालण्यात आली. त्यामुळे भारत प्रेस देखील बंद झाली. त्यानंतर 'स्वदेश', 'वीर अर्जुन' अशा नावाने त्यांनी वृत्तपत्रे काढली आणि अल्पावधीतच ती प्रसिद्ध झाली. परंतु परमेश्वराला अटलजींना वृत्तपत्र संपादकाच्या भूमिकेत अडकावयाचे नव्हते. त्यांना फक्त त्यांचा अनुभव द्यायचा होता, त्यामुळे काही ना काही अडथळे निर्माण करून त्यांची वृत्तपत्रे बंद पाडली गेली. परंतु ह्या सर्व अनुभवाचा, कवित्वाचा अनुभव त्यांना भविष्यात अत्यंत फायद्याचा ठरला. आपल्या धीरगंभीर वाणीने आणि काव्यात्मक भाषणामुळे अटल बिहारी वाजपेयी लाखो श्रोत्यांची मने अगदी सहजतेने जिंकत असत. त्यांच्यावरील विश्वास प्रत्येक भाषणातून गुणाकाराच्या स्वरूपात गुणित होऊन वाढतच होता. १९५७ मध्ये भारतीय जन संघाच्या वतीने वयाच्या अवघ्या ३३ व्या वर्षी त्यांनी खासदारकीची निवडणूक लढवली आणि १०००० मतांनी विजयी झाले. ते लोकसभेचे सभासद झाले. १९६२ मध्ये निवडणूक हरले, पण १४ उमेदवार भारतीय जन संघाचे निवडून आल्यामुळे ते राज्यसभेचे सभासद झाले. १९६७ मध्ये अटलजी ३२००० मतांनी विजयी खासदार झाले. १९७२ मध्ये ते जन्मस्थान असलेल्या ग्वालियर मधून खासदार म्हणून निवडून आले. त्या कालावधीत जनता पार्टीने १९७७ मध्ये प्रचंड बहुमताने निवडणुका जिंकल्या आणि इतर छोट्या छोट्या राजकीय पक्षांना सोबत घेत केंद्रसरकारची सत्ता मिळवली. तेव्हा मोरारजी देसाई पंतप्रधान झाले, तर अटलबिहारी वाजपेयी ह्यांनी विदेश मंत्री म्हणून कार्य केले. जनता पार्टीचे सरकार अधिक काळ टिकू शकले नाही. १९७९ मध्ये पंतप्रधान मोरारजी देसाई यांना राजीनामा द्यावा लागला. आणि जनता पार्टी आणि भारतीय जन संघ व इतर पक्ष विस्कळीत झाले. १९८० मध्ये जनता पार्टी, भारतीय जन संघ व इतर पक्ष या सर्वांना एकत्रित करून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मार्गदर्शनानुसार भारतीय जनता पार्टीची स्थापना झाली. त्या कालावधीत १९८४ मध्ये शिख विरोधी दंग्याचा दृढतापूर्वक विरोध केला. पंजाबमध्ये भाजपची ताकद वाढली. त्या दरम्यान महाराष्ट्रात शिवसेनेची वाढती ताकद लक्षात घेवून भारतीय जनता पार्टीने शिवसेनेबरोबर हात जुळणी केली. त्यावेळी अटल बिहारी वाजपेयी त्यांच्या धीर गंभीर काव्यात्मकरित्या भारतीय जनतेला म्हणाले होते,

'अंधेरा छटेगा, सूरज निकलेगा और कमल खिलेगा!' त्यावेळी १९८४ मध्ये साधारण निवडणुकांमध्ये २८ उमेदवार भाजपचे निवडून आले. १९८० ते १९९५ पर्यंत अटलबिहारी वाजपेयी विपक्ष भूमिकेत सातत्याने कार्य करीत राहीले. अटलबिहारी वाजपेयी आणि बाळासाहेब ठाकरे एकत्र आल्यामुळे खरं तर दोघांचीही ताकद वाढली

होती, परंतु बाळासाहेबांनी त्यादरम्यान इंदिरा गांधींच्या आणीबाणीला पाठिंबा दिल्यामुळे कमळाबाईंनी शिवसेनेला सोडले. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर बाळासाहेबांनी पाठिंबा काढून घेतला अन् त्या कालावधीत शिवसेनेने देखील कात टाकली आणि हिंदुत्वाची भूमिका अधिक प्रखरतेने घेतली. बाळासाहेबांना अटल बिहारी वाजपेयी यांचे नेतृत्व आवडत होते. शिवाय अटल बिहारी वाजपेयींचे बाळासाहेब ठाकरे हे एकदम फेवरेट असे व्यक्तिमत्त्व होते. दोघांची वये, विचारधारा, त्यागाची वृत्ती ही जवळ जवळ सारखीच होती. बाळासाहेब हे एकवचनी तर शब्दाला अटळ महत्त्व देणारे अटलजी अशी दोन व्यक्तिमत्त्वे त्या दरम्यान अधिक जवळ आली. बाळासाहेबांचे भाषण कौशल्ये, शिवाजी राजांसारखा थाटमाट आणि विचारसरणी अटलबिहारी वाजपेयी ह्यांचे धीरगंभीर काव्यात्मक भाषण कौशल्य, आणि थाटमाट आणि संघाची विचारसरणी लाखोंची महासभा गाजवत होती. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या भारताच्या कानाकोपऱ्यात, गल्ली बोळामध्ये सोसायट्यांमध्ये सकाळी आणि सायंकाळी संघाच्या विचारसरणीची मंडळी लहान मुलांसोबत शाखेत येत होती आणि येतच आहेत. ''मैदान तेथे संघशाखा'' अशाप्रकारच्या संकल्पनेतून भारताच्या सर्व मैदानावर संघशाखा चालविण्याचे कार्य चालू आहे. त्या शाखेत प्रथम भारतमातेला वंदन करून ।। परमवैभवम् नेत् मेतत् स्वराष्ट्रम्।। ह्या मातेला आम्ही परमवैभवाकडे नेण्यासाठी कटिबद्ध आहोत अशा प्रकारची प्रार्थनामय घोषणा करत संघशाखा सुरू होते. त्यानंतर सूर्यनमस्कार, इतर व्यायाम खेळ घेतले जातात. आठवड्यातून काही दिवशी दंड चालवण्यास शिकवले जातात, त्यात वेगवेगळ्या दंडक्रमिकांच्या माध्यमातून दंडाद्वारे प्रहार करणे, प्रहार अडविणे हे देखील शिकवले जाते. आठवड्यातून काही दिवस नियुद्ध (कराटे) शिकवले जाते. दररोज 'विचारकणिका' (सुविचार) सांगितली जाते, तसेच दैनंदिन शाखेचा शेवट हा एकात्मका श्लोक अथवा विचाराच्या माध्यमातून केला जातो. हिंदुस्थानामध्ये आजवर ज्या ज्या चांगल्या गोष्टी घडल्या, जे जे महान ऋषीमुनी, समाजसुधारक, क्रांतीकारी, प्रबोधनकर्ते, देशभक्त, स्वातंत्र्यसेनानी, राजे महाराजे, संत महात्मे ह्यांच्या विचारांचा समावेश ह्या एकात्मका श्लोक अथवा स्तोत्र अथवा विचारांतून म्हटले जाते. शाखेचा गणवेश हा पांढरा शर्ट आणि खाकी हाफचड्डी असते. ह्या गणवेशामुळे एकीची जाणीव सर्वांना होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची विचारधारा संघशाखेमुळे आणखीनच मजबूत होते.

छात्र संगठन ह्या माध्यमातून अखिल भारतीय विद्यार्थी परिषद विद्यार्थ्यांसाठी प्राध्यापकाच्या द्वारे आणि विद्यार्थ्यांच्या माध्यमातून चालविली जाते आणि त्यामधून उत्तम कामगिरी करणाऱ्या छात्रास भारतीय जनता पार्टीमध्ये घेतले जाते. त्यामधूनच



प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, नितीन गडकरी यांच्यासारखी चांगली नेतृत्व पुढे आली.

महाराष्ट्रामध्ये प्रमोद महाजन यांनी शिवसेनेबरोबर कायमचे शिरसंधान बांधून युती करण्याचे कार्य केले. आणि दोघांमधील हिंदुत्वाचा सेतू पक्का बांधला गेला.

आयोध्येतील बाबरीकांड प्रकरणामुळे आणि बाळासाहेब ठाकरे आणि अटलबिहारी वाजपेयी ह्यांची मैत्री आणखीनच पक्की झाली, परिणामी भारतीय जनता पार्टी आणि शिवसेना यांची युती आणखीनच मजबूत झाली.

१९९३ मध्ये दिल्ली निवडणुका आणि १९९५ मध्ये गुजरात निवडणुकांमध्ये भाजपने चांगलीच मुसंडी मारली, १९९६ मध्ये भाजपचे अधिक उमेदवार विजयी झाले. अटलबिहारी वाजपेयी इतर पक्षाच्या सहाय्याने पंतप्रधानपदी विराजमान झाले असे दोनदा झाले परंतु स्पष्ट बहुमत कोणत्याही पक्षाला मिळत नसल्यामुळे युपीए (णपळींशव झीसीर्शीळींश अश्रश्रळरपलश) (कॉंग्रेसच्या नेतृत्वाबरोबर इतर पक्ष) आणि एनडीए (छरींळेपरश्र ऊशोलीरींळल अश्रश्रळरपलश) (भाजपच्या व शिवसेनेच्या नेतृत्वाबरोबर इतर पक्ष) ची स्थापना झाली. १९९९ मध्ये एनडीएला स्पष्ट बहुमत मिळाले आणि बाळासाहेबांचे आवडते नेते अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधानपदी सर्वानुमते विराजमान झाले. तेव्हा लालबहादूर शास्त्रींच्या 'जय जवान, जय किसान' ला पत्तींला जय विज्ञान जोडत अटलबिहारी वाजपेयी जनमाणसात पोहचले होते. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना, त्यांच्या कालावधीत अनेक महत्त्वपूर्ण कार्ये करण्यात आली. त्यावेळी ठाम निर्णय घेण्याच्या भूमिकेत बाळासाहेब ठाकरे यांचे महत्त्वपूर्ण योगदान अटलजींना लाभले. त्यावेळी एनडीएचे संयोजक म्हणून जॉर्ज फर्नांडिस म्हणून कार्यरत होते तर लोकसभेचे अध्यक्ष बाळासाहेब ठाकरेंचे निकटवर्तीय आणि शिवसेनेचे वरीष्ठ नेते श्री. मनोहर जोशी होते.

बाळासाहेब ठाकरेंच्या मार्गदर्शनानुसार सर्वप्रथम सर्व राज्यांना एकत्रित जोडण्याचे आणि देशाची महत्त्वाची शहरे आणि गाव जोडण्याचे कार्य ह्या कालावधीत करण्यात आले. ह्या योजनेला 'स्वर्णिम चतुर्भुज' असे नाव देण्यात आले. त्यानुसार भारतातील सर्व राष्ट्रीय महामार्ग उत्तम दर्जाचे करण्यात आले, दळणवळणाचे साधन सहज, सुलभ, गतिवान झाल्यामुळे उद्योगधंदे मोठ्या प्रमाणावर वाढले. अटलजींनी विज्ञान आणि तंत्रज्ञान यांची जोड घालून भविष्याच्या गतिवान प्रगतीमय यशाचे दरवाजे कायमस्वरुपी उघडले.

पाकिस्तानचे परवेज मुशर्रफ ह्यांनी काश्मीरच्या कारगिल क्षेत्रास भारताशी तोडून

पाकिस्तानबरोबर जोडण्याचे कटकारस्थान रचले, आणि कालगिल जिंकल्यावर हळूहळू संपूर्ण काश्मीर पाकिस्तानबरोबर जोडण्याचे स्वप्न पाहिले. हे कटकारस्थान करत असताना भारताशी योग्य संबंध जोडायचे म्हणून त्यांनी अटलबिहारी वाजपेयी यांच्यासोबत काही भेटी घेतल्या आणि दुसरी आतंकवादी संघटनेबरोबर पाकिस्तानी सैन्य सामील करवून कारगिल क्षेत्राचा काही भागावर कब्जा घेतला. हा भाग उंच उंच पहाडी क्षेत्रातील असल्यामुळे काही काळ त्या ठिकाणी प्रचंड कडाक्याची थंडी असते. त्यामुळे भारतीय सेना त्या कालावधीत त्याठिकाणी न ठेवण्याचा निर्णय मिलीटरीने घेतला होता, त्याचाच फायदा घेत, पाकिस्तानी सेनेने आतंकवादींबरोबर सामील होवून कारगिलवर कब्जा घेतला. त्यावर विचारपूस केली असता त्यामध्ये पाकिस्तानी सेनेचा काहीही सहभाग नाही, ते आतंकवादी संघटनेने केले असे म्हणत परवेज मुशर्रफ ह्यांनी हात झटकले होते. ह्या राजकारणामुळे भारतीय सेनेचे मनोबल खचत चालले होते. शिवाय प्रतिरोधात्मक भूमिकेलाही ते कंटाळले होते. त्यावेळी बाळासाहेब ठाकरे ह्यांनी ठोस प्रतिक्रिया दिली. ह्यावर ठोस कारवाई झालीच पाहिजे असे ते म्हणाले. त्यानंतर खंबीरपणे पाऊल उचलत भारतीय सेनेचे मनोबल उंचवण्याचे कार्य सर्वांकडून करण्यात आले. आणि पाकिस्तानच्या ह्या हल्ल्याला प्रतिउत्तर द्यायचे, पाकिस्तानी सैनिकांना, आतंकवादींना कारगिलमधून खदडून काढूनच दम द्यायचा असे ठरले. खरं तर हे मिशन थोडेसे कठिण होते. कारण उंचावर असल्यामुळे दुश्मनाच्या निशाणीवर भारतीय सैनिक येत होते. भारत माता की जय! चा नारा लावत अखेरीस भारतीय सेना विजयी झाली. त्या मिशनला 'ऑपरेशन विजय' असे नाव देण्यात आले होते.

भारताला बलाढ्य आणि शक्तिशाली बनविण्यासाठी परमाणु शक्ती आवश्यकच आहे असे सांगून ११ मे १९९८ मध्ये पोखरण मध्ये पाच परमाणु परिक्षण केले गेले. त्यावेळी बाळासाहेब ठाकरेंनी अटलबिहारी वाजपेयी ह्यांच्या निर्णयास सबळ पाठिंबा दिला आणि त्याचे कौतुकही केले. त्यावेळी राजकारण बाजूला ठेवून अटलजींनी श्रीमती इंदिरा गांधी यांचे परमाणु परिक्षणाच्या पूर्वीच्या निर्णयाचे अभिवादनदेखील केले. आणि बाळासाहेबांचा इंदिरा गांधींना पाठिंबा होता. कॉंग्रेसला नव्हता असेही त्यांनी पूर्वीच्या राजकारणाला कळत नकळत बाळासाहेबांना पाठिंबा दर्शवला.

'बाळासाहेबांचा दरबार आणि भाजपचे सरकार' असे म्हणणे योग्य आहे की, बाळासाहेबांना राजकारणामधील कोणतीही खुर्ची नको होती. त्यांनी स्वत:चे एक स्वयंभू सत्ताकेंद्र निर्माण केले होते. बाळासाहेब शक्यतो कधीच कोणाच्या वैयक्तिक भेटीला जात नसत. कोणत्याही ठिकाणी जेव्हा जेव्हा महासभा होत तेव्हा तेव्हाच



बाळासाहेब लाखोंच्या जनसमुदायासमोर आपले प्रखर विचार मांडण्यासाठी बाहेर जात. इतरवेळी त्यांच्याशी भेट करायची म्हटल्यावर सर्वांनाच बाळासाहेबांच्या दरबारातच जावे लागायचे. बाळासाहेबांच्या दरबारात शिवसेनेबरोबर भाजपचे नेते व इतर सर्व पक्षाचे नेते देखील येत असत.

एकदा चौगुले (वाईनवाले) बाळासाहेबांना भेटायला आले होते. त्यावेळी बाळासाहेबांनी मुंबईमध्ये आलेल्या आणि भाजपाचे वरिष्ठ नेते असलेल्या नितीन गडकरी ह्यांनाही बोलावले, त्यावेळी नितीन गडकरी ह्यांना उद्देशून बाळासाहेब चौगुलेंना म्हणाले, ''आमचा नितीन द्राक्षाची वाईन घेत नाही बरं, त्यांच्याकरिता दमदार गोमुत्र आणि शेणापासून वाईन बनवा म्हणजे चालेल.'' त्यावर तिघेही अगदी खळाळून हसले होते. बाळासाहेबांकडे कोणीही भारतीय जनता पार्टीचे गेले म्हणून कधीही फरक करत नसत. तो भाजपचा नेता म्हणजे माझाच नेता म्हणून ते उल्लेख करत. कदाचित त्यामुळे शिवसेना भाजपाची युती अनेक वर्षांपासून टिकून आहे.

निवडणुकीच्या काळात अनेकदा भाजपचे नेते बाळासाहेबांबरोबर दौरे करायचे. एकदा विदर्भात नागपूर जिल्ह्यात कमळेश्वर येथे सभा होती. सभेला जाताना नितीन गडकरी बाळासाहेबांना म्हणाले, ''बाळासाहेब सभेला महिला भरपूर प्रमाणात येणार आहेत. आपण सांभाळून टीका करावी.'' सभास्थानी पोहचल्यावर बाळासाहेबांनी भाषण सुरु करतानाच ते म्हणाले, 'हा नितीन मला म्हणत होता, सभेला भरपूर महिला येणार आहेत, सांभाळून बोला. आता मला सांगा मी सांभाळून बोलतो म्हणूनच तर एवढ्या महिला आल्या ना!' असे म्हणून बाळासाहेबांनी हसत खेळत नितीन गडकरी यांचीच विकेट घेतली. भाजपाच्या नेत्यांना जे वयाने लहान आहेत त्यांना बाळासाहेब वडीलांप्रमाणेच वाटायचे. जिथे भाजपाचे नेते चुकत तेथे त्यांना स्पष्टपणे बाळासाहेब सांगत आणि भाजपचे नेते देखील ते स्वीकारत. गोपीनाथ मुंडे यांचे पक्षांतर्गत संघर्ष सुरु होते. गोपीनाथ मुंडे दुसऱ्या पक्षात जातील अशीच सर्वत्र चर्चा होती. गोपीनाथ मुंडे पक्षाच्या भूमिकेवर नाराज होते, त्यावर बाळासाहेब ठाकरे ह्यांनी गोपीनाथ मुंडे ह्यांना मातोश्रीवर बोलावून घेतले. तेव्हा गोपीनाथ मुंडे यांना वाटलं की, बाळासाहेब त्यांच्याशी पक्षाअंतर्गत वादाबद्दल चर्चा करतील. पण प्रत्यक्षात तसे काहीही घडले नाही. ठाकरे शैलीतील पाहुणचार झाल्यावर बाळासाहेबांनी गोपीनाथराव मुंडे यांच्याबरोबर इतर मनसोक्त कौटुंबिक, राजकीय, सामाजिक चर्चा केली. त्यावर मुंडेंना आश्चर्य वाटले. गप्पा झाल्यावर गोपीनाथराव मी येतो असे म्हणाले, त्यावेळी त्यांना बाळासाहेब मातोश्रीवरच्या मजल्यावर घेवून गेले. त्याखोलीत गणपतीचा फोटो होता. गोपीनाथरावांना हाताला धरून त्यांनी गणपतीसमोर नेले. तिथे असलेल्या करंड्यातून भगवा गंध त्यांनी

हातात घेतला. मुंडेच्या कपाळावर टिळा लावत ते म्हणाले, ‘गोपीनाथराव हा भगवा टिळा आहे. कधीही सोडायचा नाही. बस्स इतकेच ते बोलले आणि गोपीनाथरावांच्या डोळ्यात अश्ररश: अश्रू आले. वडील आपल्या मुलाला ज्या अधिकारवाणीने सांगतो, तसेच ते बोलले. बाळासाहेबांनी लावलेला भगवा टिळा लावूनच गोपीनाथराव मुंडे बाहेर पडले. आणि त्यांचा पक्षांतर्गत वाद संपला. तशाचप्रकारे गोपीनाथरावांच्या मुलीला म्हणजेच पंकजाला राजकारणात आणा असे बाळासाहेब म्हणाले त्यानुसार गोपीनाथरावांनी पंकजाला राजकारणात आणले. अशाप्रकारे भाजपाच्या अनेक नेत्यांना बाळासाहेबांनी आपले म्हणूनच सांभाळून घेतले. म्हणूनच बाळासाहेबांचा दरबार हा सर्वांचा दरबार होता. आणि भाजपाच्या नेत्यासाठी तो अधिक जवळचा वाटत होता म्हणूनच म्हटले आहे बाळासाहेबांचे दरबार आणि भाजपचे सरकार.



# महाराष्ट्राचे उद्योगपती अन् बाळासाहेब महीपती

‘‘महीपती’’ म्हणजे राजांचे राजा. महाराष्ट्रातील उद्योगसम्राटांचे सम्राट म्हणून बाळासाहेबांची ओळख निर्माण झाली होती. महाराष्ट्राच्या मातीतच उद्योगसम्राटांनी आपले विश्व निर्माण करावे आणि त्याची व्याप्ती संपूर्ण जगभर व्हावी अशी शिकवण उद्योगपतींना बाळासाहेब करत असत. त्यामुळे जसे महाराष्ट्राचे उद्योगपती जगभर पोहचले, तसेच जगामध्ये कोणाच्याही तोंडात मुंबईचे नाव आले, तर बाळासाहेबांचे येतेच येते. अशीच एक घटना दुबईमध्ये असताना बाळासाहेबांनी अनुभवली. एअरपोर्टवर बाळासाहेबांना एक भगव्या रंगाची पर्स फार आवडली. ती घेण्यासाठी बाळासाहेब पुढे सरसावले. तो विक्रेता दुबईचा रहिवासी होता, त्याने बाळासाहेबांना विचारले, "Are you from India? You are belongs to Mumbai, am I right?" त्यावर बाळासाहेब हो म्हणाले, "yes" त्यावर त्या दुकानाच्या मालकाने विचारले, "You are Mr. Balasaheb Thacheray, am I right?" त्यावर बाळासाहेबांनी स्मित हास्य केले आणि हो म्हणाले. त्यावरून बाळासाहेबांचे जगभरात अनेक जण चाहते आहेत असे जाणवते. महाराष्ट्राचे उद्योगपती वेळात वेळ काढून बाळासाहेबांना भेटायला जात असत. असेच प्रसिद्ध उद्योगपती वेणूगोपाल धूत साहेब बाळासाहेबांना भेटायला गेले होते, तेव्हा वेणूगोपाल धूत यांना बाळासाहेब म्हणाले,

‘‘महाराष्ट्रातच राहा, पण जगभर भरारी घ्या. महाराष्ट्रातील लक्षावधी युवकांना रोजगार देवून स्वत:च्या पायावर उभे करा. तुमच्या उद्योगाचा विस्तार सातासमुद्रापार पोहचवा. उद्योगपतींनी माझ्या सारख्या राजकारण्यांना भेटून वेळ वाया घालवू नका, त्यापेक्षा तुमचा वेळ संपत्ती निर्माण करण्यासाठी खर्च करा असे बाळासाहेब सांगत पण बाळासाहेबांचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद महत्त्वाचे वाटून उद्योगपती सातत्याने भेटत असत. कोणत्याही आडमार्गाने आणि सोप्या मार्गाने पैसा कमवू नका ह्याबद्दल बाळासाहेब कमालीचे आग्रही असायचे. लहानपणापासून प्रबोधनकारांकडून हीच शिकवण बाळासाहेबांना मिळाली होती.

जेव्हा महाराष्ट्रात शिवसेना भाजप युतीचे सरकार होते, त्यादरम्यान महाराष्ट्रात अधिकाधिक पायाभूत सुविधा पुरविण्याचे कार्य बाळासाहेबांनी केले. पुण्याप्रमाणेच नागपूर आणि औरंगाबादमध्ये देखील माहिती तंत्रज्ञानाचे जाळे पसरावे असे बाळासाहेबांना वाटायचे.

महाराष्ट्राच्या उद्योगपतींमध्ये विठ्ठल कामत यांचे नाव विशेष आदराने घेतले जाते.

जयदेव ठाकरे आणि विठ्ठल कामत यांची चांगली मैत्री जमलेली. जयदेव ठाकरे यांनी १९७८-१९७९ च्या साली विठ्ठल कामत यांची बाळासाहेब ठाकरे यांच्याशी ओळख करून दिली. कामत हॉटेल इंडस्ट्रीचे मालक आणि विठ्ठल कामत यांनी तयार केलेल्या चविष्ट पदार्थांचा फॉर्म्युला सर्व ठिकाणच्या हॉटेलमध्ये वापरला जातो, त्यामुळे हॉटेल कामत नाव ऐकले किंवा पाहिले की त्या हॉटेलमध्ये खमंग चमचमीत पदार्थ खायचे अशी इच्छा निर्माण होतेच. बाळासाहेबांच्या दरबारात सर्व क्षेत्रातील लोक यायचे. पाहुणचार पाहून थक्क व्हायचे आणि बाळासाहेबांच्या दिलखुलास चर्चेनंतर तर आयुष्यभराची जगण्याची शिदोरी मिळायची. बाळासाहेबांचा एक एक शब्द म्हणजे त्यांच्या आयुष्याला दिशा देणारा ठरायचा. बाळासाहेबांची जीवनपद्धती आणि सवयी ह्या सर्वांसाठी आदर्श होत्या. बाळासाहेबांचा वक्तशीरपणा, टापटीपपणा ह्या सर्व गोष्टी सर्वांनाच भावत असत. एखादी गोष्ट कपाटामध्ये कोठे ठेवली आहे, कोणत्या कप्प्यामध्ये ठेवली आहे, डाव्या बाजूला की उजव्या बाजूला ठेवली आहे हे बाळासाहेब अगदी अचूकपणे सांगत असत.

मुंबईमध्ये विठ्ठल कामत वेळात वेळ काढून बाळासाहेबांना भेटायला गेले होते. पाहताक्षणी बाळासाहेब नेहमीप्रमाणे म्हणाले, ''विठ्ठल विठ्ठल जय पांडुरंग'' अशाप्रमाणे स्वागत झाल्यानंतर थोड्या वेळाने बाळासाहेब पुन्हा विठ्ठल कामतांकडे बघून म्हणाले, ''सांगा कामतांना का 'मत' द्यावे?'' मग हसून पुन्हा चर्चा सुरु केली. थोड्या वेळाने बाळासाहेबांनी कपाटामधून तिसऱ्या कप्प्यात डावीकडे ठेवलेला चष्मा आणायला सांगितला. विठ्ठल कामतांना तो चष्मा बरोबर तिसऱ्या कप्प्यावर डाव्या बाजूलाच सापडला.

तेव्हा एक नात्यांतील व्यक्ती बाळासाहेबांना भेटण्यासाठी आले होते. बोलण्याच्या ओघात ती व्यक्ती बोलून गेली, 'ते अमुक अमुक उपहारगृह आहे ना, ते मला चालवायला मिळेल का?' त्यावर बाळासाहेबांनी विचारले 'का?' त्यावर पुन्हा ती नात्यातील व्यक्ती म्हणाली, 'सध्या चालू आहे आणि अमकी व्यक्ती चालवत आहे.' हे ऐकल्यावर साहेब म्हणाले, 'कशाला कोणाच्या पोटावर पाय देत आहात? व्यवस्थित चाललय ना त्याचं, काही तक्रार नाही ना कर्मचाऱ्यांची? मग करु दे त्याला तिथेच व्यवसाय!' अशाप्रकारे विठ्ठल कामत ह्यांना बाळासाहेबांमधल्या माणुसकीचे दर्शन घडले होते. त्यानंतर ह्या घडलेल्या घटनेनंतर विठ्ठल कामत ह्यांनी त्यांचा वक्तशीरपणा, टापटीप आणखी चांगला रितसर आणि शिस्तबद्ध करत त्यांचा व्यवसाय वाढवला आणि विठ्ठल कामत नावाचा मोठा ब्रॅन्डच त्यांनी निर्माण केला, पण त्यांच्या यशाचे श्रेय ते बाळासाहेबांना देतात. एवढेच नव्हे तर विठ्ठल कामत ह्यांच्या इडली, ऑर्केड



आणि मी ह्या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा मातोश्री वर बाळासाहेबांच्या हस्ते पार पडला. त्यावेळेस बाळासाहेबांनी विठ्ठल कामत ह्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप मारली, ते सारं कामत ह्यांच्यासाठी अत्यंत प्रेरणादायी होते, म्हणूनच विठ्ठल कामत म्हणतात की, बाळासाहेब ठाकरे म्हणजे नेहमीचं हापूस आंब्याचं बहरलेलं झाड वाटतं जे सावली देतं, मधुर फळं देतं. त्याचबरोबर ते मंगल अन् पवित्र असून त्याची ख्याती जगाच्या पाठीवर सर्वत्र आहे.

म्हणूनच बाळासाहेब म्हणजे महाराष्ट्राच्या उद्योगपतींचे महीपती असे म्हटले जाते. सत्तेवर कोणीही असले, तरी महाराष्ट्राविषयी बाळासाहेबांचे मत काय हे विचारात घेतल्याशिवाय महाराष्ट्रातल्या उद्योग क्षेत्रातला किंवा इतर कोणत्याही क्षेत्रातला निर्णय होत नव्हता. शून्यातून एक स्वयंभू असे सत्ताकेंद्र बाळासाहेबांनी निर्माण केले होते. बाळासाहेबांनी महाराष्ट्रातल्या मराठी उद्योजकांना सातत्याने मदत केली. याचा एक गोड अनुभव पुण्याचे प्रसिद्ध बांधकाम व्यावसायिक असलेले संजय काकडे सांगतात, '२००८ मध्ये सर्वप्रथम संजयजी बाळासाहेबांना भेटण्यासाठी गेले त्यावेळी बाळासाहेब म्हणाले, 'अरे मराठी बांधवासाठी आम्ही आयुष्यभर त्याग केला. संजय काकडे सारखे कोणी मराठी व्यावसायिक पुढे येतील, त्यांना आम्ही संपूर्ण सहकार्य करु असे आश्वासन त्यांनी दिले.' अशा प्रेरणादायी पाठिंब्यामुळे संजय काकडे यांना त्यांचा व्यवसाय आणखी वाढवण्यासाठी आयुष्यभराची प्रेरणामय शिदोरी मिळाली.

अशाप्रकारे अनेक घटना दिसून येतात. मराठी जिथे बाळासाहेब तिथे अशा प्रकारचा फॉर्म्युलाच बाळासाहेबांच्या कर्तृत्वाने निर्माण केला होता. बाळासाहेबांना महाराष्ट्रातील कोणत्याही क्षेत्रातील यशस्वी व्यक्ती भेटला नसेल असे क्वचितच घडले असेल. मग ते उद्योगसम्राट असतील, शिक्षणसम्राट, खेळसम्राट, सिनेसम्राट अशा कोणत्याही क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळींनी बाळासाहेबांची भेट एकदातरी घेतलेली आहे. सिम्बॉयसिसचे इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीचे चॅन्सेलर डॉ. शां. ब. मुजुमदार यांचा बाळासाहेबांनी खास कार्यक्रमामध्ये, त्यांच्या कर्तृत्वाबद्दल सत्कार केला, तेव्हा डॉ. मुजुमदार साहेब त्यांच्या सत्काराच्या फोटोवर स्वाक्षरी घेण्यासाठी गेले होते, त्यावेळेस साहेबांनी त्यांच्या सत्काराच्या फोटोवर सही तर केलीच, शिवाय पुढील कार्यासाठी शुभेच्छा देखील दिल्या. आणि येथूनपुढे जेव्हा जेव्हा मुंबईला येशील तेव्हा मला भेटायला येत जा. नाही आलास तर माझे कार्यकर्ते काय करतील तुला माहीतच आहे, अशा शब्दात बाळासाहेब डॉ. मुजुमदारांना म्हणाले होते. अशाप्रकारे लहानांपासून मोठ्यांपर्यंत, सर्वसामान्यांपासून ते उद्योगपतींपर्यंत बाळासाहेब त्यांना भेटले असोत वा नसोत, सर्वांचेच बाळासाहेब त्यांच्या गळ्यातील ताईतच बनले होते. अशीच एक

घटना सांगावीशी वाटते.

लातूरमध्ये झालेल्या महाभयंकर नैसर्गिक भूकंप आपत्तीनंतर अनेक बडे नेते त्याठिकाणी भेटीसाठी गेले होते, त्याठिकाणी तत्कालीन केंद्रसरकारच्या प्रमुख आणि काँग्रेस पक्षाच्या सर्वेसर्वा सोनियाजी गांधी आणि तत्कालीन केंद्रीय मंत्री शिवराज पाटील गेले होते. लातूरमधील एका मोठ्या इमारतीच्या ढिगाऱ्यावर एक लहान मुलगी उभी होती, त्या मुलीची विचारपूस करण्यासाठी सोनिया गांधी तिच्याजवळ गेल्या होत्या. तेव्हा त्या मुलीच्या गळ्यामध्ये असलेल्या ताईतामध्ये बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो होता. ही एक सत्य घटना एका पत्रकाराने मोठ्या जिकरीने एका प्रसिद्ध वृत्तपत्रामध्ये छापली देखील होती.

अशाप्रकारे बाळासाहेब जनमाणसात सर्वत्र पोहचले होते. बाळासाहेबांविषयी जगप्रसिद्ध व्यावसायिक आणि डीएस.के ग्रुपचे संचालक म्हणतात,

‘‘वादळ, झंझावात, तुफान, कठोर, आक्रमक, धाडस, छावा, प्रचंड यासारख्या शब्दांचा अर्क काढला आणि त्यापासून एक अजब अत्तर निर्माण झालं, त्याचं नाव ‘‘बाळासाहेब ठाकरे’’!




# पुणे नाही राहिले बाळासाहेबांपासून उणे !

बाळासाहेबांनी जेव्हा शिवसेना सुरु केली, तेव्हा मुंबईनंतर महाराष्ट्रभर ठिकठिकाणी दौरे केले आणि त्यांच्या भाषणातून तळमळीने त्यांनी अनेकांना शिवसेनेमध्ये सामील होण्याचे आव्हान दिले. असेच काही पुण्यामध्ये दिगंबर राऊत ह्या तरुणाने पुढाकार घेत पुण्यात सोमवार पेठेत पहिली शाखा सुरु केली. त्यानंतर पुण्याच्या कानाकोपऱ्यात शिवसेनेच्या शाखा स्थापन झाल्या. पुण्याबरोबर नागपूर, अमरावती, वर्धा, कोकण, नाशिक, कोल्हापूर अशा अनेक ठिकाणी शिवसेना दिवसेदिवस वाढतच गेली. शिवसेना पक्ष वाढवताना सर्वसामान्य कार्यकर्त्याला न्याय कसा मिळेल याकडे बाळासाहेबांनी लक्ष दिले. त्यामुळेच पथारीवाला कार्यकर्ताही नगरसेवक पदापासून ते अगदी आमदार, खासदार आणि मंत्रीपदाच्या खुर्च्यापर्यंत पोहाचलेला दिसतो. बाळासाहेबांच्या दरबारात कोणत्याही जातीधर्माचा माणूस कामासाठी भेटण्यासाठी जायचा, त्यासाठी कधीही कोणलाच मध्यस्थांची गरज भासली नाही. कोणताही माणूस कोणतेही काम घेवून आला की बाळासाहेब ते चटकन मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील असायचे. त्यामुळेच बाळासाहेबांना हिंदूहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख, सरसेनापती, एक स्वयंभू सत्ताकेंद्र, लोकनेता, महानेता, महाराष्ट्राचा ढाण्या वाघ, एकवचनी, महीपती सरकार, महाराष्ट्राचा दिपस्तंभ, महाराष्ट्रपिता अशा अनेक पदव्या लोकांनी आपोआप बहाल केल्या. बाळासाहेबांचे प्रत्येक कर्तृत्ववान शिवसैनिकांवर बारकाईने लक्ष असे. न मागता त्या शिवसैनिकांवर बाळासाहेबांची कृपादृष्टी होत असे. कोणत्याही व्यक्तीची कामाची पद्धत आणि समाजविषयी असलेली समाजप्रेमी निष्ठा पाहून त्या शिवसैनिकांला बाळासाहेब संधी देत असत. असेच पुण्यामध्ये अगदी सुरुवातीपासून शिवसेनेबरोबर असलेले शशिकांत सुतार यांना बाळासाहेबांनी न मागताच नगरसेवक होण्यासाठी उमेदवारी दिली. नगरसेवक म्हणून उत्तम कामगिरी केल्यानंतर त्यांना आमदार होण्यासाठी उमेदवारी दिली आणि ते प्रचंड बहुमताने आमदार झाले. नंतर त्यांनी महाराष्ट्राचे कृषीमंत्री म्हणून देखील कार्य केले, यामुळेच शशिकांत भाऊ सुतार म्हणतात, 'माझ्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला मंत्रीपदापर्यंत पोहचविण्याचे कार्य बाळासाहेबांनी केले. जिद्द कष्ट आणि प्रबळ इच्छाशक्ती या त्रिसुत्रीच्या जोरावरच बाळासाहेबांना आणि त्यांच्या शिवसैनिकांना झटपट यश मिळाले. परंतु बाळासाहेबांनी कधीही त्याचा अहंपणा बाळगला नाही. कुठेही आणि केव्हाही बोलावले त्यावेळी हा महान नेता हजर असायचा. शशिकांत सुतारांनंतर विनायक निम्हण हे आमदार झाले.

विनायक निम्हण यांनी नारायण राणे यांच्या सोबत काँग्रेस पक्षात गेले, परंतु शिवसेना सोडल्यानंतरही शिवसेनेसारखीच कार्यप्रणाली करत ते दुसऱ्यांदाही काँग्रेसमधून आमदार झाले. बाळासाहेब जेव्हा जेव्हा पुण्यामध्ये येत तेव्हा तेव्हा ते सर्व शिवसैनिकांना मार्गदर्शन करत. पुण्यामधून दिपक पायगुडे ह्यांनी देखील शिवसेनेतून घौडदौड करत मोठे कार्य केले. ते आमदार झाले, तेव्हा लोकसेवा प्रतिष्ठानच्या वतीने ना नफा ना तोटा ह्या तत्त्वावर सुरु केलेले त्यांनी लोकसेवा किचन सुरु केले. कमी पैशामध्ये पोटभर जेवण हे त्यांचे कार्य आजही सुरु ठेवलेले दिसते. लोकसेवा नावाने त्यांनी शाळा, कॉलेजेस काढून सहकाऱ्यातून क्रांती घडवली. लोकसेवा सहकारी बँकेचे कार्यदेखील त्यांनी उल्लेखनीय केले. बाळासाहेब जेव्हा जेव्हा पुण्यामध्ये येत तेव्हा तेव्हा ते कोणत्याही हॉटेलमध्ये न जेवता त्यांच्या मित्राकडे अथवा शिवसैनिकांकडे जेवत असत. पुण्यामध्ये शिवसेनेच्या कामानिमित्त आल्यानंतर जाताना बाळासाहेब त्यांच्या नातवंडासाठी आवर्जुन काहीना काही खाऊ आणि खेळणी आवर्जुन घेवून जात असत. तेव्हा चंद्रकांत मोकाटे यांना दोनदा तीनदा बाळासाहेबांना दुकानात घेवून जाण्याची संधी मिळाली होती. त्यावेळी ते नुकतेच शिवसेनेत सामील झाले होते. तेव्हा बाळासाहेब मोकाटेंना म्हणाले, ''शिवसैनिक असल्याचा अभिमान बाळगा. शिवसैनिक बनून रहा. आई जगदंबा तुला उदंड यश देईल. खंबीर रहा! साहेबांच्या मार्गदर्शनानुसार ते खंबीरपणे शिवसैनिक म्हणून कार्य करत राहीले. नगरसेवक, उपमहापौर आणि आमदार होण्याचा सन्मान त्यांना बाळासाहेबांमुळे लाभला.

बाळासाहेबांची जन्मभूमी पुणे. ह्या ठिकाणी बाळासाहेबांचे असंख्य चाहते आणि शिवसैनिक अगदी यशस्वीरित्या कार्यरत आहेत. त्यामध्ये महिलांचा देखील सहभाग उल्लेखनीय असा आहे. मग त्यात कल्पनाताई थोरवे आणि अशा अनेक महिला बाळासाहेब असताना आणि बाळासाहेब गेल्यावर बाळासाहेबांच्या विचारांनुसार उद्धवजी ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत आहेत. आज पुण्यामध्ये बाळासाहेबांना मानणारे लाखो लोक आहेत. बाळासाहेब जेव्हा जेव्हा पुण्यामध्ये जात, तेव्हा तेव्हा ते शिवसैनिकांच्या माध्यमातून त्यांच्या सर्व मित्रपरिवारांना, कलाकारांना आवर्जुन बोलावून घेत, त्यामध्ये ज्येष्ठ साहित्यिक विंदा करंदीकर, सुबोध भावे, भीमसेनजी जोशी, विजय कुवळेकर, मंगेश तेंडूलकर अशा अनेक कलाकार मंडळींबरोबर त्यांची मैफिल होत असे. कधी कधी त्या मैफलीमध्ये राहुल बजाजसारखे उद्योजकही सामील होत असत. जशाप्रकारे बाळासाहेब त्यांच्या मित्रपरिवारांना भेटायचे तसेच ते शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांना भेटण्यासाठी देखील विशेष वेळेचे नियोजन करायचे, त्यामध्ये शिवसेनेचे सर्व पदाधिकारी आमदार, नगरसेवक मंडळी बाळासाहेबांचे मार्गदर्शन घेत असत.



शिवाजी महाराजांच्या जीवनावर अनेक पुस्तके लिहिणारे शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्याशी बाळासाहेबांचे अगदी जवळचे संबंध होते. बाळासाहेब पुरंदरे यांचा जन्म २९ जुलै १९२२ रोजी सासवडमध्ये झाला. परंतु ते अनेक वर्षे पुण्यामध्येच राहात असल्याने त्यांना पुणेकर म्हणूनच ओळखले जाते. बाबासाहेब पुरंदरे आणि बाळासाहेब ठाकरे यांच्यामध्ये फक्त ४ वर्षांचे अंतर होते. परंतु दोघेही एकमेकांना गुरुच्या भूमिकेतूनच पाहात होते. बाबासाहेबांनी लिहिलेले शिवचरित्र बाळासाहेब अगदी पारायणासारखे वाचत होते. त्यामुळे दोघांनाही एकमेकांविषयी विशेष आदर होता. त्यामुळेच बाळासाहेब गेल्यावर जेव्हा त्यांच्या बाळासाहेबांच्या आयुष्यातील घटनांचे कलादालन जेव्हा सणस ग्राऊंडच्या ठिकाणी निर्माण केले, बाबासाहेब पुरंदरे यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन केले, तेव्हा ते कलादालन पाहताना बाबासाहेबांना अश्रू आवरता आले नाही.

बाळासाहेबांचे पुण्यावर विशेष लक्ष असायचे. बाळासाहेबांच्या मार्गदर्शनानुसार सातत्याने शिवसेनेची घौडदौड सातत्याने चालूच राहिली. श्रीमंत दगडू शेठ गणपतीवर बाळासाहेबांची नितांत श्रद्धा होती, ते जेव्हा जेव्हा पुण्यामध्ये येत तेव्हा ते श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीचे नेहमी दर्शन घेत. चितळे बंधू मिठाईवाले यांचा बाळासाहेबांना अत्यंत अभिमान वाटे. त्यामुळे पुण्यावरून मुंबईला जाताना चितळे बंधू मिठाईवाले यांच्या दुकानातून आवर्जुन मिठाई घेवून जात असत.

सर्वसामान्य कार्यकर्ते बाळासाहेबांच्या सहवासामुळे खूप खूप मोठे झाले. त्यामध्ये गजानन बाबर, महादेवराव बाबर, शामराव देशपांडे, श्रीरंगजी बारणे, पुरुषोत्तमजी जाधव, किशोरजी विटेकर, शरदराव ढमाले, गणेशजी सातपुते, प्रशांतजी बधे, प्रकाशजी बालवडकर, नितीनजी पवार, राजाभाऊ चव्हाण, राजा बलकवडे अशा अनेक शिवसैनिकांना बाळासाहेबांनी आपलेसे केले आणि मोठे केले. खरं तर पुण्यामधील सर्वच घरात बाळासाहेबांना मानणारी व्यक्ती नक्कीच सापडेल. उद्योजक आढळराव पाटील यांचे बाळासाहेबांशी जवळचे नाते होते. मातोश्रीवर भेटायला जाण्यासाठी त्यांना नेहमीच विशेष परवानगी होती, आढळराव पाटील सातत्याने अनेक वर्षे शिवसेनेचा झेंडा राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या बालेकिल्ल्यात रोवून आहेत. त्याचा बाळासाहेबांना नेहमी अभिमान वाटे.

पुण्यामध्ये शिवसेनेच्या अगदी सुरुवातीपासून कार्यरत असलेले राजाभाऊ रायकर यांचा आजही मातोश्रीवर विशेष आदर होताना दिसतो. राजाभाऊ जेव्हा जेव्हा बाळासाहेबांना भेटायला जात तेव्हा तेव्हा उद्धवजींचे सुपुत्र आदित्य, तसेच विंदा यांचे सुपुत्र मिहीर व इतर लहान मुलांसाठी आवर्जुन खेळणी घेवून जात असत. त्यामुळे

बाळासाहेबांनी राजाभाऊ रायकरांचे नाव खेळणीवाले काका म्हणून पाडले होते. बाळासाहेबांनी त्यांच्या पुस्तकांच्या प्रकाशनाचे काम राजाभाऊ रायकर यांना दिले होते. दिलीप जोशी यांनी लिहिलेल्या त्या पुस्तकाचे 'युगपुरुष' असे ठेवण्यात आले होते. पुणेकर बाळासाहेबांना 'पुणेरत्न' हा पुरस्कार देवून त्यांना सन्मानही करण्यात आला होता. अशाप्रकारे बाळासाहेबांचे पुणेकरांवर आणि पुणेकरांनी बाळासाहेबांवर भरभरून प्रेम दिले म्हणून म्हटले गेले

''पुणे नाही राहीले
बाळासाहेबांसाठी उणे!''



# गर्व आहे आम्हाला शिवसैनिक असल्याचा

बाळासाहेबांनी शिवसैनिकांवर आईवडीलांप्रमाणे प्रेम केले. त्यामुळेच बाळासाहेबांबरोबर ५० वर्षे एक दोन नव्हे तर करोडो शिवसैनिक जुडले आणि ते बाळासाहेब असेपर्यंत आणि बाळासाहेब गेल्यानंतर सुद्धा त्याच्या विचारांनुसार हे करोडो शिवसैनिक देशाच्या कानाकोपऱ्यात कार्यरत आहेत. ज्या ज्या शिवसैनिकांनी बाळासाहेबांच्या सांगण्यानुसार कार्य केले ते ते शिवसैनिक फार फार मोठे झाले. बाळासाहेबांबरोबर असलेल्या इमानदार आणि कर्तबगार शिवसैनिकांमध्ये अनेक नेतेमंडळी येतात. मग ते सुभाष देसाईसाहेब असोत, किंवा संजयजी राऊत असोत. मनोहर जोशी, सुधीर जोशी, निलमताई गोऱ्हे, आढळराव पाटील, अनिल शरद ढमाले, गोपाळराव केळे, शशिकांतभाऊ सुतार, चंद्रकांत मोकाटे, पुरुषोत्तम जाधव, साबीरभाई शेख, रामदास कदम, सुनिल प्रभू अशी अनेक शिवसैनिक बाळासाहेबांबरोबर अगदी सुरुवातीपासून आहेत. बाळासाहेबांनी जेव्हा शिवसेना सुरु केली तेव्हापासून शिवसैनिक असलेल्या सुदेशजी म्हात्रे यांना मी एकदा मुंबईमध्ये भेटलो. बाळासाहेबांविषयी असलेल्या त्यांच्या प्रचंड निष्ठेने मी पुरता भारावून गेलो. आम्ही काही काळ मुंबईच्या लोकल मधून प्रवास केला तेव्हा मी त्यांना त्यांच्या आयुष्याबद्दल सांगितले तेव्हा ते म्हणाले होय मला अभिमान आहे शिवसैनिक झाल्याचा. बाळासाहेबांनी अनेक निष्ठावंत कर्तृत्ववान माणसांना हेरलं आणि त्यांना मोठं केलं, मग तो सर्वसामान्य भाजीवाला असोत वा डबे पोहचवणारा डबेवाला वा पेपर टाकणारा पेपरवाला, वा रिक्षा चालवणारा रिक्षावाला, अथवा एखाद्या बेरोजगार असोत बाळासाहेबांनी त्या व्यक्तीमधील कलागुणांना वाव आणि संधी देत संघर्षमय वाटचाल करण्यासाठी प्रेरणा देत, त्या व्यक्तीच्या आंतरिक शक्तीला जागे केले आणि त्यामुळे असंख्य जण राजकारणात मोठे झाले.

बाळासाहेबांसोबत मनोहर जोशी यांचे नाते जेव्हा जुडले ते अगदी बाळासाहेब असेपर्यंत आणि त्यांच्यानंतरही शिवसेनेच्या माध्यमातून जवळजवळ ५० वर्षे टिकून राहीले. एवढी वर्षे नातेसंबंध यशस्वी रित्या टिकून राहिल्यामुळे जोशी साहेबांना बाळासाहेबांविषयी प्रचंड आदर निर्माण झाला आहे. एका आठवणीमध्ये मनोहर जोशी सांगतात, की बाळासाहेबांनी भाजप-शिवसेना युतीचा रिमोट कंट्रोल त्यांच्या हातातच ठेवला होता. ह्या रिमोट कंट्रोलचा पहिला अनुभव मनोहर जोशी साहेबांना १९६८ मध्येच आला होता. त्यावेळेस मुंबई महापालिकेत जोशीसाहेब विरोधी पक्षनेता

होते. सभागृहात फक्त शहराच्या समस्यांवरच तहकुबी सूचना मांडायच्या, असा धोरणात्मक निर्णय शिवसेनेने घेतला होता. तेव्हा अमेरिकन नेते मार्टीन ल्यूथर यांचे निधन झाले होते. त्यांना अमेरिकेतील महात्मा गांधी मानले होते. त्यानुसार ते मुंबईशी संबंधीत नसतानादेखील सभागृह तहकूब करण्याविषयी मनोहर जोशींनी सभागृहात मांडले. नंतर शिवसेनेतील ठरावानुसार मनोहर जोशींचा इतर शिवसैनिकांच्या माध्यमातून त्यांच्या चुकीची जाणीव झाली, बाळासाहेबांच्या कानावर सभागृह तहकुबी विषय गेल्यानंतर त्यांनी मनोहर जोशी साहेबांना तातडीने बोलावून घेतले. त्यावेळेस मनोहर जोशींना शिवसेनेमध्ये येवून फक्त एकच वर्ष झाले होते. बोलावणे आल्यानंतर राजीनामापत्र खिशात घेवूनच मनोहर जोशी सर बाळासाहेबांना भेटायला गेले, भेट झाल्या झाल्या त्यांनी बाळासाहेबांना सांगितले, माझी चूक झाली आणि मी राजीनामा देतो. त्यावर बाळासाहेब फक्त हसले आणि म्हणाले, 'ठिक आहे परत अशी चूक करू नका.' त्यानुसार बाळासाहेबांच्या विचारांनुसार आणि मार्गदर्शनानुसार मनोहर जोशी सरांनी कार्य केले. एम. ए. एल. एल. बी., पी. एच. डी. केलेले डॉ. मनोहर जोशी सरांनी शिवसेनेचे प्रवक्ते म्हणून जबाबदारी पार पाडली. त्यांनी मुंबई महानगरपालिकेचे महापौरपद सांभाळले. त्यानंतर आमदार, विरोधी पक्ष नेता, मुख्यमंत्री, त्यानंतर खासदार, भारत सरकारचे मंत्री, लोकसभेचे अध्यक्षपद, आणि राज्यसभेचे खासदारपद अशी अनेक पदे डॉ. मनोहर जोशी सरांना बाळासाहेबांमुळेच लाभली.

बाळासाहेब मनाने अगदी मोकळे होते, त्यांच्या पोटात एक आणि ओठावर असे कधीच नव्हते. त्यामुळेच बाळासाहेबांसारखा सच्चा नेता लोकप्रिय झाला. बाळासाहेबांची बाहेरील प्रतिमा ही अत्यंत कडक आणि कणखर अशी होती. बाळासाहेबांना आयुष्यात दोन गोष्टींचा कमालीचा तिरस्कार वाटतो. एक अप्रामाणिकपणा आणि दुसरी बेईमानी. बाळासाहेब म्हणजे शिवसेना ह्या कुटुंबाचे कुटुंबप्रमुख होते. जशाप्रकारे कुटुंबप्रमुखाचे लक्ष त्याच्या कुटुंबातील थोरा-मोठ्यापासून ते लहान बालकांपर्यंत असते. बाळासाहेब नेहमी म्हणत... 'मी सर्वांना सांगतो, शिवसैनिक हे माझं सर्वस्व आहे, माझं भांडवल आहे, तुम्ही शिवसैनिक आहात म्हणून मी बाळासाहेब ठाकरे आहे. त्यामुळे कोणीही शिवसैनिकांशी उर्मटपणाने वागू नका, हे माझं सगळ्यांना स्पष्ट सांगणे आहे.'

मुंबईमध्ये जेव्हा जेव्हा बॉम्बस्फोट झाले, त्यात अनेकजण मृत्यूमुखी पडले. त्यावेळी बाळासाहेबांनी पुढाकार घेवून मृत व्यक्तींच्या कुटुंबाना आर्थिक मदत करायला पुढे मागे पाहिले नाही. ह्यावरून लक्षात येते ते महाराष्ट्राचे कुटुंबप्रमुख होते.

महाराष्ट्राच्या राजकारणात शिरलेले जातीपातीच्या राजकारणाची घाण दूर करण्याचे कार्य बाळासाहेबांनी केले. बाळासाहेबांनी सर्व जाती धर्मांच्या लोकांनी एकत्र करत



हिंदुस्थानातील राहणारा प्रत्येक व्यक्ती हा हिंदुस्थानी असे म्हणत शिवसेनेचे कार्य चालू ठेवले. ज्यावेळेस शिवसेना – भाजपचे सरकार महाराष्ट्र राज्यात निवडून आले, तेव्हा ब्राह्मण कुटुंबातील असलेल्या परंतु सर्व धर्मसमभाव मानणारा नेता, समाजासाठी परिवर्तनात्मक निर्णय घेणारा नेता म्हणून त्यांनी डॉ. मनोहर जोशी सरांची मुख्यमंत्री म्हणून घोषणा केली. त्यानंतर मनोहर जोशींना लोकसभेचे अध्यक्ष केले. तर महाराष्ट्रामध्ये मुस्लिम समाजाचे पण शिवसेनेचे कट्टर नेते असलेल्या साबीरभाई शेख यांना कामगार मंत्री केले. कामगार मंत्री म्हणून नेमणूक करण्यापूर्वी त्यांनी साबीरभाईंना 'मातोश्री'वर बोलावून घेतले. आणि मीनाताईंना सांगितले की, 'अग, आपला साबीर मंत्री होतोय.' त्यावर मीनाताई तत्काळ म्हणाल्या, 'हो तो त्याचा हक्कच आहे.' हा सुखद धक्का साबीरभाईंना आयुष्यभर लक्षात राहीला.

साबीरभाईंची बाळासाहेबांबरोबर पहिली भेट १७ ऑक्टोबर १९६६ रोजी कल्याणमध्ये झाली. धर्मापेक्षा साबीरभाईंनी राष्ट्र महत्त्वाचे मानले. त्यामुळे शिवसेनाप्रमुखांनी साबीरभाईंना शिवसेनेत बरोबर घेतले. आपलेसे केले. शिवसेनेमध्ये नेहमी आदराचे स्थान दिले. बाळासाहेबांनी साबीरभाई वर जो काही विश्वास टाकला, त्यावर साबीरभाई शेख देखील अगदी खरे उतरले. आयुष्यभर ते प्रामाणिकपणे कार्य करीत राहीले. मुंबईमध्येच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रभर साबीरभाई शेख ह्यांना मानणारा जनसमुदाय आहे. साबीरभाईनी कधीही पैशाच्या बाबतीत एक रुपयांची देखील बेइमानी केली नाही, एका राष्ट्रभक्ताप्रमाणे, फकिराप्रमाणे ते संपूर्ण आयुष्य जगले. ह्यावरून बाळासाहेबांची शिवसैनिकांबरोबर असलेली निष्ठेची नाळ ही अत्यंत घट्ट आणि मजबूत होती हे स्पष्ट होते. बाळासाहेबांचे दाखवायचे दात आणि खायचे दात वेगळे नव्हते. बाळासाहेब अगदी दिलखुलासपणे गप्पा मारायचे. तर कधी क्रिकेट खेळायचे. तर त्यांच्या आवडीचा इंग्रजी चित्रपट शिवसैनिकांबरोबर पाहायचे. तर कधी विशिष्ट शिवसैनिकांबरोबर दारू देखील घ्यायचे. त्याचबरोबर शिवसैनिकांवर त्यांचा प्रचंड विश्वास होता. त्यामुळेच अनेक यशस्वी माणसे शिवसैनिक झाली. मनोहर जोशी, सुभाष देसाई, संजय राऊत यांच्याबरोबर त्या काळात सुधीर जोशी हे देखील शिवसेनेमध्ये सक्रीय झाले. सुधीर जोशींना खरंतर राजकारणामधील फारसं काही माहीत नव्हते, त्यांची पाटी पूर्णपणे कोरी होती. त्यामुळे त्यांनी बाळासाहेबांकडून कमी कालावधीत खूप काही शिकले. साहेबांमुळे त्यांना जाहीर सभा काय ते कळले. नंतर सुधीर जोशींना बाळासाहेबांनी उमेदवारी दिली. नंतर स्थानिय लोकाधिकार समितीचे अध्यक्षपद दिले. त्या महासंघाच्या अध्यक्षस्थानी जवळजवळ २५ वर्षे सुधीर जोशी राहीले. त्यामागे बाळासाहेबांचीच साथ होती. एका आठवणीमध्ये सुधीर जोशी सांगतात की,

बाळासाहेब ठाकरे हे फार मोठ्या मनाचे होते. त्यासाठी त्यांच्या आयुष्यातील एक घटना सांगतात. शिवसेना प्रमुखांच्या उपस्थितीतच प्रबोधनकारांच्या एका पुस्तकाचे प्रकाशन महापौर या नात्याने सुधीर जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. तेव्हा कार्यक्रमामध्ये शिवसैनिकांनी बाळासाहेबांना प्रथम हार घालण्याचा प्रयत्न केला तेव्हा ते म्हणाले की, शहराच्या प्रथम नागरिकाचा मान मोठा आहे. महापौर हा कोणत्याही पक्षाचा नंतर असतो, प्रथम तो त्या शहराचा प्रथम नागरिक असतो. त्यामुळे प्रथम महापौरांचा सत्कार करण्यात आला व नंतर बाळासाहेबांचा. बाळासाहेबांनी शिवसेना भाजप युती सरकारचा रिमोट कंट्रोल माझ्या हातात आहे असे अनेकदा म्हटले परंतु बाळासाहेबांनी त्या रिमोट कंट्रोलचा फक्त धाक दाखवला, परंतु प्रत्यक्षात त्यांना रिमोट कंट्रोलचा वापर करण्याची वेळ कधी आलीच नाही. कारण बाळासाहेबांवर नितांत प्रेम करणारा कडवा शिवसैनिक बाळासाहेबांसमवेत अखेरपर्यंत होता. आणि त्यांच्यानंतरही त्यांच्या दाखवलेल्या पावलावर पाऊल टाकत झडतो आहे.

शिवाजी महाराजांना प्रत्यक्षात २० व्या २१ व्या शतकातील लोकांनी पाहीले नाही. परंतु बाळासाहेबांच्या रूपाने आम्हाला शिवाजी महाराजांचेच दर्शन झाले. लाखो शिवप्रेमी सांगताना दिसतात. जशाप्रकारे शिवाजी महाराजांनी परस्त्री माताभगिनी समान मानले आणि त्या गोष्टीला ते आयुष्यभर जागले. त्याचप्रमाणे शिवसेनाप्रमुखांच्या दरबारात आणि शिवसेनेत स्त्रियांना नेहमीच आदराने आणि सन्मानाने माता भगिनी समान वागवले जाते. अनेक स्त्रिया शिवसेनेत सुरुवातीपासून काम करत होत्या आणि आजही आहेत. त्यापैकी एक महाराष्ट्राच्या रणांगिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि आपल्या अभ्यासू आणि चाणाक्ष कामगिरीतून महाराष्ट्राच्या राजकारणाचा एक अविभाज्य घटक झाल्या डॉ. निलमताई गोऱ्हे. बाळासाहेबांबरोबर निलमताईंचा परिचय १४ वर्षांपूर्वी झाला होता. त्या पूर्वी बाळासाहेबांचा परिचय त्यांच्या व्याख्यानातून आणि विचारातून होताच. निलमताई चेंबूर, तुर्भे, भिवंडी, शिवाजीनगर, बुद्धनगर, लिबानीबाग, शताब्दी हॉस्पिटल, कुर्ला, संजय गांधीनगर भागात सामाजिक कार्य करत होत्या. १९९२ मध्ये मुंबईमध्ये भीषण दंगल उसळली होती. त्यामुळे हातावर पोट असणाऱ्यांना आठ आठ दहा दहा दिवस रोजगार मिळाला नव्हता. तेव्हा गरीब, मागासवर्गीय लोकांसाठी फक्त शिवसैनिकच काम करताना दिसत होते. हे पाहून शिवसेनेची प्रतिमा निलमताईंच्या मनात आणखी दृढ झाली, पुढे जावून महिला धोरणांवर अंमलबजावणी करण्याचे खुद्द बाळासाहेबांनी सुचविले आणि त्या अंमलबजावणीची जबाबदारी निलमताईनी योग्य रित्या पार पाडली. त्यानंतर महालक्ष्मी मंदिरात महिलांना प्रवेश द्यावा ह्याकरिता बाळासाहेबांनी निलमताईंच्या माध्यमातून



पाठिंबा दर्शविला. बाळासाहेबांचे दैवत आईजगदंबा त्याप्रमाणे देवीसारखे मानत स्त्रियांना बाळासाहेबांनी पाठबळ पुरविले. बाळासाहेब विशेष कार्यक्रमामध्ये स्त्रियांची रणरागिणी म्हणून सत्कार करत होते. बाळासाहेबांनी अनेक समाजप्रेमी, आणि विकासाचे कार्य करणाऱ्या स्त्रियांना महापौर केले. वैजयंती घोलप सध्या डोंबिवलीच्या महापौर केले, त्याप्रमाणे सभे नंतर बाळासाहेबांनी आरक्षण नसतानाही महिलांना मोठ्या प्रमाणात उमेदवारीची तिकीटे देवून संधी दिली गेली. त्या भूमिकेतून आज साधनाताई गवळी ह्या खासदार झाल्या. दुसऱ्यांदा आरक्षण नसतानासुद्धा बाळासाहेबांनी त्यांना तिकीट दिले. शिवसेनाप्रमुखांची भूमिका होती की शिवसैनिक म्हणजे शिवसैनिक, तुम्ही पुरुष आहात की महिला आहात यापेक्षा तुम्ही सैनिक म्हणून काय भूमिका बजावताय हे पाहूनच बाळासाहेब निर्णय घ्यायचे. आणि जबाबदारी सोपवायचे. निलमताईंची कामगिरीवर साहेब प्रचंड खूष असायचे, जेव्हा जेव्हा निलमताई मातोश्रीवर जात, तेव्हा तेव्हा बाळासाहेब स्वत:च्या मुलीप्रमाणेच त्यांच्यावर प्रेम करायचे, विचारपूस करायचे, कुतुहलाने कुठे कुठे जावून आलात, त्या दौऱ्यामध्ये काय काय झाले असे आवर्जुन विचारायचे आणि पाठीवर शाबासकीची थाप द्यायचे. तीन ते चार वेळा तर बाळासाहेबांनी दरबारामध्येच निलमताईंचे कौतुक केले. त्यावेळेला सर्व आमदार आणि खासदार मंडळी होती. तेव्हा पुरुषांना जे जमले नाही ते हीने करून दाखविले अशा शब्दात कौतुक केले. अशाप्रकारे बाळासाहेबांनी शिवसैनिकांवर अतोनत प्रेम करत, त्यांच्याशी एक आपुलकीचे नातेसंबंध जोपासले त्यामुळेच बाळासाहेब असताना आणि बाळासाहेब नसताना उद्धवसाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली करोडो शिवसैनिक आजही अभिमानाने सांगतात,

गर्व आहे मला शिवसैनिक असल्याचा !
गर्व आहे मला शिवसैनिक असल्याचा !
होय गर्व आहे आम्हाला शिवसेनेचा !
गर्व आहे आम्हाला बाळासाहेब ठाकरेंचा !

# संतमहात्मे अन् बाळासाहेब धर्मात्मे

बाळासाहेबांचे जसे शिवसैनिकांबरोबर इतर पक्षाच्या राजकीय व्यक्तीबरोबर सर्व क्षेत्रातल्या कलाकारांबरोबर, उद्योगपतींबरोबर जसे सलोख्याचे संबंध होते तसेच संत महात्मे यांच्या बरोबर देखील सलोख्याचे संबंध होते. राजकीय आणि इतर क्षेत्रातील मंडळी कोणत्या ना कोणत्या फायद्याच्या भूमिकेतून बाळासाहेबांबरोबर जुडलेले असले, तरी निर्व्याज, बिनास्वार्थ केवळ मैत्रीच्या बाळासाहेबांचे अनेकांबरोबर नातेसंबंध होते. बाळासाहेबांना भोंदूगिरी करणाऱ्या बाबामहाराजांची अत्यंत चीड होती. अंधश्रद्धेच्या माध्यमातून काहीतरी चमत्कार करणाऱ्या बाबामहाराजांना बाळासाहेब त्यांच्या कडक वाणीने अगदी झोडपून काढत, बाळासाहेब बोलल्यावर शिवसैनिक तर अशा बाबामहाराजांचे पितळ उघडे पाडायला कधीही कमी पडले नाहीत. बाळासाहेबांमुळे असंख्य लोकांची फसवणूक बाबामहाराजांपासून थांबलेले चित्र महाराष्ट्रामध्ये दिसते, अर्थात त्याकरिता डॉ. नरेंद्र दाभोळकरांसारख्या सामाजिक कार्यकर्त्यांचे मोठे कार्य आहे. अंधश्रद्धा निर्मुलन झालेच पाहिजे अशा ठाम मताचे शिवसेनाप्रमुख.

समाजामध्ये काही संत, महात्मे अत्यंत चांगल्या दर्जाचे कामगिरी करतात. समाजाला दिशा दाखवण्याचे अनमोल कार्य ते करतात अशा संत महात्म्यांचे बाळासाहेबांनी नेहमीच कौतुक केले. त्यांच्याकडून आशीर्वाद घेतले आणि त्यांच्या सत्कार्यासाठी आशीर्वादही दिले. महाराष्ट्रामध्ये नानासाहेब धर्माधिकारी गेली अनेक वर्षे श्रीसमर्थ बैठकीच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य करतात, दर आठवड्याला करोडो करोडो श्री समर्थाचे दास श्रीमत दासबोध ह्या ग्रंथाच्या माध्यमातून निरोपणाच्या द्वारे समाजप्रबोधनाचे कार्य करतात. श्री रामदास स्वामी म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचे गुरु, एकीकडे श्री समर्थ रामदास स्वामींच्या मार्गदर्शनानुसार स्वराज्य स्थापन करून श्रींचे राज्य स्थापन करण्याचे कार्य शिवाजी महाराजांनी केले, तर दुसरीकडे माणसामध्ये दडलेल्या रावणरूपी काम, क्रोध, मद, मत्सर, लोभ, दंभ, संशय, चिंता अशा विकारांवर जय प्राप्त करून विजयाचा मार्ग श्रीमत दासबोधाच्या माध्यमातून समर्थ रामदासांनी दाखवला. विसाव्या आणि एक विसाव्या शतकात तेच अनमोल कार्य नानासाहेब धर्माधिकारी आणि त्यानंतर आप्पासाहेब धर्माधिकारी यांनी चालविले आणि अखंडपणे चालवत आहेत. अंधश्रद्धा निर्मुलनासाठी श्री समर्थ बैठकीच्या माध्यमातून विशेष कार्य केले जाते. पर्यावरणात्मक हानी थांबवून करोडो नवीन झाडे लावण्याचे मोलाचे कार्य श्री समर्थ बैठकीतील दासांच्या माध्यमातून सातत्याने होत



आहे. अनेकदा स्वच्छता मोहिमेतून लाखो करोडो श्रीसमर्थाचे दास शिस्तबद्ध रित्या रस्त्यावर आले आणि आजूबाजूचा परिसर स्वच्छ केला. अशाप्रकारे प्रबोधनाचे आणि परिवर्तनाचे काम करणाऱ्या सद्‌गुरू नानासाहेब धर्माधिकारी आणि श्री सद्‌गुरू आप्पासाहेब धर्माधिकारी यांचे आणि श्री समर्थ परिवाराचे कौतुक अनेकदा बाळासाहेबांनी केले.

जे लोक स्वत:ला साधू म्हणवतात ते तर संधीसाधू आहेत आणि जे स्वत:ला परमेश्वराचा सामान्य भक्त समजतात तोच खरा माणसात देव शोधणारा माणूस देव होय. समाजासाठी जे लोक विधायक काम करतात, समाजजागृतीचे आणि प्रबोधनाचे कार्य करतात, ते खरे संत महात्मे होत. महाराष्ट्राची भूमी ही संतमहात्मेंची भूमी म्हणूनच ओळखली जाते. ह्याच महाराष्ट्राच्या भूमीत संतशिरोमणी ज्ञानेश्वर महाराज होऊन गेले, जगद्‌गुरू तुकोबा राय, सबका मालिक एक म्हणणारे साईबाबा, सामर्थ्य पुरविणारे श्री समर्थ रामदास स्वामी, स्वच्छतेचे पुजारी श्री संत गाडगेबाबा असे महान संत होऊन गेले. त्यांनी महानकार्यातून महाराष्ट्र घडविला. बाळासाहेबांनी त्यांच्या भाषणांमध्ये वेळोवेळी संत महात्मे यांच्या महान कार्याबद्दल उल्लेख केलेला आढळून येतो.

श्री सद्‌गुरू दत्त धार्मिक एवम्‌ पारमार्थिक ट्रस्टचे संस्थापक राष्ट्रसंत परमपुज्य श्री भैय्यूजी महाराज, यांच्याशी देखील बाळासाहेब ठाकरे यांचे चांगले संबंध होते. उदेसिंह देशमुख उर्फ भैय्यूजी महाराज यांचा जन्म २९ एप्रिल १९६८ मध्ये झाला. लहानपणापासून धर्मकार्य करण्यात उदयसिंह मोठे कार्य करेल याची जाणीव देशमुख कुटुंबाना झाली. एक हुशार विद्यार्थी म्हणून त्यांनी त्यांचे शिक्षण पूर्ण केले. लहानवयात उदयसिंह ह्यांना क्रिकेट, घोडेस्वारी, पोहणे, बॅडमिंटन खेळात प्रचंड आवड होती. एक कलाकार ॲक्टर म्हणूनही त्यांना अनेक स्पर्धामध्ये प्राविण्य मिळाले. कालांतराने त्यांनी साधना, ध्यान, तपश्चर्या ह्याकडे त्यांचे लक्ष आकर्षित झाले. असे म्हणतात की दत्ताचे दास म्हणून सिद्धी प्राप्त आहेत. आपण सर्व वानप्रस्थी त्यांच्या नसून गृहस्थीच आहोत, त्यांनी गृहस्थ आणि संन्यास यांचा संगम करत त्यांच्या आयुष्याची सुरुवात केली. गृहस्थ आश्रमामध्ये न जाता जगणे म्हणजे अपूर्णतेचे जीवन जगणे ह्या भूमिकेतून त्यांनी माधवी यांच्याशी लग्न केले. त्यांना मुलगी झाली. तिचे नाव त्यांनी आनंदाने 'कूहू' ठेवले. आजवर जे लोक भैय्यूजी महाराजांना भेटतात, ते त्यांच्या शांतीपूर्ण तेजस्वी, चमकदार, प्रभावी व्यक्तीमत्त्वास ते त्यांना आयुष्यभर लक्षात ठेवताना आढळतात. त्यांचे विचार हे प्रॅक्टिकल आणि शाश्वत सत्यपूर्ण असल्याने ते लोकांना पटतात. त्यांच्या साध्या सरळ आणि सर्वसामान्यांना समजतील आणि परिवर्तन करवतील

अशा प्रभावी वाणीने त्यांच्याकडे लाखो भक्तजण आकर्षित झाले. त्यांच्या शारिरीक उर्जेमुळे आणि तेजामुळे आशीर्वादामुळे आणि योग्य मार्गदर्शनामुळे लाखोभक्तजनांना उत्तम दिशा मिळाली आहे. कित्येकांनी व्यसनाला रामराम करून जीवनास सामोरे जाण्याचे सामर्थ्य गुरुवर्य भैय्यूजी महाराजांकडून मिळवले आहे. भैय्यूजी महाराज त्यांच्याकडे आलेल्यांना वैयक्तिक मार्गदर्शनाद्वारे दिशा दाखवण्याचे कार्य करतात. त्यांचे विचार ऐकण्यासाठी हजारोंच्या संख्येने लोक उपस्थिती दाखवतात. त्यांच्या अनमोल कार्यामुळे लोक त्यांना राष्ट्रसंत म्हणून ओळखतात. राष्ट्रसंत भैय्यूजी महाराज आणि बाळासाहेब ठाकरे यांच्याबरोबर जवळचे संबंध होते. एक उत्कृष्ठ व्यंगचित्रकार, एक प्रखर वक्ता, शिवाजी महाराजांसारखे राजथाट असलेले सरसेनापती, मराठी माणसांचे कैवारी, थोडेसे मिस्किल सर्वगुणसंपन्न व्यक्ती म्हणजे श्रीमंत बाळासाहेब ठाकरे होत, असे भैय्यूजी महाराज म्हणतात. बाळासाहेबांचे व्यक्तिमत्त्व अगदी बेधडक होते, धनुष्यातून बाण निघाल्यावर जसे परत येत नसते तसे बाळासाहेब जे काही बोलले त्यामध्ये कधीही कोणत्याही परिस्थितीत त्यांना माघार घेतली नाही आणि त्यावर दिलगिरी वगैरे काहीच नाही. अशाप्रकारे बोलले ते करून दाखवणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे साहेब, भैय्यूजी महाराजांना बाळासाहेब अगदी नारळाच्या गुणासारखे वाटायचे. वरून कठोर आणि आतून अगदी प्रेमळ आणि भावनिक.

उदयसिंह देशमुख उर्फ महाराजांच्या सर्वोदय परिवाराविषयी बाळासाहेबांनी ऐकले होते. काही शिवसैनिकांना भैय्यूजी महाराजांच्या शिकवणीतून प्रचीती देखील मिळाली होती. ही गोष्ट जेव्हा उद्धवसाहेब ठाकरे यांच्यापर्यंत पोहचली तेव्हा त्यांनी बाळासाहेबांना देखील ह्याविषयी सांगितले होते. बाळासाहेबांनी भैय्यूजी महाराजांना मातोश्रीवर बोलावले होते, भैय्यूजी महाराज जेव्हा बाळासाहेबांना भेटायला गेले, तेव्हा त्यांना बाळासाहेबांच्या पाहुणचाराचे नवलच वाटले. साहेबांनी त्यांच्याबरोबर भोजन करण्यासाठी त्यांना बोलावले. महाराजांचे भोजन झाले आहे असे कळल्यानंतरही त्यांचा हात पकडून त्यांना भोजनगृहामध्ये घेवून गेले यावरून बाळासाहेबांच्या प्रेमाची, पितृत्वाची, अधिकाराची, आदेशाची अनुभूती उदयसिंहजी देशमुख यांना आली. त्या भेटीतून मिळालेले प्रेम आणि आपुलकीची जाणीव आजही भैय्यूजी महाराजांना आहे.



# बाळासाहेब म्हणजे स्वयंभू सरकार

शिवसेनाप्रमुख, हिंदुहृदयसम्राट, सरसेनापती, महाराष्ट्रपिता, सरकार, सच्चा नेता, महीपती, महाराष्ट्राचा ढाण्या वाघ म्हणून ओळखले जाणारे ''बाळासाहेब ठाकरे'' यांनी राजकारण करताना कधीही गुलामी स्वीकारली नाही. मुंबईवरून संपूर्ण जगभर आपल्याला कर्तृत्वाने मोठे झालेले बाळासाहेब म्हणजे एक स्वतंत्र सरकारच होते. ते एक स्वयंभू असे सत्ताकेंद्र होते. बाळासाहेबांनी कोणत्याही सत्तेच्या पदाचा मोह कधीच धरला नाही, पण सर्वांचा रिमोट कंट्रोल माझ्या हातात आहे असे म्हणत सत्ताधाऱ्यांकडून सहजतेने कार्य करवून घेणारे व्यक्ती म्हणजे सरसेनापती बाळासाहेब. महाराष्ट्राचा मुख्यमंत्री असेल किंवा देशाचा राष्ट्रपती बाळासाहेबांच्या दरबारात अवश्य भेट घेण्यासाठी येत असत. बाळासाहेबांचा दरबार म्हणजे मातोश्री. मातोश्रीवरून आदेश निघाला आणि तो पाळला गेला नाही असे कधीही झाले नाही. बाळासाहेबांनी प्रादेशिक राजकारण केले असले तर त्यांनी त्यांच्या आक्रमक आणि प्रखर विचारांनी आंतरराष्ट्रीय पातळीवरील माध्यमांची झोप उडवली. बाळासाहेबांनी हिटलरच्या हिटलरशाहीचे विशेष कौतुक केले. जर देशाला विशेष दिशा द्यायची असेल, तर हिटलरशाही शिवाय पर्याय नाही असे बाळासाहेबांचे म्हणणे होते. भारतीय जनता पार्टी बरोबर शिवसेनेची युती असतानादेखील कोणत्याही परिमाणाची पर्वा न करता त्यांनी पोलादी भूमिका असणाऱ्या इंदिरा गांधींना पाठिंबा दिला. तो पाठिंबा खरं तर त्यांनी जाहीर केलेल्या आणीबाणीला होता. हिटलरच्या नरसंहाराला नव्हे तर राष्ट्राचा स्वाभिमान बाळगणाऱ्या आक्रमक विचारांना बाळासाहेबांचा पाठिंबा होता. तसेच इंदिरा गांधींना नव्हे तर इंदिरा गांधींच्या पोलादी निर्णय क्षमतेला आणि शिस्तीच्या कारभाराला बाळासाहेबांचा पाठिंबा होता. प्रत्येकामध्ये काहीना काही चांगले गुण असतात. बाळासाहेब त्या गुणांना पाठींबा देत असत. समर्थ रामदास स्वामींनी म्हटले आहे, ''सार ते घ्यावे आणि असार ते जाणून त्यागावे!'' अशीच भूमिका बाळासाहेबांची होती. बाळासाहेबांनी आयुष्यभर नेहमी सामान्य माणसाच्या हिताला महत्त्व दिले. आपल्या प्रभावी, प्रखर वाणीने मर्मावर आघात करण्याचे अनोखे सामर्थ्य बाळासाहेबांकडे होते. बाळासाहेबांनी नेहमी मनाला योग्य वाटेल तेच निर्णय घेतले, परिणामाची पर्वा न करता त्यावर कृती केली. आणि घेतलेले निर्णय खरे केले. निर्णय घेताना त्यांनी फक्त आणि फक्त देशहितालाच महत्त्व दिले. आपल्या विचारांशी तडजोड करायची नाही, समझोते करून स्वविचारांचा आणि सामर्थ्याचा विश्वासघात कधीच केला नाही.

बाळासाहेबांनी त्यांचे आक्रमक विचारही त्यांच्या आगळ्या वेगळ्या ठाकरे शैलीत मांडले. कोणत्याही व्यक्तीच्या विचारांना, कृतीला त्यांनी विरोध केला आणि त्या व्यक्तीबरोबर मात्र सलोख्याचे संबंध स्थापित केले. अनेकांना बाळासाहेबांबरोबर आपले सलोख्याचे संबंध असावेत असे वाटत होते.

महाराष्ट्रात जेव्हा मराठी माणसांच्या अस्मितेचा अस्तित्त्वाचा खेळखंडोबा करण्याचा प्रयत्न महाराष्ट्राबाहेरील मंडळींनी केला तेव्हा बाळासाहेबांनी त्यांच्या आक्रमक शब्दात चांगलाच समाचार घेतला. झोपलेल्या माणसांना जागे करण्यासाठी भीष्मप्रतिज्ञा करून मार्मिक सुरू केले. मराठी माणूस कसा झोपलेला आहे हे दाखवून दिले. झोपचे सोंग सोडून जागे होण्यासाठी कार्य केले. शेकडो प्रबोधनपर लेखातून जे शक्य होणार नाही ते त्यांनी त्यांच्या व्यंगचित्रातून करून दाखवले. हजारोंना जागे करून त्यांना दिशा दाखवण्यासाठी शिवसेनेची स्थापना केली. शिवसेनेचे बोधचिन्ह म्हणून जबडा उघडलेल्या वाघाची निवड केली. त्यामुळे शिवसेनेची आक्रमकता जनमाणसात पोहचली. श्रीरामाने ज्या धनुष्याने रावणाला मारले, तेच 'धनुष्यबाण चिन्ह' शिवसैनिकांच्या हातात देवून समाजाविरोधी रावणांना मारण्यासाठी शिवाजी महाराजांच्या आदर्शावर चालणारे सच्चे, कट्टर शिवसैनिक निर्माण केले. ह्या सर्व शिवसैनिकांचे रक्त बाळासाहेबांच्या डरकाळीमय प्रहाररूपी बोलण्यातून उसळून येत असे. बाळासाहेब भाषणाला उभे राहीले की, लाखोंचे मन उचंबळून येत होते. त्यांच्या आक्रमकवाणीने मराठी माणसांचे हृदयच जिंकले होते. महाराष्ट्राच्या मुंबईकडे आणि मराठी माणसाकडे वाकड्या नजरेने पाहणाऱ्यांचे तुकडे पडतील, महाराष्ट्राच्या अस्मितेला नख लावाल तर महाराष्ट्र पेटून उठेल अशी बाळासाहेबांची आदेश देणारी वाक्ये आजही ऐकली आणि आठवली तरी आजही महाराष्ट्रातल्या तरुणांचे रक्त उसळून येते. बाळासाहेबांच्या विचारांचा एक वेगळाच प्रतिभावंत दरारा महाराष्ट्राच्या जममाणसात होता. मुंबई आहे मराठी माणसाची, नाही कोणाच्या बापाची असे बोलत दक्षिण भारतीयांच्या होणाऱ्या वर्चस्वापासून महाराष्ट्राची मुक्ती करत मराठी माणसांचीच मुंबई आहे हे बाळासाहेबांनी दाखवून दिले.

बाळासाहेबांचा दरारा एवढा होता की, बाळासाहेबांनी त्या व्यक्तीला मातोश्रीवर बोलावले आणि ती व्यक्ती गेली नाही असे कधीही झाले नाही. बाळासाहेब खुर्ची सम्राट नव्हते तर खुर्ची सम्राटांचे हृदय सम्राट होते. म्हणूनच तर कोणत्याही सत्तेच्या स्थानावर विराजमान न होता त्यांनी लोकांच्या मनावर राज्य केले. त्यामुळेच बाळासाहेब त्यांच्या मरणानंतरही अमर झाले. बाळासाहेबांबरोबर  जे काही साम्राज्य निर्माण केले ते कोरी पाटी असणाऱ्या माणसाच्या द्वारे निर्माण केले. राजकारणांचे सर्व नियम मोडीत काढत १६०० वर्षांपूर्वीची शिवशाही स्थापन करण्याचा प्रयत्न बाळासाहेबांनी त्यांच्या राजकारणातून



केला. बाळासाहेबांनी अशा माणसांना सोबत घेतले जे ह्यापूर्वी कधीही राजकारणात नव्हते. अशा भाजीवाल्या, पेपरवाल्या, दूधवाल्या, डबेवाल्या, रिक्षावाल्या, टॅक्सीवाल्यांपासून ते उच्च सुशिक्षित, उद्योजक, कलाकार, कामगार अशा सर्वच वर्गातील नवीन लोकांना सोबत घेत राजकारण यशस्वी केले. ज्या माणसाकडे स्वत:चे भविष्य अंध:कारात दिसत होते अशा नव्या चेहऱ्यांना आत्मसन्मानाने बरोबर घेतले आणि समाजाचे भविष्य घडवण्याच्या कामात त्यांना जोडले, त्यांना दूरदृष्टी दिली, विचारधारा दिली, आत्मसन्मान दिला. आणि त्यांना शाखाप्रमुखापासून सरपंच, नगरसेवक, आमदार, खासदार, मंत्रीपद अशा अनेक महत्त्वाच्या स्थानांवर नेऊन पोहचविले. बाळासाहेबांनी राजकारणाची खेळी खेळताना जयपराजयाचे नव्हे तर विकासाचे राजकारण केले. बाळासाहेबांनी फक्त आदेश द्यायचा आणि त्याच्या आदेशावर देश बंद पडायचा केवढी मोठी सामर्थ्यवान वाणी बाळासाहेबांना लाभली होती. बाळासाहेब फक्त भाषणाला उभे राहिले तरी जनमाणसातून घोषणा सुरु व्हायच्या!

हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख, सरसेनापती, श्रीमंत श्री बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो! बाळासाहेबांनी फक्त हात वर केला की, ती लाखोंची जनसभा क्षणार्धात शांत व्हायची. आणि मग जमलेल्या माझ्या तमाम बंधु भगिनीं बांधवांनो असे म्हटले की लाखोंच्या जनसभेतून टाळ्यांचा कडकडाट सुरु व्हायचा! असे एवढे सामर्थ्यवान, प्रतिभावंत व्यक्तिमत्त्व शिवाजी महाराजांनंतर २० व्या २१ व्या शतकात लोकांना पाहाता आले. बाळासाहेबांकडे कोणताही राजकीय वारसा नव्हता, त्यांनी कधीही कोणत्याही राजकीय व्यक्तीबरोबर अथवा राजकीय पक्षाबरोबर काम केले नव्हते. बाळासाहेबांनी जे काही निर्माण केले ह्यामध्ये त्यांचा आणि त्यांच्या वडीलांची ती नवनिर्मिती होती. शिवसेना कशी घडवावी, तिला कोणती दिशा द्यावी हे काही कोणत्याही इतर व्यक्तींनी त्यांना सांगितले नव्हते तर ती एक उत्स्फुर्त अशी एक कल्पना होती. १६०० व्या दशकामध्ये स्वराज्याची स्थापना करून हे राज्य व्हावे ही 'श्री' ची इच्छा अशी आशा व्यक्त करणाऱ्या शिवाजी महाराजांच्या शिवशाहीवर आधारीत अशी ही संकल्पना शिवसेनेच्या रूपात लोकांसमोर मांडली होती. आणि ती शिवशाही घडविण्याचे कार्य त्यांनी शिवाजी महाराजांच्या विचारांना मानणाऱ्या शिवसैनिकांच्या मार्फत घडवून आणले. जेव्हा बाळासाहेबांनी सुरुवात केली तेव्हा पक्षाचे विचार पोहचवण्यासाठी त्यांच्याकडे आजच्या सारख्या इंटरनेटचे युग नव्हते की मोबाईल नव्हता. त्यावेळी फक्त आणि फक्त एकच साधन होते ते हृदयाने हृदयाला भिडणारी विचारवाणी. त्या सामर्थ्यवाणीने बाळासाहेबांनी क्रांती घडवली. सोबत व्यंगचित्राची घेतली. कलाकाराच्या नातेसंबंधांचा गुणाकार आणि त्यांच्या यशाचा

आणि शिवसेनेच्या यशाचा गुणाकाराची बेरीज करतच जनमाणसात शिवसेना पोहचवली. सोबत होते फक्त आणि फक्त एकच हत्यार. एकवचनी होवून दिला शब्द मोडणार नाही मोडलो तरी वाकणार नाही. ह्या भूमिकेतून शिवसेनेचे साम्राज्य घडविले. शिवसेनेचे साम्राज्य घडविताना सर्व बाजूंनी विचार करणाऱ्या बाळासाहेबांनी सिनेमा, कामगार, वाहतूक, कलाकार आणि विद्यार्थी, महिला अशा विविध विभागातील शिवसेना स्थापन करण्यात आल्या. मराठी जिथे बाळासाहेब तिथे! अशाप्रकारची रचना महाराष्ट्रभर निर्माण झाली. बाळासाहेबांचा करिश्मा दिसला अन् विधानभवनावर भगवा फडकला. संपूर्ण महाराष्ट्राचा कानाकोपरा चांगल्या रस्त्यांनी जवळचा वाटू लागला. पुण्याहून मुंबईला जाण्यासाठी जेथे पाच ते सहा तास लागत होते, त्याऐवजी राष्ट्रीय महामार्गामुळे अवघ्या दोन तासात पुण्याचा माणूस मुंबईत पोहचू लागला. अशी अनेक कार्ये विधानभवनावर भगवा फडकेपर्यंत झाली. जेव्हापासून शिवसेनेचा कार्यभाग सुरु झाला, तेव्हापासून आजपर्यंत कायम स्वरूपी मुंबई महानगरपालिकेवर म्हणजेच भारताच्या आर्थिक राजधानीवर भगवा फडकत आलेला आहे.

बाळासाहेब वयोमानानुसार आजारी पडत गेले. काहीही उपचार केले, तरी काळापुढे आजवर नाही कोणाचे चालले आणि चालणार! अखेरीस ह्या महापुरुषाला देवाघरी घेण्यासाठी ऐनदिवाळीतच यमराज आले. दिवाळीनंतर येतो म्हणून बाळासाहेबांनी यमराजाला परत पाठविले. एकवचनी असलेल्या बाळासाहेबांचा शब्द यमराजांनी मानला. दिवाळी झाली अन् ठरल्याप्रमाणे यमराज बाळासाहेबांना देवाघरी घेवून गेले. २४ लाखांपेक्षा अधिक लोक त्यांच्या महाअंत्ययात्रेत सामील झाले. आणि अखेरीस एक स्वतंत्र सरकार म्हणून ओळखले जाणारे बाळासाहेबांचे शरीर पंचतत्वात विलीन झाले.

*आजही बाळासाहेब आपल्यात आहेत त्यांच्या विचाराच्या माध्यमातून!*
*आजही बाळासाहेब आपल्यात आहेत त्यांच्या विविध आठवणींतून!*
*आजही बाळासाहेब आपल्यात आहेत त्यांच्या व्यंगचित्रांतून!*
*आजही बाळासाहेब आपल्यात आहेत त्यांच्या शिवसेनेच्या माध्यमातून!*

हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख, एकवचनी, सरकार, महीपती, मराठ्यांचे दैवत, सरसेनापती, श्रीमंत श्री बाळासाहेब ठाकरे अमर रहे!

मराठी जिथे, बाळासाहेब तिथे.

# बाळासाहेब ठाकरे यांची भाषणे
# ‘‘जशी आहेत तशी’’

- शिवसेना कशासाठी?
- दसरा मेळावा १९ जून १९६६ – भाषण
- ४ डिसेंबर १९८८ रोजी अकोला भाषण
- १० एप्रिल २००२ शिर्डीमधील भाषण
- १९ जून २००४ शिवसेना वर्धापनदिनानिमित्त भाषण
- १९ जून २००५ शिवसेना वर्धापनदिनानिमित्त भाषण
- १९ जून २००६ शिवसेना वर्धापनदिनानिमित्त भाषण
- १ मे २०१० मधील भाषण
- १७ ऑक्टोबर २०१० दसरा मेळावा

## बाळासाहेब ठाकरे यांची भाषणे ...

'प्रबोधन'कारांनी बाळासाहेबांना शिकविले होते की भाषण करत असताना जणू काही आपण समोरच्या व्यक्तीबरोबर बोलतच आहोत अशा स्वरूपात भाषण करावे. बाळासाहेबांनी हा सल्ला आयुष्यभर पाळला आणि त्यांच्या भाषणकौशल्यामुळे लाखो लोकांचा जनसमुदाय त्यांना लाभला.

बाळासाहेबांच्या भाषणात रोखठोकपणा होता, तो आमच्या पिढीला नेहमीच भावला होता. राजकीय पुढाऱ्यांबद्दल त्यांनी दिलेल्या प्रतिक्रिया आम्ही चवीने ऐकत असू. त्यांच्या वाणीत जो रोखठोकपणा होता, तोच सर्व राजकीय पुढाऱ्यांमध्ये असला पाहिजे. वक्तृत्वाच्या शैलीमुळे त्यांनी महाराष्ट्रातील तमाम जनतेला केवळ आकर्षित केले नाही तर ते प्रत्येक निर्णयावर नेहमीच ठाम राहिले. त्यांच्या याच ठाम भूमिकेमुळे ते लाखोंच्या गळ्यातले ताईत झाले.

विरोधकांच्या मते शिवराळ मानल्या जाणाऱ्या बाळासाहेबांच्या वक्तृत्वाचा उगम त्यांच्या वडिलांच्या - प्रबोधनकार ठाकरे यांच्या शैलीमध्ये आहे. बाळासाहेब अभिमानाने या शैलीला ही आमची 'ठाकरी भाषा' आहे असे म्हणत.

बेळगाव प्रश्नी बाळासाहेबांनी अनेक सभा घेतल्या. अनेकदा आंदोलने केली. त्यासाठी गावागावांतून कार्यकर्ते यायचे आणि कोणत्याही चौकात, रस्त्यावर बाळासाहेबांचे भाषण सुरू व्हायचे. एक काळ असा होता की बाळासाहेब जिथे उभे राहत तिथेच त्यांची सभा सुरू होई. त्यांना कोणत्या व्यासपीठाची गरज नव्हती आणि नाही विशेष श्रोत्यांची. ही जादू शेवटपर्यंत कायम राहिली.

घणाघाती वक्तृत्व हे बाळासाहेबांचे खास वैशिष्ट्य. आपल्या ओघवत्या आणि हजरजबाबी वक्तृत्वाने ते तासन्‌तास लाखो-लाखोंच्या सभेला अक्षरश: मंत्रमुग्ध करून सोडायचे. त्यांच्या भाषेतील आक्रमकपणाने व खुमासदारपणाने श्रोत्यांची अंत:करणे भारावून जात असत. लोकांच्या भावनांना हात घालण्याचे जबरदस्त सामर्थ्य त्यांच्या शब्दांत होते. त्यांचे ठाकरी शैलीतील वक्तृत्व हा खरोखरीच एक वेगळा अनुभव होता. त्यांच्या भाषणाच्या वेळी त्यांच्या जिभेवर साक्षात सरस्वती आणि दुर्गा दोघीही प्रकट होत असत. महाराष्ट्रात काय; पण देशातही केवळ वक्तृत्वाच्या आणि विचारांच्या जोरावर केवळ लाख लाख माणसांना सभास्थानी खेचून आणण्याचे सामर्थ्य असलेला राजकीय नेता विरळाच असेल. अन्य नेत्यांच्या सभांनाही गर्दी होते, नाही असे नाही; आणि त्यासाठी



लोकांना ट्रकने, मिळेल त्या वाहनाने पण प्रसंगी रोजगार देऊनही आणावे लागते. बाळासाहेबांचे तसे नव्हते. त्यांच्या सभेला आपणहून लोक येत आणि त्यांच्या भाषणाच्या धबधब्यात अक्षरश: ओलेचिंब होत असत.

काही भाषणे जशीच्या तशी आपल्या समोर या पुस्तकात मांडलेली आहेत.

# शिवसेना कशासाठी?
# प्रबोधनकार ठाकरे

शिवसेनेची स्थापना १९ जून १९६६ ला झाली. पण तिच्या निर्मितीची जाहीर सभा मुंबईत दादरच्या शिवाजी पार्कवर ३० ऑक्टोबर १९६६ ला झाली. तेव्हा दसरा होता. शिवसेनेतर्फे हा दिवस दसरा मेळावा म्हणून वर्षानुवर्ष साजरा होतो. त्या मेळाव्यात प्रबोधनकारांचंही भाषण झालं. तेव्हा ते ८१ वर्षांचे होते. पण विचारात आणि वाणीत दणकटपणा ठासून होता.

पौर्णिमेच्या पूर्णचंद्राला साक्षी ठेवून आज आपण महाराष्ट्र देशाच्या मायलेकरांचा खराखुरा दसरा साजरा करत आहोत (टाळ्या). दसऱ्याच्या दिवशी सीमोल्लंघन करतात आणि सीमोल्लंघन केल्यानंतर तिथून सोनं लुटून आणायचं असतं. आज आपल्याभोवती इतक्या तऱ्हेतऱ्हेच्या भानगडींच्या, अडचणींच्या, निराशेच्या सीमा पडलेल्या आहेत की, आपल्या पूर्वीच्या प्रथेप्रमाणे नुसती गावाची सीमा उल्लंघून आपल्याला जमणार नाही. तेवढ्यासाठी सबंध महाराष्ट्राचा एकजात मराठा, छत्रपतींची शपथ घेऊन, मी महाराष्ट्राचा अभिमानी लेक आहे. यापुढे कोणाच्याही प्रतिटोल्याची तमा न ठेवता समोर येईल ती सीमा तुडवीत निघण्याइतकी ताकद येईल, अशी हिंमत बांधली पाहिजे. अहो, सामोपचाराच्या गोष्टी गांडूंनी सांगाव्या. (हास्यलोट) मर्दाचं ते काम नाही. समर्थ रामदास म्हणतात, मारिता मारिता मरावे। मरोनि अवघ्यांस मारावे । (टाळ्या) महाराष्ट्र हा काही लेच्यापेच्यांचा देश नाहीये. ही वाघाची अवलाद आहे; आणि या वाघाला कोणी डिवचलं तर त्याचा परिणाम काय होईल, याचे इतिहासामध्ये दाखले आहेत. भविष्यकाळात पाहायचे असतील तर पाहायला मिळतील! (प्रचंड टाळ्या) अजून आमचं रक्त भ्रष्ट झालेलं नाही. शिवारायांचं नाव आम्हाला सांगायचं आहे. भवानी आमच्या पाठीशी उभी आहे. काळ बदलला, विचार बदलले, आचार बदलले, ड्रेस बदलले, सगळे बदलले, तरी मराठा म्हणून जो मंत्र आहे, जो छत्रपतींनी आम्हाला दिलेला, ती शिवरायांची मूर्ती आमच्या देहातून काढून टाकणारा माणूस अजून जन्माला आलेला नाही (टाळ्या). शिवरायांची मूर्ती आणि कीर्ती आमच्या हृदयात आत्माराम म्हणून आहे. आमच्यावरती आज ज्यांची आक्रमणं झाली आहेत त्यांची तर गोष्टच सोडून द्या. परंतु सगळ्या हिंदुस्थानवर राज्य जे करतायत त्यांनाही कळून चुकलं पाहिजे, की महाराष्ट्र हा काही मेलेल्या आईचं दूध प्यायलेला नाही



(टाळ्या). असा हा पराक्रम दाखवण्यासाठी पहिली गोष्ट म्हणजे आपण महाराष्ट्राचा मराठा आहोत, एका आईची लेकरे आहोत, सख्खी भावंडं आहोत, असं तुम्ही-आम्ही मानलं पाहिजे. आजपासून तशी शपथ घ्या. दुसरी गोष्ट स्त्री वर्ग, महिला! या महिलांच्याबद्दल जितका आदर तुम्ही आपल्या अंत:करणामध्ये साठवीत जाल, वाढवीत जाल, तितका तितका तो शिवराय तुमच्यावर फार प्रसन्न होईल! अरे, नारी नर की खान, जिस खानीसे पैदा हुए राम, कृष्ण, हनुमान (टाळ्या). मी वर्तमानपत्रात वाचतो... आमच्या पोरीची टिंगल केली गेली. जातिवंत मराठा तिथे एकटा जरी असला, तरी त्याने जीव त्या पोरीच्या रक्षणासाठी दिला पाहिजे. धावून गेला पाहिजे. आज इथे काय चाललंय. मी तर काही घराबाहेर पडत नाही, मी झालोय कोकिळेचा मास! (हास्यलोट) पण तुम्ही माझ्या पाठीमागे सारे उभे राहिलात आणि हा शिवरायाचा भगवा झेंडा घेऊन 'महाराष्ट्र की जय' म्हणून जर तुम्ही गर्जना केलीत, ठिकठिकाणी उभे राहिलात, तर काय कुणाची टाप आहे तुमच्या विरुद्ध जायची? आमच्या मागण्या आहेत. आम्हाला काय पाहिजे, ते तुम्हाला 'मार्मिक'नं इतक्या दिवसांत सांगितलंय. ती प्रत्येक गोष्ट आपण मिळवलीच पाहिजे. त्याच्याकरता वाटेल ते करावं लागलं तरी चालेल.

आता स्वस्थ बसायचं नाही. अरे, मराठा म्हणजे काय? मराठ्यांच्या नावाचा दरारा केवढा होता! मराठे रस्त्याने जर चालू लागले, तर विरोधक टरकून बाजूला झाले पाहिजेत. एवढं सामर्थ्य तुम्ही तयार केलं पाहिजे (टाळ्या). लेख लिहिताना, भाषण करताना, कोणतीही कामगिरी करताना पेटलं पाहिजे. असं तुमचं एकदा अंत:करण पेटायला लागलं, की सत्याची चाड आणि असत्याची चीड येणारच. अन्यायाची चीड आली पाहिजे. माथं भडकून गेलं पाहिजे. मी एक मराठी इथे उभा आहे नि माझ्यासमोर अन्याय? तो तरी मरेल किंवा मी तरी मरेन. इतकी जिद्द असल्याशिवाय मराठ्याला मराठा म्हणून घेण्याचा अधिकार नाही! म्हणून तुम्ही आज जमला आहात. आपल्याला सीमोल्लंघन करायचंय. ते करताना प्रत्येक ठिकाणी छत्रपतींचं नाव घेऊन, संकटात उडी घालून अन्यायाचा फडशा पाडायचा, असा निश्चय केला पाहिजे. बसमध्ये जाताना एखाद्या महिलेला कुणी धक्का मारला, तर एक फाऽडकन वाजली पाहिजे. इतकी जेव्हा जरब तुम्ही निर्माण कराल, त्याच वेळेला रस्त्यातून, चाळीतून-बिल्डिंगमधून होणारे गैरप्रकार थांबतील. 'अहिंसा परमो धर्म:' हे तिथे चालणार नाही.

अहो, अशा अहिंसेने कुठे कामं होतात काय? मी सांगतो तुम्हाला पुराण. एखादा पुराणिक काय माझ्यापुढे पुराण सांगेल! ब्रह्म आहे नि माया आहे! ठीक आहे! पण आमचं-आमचं कर्म आहे, ते आम्हाला सुधारायचंय (टाळ्या). तेव्हा आज ही

शिवसेनेची सगळी गर्दी पाहून तुमचं दर्शन घेऊन मला तर असं वाटायला लागलं की, जो अर्जुन धनुष्यबाण टाकून एखाद्या नपुंसकासारखा उभा राहिला; तेव्हा त्याला भगवान कृष्णांनी, गीतेचा उपदेश केला. त्या वेळी भगवंतानं त्याला जसं विश्वरूप दाखवलं, तसं हे विश्वरूप आज हतबल झालेल्या मराठ्याला, आपल्याला शिवरायानं दाखवलं आहे. ही विश्वरूपाची पुण्याई फुकट जाता कामा नये. तुम्ही जर शिवरायांचे खरे भक्त असाल, जातिवंत मराठे असाल, मराठ्याचं नाव सांगत असाल, महाराष्ट्राबद्दल खरंखुरं प्रेम असेल, तर आजपासून निश्चय करा – अन्यायाला कधीही मी क्षमा करणार नाही आणि जे न्याय्य आहे त्याच्याकरता झगडताना प्राण गेला तरी बेहत्तर! पण महाराष्ट्राचं नाव बदनाम करणार नाही! अशी बुद्धी तुम्हाला छत्रपती शिवराय देवो, इतकं सांगून मी माझं भाषण संपवतो.



# अकोला – ४ डिसेंबर १९८८
# बाळासाहेब ठाकरे

बाळासाहेब ठाकरे भाषण करण्यासाठी उभे राहताना प्रेक्षकांमधून घोषणा (हिंदुहृदयसम्राट, शिवसेना प्रमुख, सरसेनापती, श्रीमंत श्री बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो.)

जमलेल्या माझ्या तमाम बंधूंनो, भगिनी व बांधवांनो आणि मातांनो... (प्रेक्षकांमधून जल्लोष, टाळ्यांचा कडकडाट आणि घोषणाबाजी)

माझा महाराष्ट्राचा दौरा सुरू झालेला आहे. मुंबईमध्ये असताना बऱ्याच बातम्या यायच्या. थंडी कडाक्याची आहे. जाताना स्वेटर वगैरे घालून जा. मफलर घेऊन जा. बायकोनी सांगितलं, स्वेटर घ्या. माकडटोपी घ्या... मी माकडटोपी काही घालणार नाही, मंत्रिमंडळामध्ये एवढी माकडं असताना आणखी माकडटोपी कशाला?... (हास्यलोट) मी जसा आहे तसा दिसू द्या लोकांना... पलीकडे अमरावती आहे. माझ्या आईचा जन्म अमरावतीचा आहे. तिचं माहेर अमरावती. उद्या संध्याकाळी तेथे सभा आहे. (स्टेज व श्रोत्यांमधील अंतर दाखवीत) आता तुम्ही म्हणाल की हे एवढं काय अंतर ठेवलं आहे... आता तुम्ही असं म्हणाल, हे असं लांब, लांब का अंतर ठेवलंत तुम्ह... बाळासाहेब काय जनतेपासून दूर चाललेत की काय? ह्या देशाचे पंतप्रधान होणार आहेत का? कारण ह्यांच्यानंतर पोलिस, पोलिसांनंतर कोणी आणखी आणि त्यानंतर जनता. पण तसला काही प्रकार नाही. खरं सांगायचं तर तुम्ही असे दूर व्हावं असं मलाही वाटत नाही. काही काही वेळेला अशा काही बातम्या येतात. काही तरी चार अतिरेकी मला मारायला निघालेत मुंबईतून. भेकडांनो, हिंमत असेल तर या ना तुम्ही मैदानामध्ये...! (हास्यलोट, जल्लोष, टाळ्या) आणि मग मराठ्यांच्या तलवारीची धार काय असते ते तुम्हाला दिसून येईल. ह्या देशाच्या पंतप्रधानांना कदाचित तुम्ही उडवलं असाल पण नीचपणा जर या महाराष्ट्राच्या मातीशी कराल तर एक कपरीसुद्धा शिल्लक राहणार नाही. कारण हा प्रश्न फक्त महाराष्ट्रापुरता मर्यादित राहणार नाही... कारण ६९ साली जेव्हा मुंबईमध्ये सीमाप्रश्नावर आम्ही आंदोलन केलं. आम्हा सर्व पोरांना अटक झाली. मुंबई पेटली, ठाणं पेटलं, पुणं थोडंसं थोडंसं पेटलं. पण आता प्रकार बदललेला आहे. या २२ वर्षांमध्ये शिवसेनेची पाळंमुळं केवळ महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातच नाही, तर गुजरातमध्ये, गोव्यामध्ये, उत्तर प्रदेशमध्ये,

मध्य प्रदेशमध्ये, जम्मू काश्मीरमध्ये, पंजाबमध्ये, नव्हे दिल्लीमध्ये, हिमाचल प्रदेशमध्येसुद्धा पसरलेली आहेत. इथे माझ्या केसांना जरी धक्का लावाल तर इथून जी सुरुंगाची वात पेटेल ती पेटून पेटून पुढे संपूर्ण देशभर पसरेल, आणि त्यात तुम्ही होरपळून जाल... हा इशारा तुम्हाला देऊन ठेवतो. तुमचं भांडणं कोणाशी आहे, सरकारशी आहे ना. मग घाला ना गोळ्या तिकडे. आमच्या मागे कशाला? उलट कमी पडल्या तर आम्ही पुरवू. त्या सरदारजींना सांगायचं कुणी?... हा प्रश्न येतो, शिरतच नाही म्हणून सांगतो जरा टोपी वर करा म्हणजे कानांची भोकं मोकळी होतील आणि मग आम्ही काय म्हणतो ते ऐकू येईल. (हास्यलोट) आम्ही महाराष्ट्र जिंकायला निघालो आहोत. केवळ बाळ ठाकरेला काही तरी व्हायचंय म्हणून नव्हे. बाळासाहेब म्हणजे शरद पवार नव्हेत. इकडं नसेल तर तिकडे, तिकडे नसेल तर हिकडे, हे धंदे मला करायचे नाहीत... निवडणुकीला मी उभाच राहणार नाही... तुम्हीच सर्व मोठे व्हा... शेतकऱ्यांचे प्रश्न आहेत, शेतकरी रडतोय... कामगारांचे प्रश्न आहेत, कामगार रडतोय, जनता रडतेय. ४२ वर्षांमध्ये काय मिळालं तुम्हाला? जेवढ्या ह्यांनी खुर्च्या उबवल्या, आणि त्यांना जेवढी ऊब मिळाली तेवढी तुम्हालासुद्धा ऊब मिळालेली नाहीये. आता मिळत असेल ती गोष्ट निराळी. आता जरा चिकटून बसल्यानंतर जरा बरं वाटतं. गरम गरम थोडं (हास्यलोट). म्हणजे एकजुटीचा फायदा केवढा आहे बघा... थंडीचा बाप जरी खाली उतरला तरी तुम्हाला मात्र थंडी वाजणार नाही कारण काय, एकजुटीने बसलेले आहात. (टाळ्या) हे एकजुटीचे महत्त्व आहे. आम्ही महाराष्ट्र का जिंकतोय, की घरी बायकोचं आणि माझं भांडणं झालंय. ह्यांना काही संसार नाही की पोरंबाळं नाहीत?... कारण हे पाहवत नाही. ह्या देशामध्ये काँग्रेसने संपूर्ण सत्ता राबवली. एक मधली दोन-अडीच वर्षं सत्ता त्या जनता पक्ष दळभद्र्यांना दिली. त्यांनाही ते जमलं नाही. म्हातारे असले तरी भांडत होते आणि धोतरात पाय अडकून पडले. (हास्यलोट) मोरारजी देसाई काय? ते चरणसिंग काय? आता काही नवीन पक्ष निर्माण होतोय. व्ही. पी. सिंग काय वगैरे वगैरे. बहुगुणा अमुक तमुक... ते तुमचे कोण हरियानाचे देवीलाल, ह्याची लाल, त्याची लाल, केवढे आले... हे सगळे माजी काँग्रेसवाले हिकडं जमत नाही म्हणून तिकडे आले आणि विरोधी पक्ष स्थापन करताहेत. अरे वाण नसला तरी गुण लागलेला आहे... अरे, साबणाने घासून जाणार आहे का तुमचं?... हा काँग्रेसचा जो नायटा त्यांना चिकटलेला आहे, तो खाजवून खाजवून बरा होणार नाही. तो वाढतच जाणार... अरे महाराष्ट्रात तुमचं आहे तरी काय? या महाराष्ट्रामध्ये फक्त शिवसेना... शिवसेना... आणि शिवसेना. बाकी कोणत्याही पक्षाला येथे कसलाही थारा नाहीये. (टाळ्या, जल्लोष). शरद जोशींना




आम्ही सांगतोय, अरे, शेतकऱ्यांची संघटना बांधली. आम्ही तुम्हाला मदत करतो, तुम्ही येऊन निवडणुकीला उभे रहा. शेतकरी संघटनेने महाराष्ट्राची निवडणूक लढवावी, आम्ही तुम्हाला मुख्यमंत्री करतो, आणि तुम्ही शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवा. नाही..., म्हणे आम्ही निवडणुकाच लढवणार नाही. मग म्हटलं काय करणार... योग्य माणसाला आम्ही पाठिंबा देणार. तुम्ही कोण ठरवणार हा योग्य का हा लायक, का नालायक? पहिल्यांदा तुम्ही लायक का नालायक ते ठरवू या. मग बाकीच्यांची लायकी बघूया. कुठल्या तरी वर्तमानपत्रात आलंय, आम्ही शिवसेनेबरोबर नाही No tie up with Shivsena. आम्ही म्हटलं जा... दोन फुल्यात... तुम्हाला पर्वा नसेल तर आम्ही काही फरकटत येणार नाही. पण आम्ही सत्ता घेणारच. शिवसेना आपल्या स्वत:च्या ताकदीवरती महाराष्ट्राची सत्ता घेतल्याशिवाय राहणार नाही, अशी ताकद आज कमावलेली आहे. मागतोय काय आम्ही? काय मुसलमानांशी आमचं वैर आहे... आज आयुब खेळतोय, विकेट घेतोय, आज देशासाठी खेळणारा मुसलमान आमचा आहे. आम्ही त्याला मानतो. नंतर तो अझहर... तरुण पोरगा. पहिल्याच वेळेला पाकिस्तानात ३ लागोपाठ सेंच्युरी मारल्या. देशासाठी मारल्या, तो आमचा आहे. जन्माने मुसलमान असेल पण तो आमचा आहे. रशीद पटेल आमचा आहे, किरमाणी आमचा होता, आजही आहे. हे मुसलमान कसले, जन्माने असतील. पण देशासाठी लढणारे हे आमचे आहेत असं आम्ही मानतो. मग तुमचं काय वळवळतंय? तुम्ही कशासाठी आमच्या विरुद्ध? बरं, आमच्या विरुद्ध नाही, देशाच्या विरुद्ध? अहो, झिया मेल्यानंतर भेंडी बाजार बंद. कोण तुमचा लागत होता? बाप?... इथे आम्हाला चीड येते. आमच्या जीवन-मरणाचे प्रश्न जरूर आहेत... महिला आल्या असतील त्यांना थोडं राजकारणाचं द्यायला पाहिजे... थोडंसं बालामृत. पण त्या म्हणतील बाबा आमच्याकरता काय?... तुमच्या करताही बोलणार आहे... कोणी म्हणतात तुमचं सरकार आल्यानंतर तुम्ही करणार काय?... पहिल्यांदा हे प्रश्न विचारतात हे पत्रकार मला. तुम्ही लोकशाही मानत नाही...? बिलकूल मानत नाही... काय चाटायची ती लोकशाही? देत काही नाही... आणि उगीच चाटत बसताय? या देशात मुळात लोकशाही होती कुठे? एक अधिकार... एका पक्षाचा नव्हे. एका कुटुंबाचा अधिकार... या देशामध्ये गाजलेला आहे, आजही गाजतो, ही लोकशाही? मला वाटत नाही, मला पटतही नाही. मग आम्ही सांगतो, आम्हाला शिवशाही पाहिजे. शिवरायाने ज्या पद्धतीने आपली राजवट राबवली ह्या देशामध्ये, महाराष्ट्रामध्ये ती शिवशाही आम्हाला पाहिजे आहे... ती आम्ही मानतो. न्याय तिथल्या तिथे. गडबड नाही. झंजट नाही. फैसला तिथल्या तिथे... खंडू खोपडा आडवा गेला, उडव...

मराठा... आपल्या जातीचा... छे छे छे छे... एक हात उडवला अन् एक तंगडं उडवलं... स्वराज्याच्या विरोधात चालून आला... ज्या हातानी तलवार उपसली स्वराज्याच्या विरोधात तो हात उडवला... आणि ज्या पायांनी चालून आला स्वराज्याच्या विरुद्ध ती तंगडी उडवली. असं नाही बघितलं... किती रे, बाबा तू ९६ कुळी का ९२ कुळी?... मग तो म्हणतो, महाराज... ९६ कुळी.... ९६ कुळी, मग तू माझ्या जातीचा. माफ केलं... नाही. अफझलखानाच्या बरोबर गेलास ना... मग तुझे हे उद्‌गार शून्य केलेच पाहिजेत... केलं ना. आम्ही म्हणतो ही लोकशाही, तारखाबिरखा काही नाही. अतिरेक्यांना फाशी देणार... देणार... देणार... दिवस ठरला, परत काय? रद्द... कोण हे तुमचे, जावई? माझ्या हातात सत्ता द्या... किंबहुना पंतप्रधानांचा सल्लागार म्हणून मला नेमा... देशाला एका फटक्यामध्ये सुधारून दाखवतो. चौकशी, खटलेबिटले भानगडच नाही हो. गोळी घाला पहिली... आडवा करा... लोकांच्या समोर... घाला...

८० लोक बसमधून काढायचे. बायका बघायच्या नाहीत... मुलं बघायची नाहीत... स्टेनगनने कचा कचा कचा कचा गोळ्या घालायच्या. अरे कसले पाषाणहृदयी तुम्ही. अटक कोणालाही नाही... चौकशी चालली आहे... कुत्रं हुंगतंय... माझ्या हातात द्या सत्ता. एका दिवसात सगळ्यांना सरळ आणतो. एका दिवसात... जास्त वेळ नाही लागणार... पण मात्र मी हुकूमशहा आहे, जनहितासाठी म्हणून जे राबवावं लागेल ते मी राबवणार... मग म्हणतात तुम्ही लोकशाही मानत नाही... अरे, तुम्ही मानता, तुम्ही काय दिलंत या लोकांना?... साधं पाणी देता आलं नाही...! संडास देता आले नाहीत...! हायवेवरती बघा... रांकेनं बसलेले असतात. ते काय राष्ट्रगीत चाललेलं असतं? (हास्यलोट) काय, करतात काय?... संडास देऊ शकले नाहीत अजून... पाणी देता येत नाही... ग्रामीण भागामध्ये अजून पाणी नाही. नारूसारखे रोग होत आहेत. नारू?... सकाळी येताना मी बघत होतो. मी व्यंगचित्रकार आहे. आता हल्ली थोडं कमी झालं आहे काढणं. पण व्यंगचित्रकार म्हणून माझी थोडी हलकट नजर आहे. पाहतोय बायका बिचाऱ्या धुणं धुतात आणि तेच पाणी कळशीमध्ये भरून प्यायला नेताहेत. शरद पवाराला पाजा. हे मंत्रिमंडळामध्ये नवीन आलेत ना कोणी... नवीन धेंडं... त्यांना पाजा. पी म्हणावं पाणी तुझ्या महाराष्ट्रातलं पाणी...! पिऊन दाखवं... प्यायला पाणी नाही... काही नाही.

आर्थिक कार्यक्रम काय तुमचा? मी म्हटलं काही नाही... आर्थिक कार्यक्रम आमच्या शिवसेनेच्या हातामध्ये जर सत्ता आली तर पहिल्यांदा अन्न, वस्त्र, निवाऱ्याची



सोय केली जाईल. अन्न, वस्त्र, निवारा, मिळालाय कुठे... नंगे से खुदा भी डरता है। अरे नागडं झालं तरी यांना लाज नाही वाटत. (हास्यलोट) हे काही खुदा नव्हेत. खुर्दा मोजतात खिशातला... किती जमला? अन्न, वस्त्र, निवारा देत नाहीत... आम्ही देणार! आणि त्यानंतरसुद्धा जर तुम्ही आम्हाला सत्तेवर निवडून दिलंत... पण दुर्दैवाने, एखाद्या प्रश्नासाठी तुमचा एखादा मोर्चा आला मुंबईमध्ये... पोलिसांकरवी अडवला जाणार नाही, बिलकूल अडवला जाणार नाही. (जल्लोष, घोषणा) तुम्ही थांबायचं... संबंधित विषयाचा जो मंत्री असेल, पाण्याच्या प्रश्नावरचं काही असेल, घरासंबंधी असेल, अन्नाबद्दल असेल, रेशनिंगबद्दल असेल, शेतकऱ्यांचा असेल, कामगारांचा असेल, त्या त्या विषयाच्या संबंधित मंत्री सहाव्या मजल्यावरून, पाचव्या मजल्यावरून खाली उतरेल आणि मोर्चाला सामोरा येईल... बोलेल तुम्हाला... बोला मायबापहो... कशाकरता आलात?... काय तक्रार आहे?... काय कमी पडलं काय आमच्याकडून? ही विचारणा होईल... ह्याला म्हणतात लोकशाही. ती शिवसेनेला अभिप्रेत आहे... ती शिवसेनेला मान्य आहे... अन्यथा ती लोकशाही नाही. बिलकूल मान्य नाहिये... का तर नागपूरला आलात. मोर्चे लागणार आहेत. आंदोलनं काही तरी करण्याचं प्रयत्न होणार आहेत? का? शेतकऱ्यांची कर्जे माफ केलीत, पण त्या अगोदर शेतकऱ्यांच्या कर्जाकरता म्हणून किती शेतकऱ्यांच्या घरांचे लिलाव झाले ते विचारा... देता भांडी-कुंडी आणून परत... देता ते पैसे त्याला परत... कर्जे कोणाची माफ झाली... भाबडेपणाने आम्ही बघतो, दीड हजार कोटी परदेशातून आणले जाणार आहेत. शरद पवारांचे राजीव गांधींना वचन आहे की दीड हजार कोटी मी आणून देतो. एकतर मुळात असा मुख्यमंत्री जाऊ शकत नाही. ह्या सगळ्या भानगडी केंद्र सरकारच्या हातात असतात. पण हा मुख्यमंत्री गेला कसा...? परदेशाशी बोलतो कसा...? धंदे आणतो कसा...? हे तुमच्या आमच्यासाठी काही नाही. ही निवडणुकीची तयारी आहे. पैसे पाहिजे आहेत निवडणुकीला... तिकडूनही मिळवतोय आणि इकडूनही मिळवतोय. बरेचसे आपल्या खिशात- थोडंसं राजीव गांधीला. तरी बेटा चांगलं कमावतोय, काही कमी कमवत नाहीये. गच्चून कमवतात. म्हणजे देशामध्ये निवडणुका रद्द जर झाल्या ना, तर त्या पैशामध्ये या देशाचं सोनं आपल्याला करता येईल. महाराष्ट्राचं तर निश्चित करता येईल... पण येतो कुठे पैसा तुमच्या वाट्याला. येतो कुठे पैसा वाट्याला? अरे किती खाणार तुम्ही? अहो तुम्हाला पोरं किती? इथून सुरुवात. त्यांच्या नावावर ठेवायचं किती...? तुम्ही जगणार किती...? सगळ्या आयुष्याची बेगमी करून, वरती पैसा ठेवून उरलेला पैसा जनतेसाठी खर्च करा. नाही... करोडो रुपये जमले आहेत. मी तर

जाहीर आव्हान दिलंय त्यांना... ते कलमाडी बिलमाडी आहेत ना... शरद पवारांचा डावा हात... उजवा म्हणत नाही कारण सर्व घाणेरडी कर्म तो त्या हाताने करतो. (हास्यलोट) म्हणे शिवसेनाप्रमुखांना पुण्याच्या घाटाच्या वरती येऊन देणार नाही. आयला लेका, पुण्याला तर केव्हाच आलो. रात्र तर मी पुण्याला काढली... पुण्यामध्ये आता आमचं अधिवेशन आहे... तू काय आम्हाला अडवतो... शिवसेनेला आता कोणाला रोखता येणार नाही... (टाळ्या). विलासराव देशमुख... त्या वेळचे... आता गेलं मंत्रिपद त्यांचं, त्याचं खातं बदललं. नशीब, गोंद चांगला आहे, चिकटलाय... त्यांनी असं आव्हान दिलं होतं औरंगाबादेत... म्हणजे आता आम्ही त्याचं संभाजीनगर असं नाव ठेवलं आहे. ज्या औरंगजेबाने संभाजीराजांचे डोळे काढले, त्यांचे हाल हाल केले, त्याचा राजकीय सूड, ऐतिहासिक सूड म्हणून आम्ही औरंगाबादला संभाजीनगर हे नाव ठेवलेलं आहे. आम्ही सुरुवात केली, सरकारला ते मान्य असो वा नसो... आणि त्यांनी असं सांगितलं, म्हणे शिवसेनेची घोडदौड आम्ही रोखणार...! इति विलास देशमुख... म्हटलं तुम्ही काय माकडं आमची रोखणार रे... घोडे पुढे जाणार आहेत, तुम्हाला लिदी त्याच्या गोळा कराव्या लागतील. किती? १,२,३,४,५ घोड्याच्या लिदी. घौडदौड आमची चालू राहणार आहे. हादरलेच... वर्तमानपत्र उघडल्यानंतर प्रभा राव असो, प्रतिभाताई पाटील असो, शरद पवारांची नवीन नेमणूक असो, अन्य कोणी असो... पहिल्यांदा शिवसेनेला तो शिवी देतो. कोणत्याही राजकीय पक्षाला देत नाही कारण त्यांना माहीत आहे सामना हा शिवसेनेशी होणार आहे. या महाराष्ट्रामध्ये काँग्रेसचा आयचा – इंदिरा काँग्रेसचा पराभव करणारा फक्त एकच पक्ष आणि संघटना... ती तुमची भगव्या झेंड्याची शिवसेना. (टाळ्या) म्हणून हादरलेत...! मग आता लावून द्यायची... अहो लावून देण्याकरता काही लागतं... मध्यंतरी मी व्यंगचित्रच काढलं होतं मार्मिकच्या मुखपृष्ठावरती. येथे माझे दलित बांधव कितीतरी आले असतील... त्यांना नम्रपणे सांगतो तुमचं-आमचं भांडण काहीच नाही. असूच शकत नाही... अरे, तुम्ही दीक्षा घेतलीत. सगळ्यांनी घेतली नाही, काहींनी घेतली. काही आमच्यातच आहेत. पण ज्यांनी घेतली त्यांच्याशी आमचं भांडण तर नाहीच नाही. नवबौद्धांशी आमचं भांडणच नाहीये. जनतेशी कसलं भांडण करायचं... त्यामध्ये आमचा नामदेव आहे, त्यामध्ये आमचा पांडुरंग आहे, त्यामध्ये आमचा तुकाराम आहे, सगळ्या आमच्या संतांची नावं असणारी मंडळी... तुमच्या दृष्टीने धर्मांतर झालं असेल पण तुमचं रक्तांतर झालेलं नाही. तुम्ही हिंदूच आहात, हिंदूच आहात. बरं, बुद्धाने कुठला धर्म बदलला होता. बुद्धानी काही धर्म बदलला नाही.



धर्मामध्ये, हिंदू धर्मामध्ये जी काही कर्मकांडं, घाणेरड्या गोष्टी, ब्राह्मणांचं म्हणजे बडव्यांचं वर्चस्व... माझ्या वडिलांनी ह्याकरता महाराष्ट्रामध्ये लढत दिलेली आहे. हुंडा बंदी पहिल्यांना माझ्या वडिलांनी ह्या महाराष्ट्रात सुरू केली आहे. (टाळ्या).

१६ वर्षांची पोरगी आणि ७५ वर्षांचा म्हातारा, ज्याला शारदा विवाह म्हणायचे... त्याच्या विरोधात पहिल्यांदा माझ्या बापानी बंड पहिलं महाराष्ट्रात केलेलं आहे. लहान होते... त्या वेळेला शिवसेना, शिवसैनिक वगैरे काही नव्हतं. एकटा माणूस पण भन्नाट... अन्यायाची चीड भयंकर... आईला विचारलं काय? चहा झाला का? आई म्हणे, चहा राहू दे. ते बघ पलीकडे मांडव पडलाय. म्हणे कसला आहे?... लग्नाचा...! म्हणे असेल... लग्नाला मांडव घालतात... नाही तसे नव्हे. अरे १६ वर्षाच्या पोरीशी ७५ वर्षांचा म्हातारा लग्न करतोय... असं? मग...? जातो म्हणे...? बघ रे बाबा सांभाळून... सांभाळून वगैरे... आगपेटी घातली खिशात आणि गेले मांडवापाशी- म्हणे कोण आहे, कुठंय तो थेरडा? कोण तुम्ही...?(मंडपातील लोकांकडून विचारणा) अरे, मी कोणीही असेन...! तो थेरडा कुठंय? लग्न कसं लावतो ते पाहतो... पण तुमचा संबंध काय?... संबंध वगैरे काही नाही. तो थेरडा समोर आणा पहिला...! म्हणे काय कराल?... ते आत्ताच नाही सांगत... करून तर पहा... म्हणाले आत्ता करतो... आगपेटी घेतली अन् मांडव जाळून टाकला. लग्न झालं नाही. ही अशी बंडखोरी केलेले माझे वडील, त्यांचंच आमच्या अंगामधील रक्त. अरे, तुमच्यामध्येसुद्धा आहे... शिवरायांचे नाव घेता तुम्ही आणि काय आपलं मुकाट तोंडी बसता... हे कसं होणार, हे कसं होणार? अरे हट, हे असले हे मावळे मला नाही आवडत. मावळा कसा पाहिजे. आरे म्हटलं की कारे म्हणून खाड्कन ५ बोटं गालफडावर उठवणारा पाहिजे. (टाळ्या आणि प्रेक्षकांमधून घोषणा) जय भवानी... जय शिवाजी...! मला म्हणायचं की, मी महाराष्ट्राचा दौरा कशासाठी करतोय... माझ्याकरता नाही करत... तुमच्यासाठी करतोय... हे दलितांचे प्रश्न आहेत, सुटले का? आज अनेक दलित आज माझे बांधव आहेत. माझे कार्यकर्ते आहेत. माझे नगरसेवक आहेत. अरे भीमशक्ती आणि शिवशक्ती या महाराष्ट्रामध्ये एकत्र झाली तर ना! मी करतो दलिताला महाराष्ट्राचा मुख्यमंत्री. मी करायला तयार आहे... पण जरा तो हुशार पाहिजे, चांगला पाहिजे... नाहीतर आपला आहेच... मी जातपात मानत नाही. शिवसेना जात मानत नाही. तुम्ही ब्राह्मण आहात, तुम्ही कुणबी आहात, तुम्ही मराठा आहात, तुम्ही कोणी असाल महाराष्ट्रात आम्ही मराठी आहोत आणि

हिंदुस्थानामध्ये आम्ही हिंदू आहोत, ही आमची व्यापक भूमिका आहे. आम्हाला पोटजात मान्य नाही. मी कधीच कोणाला जात विचारत नाही. नंतर कळतं हा ह्या जातीचा... हा प्रभू, बामणही आहे, पण खरा मराठा आहे, नंतर कळलं मला... निवडणुकीत कळलं. पण ब्राह्मणांची मतं या मराठ्याला पडू नयेत म्हणून नीच डाव काँग्रेसवाल्यांनी खेळला, तेव्हा आम्हाला कळलं की हा मराठा आहे... तोपर्यंत आम्ही या प्रभूना अक्षरांनी विचारलं नाही. (नक्कल करीत) प्रभू म्हणजे... आपण... म्हणजे... नाही विचारलं. तू मराठी आहेस ना? ठीक आहे... काही खाजवत बसलो नाही मी. या आत्तापर्यंत इतकी लोकं... या औरंगाबादमध्ये दलित नगरसेवक निवडून आलेले आहेत. पण नेतृत्व नसल्याने आज वाकडातिकडा प्रकार होतो आहे. प्रकाश आंबेडकरांना मुंबईमध्ये आम्ही किती मदत केली. जा, प्रकाशला बोलवा इथे... माझ्या वडिलांचे आणि बाबासाहेब आंबेडकरांचे जवळचे संबंध. बाबासाहेब आंबेडकरांना महाराष्ट्र समितीमध्ये आणायला माझे वडील कारणीभूत आहेत. वडिलांनी आणलंय. समर्थांच्या घरी मीटिंग झाली त्यांची. बाबासाहेब आले होते आणि त्यांनी सांगितलं, बाबासाहेब संयुक्त महाराष्ट्रासाठी लढा इथे पेटला असताना तुम्ही कुठे आहात... म्हणे काय करावं केशवराव? तुम्ही आलं पाहिजे!! असं म्हणता...! बाबासाहेब म्हणाले... आलो म्हणे. आलो नाही... मी उद्या जाहीर करतो... करा... मी तुमच्याबरोबर आहे...! हे असं नातं होतं त्यांचं. 'खरा ब्राह्मण' माझ्या वडिलांनी काढलं. पुण्यामध्ये काढलं. त्यामुळे आमच्या घरावर शेणमारा काय... माझ्या वडिलांची जिवंतपणी प्रेतयात्रा काय... मेलेली गाढवं काय...? हे आजच्या पोरांनी मला शिकवू नये. आमचं घराणं त्यामध्ये जाऊन आलंय आणि होरपळून निघालंय. प्रश्न काय येतो इथे, की कोणाच्या नादी लागलात. तुम्ही बाबासाहेबांचे अनुयायी ना? मग एका व्यासपीठावरती बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांच्या बाजूला मस्तान? लोकांनी चिडून उठलं पाहिजे... आम्ही वाट्टेल ते सहन करू पण बाबासाहेबांचा हा अपमान आम्ही सहन करणार नाही. या दृष्टीने तो समाज दिसायला पाहिजे. बरं लावताहेत तुमची आमची... मरताहेत हिंदू-हिंदू... दलित काय आणि शिवसेना काय. धोंडमार तुमच्या आमच्यामध्ये? कशाकरता करता आहात. कुणाकरता करता आहात... इतिहासामध्ये तेच झालं. महाराजांच्या नात्यातले म्हणजे एकदम जवळचे. जिजामातेचे जवळचे भाऊ... लढतायेत खाली... हत्ती पिसाळलेला... सोंड कापली म्हणून दुसरा मराठा चिडला आणि दत्ताजीवरती धावून गेला आणि लढत झाली आणि भाऊ मरून पडला. हे जिजामातेला सहन होत नव्हतं. अरे काय हे चाललंय? कोणासाठी चाललंय?



मराठी मरताहेत आणि सुलतान वरती बसून खदखदा हसतोय. बहोत अच्छा! बहोत अच्छा. हा इतिहास तुम्हाला गिरवायचाय.

मी आपल्याला इशारा देऊ इच्छितो की, जातपात विसरा आणि एकजुटीने महाराष्ट्रात मराठी म्हणून बांधूयात. आणि हिंदुत्वाचा जो मी प्रचार करतोय निवडणुकीसाठी नाहीये... हे आमचे राष्ट्रपती आहेत ना आत्ता नवीन झालेले, भुत्तो मेला... गेले ते पाकिस्तानात. श्रद्धांजली आपल्या देशातर्फे वाहायला... अंगावरती कोट माहितेय का... कपडे तर घालून जावंच लागतं. अंगावरती हिरवा कोट... काय गरज आहे तुम्हाला... जा... आणि तुमचा तो प्रोटोकॉल वगैरे भानगडी असतात, राजकारणात. त्याना श्रद्धांजली वहा... हरकत नाही... हिरवा रंग का? रंगाच्या विरोधात नाही, पण तो पाकिस्तानात का? आता घालताहेत का कुठे हिरवा रंग... आणि मद्रासच्या देवळामध्ये ते गेले असताना त्या पुजाऱ्याने सांगितलं, की तुम्हाला हे कपडे घालून आतमध्ये येता येणार नाही, जरा रेशमी कद-बीद कपडे घालूनच यावं लागेल... रेशमी धोतर नेसावं लागेल... म्हणाला, व्हाट इज धिस... हाऊ कॅन आय, आय ॲम राष्ट्रपती टुडे... अरे लेका, आमच्याच गावचा. आता कपडे बदलायला तयार नाही. चीड आम्हाला इथे येते. या दळभद्री सरकारच्या धोरणामुळे हिंदू मुसलमानांचे दंगे होताहेत ह्या देशामध्ये... पहिलं सरकार जबाबदार आहे. रिडल्सच्या बातम्यांनाही आमचा काही विरोध नव्हता. बाबासाहेबांचे विचार आहेत, जरूर आले पाहिजेत... कोणाचेही विचार कुठेही मारता कामा नयेत, पुस्तकरूपाने छापले गेले. जरूर छापा. खासगी प्रकाशन जर असतं आमचं काहीही म्हणणं नाही. तो त्यांचा अधिकार आहे.

एवढंच कशाला बाबासाहेबांना आम्ही त्या पलीकडेही मानतो. ह्या देशाची फाळणी होत असताना बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या पुस्तकामध्ये महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, पंडित पंत, मौलाना आझाद सगळ्यांना झाडून इशारा दिला होता... की पहा देशाची फाळणी करता आहात... तत्पूर्वी एक करा की तिकडचे जेवढे हिंदू असतील ते इकडे आणा आणि इकडचे जेवढे मुसलमान असतील ते तिकडे पाठवा. मूठभर जरी राहिले तरी डोकेदुखी होऊन बसल्याशिवाय राहणार नाही... हा बाबासाहेबांचा इशारा त्या वेळचा. जरा दलितमुक्तीवाल्यांना जरा विचारा, कोणत्या मार्गाने तुम्ही तुमचा समाज नेत आहात? ज्या बाबासाहेबांनी हा इशारा दिला... देशहिताचा इशारा. धर्म बदलतानासुद्धा बुद्धाला कवटाळलं, पैगंबराला कवटाळलं नाही... हे विसरू नका आपण. पण आज अंदरकी बात निराळी आहे. कालचे (किडकिडीत शरीराची खूण करत) अशे अशे आज असे

असे (जाडे) झाले आहेत...! पोटं सुटली. बेंब्या बाहेर पडल्या. बापाला उद्योग नसल्यागत रात्रीची पोरं खेळत असतात पी-पी-पी... त्याला वाटतं हा मोटरीचा हार्न लावलाय बापानी पोटाला...! त्याला काय माहिती खाऊन खाऊन बाबाची बेंबी बाहेर आली आहे... हे हे धंदे चाललेले आहेत, जनतेला पूर्णपणे फसवताहेत. प्रकाश आंबेडकरांचं आणि आमचं काय भांडण. उलट आम्ही मुंबईला... हे प्रभू इथे बसलेले आहेत, महापौर असताना... प्रकाश आंबेडकरांचा फोन आला, त्यांच्याकडे सफाई कामगारांची युनियन आहे. मला म्हणाले, बाळासाहेब आमच्या हातामध्ये युनियन आहे. आपल्याला ही युनियन मोडून काढायची आहे? कोणाची? जॉर्ज फर्नांडिसची, ती तर मोडायलाच पाहिजे. जार्ज तर आता मोडलाच आहे सगळा पण उरलासुरलासुद्धा मोडून टाकूया. त्यामध्ये प्रकाश आंबेडकर उभे राहिले तरी आम्हाला चालतील पण आम्हाला जॉर्ज फर्नांडिस सहन होणार नाही. ही माझी भूमिका. म्हटलं, बोला काय करायचं? नाही एवढा आम्हाला टक्का मिळून दिलात ना, मग आपली मजबुती होईल... म्हटलं दिला... डॉ. प्रभूंना फोन केला... हे इथे बसलेत, महापौर असताना... म्हटलं डॉक्टर प्रकाश आंबेडकरांची जी युनियन आहे ते जे काही मागताहेत त्याप्रमाणे त्यांना देऊन टाका. डॉक्टरांनी ताबडतोब मान्य केलं आणि सफाई कामगारांना तो टक्का मिळाला. हे आम्ही कोणाकरता केलं? भय्यासाहेब आंबेडकर आणि माझी मैत्री होती. ज्या ज्या वेळेला भय्यासाहेब उभे राहिलेले आहेत निवडणुकीला त्या त्या वेळेला संपूर्ण आमची दोन-तीन मतं जरी असली तरी ती भय्यासाहेबांच्या बाजूने उभी राहायची. हे इथे मनोहर जोशी बसलेले आहेत. वामन महाडिक आलेले नाहीत, पण नवलकर तिथं बसलेले आहेत. ही तीन मतं खास भय्यासाहेबांच्या बाजूने उभी राहायची, आम्ही प्रपोज करायचो. ही सगळी मदत करून तुम्ही आमच्या विरोधात गेला. औरंगाबादची... संभाजीनगरची... निवडणूक आम्ही ज्या वेळेला लढवली, महानगरपालिका पहिल्यांदा झाली म्हणून... मुंबईमध्ये भुजबळ वगैरे या सगळ्या लोकांशी चर्चा झाली. तुम्ही काँग्रेसच्या विरोधात... आम्ही काँग्रेसच्या विरोधात... भले आपलं नाही जमत असेल... बाजूला राहू. पण काँग्रेसला मात्र कुठेही मदत होता कामा नये हे धोरण असलं पाहिजे. तुम्ही काय केलंत, मुंबईमध्ये आणा खाल्ल्या ९०% आम्ही काँग्रेसच्या बरोबर जाणार नाही. आलो तर कदाचित तुमच्याबरोबर पण आम्ही काँग्रेसबरोबर जाणार नाही... आणि औरंगाबादमध्ये ११.३० वा. निर्णय घेतला गेला आणि त्यांच्या तिन्ही उमेदवारांनी, नगरसेवकांनी काँग्रेसच्या बाजूने मतदान केलं आणि त्यांचा महापौर निवडून दिला. का केलंत हे? कशाकरता केलंत हे?



तुम्ही तटस्थ राहिला असता तरी चाललं असतं... ना शिवसेना, ना काँग्रेस... आम्ही तटस्थ... हरकत नाही, तो अभिमान... त्याला साष्टांग दंडवत आम्ही घातला असता. बाबासाहेबांचा नातू का असेना पण अभिमानाने जगतोय. अभिमानाने संपूर्ण समाजाला जगवण्याचा प्रयत्न करतोय, याकरिता आम्ही तुझी पाठ थोपटली असती. पण दगडापेक्षा वीट मऊ. कोणचा दगड, कोणची वीट, आम्ही दगड... मग या दगडाच्या मागे, या धोंड्याच्या मागे लागलात का मुंबईमध्ये? आम्ही नव्हतं ना सांगितलं तुम्हाला की आमच्यावरती शेंदूर टाका आणि देव म्हणा... बिलकूल नाही. आम्हाला धोंडा म्हणूनच जगायचंय. धोंडा म्हणून जगण्यात एक मजा असते. एरवी तो पडलेला असतो इकडे तिकडे. कोणी त्याला विचारत नाही... कुत्र्याखेरीज म्हणा वाटल्यास. पण आंदोलन सुरू झाल्यानंतर एकदा का त्याला हात लागला की त्याला देवपण प्राप्त होतं... त्या धोंड्याला देवपण प्राप्त होतं. मारा, हाणून टाका... ज्याच्या टाळक्यात बसेल त्याला अर्थ धोंड्याचा कळतो... की अरे हा धोंडा नाही हा देव आहे... आपल्या टाळक्यात बसला. हे राजकारण तुम्ही समजून घ्या, आज कोणाबरोबर जाता, हे राजकारण... मुसलमानांनाही सांगेन आम्ही हिंदुत्वाचा प्रचार करणार आणि तो आमच्या हिंदुस्थानमध्ये, तो आमचा जन्मसिद्ध हक्क आहे... आम्ही तो करणारच. तुम्हाला का मिरच्या झोंबतात? पैगंबराचा जन्मदिन झाला. जरूर झाला पाहिजे.. आमचा काही त्याला विरोध नाही, तुमचा तो धर्मगुरू आहे. करा... इतमामानं करा. पण आमच्या मुख्यमंत्र्याला तिथं जाण्याची काय गरज होती? ओपन जीपमध्ये... उघड्या जीपमध्ये उभे राहिलं आमचं धूड... आणि आजूबाजूला सगळे ते आणि काय नमस्कार करताय? (हाताने सलाम करण्याची नक्कल करत) आपल्या संस्काराप्रमाणे आपल्या संस्कृतीप्रमाणे नमस्कार नाही... वा वा वा... मुख्यमंत्री त्यांना सांगताहेत मी कपाळकरंटा आहे, तुमच्यावरती माझं सगळं काही अवलंबून आहे, तुमच्या पाठिंब्याची भीक मागतोय. काही लाज नाही. लज्जा नाही. अरे आमच्यामध्ये आम्ही शिवजयंतीत काढतो त्याला नाही येणार. का? हिंदुत्वाचा उद्या डाग पडला तर करू काय, तो डाग चालेल पण आमचा डाग चालणार नाही. असले हे दळभद्री मराठे. हे दळभद्री, हे राज्यकर्ते, हे सत्ताधारी... स्वाभिमान मारून टाकलेला आहे संपूर्णपणे. अफजलखानाची लढाई झाली हा इतिहास आहे, हे सत्य आहे... कोथळा बाहेर काढला आहे हे सत्य आहे. पण नाही, आता त्या ओळी लिहायच्या नाहीत. का लिहायच्या नाहीत, त्यांच्या भावना दुखावतात. कोणाच्या भावना दुखावतात?... माझ्या महाराजांबरोबर तर खूप कितीतरी मुसलमान

सरदार होते. तोफखान्याचा प्रमुख मुसलमान होता. अविश्वास नाही दाखवला आम्ही त्याला. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेचं नेहमी उदाहरण देतात. कल्याणच्या सुभेदाराची सून जेव्हा महाराजांना नजराणा म्हणून समोर आणली गेली तेव्हा ''अशीच आमची आई असती सुंदर रूपवती; तर आम्हीही सुंदर झालो असतो असे वदले छत्रपती'' मार कानफटात त्या कवीच्या! अरे गधड्या, महाराजांना खुद्द जिजामातेबद्दल एवढा नितांत आदर होता, केवळ त्या मुसलमानीसाठी आपल्या आईचा असा अपमान केला नसता, बिलकूल केला नसता... हे उद्‌गार महाराजांचे नाहीतच, ते कवड्यांचे आहेत. ते कवी... ती रेकॉर्ड फोडून टाका. महाराजांना मुसलमान म्हणून ती बाई नजराणा देण्याची हिंमत नव्हती. अरे, नजरेला नजर भिडवण्याची ज्यांची हिंमत नव्हती, त्यांना नजराणा... आणि तीही मुसलमानांची सून.

बरं ते ठीक आहे. ते मुख्यमंत्री मला वाटतं काल की परवा बीडला गेलेत. मीही बीडला जाणार आहे... आज सभा झाल्यानंतर रातोरात मीही अमरावतीला रवाना होणार. तिथेही उद्या जाहीर सभा आहे. गाडीत बसणार आणि अमरावतीला निघणार. करता काय, गेलं पाहिजे. लोक वाट बघताहेत तिकडे. पण बीडला गेलले आमचे मुख्यमंत्री आणि तिथे लिडबिडले. बिडऽ बिडऽ बिडऽ बिडऽ काहीतरी बोलले. काय बोलले? आज अशा काही सेना उभ्या राहतात की ज्यामुळे महाराजांची बदनामी होतीय त्यांची, त्यांना लांच्छन आहे... आहे... आमच्यामुळे लांछन आहे... आम्ही कोण? नकली शिवाजी, आम्ही कोण तर म्हणे तर गावठी शिवाजी... महाराजांच्या मागे ही विशेषणे लावणारे हे मराठे महाराजांना लांछन आणताहेत. तुमच्याबद्दल महाराजांना अभिमान वाटला असेल नाही रे? काँग्रेस सोडली आणि समाजवादी पक्ष काढला. समाजवादी पक्षामध्ये काही मिळत नाही म्हणून ज्या महाराष्ट्रामध्ये तमाम जनतेला सांगितलं की महाराष्ट्राची अस्मिता, महाराष्ट्राचा अभिमान ह ा
आपल्याला जागवायचा आहे... त्या सगळ्या सत्ताधाऱ्यांनी आज दिल्लीश्वरापुढे लोटांगण घातलं आहे आणि अशा वेळेला तुम्ही काय केलं? तुम्हीही लोटांगणच घातलं. (प्रेक्षकांच्या गर्दीत गदारोळ झालेला पाहून...) काय तेथे गडबड, काहीच नाही. बसा खाली... आणि जर तुम्ही काँग्रेसवाले आले असाल, नसेल परवडत विचार तर जाऊ शकता, कुणी तुम्हाला अडवणार नाही. पण हे विचार तुम्हाला पेलवणारही नाहीत. कारण परसाकडला सुरू झालं तर करता काय? विचारांना ऐकलंत, पटलं, या म्हणून म्हणत नाही. कारण आम्हाला घाण कुणाचीही नको.



आम्ही आहोत ते बरे आहोत. इथे आम्ही शिवाजी महाराजांना आम्ही बदनामी आणत आहोत... अमरावतीबद्दल बघा- जरा थोडी जरा जास्ती झाली असताना हवाई जहाजामध्ये हवाई सुंदरीचा हात पकडणारे रामराव तुमच्या मंत्रिमंडळात आणि महाराजांच्या गप्पा तुम्ही आम्हाला शिकवताय. आम्ही महाराजांना इथे आम्ही ठेवतो ते डेकोरेशन म्हणून नव्हे, देखावा म्हणून नव्हे. त्यांच्या साक्षीने बोलतोय. एका शब्दाने महाराजांचा अपमान आमच्याकडून झाला तर जीभ झडून जाईल आमची. की तुम्ही गद्दारी केली, या लोकांच्या पाठीत वार केला, असा शाप महाराज आम्हाला देतील... म्हणून महाराजांच्या साक्षीने आम्ही हे विचार तुमच्याजवळ मांडत असतो. (पुन्हा सभेमधील झालेल्या भांडणातील गर्दीमधील गदारोळाला उद्देशून...) थंडी वाजू नये म्हणून कोणीतरी नवटाक गरम काहीतरी मारावी लागते आणि मग नशेच्या भरात तो काहीतरी बडबडतो. मग आमच्या शिवसैनिकांना ते आवडत नाही. मी त्यांना सांगतो मारतबिरत बसू नका... सरळ अशा दारुड्यांना पोलिसांच्या ताब्यात द्या. ते बघतील. ते घेतील त्यांचा वास.... (हास्यलोट) शेवटी आम्ही या विचाराने जात आहोत की, महाराजांचा इतिहास... त्या इतिहासावरती तुम्हाला जगता येणार नाही. निर्माण करावा लागेल, तुम्हाला इतिहास निर्माण करावा लागेल... बाबासाहेब आंबेडकर की जय म्हणून तुम्हाला न्याय मिळणार नाही. तुम्हाला बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी म्हणून त्यांच्या नावाला शोभेल अशी पावलं टाकली पाहिजेत. तरच तुम्हाला न्याय मिळेल. छत्रपती शिवाजी महाराज की जय... नाही... नोकरी मिळणार नाही, छोकरी मिळणार नाही, घर मिळणार नाही, काही मिळणार नाही. इतिहास... पुढे न्यायचाय आपल्याला, आणि म्हणून शिवसेनेने प्रस्ताव मांडलेला आहे... कशाकरता आम्ही लढतोय. काय मजा वाटतेय... हार घालताहेत, बरं वाटतंय... कोणीतरी झिंदाबाद करतंय... नाही... मला हार घालू नका, झिंदाबाद करू नका... फक्त भगवा झेंडा या विधानसभेवरती जबरदस्त बहुमताने फडकवा. (प्रचंड जल्लोष). शेतकरी सेना काढतोय. त्यांनी मला सांगितलं, तुम्हाला गरज आहे का? मी म्हटलं मला कुठे गरज आहे. शेतकऱ्यांना गरज आहे. शेतकऱ्यांच्या बिल्ल्यांचे भाव वाढत चाललेले आहेत. पाच रुपयांचा बिल्ला १० रुपयांपर्यंत गेलेला आहे व पैसे जातात कुठे? शेतमजुरांना काय मिळणार आहे? शेतमजुरांचे प्रश्न सुटलेले नाहीत... आणि ज्या वेळी आम्ही तुम्हाला सांगतो की, तुम्ही व्हा... तर नाही व्हायचं? पाठिंबा कोणाला देणार? लायकीच्या प्रमाणे... व्ही. पी. सिंगला पाठिंबा दिला... म्हटलं महाराष्ट्रात आम्हाला द्या... विधानसभेसाठी द्या, लोकसभेसाठी नाही...

शिवसेना लोकसभा लढणार नाही... म्हणे विचार करू आणि आता ते सांगताहेत आम्ही तुमच्याबरोबर येणारच नाही. भारतीय जनता पक्षाला विचारल्यानंतर त्यांच्यामधील हिंदुत्व जागं झालेलं आहे. खास करून मी बाळासाहेब देवरसांना धन्यवाद देतो. की निदान त्यांनी आता समजून काही पावलं टाकायला सुरुवात केली आहे. की कुठेही हिंदूंची मतं विभागता कामा नयेत. हे फार चांगलं लक्षण आहे... देशहिताच्या दृष्टीने खूप चांगलं पाऊल आहे. रिडल्सच्या बाबतीत मी सांगत होतो... आंबेडकरांचा विचार म्हणून आम्ही ह्याला नमस्कार करू. पण सरकारी प्रकाशन म्हणून नाही. रामाबद्दल त्यांनी काढलेले उद्‌गार किंवा लेखन, कृष्णाबद्दल त्यांनी काढलेले एकंदर उद्‌गार का म्हणून आम्ही सहन करायचे? तुम्हाला बुद्ध प्यारा आहे... आम्हाला राम... आम्हाला कृष्ण आहे. कशाकरता जुनं काढायचं आता? गरज आहे का त्याची? मग अशा वेळेला आम्ही रिडल्सला विरोध नाही केला, आम्ही विचारांना विरोध केला नाही. आम्ही सरकारी प्रकाशनाला विरोध केला. बरं तूर्त हे बाजूला ठेवू... लंडनमध्ये कोणीतरी एक बसलेला आहे रशीद नावाचा माणूस. त्यानं एक इंग्रजी पुस्तक लिहिलेलं आहे. सॅटॅनिक व्हर्सेस म्हणून... त्यामधे इस्लामचा त्याने अपमान केलेला आहे. पैगंबरांचा त्यानं अपमान केलेला आहे. कडकडीत लेखन केलेलं आहे. आपल्या देशाशी काही संबंध नाही. इंग्लंडमध्ये छापलेलं आहे पुस्तक. पण शहाबुद्दीननी बुटासिंगना फोन केला. बुटासिंगनी त्यांना विचारलं की आपने ये पढा है।... नहीं मैंने तो पढा नहीं मैंने सुना है।... मग म्हणे, तुम्हाला काय म्हणायचंय... म्हणे पुस्तक जर आपल्या देशात आलं तर मुसलमानांच्या भावना दुखावल्या जातील आणि म्हणे सांगता येत नाही काय होईल ते... असं...!! त्याने राजीव गांधीला फोन केला... म्हणे आत्ता शहाबुद्दीनचा फोन आला होता. त्यांनी असं असं... सांगितलं काय करायचं? बॅन टाका...! त्या पुस्तकावरती सरकारने बंदी टाकली. पुस्तकं कुठूनचं?... लंडनमधलं... लिहिलं कोणी? मुसलमानानेच... कोणावरती लिहिलं इस्लामवरती. मोहम्मद पैगंबरांवरती लिहिलं. मग त्याच्यावर जर बंदी येऊ शकते. तर मग रीडलसारखे हे विचार तुम्ही सरकारी प्रकाशन म्हणून तुम्ही का छापता? तुम्ही का छापलं ते... सरकारनी का छापावं... प्रकाशकांनी छापावं... आम्हाला विरोध काही नाही, ज्याला वाचायचं असेल तो वाचतील... ज्याला नाही वाचायचं ते नाही वाचणार... हा विरोध आमचा आहे. सर्वधर्मसमभाव... प्रत्येक ठिकाणी हिंदूंचा अपमान, प्रत्येक वेळी त्यांच्या मतांची पर्वा, हिंदूंच्या मनांची पर्वा नाही... ना मतांची पर्वा... म्हणून हा दिवस आलेला आहे. आणि हा क्षण घालवला तर... पुन्हा हिंदुत्व या देशामध्ये



उभं राहू शकणार नाही. आज जर ही संधी घालवलीत तर संपलात... कोणी हिंदुत्वाच्या नावाने रडणार नाही... म्हणून आम्हाला हे करावं लागतयं सगळं... निवडणुकांच्या वेळीदेखील इमामशी जेवढी चर्चा होईल... शहाबुद्दीनशी जेवढी चर्चा होईल... तेवढी कोणाशी होते का तुमच्यापैकी... कारण त्यांना माहिती आहे... ही मेंढरं आमच्याबरोबर येणारच. त्यांना सांगा... आता ही मेंढरं राहिलेली नाहीत. त्यांच्यामध्ये वाघाचं रक्त सळसळायला लागलंय. वाघ आहे... अरे, शंभर दिवस शेळ्यांचे आणि मेंढरांचे काढण्यापेक्षा 'एक दिवस वाघाचा काढा, एक दिवस वाघाचा...' बाकी काही नाहीये... हे शरद पवारांना नाही समजणार. त्यांना उबवायची होती फक्त मुख्यमंत्रिपदाची खुर्ची. बाकी काही नाही... आता वसंतदादा बंड करायला उभे राहिलेले आहेत. आनंदाची गोष्ट आहे. दादा बाहेर या, काँग्रेसमधून... शिवसेनेत नाही आलात तरी चालेल पण काँग्रेसमध्ये लाचारी करू नका. मिंधेपणा करू नका. अहो, शंकरराव चव्हाण जेव्हा राज्याचे आणीबाणीच्या वेळेला मुख्यमंत्री होते... तेव्हा काय करावं? डोळ्यांनी पाहिलेले प्रकार आहेत. मनोहर जोशी तर जवळच होते त्या वेळेला... सभेला गेले होते... संजय गांधी आले होते. सभा झाल्यानंतर आमच्या महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या पांढऱ्या सफेत चपला उचलून खाली वाकून त्यांच्या पायाशी ठेवल्या. आहे का, पसंत आहे का तुम्हा मराठ्यांना? तुमचा मुख्यमंत्री वाकला चपला उचलण्यासाठी? कोणासाठी? संजय गांधीसाठी...? किती शरमेची गोष्ट आहे. अरे तुम्ही वडीलधारे. हे कालचं पोरं, असेल पंतप्रधानांचा पोरगा, म्हणून इतकं वाकायचं? ही चीड आहे आम्हाला. माझ्या महाराष्ट्र राज्याचा... तो अभयसिंह भोसले... मंत्रिमंडळामध्ये बसलेले आहेत. महाराजांच्या वंशामधले... अरे भोसले असे पाहिजेत की मंत्रिमंडळ निवडून आल्यानंतर त्या गादीला मुजरा करायला तिथे गेले पाहिजे तर हाच तिकडे जाऊन बसलाय. कोनतं बी द्या, काही बी द्या... अगदीच काही नसलं तरी दारू खातं द्या, न पिता बसेन... किती नालायक आणि कसली माणसं जन्माला आलेली आहेत. हा महाराष्ट्र, शिवरायांचा महाराष्ट्र, जोतीबा फुल्यांचा महाराष्ट्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महाराष्ट्र, शाहू महाराजांचा हा महाराष्ट्र... किती नावं पाहिजेत? बाजीप्रभूंचा हा महाराष्ट्र आणि इतका लाचार इतका मिंधा. हा मिंधेपणा आणि लाचारी सोडण्याकरता आम्ही घसा फोडतो आहोत, की बाबा रे, उठा आता, एक निराळी वेळ आली आहे. अशा वेळेला स्वाभिमानाने आपली जी अस्मिता आहे ती जगवायची आहे... ती टिकवायची आहे... नाही तर मला अशा गमतीजमती पुष्कळ यायच्या हो... कसले मुख्यमंत्री?

माझे काही खास किस्से आहेत, ते मुद्दाम तुम्हाला सांगतो...  मुख्यमंत्र्याला आता काडीमात्र किंमत राहिलेली नाही. हे महापौर जसे एक एक वर्षांचे तसे. एक खास किस्सा असा माझा... एकदा त्या शिपायाचं आणि मुख्यमंत्र्यांचं भांडणं लागलं सचिवालयामध्ये, मंत्रालयात... साधा शिपाई मुख्यमंत्र्याला आई-माईवरून शिव्या देतो... साल्या खाली ये, तुला बघतो, तू काय समजतो? तुला नाही हे केला, तुला नाही ते केला तर मी नावाचा हा नाही तो नाही, अमुक नाही तमुक नाही, सखाराम नाही वगैरे वगैरे... शहाणी माणसं होती, कोणीतरी गेली... ये येड्या करतोस काय? मुख्यमंत्री आहेत, तू शिपाई आहेस. सही केली तर नोकरी जाईल... अरे जा जा, साला टेंपररी माणूस परमनंट माणसाला काय धक्का लावेल... हे खरं आहे की नाही? मार्च आणि एप्रिलच्या नंतर शरद पवार राहतात की नाही बघूया की... झालंय सुरू, त्यांच्या मागे लागलंय झेंगाट... अरे हे गांधी घराणं असं आहे की, त्यांनी देशाची वाट लावलेली आहे. नेहरूंना मुसलमानांचा पुळका, इंदिरा गांधींना तेच... ही काही पानाची गादी आहे का, की बाप मेल्यानंतर पोरगा... पोरगा मेल्यानंतर त्याचा पोरगा... त्यांच्यानंतर त्याचा पोरगा. ही पंतप्रधानांची गादी आहे. लायक माणसं बसू द्या! काय असेल ते आम्हाला द्या. आम्हाला चांगला कारभार पाहिजे, आम्हाला शासन पाहिजे... हे पोलिसही रडताहेत. आम्हाला मारतात, पण रडतात... त्या पोलिसांना सांगू इच्छितो... या पोराला जर उद्या काही त्याने गुन्हा केला तर नालबंद्या, फटके, त्याला अपंग करू नका, त्याला हात लावू नका, त्याला रक्तबंबाळ करू नका... त्याला अपंग तर नक्कीच करू नका... काही केलं असेल, बेकारीच्या पोटी कदाचित तो गुन्हा असेल... पण केला तर त्याला सांगा, समजून सांगा... अरे तुझी आई कोण? तुझे वडील कोण? तू कसा? तुझं घराणं काय? असलं नसलं काही तरी त्याला प्रेमाने जवळ करा. समजून सांगा!... जे खलिस्तानवादी तेथे उभे राहिलेले आहेत आणि पाकिस्तानी मुसलमान या देशामध्ये जो हैदोस घालताहेत, छुपा हैदोस त्यांचा चालू आहे. महंमद पैगंबरांच्या जन्मदिनी माहीमकडे जाणाऱ्या ट्रकमधून ज्या घोषणा दिल्या जात होत्या त्या तुमच्या कानाने तुम्ही ऐका... मी ऐकलेल्या आहेत. तुम्ही ऐका... घोषणा कोणती? हिंदुस्थान में रेहना होगा, तो हमसे लढना होगा. तुमच्या बापाची काय जायदाद आहे?

हा हिंदुस्थान आमचा आहे आणि रेहना होगा हे सांगण्याचा अधिकार आमचा आहे, तुमचा नाहीये. आम्ही पाकिस्तानात नाही राहत. आमचं भांडण पाकधार्जिण्या मुसलमानांच्या विरुद्ध आहे. अरे, या महाराष्ट्राला मुसलमानांनी ओळखू नये?



कोणत्याही राज्यामध्ये दुसऱ्या जातीचा मुख्यमंत्री आजपर्यंत मुसलमान झालेला नाहीये, पण महाराष्ट्र राज्याने अंतुलेंसारखा मुसलमान मुख्यमंत्री म्हणून स्वीकारलेला आहे... हे तुम्ही विसरता? आमच्या मुळावर येता? आमच्याशी वैर? आणि पुन्हा ही घोषणा? म्हणजे महाराष्ट्र तर राहिला बाजूला, हिंदुस्थानच्या बाबतीत जर तुमची ही घोषणा... नारेबाजी असेल की, हमसे लढना होगा, आमची तयारी आहे. पोलिस बाजूला काढा, घोषणा देऊन बघा... (टाळ्या). परत घोषणा देण्यासाठी जिवंत राहणार नाहीत तुम्ही. बिलकूल नाही... आणि म्हणून पोलिसांना एक नम्र विनंती करायचीय की दाबाखाली कामं करू नका. वरून दाब आला.... आला असेल... खालून दाब आणण्याचंसुद्धा आमच्याकडे तंत्र आहे. फक्त चिंता एवढीच की तुमचं काय होईल... वरून दाब, खालून दाब, तुमचं सँडविच होईल... तुम्ही स्वायत्त आहात, स्वतंत्र आहात... सांगा सरकारला... जो न्याय असेल तोच आम्ही करू... शिवसैनिक जर चुकला तर त्याला आम्ही क्षमा करणार नाही, आणि तुमचा काँग्रेसवाला जरी चुकला तरी त्यालाही क्षमा केली जाणार नाही. कारण आम्ही काही पक्षाचे चार आणे मेंबर नाहीये. आम्ही स्वतंत्र आहोत, आहे... अगदी काय म्हणतात पब्लिक सर्व्हंट वगैरे वगैरे... पण तुम्ही पहिल्यांदा लोकांचे आहात. तुम्ही जनतेसाठी आहात. जनतेला न्याय मिळवण्यासाठी तुमचा दरवाजा ठोठावायचा नाही तर कोणाचा ठोठावायचा? आणि दार ठोठावायला आल्यानंतर तुम्ही आमच्यावरच अन्याय करणार? पण जर हा उद्या तरुण लुळा-पांगळा केलात आणि ते खलिस्तानवादी उद्या अंगावर आले, किंवा पाकधार्जिणे मुसलमान अंगावरती आले, त्यांच्या हातामध्ये शस्त्र आहे, तुमच्या हातामध्ये काय आहे?... तुमच्या हातामध्ये काय आहे...? शंकराचार्य म्हणाले होते... सगळ्या प्रार्थनास्थळांची म्हणे झडती घ्या. मी म्हटले घ्या... आमची तयारी आहे. चर्चमध्ये काही मिळेल असे वाटत नाही, कारण त्यांचं फार हुशारीनं, धूर्तपणानं चाललेलं असतं... मशिदीमध्ये निश्चित काहीतरी मिळेल. कारण ज्या वेळा धाडी पडल्या तेव्हा मिळालं होतं. आमच्याकडे देवळात काय मिळणार, घंटा? (हास्यलोट)... तुम्ही हसलात की माझी पंचाईत होते. मी देवळातली घंटा बोललो. तुम्ही... काय तुमच्या डोक्यात काय आहे कळत नाही. (हास्यलोट). म्हणून हा ठाकरे वाईट म्हणतात लोकं. दोन दोन अर्थ घेता तुम्ही...! मी काय दादा कोंडके आहे का...? मी आपली देवळातली घंटा बोललो. तुम्ही काय भलताच अर्थ घेताय. असो...

हा नेभळटपणा आता चालणार नाही. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री असताना

मला भेटले तेव्हा मला म्हणाले, म्हणे तुम्ही लोकांना चिथवता... म्हटलं काय चिथवतो शंकररावजी?... तुम्ही म्हणे हातामध्ये शस्त्र घ्यायला लावता... म्हटलं नाही... मी हातात शस्त्र घ्यायला सांगत नाही त्यांना... काय म्हणतो मी... तुमचा कायदा आमच्या जीविताचं रक्षण करू शकणार नाही, आणि जर कायदा जीविताचं रक्षण करू शकणार नसेल तर आम्ही काय करायचं? ढेकणासारखं मरून जायचं?... नाही... जमणार नाही... शिवरायाच्या मराठ्यांना ते जमणार नाही... त्यांनी जर नमस्कार केला तर आम्ही नमस्कार करू, त्यांनी गळ्यात हार घातला तर त्यांना आम्ही हारच घालू... पण त्यांनी हातामध्ये स्टेनगन घेतली तर आम्हालाही स्टेनगन घ्यावी लागेल. (टाळ्या, जल्लोष). तलवारीचे दिवस गेले. शस्त्रं बदलली, गुरू बदलले. आणि आम्ही मात्र तेच भजन करत बसायचं? ग्यानबा तुकाराम, ग्यानबा तुकाराम!... जमणार नाही... इतपर्यंत षंढपणा आमच्या रक्तात नाही. असा नेभळटपणा आता कुठेही... राजकारणात नाही, समाजकारणातसुद्धा चालणार नाही. म्हणून मी हिंदूंना जागं करतोय... मारामारी करण्यासाठी नाही... सरकारचे रिपोर्ट्स पाहा, सरकारने जी समिती नेमली तिचे रिपोर्टस् आलेले आहेत... जुन्या रिपोर्टप्रमाणे २२ दंगली या देशात झाल्या... त्यापैकी २० मुसलमानांनी केलेल्या आहेत आणि दोन हिंदूंकडून झालेल्या आहेत. काय प्रमाण आहे हे? कशाकरता आम्ही दंगली करायच्या? दंगलीमुळे मिळणार काय कुणाचं? नेते जातात पेटवून... मरते मात्र सामान्य जनता. हे धंदे आमचे नाहीयेत... या बाबांनो, विश्वासाने करू. जात कुठची का असेना, मुसलमान असाल, कोणी असाल, आम्ही हिंदुत्वाचा झेंडा हातात घेतल्यानंतर तुम्हाला अंगाला काही मुंग्या यायची गरज नाही. तुम्हाला तुमच्या धर्माचा अभिमान आहे; आम्हाला असता काम नये? कोणच्या गावचा नियम? सर्वधर्मसमभाव मी मानत नाही. पहिल्यांदा या देशामध्ये हिंदू धर्माचा मान राखला गेला पाहिजे आणि मग सगळ्या धर्मांचा मान आम्ही राखायला तयार आहोत. (टाळ्या). जा... मशिदीमध्ये जा, नमाज पढा, पण वाढवू नका. रस्त्यावर येऊन लोकांची गैरसोय करू नका. तुम्ही कोणी असाल, ख्रिश्चन असाल... जा चर्चमध्ये जा. त्याचं तर फार सुंदर चाललेलं असतं, हे आपल्यासारखं नसतं. अगदी धीरगंभीरतेनं प्रसन्न वातावरण असतं. काही चांगल्या गोष्टी आहेत, त्या चांगल्या म्हणाल्याच पाहिजेत. प्रतापगडावरती अफझलखानाची कबर आहे आणि तिथे शिवरायांचा पुतळापण आहे. शिवरायांच्या पुतळ्याकडे कोणी बघत नाही पण ती अफझलखानाची कबर बघा... नेहमी व्हाईट वॉश केलेला असतो... आतमध्ये धूप सोडलेला असतो, मोरपिसं लावलेली असतात. चांगलं ते चांगलं... तुमचं जे



चांगलं असेल ते आम्ही चांगलंच म्हणू. मात्र या देशाच्या मुळावर जर याल तर मात्र ते कदापी सहन केलं जाणार नाही, आणि तुम्हाला हिंदू म्हणून जगा म्हणून सांगत नाही पण तुम्हाला हिंदुस्थानी म्हणून जगायला कोणती हरकत नसावी. मुळात आम्ही हिंदुस्थानी आहोत, हा देश आमचा आहे. पण क्रिकेटच्या मॅचमध्ये पाकिस्तानचा विजय झाला आणि हिंदुस्थानचा पराभव झाल्यानंतर, कुठे जल्लोष कराल, मटण सॅण्डविच, मटण सामोसे, चहा, रेडिओला हार घालाल, तर जमणार नाही... हात छाटून टाकू, हात छाटून टाकू... (टाळ्या) गद्दाराची औलाद या मातीमध्ये आम्ही कदापी उगवू देणार नाही, उबवू देणार नाही. कोंबसुद्धा फुटवू देणार नाही आणि एवढा प्रखर विचार देणारा कोण आहे आज माय का लाल! सांगा ना मला, आम्ही देतोय... कोणासाठी देतोय? आमच्यासाठी?... देशहितासाठी... २६ जानेवारीला तिरंगा फडकावला, १५ ऑगस्टला तिरंगा फडकावला, झालं... समाधान झालं... काय झालं? तिरंगा फडकला पण खाली काय? खाली उंदीर लागलेत. कोसळला तर एका फटक्यात कोसळेल आणि त्याची जाणीव मी माझ्या सर्व समाजाला देतोय. की बाबांनो, जागे राहा, देश कोणाचा नाही. मीसुद्धा मराठी मराठी करतो, पण त्या वेळेला इतरांचा द्वेष करीत नाही. अरे, पण आमच्या राज्यात आम्हाला जगू द्या... ह्या तरुण पोरांना जर आमच्या राज्यामध्ये नोकऱ्या मिळणार नसतील तर मिळणार कुठच्या राज्यात? बरं देवाणघेवाण असेल मग काही हरकत नाही. इकडूनचे तिकडे गेलेले आहेत... तिकडूनचे इकडे आलेले आहेत.

कित्येक झोपड्या वाढताहेत... काही रस्त्यावरती यायला लागलेल्या आहेत. मुंबई महानगरपालिका आमच्या हातात... पण छळवाद असा की सरकार मुद्दाम आयुक्ताना सांगतेय की शिवसेना जे जे करेल त्याच्या विरोधात पावलं टाका... आम्ही सांगितलं फुटपाथवरच्या झोपड्या हटवा. नाही हटवायच्या... का तर म्हणे त्यांना नोटीस द्यावी लागते. मग त्या नोटीसंच पोटीस द्यावं लागतं... त्यानंतर कोर्टामध्ये जावं लागतं... अरे कसल्या?... फुटपाथवर ते आलेत... हेच बेकायदेशीर आहे ना? अरे फुटपाथवरनं चालायचा हक्क तुमचा आहे... आणि अशा वेळेला ते हक्क बेकायदेशीररीत्या जर करून टाकणार असाल... आता आमचे बोर्ड हायवेला, रस्त्याला दिसतात, मुंबईमध्ये दिसतात... कलेक्टर येऊन आम्हाला म्हणतात, बोर्ड काढा.. बोर्ड काढा... अरे पण का? नियम आहे का काही? काही घटनेमध्ये नियम दिलाय का, की बोर्ड लावायचे नाहीत... तसा नियम असेल तर आम्ही बोर्ड काढू... तुम्ही काढू नका... पण आता काँग्रेसवाल्यांचे बोर्ड लागलेत... आमचे

बोर्ड काढून जर काँग्रेसवाल्यांचे बोर्ड महामार्गावरती राहणार असतील तर हा कायदा आम्ही मान्य करणार नाही... आणि जर कलेक्टर, इतर काही अधिकारी जबरदस्तीने, बेकायदेशीररीत्या अन्यायानं जर आपले बोर्ड काढू लागले तर काँग्रेसचे बोर्ड काढून फेकून द्या... डांबर लावून टाका... डांबर...(टाळ्या). आम्हाला न्याय पाहिजे. त्यांचा ठेवा... आमचा ठेवा... आमचा काढला तर त्यांचाही गेला पाहिजे. ह्यापेक्षा काय? ह्यापेक्षा काय? हा न्याय झाला की नाही? ही लोकशाही... सर्वांना न्याय एक. काँग्रेसच्या धेंडांना एक, शिवसेनेला एक, नाही चालणार. गुंड तो गुंड. गुंडाला जात नसते... आणि अशातऱ्हेने विचार देणारी शिवसेना, इतक्या परखडपणानं, स्पष्टपणानं आपले विचार मानणारी शिवसेना... त्याला खतम करता तुम्ही...

निवडणुकीच्या वेळेला घोळ करता... विचार ऐकता आणि दुसरं कोणी आलं की त्याच्या मागे लागता... आता नाही... बायांनो तुम्हाला तर खास सांगतो... तुमच्यावरती तर लोकशाही फार अवलंबून आहे... यापुढे जर माझे विचार पटले तर तुमच्या यजमानांना सांगा... की कोणाचंही भाषण ऐकलं तरी बाळासाहेबांचे जे विचार ऐकले त्यामध्ये आम्ही बदल करणार नाही आणि निवडणुका केव्हाही येऊ द्या... आमचं मत शिवसेनेला, शिवसेनेला, आणि शिवसेनेलाच! (प्रचंड टाळ्या, जल्लोष) का! तर यामध्ये आमच्या उद्याच्या पिढ्या... त्यांचा उद्या उत्कर्ष होणार आहे. म्हणून एवढंच नम्रपणाने सांगेन, या मैदानात इतर कोणीही आलं आणि शिवसेनेचा हा विचार तुम्हाला पटलेला असला आणि पटला... तर आणि तरच... शिवसेनेचा भगवा झेंडा, शिवरायांचा भगवा झेंडा, महाराष्ट्राच्या विधान भवनावरती जबरदस्त बहुमताने असा फडकवा की जेणेकरून पिढ्यान्पिढ्या उत्कर्षामध्ये जगतील.

जयहिंद...! जय महाराष्ट्र...!



# १० एप्रिल २००२ शिर्डीमधील भाषण – बाळासाहेब ठाकरे

बाळासाहेब ठाकरे भाषण करण्यासाठी उभे राहताना प्रेक्षकांमधून घोषणा (हिंदुहृदयसम्राट, शिवसेना प्रमुख, सरसेनापती, श्रीमंत श्री बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो.)

जमलेल्या माझ्या तमाम बंधू भगिनी व बांधवांनो...(जल्लोष, टाळ्यांचा कडकडाट आणि घोषणा)

दत्ताजी साळवी नगरामध्ये अपार कष्ट घेतले. ते पुत्रपौत्र बाळकृष्ण भिडे पाटील आणि त्याचे पुत्र रामरमण यांनी खूप मेहनत घेतली. मदतीला आम्ही होतोच. म्हणजे सगळे शिवसैनिक नेते वगैरे होते. आणि तुमचा आशीर्वाद यापेक्षा जास्त आमच्याकडे काय भांडवल. बरेच मार्गदर्शन झालेले आहे. निर्णय कायदेविषयी वगैरे वगैरे, फक्त भीती एवढीच वाटते की मी पीठ तर दळत बसणार नाही ना? दाणे दाणे भरडले आणि पीठ घालून मी काय भरडत बसू. पण विषय असतात; कोण नाही कोण आपल्याला बातम्या पुरवत असतात आणि हा जो सगळा एकंदर डोलारा आहे, सर्वांनाच सांभाळायचा आहे, तुम्हाला विशेष करून सांभाळायचा आहे. देशाबद्दल बोलू का... महाराष्ट्राबद्दल बोलू? महाराष्ट्राबद्दलही बोललं पाहिजे. आघाडी... आघाडी... आघाडी... इतकी बिघाडी झालीय; ही पिछाडीच चाललीय. पुढे जातच नाही, पण खूश आहे. त्यांना एक निश्चित माहिती आहे की हे काय आपल्याला पाडत नाही आणि पाडू शकत नाहीत आणि पडायची वेळ आली की आपण एकजुटीने राहायचे. निदान खायला तरी मिळते आणि याच उद्देशाने एकजूट आहेत. यापेक्षा काही नाही. फक्त पैसा.... त्यामुळे सगळी कामे रेंगाळली आहेत आणि अशा वेळेला लोकशाही, लोकशाही नावाचा जो काही ढंडुरा पिटता? हा ढंडुरा आता बस झाला. या काय लोकशाहीने तुमचे प्रश्न सुटणार नाहीत आणि सुटले असते तर शेतकरी, कामगार वर्ग एवढे मध्यमवर्गीय जेवढे समाजामधले थर आहेत, त्यात कुठला थर सुखी आहे, हे मला दाखवा. सगळे रडताहेत आणि बोंबा मारतात. दोन हात कमी पडताहेत म्हणून नाहीतर सगळ्या हातांनी बोंब मारली असती. मग कशाकरता सहन करायचे? याबाबत माझे एक भाकीत आहे. ज्या वेळी मी काही बोलून जातो पटकन् आणि माघार घेत नाही. त्या वेळी ते होतेच. पाकिस्तानशी युद्ध होईल तेव्हा होईल, कारण आपण कधी

युद्धाला जातच नाही, आपण करतच नाही, कारण आपण शस्त्रसंधीवाले... पाकिस्तानशी युद्ध होईल तेव्हा होईल, पण देशामध्ये पहिल्यांदा यादवी युद्ध होणार यांची बीज वाटे पेरली गेलेली आहेत. हे मुसलमानाचे उठाव काय सांगताहेत. इकडे असंख्य शिवसेनेचे मुसलमान बांधव आले असतील, पण प्रत्येक वेळी सहानुभूतीची भाषा आम्ही बोलायची आणि त्यांनी मात्र टर्रेबाजीने आमच्याशी वागायचे. तू तुझे दात दाखव, मी माझे दात दाखवतो. विचार करा आपला शत्रू नक्की तो कोण, मी म्हणेन मुसलमानांपेक्षा हिंदूच हिंदूंचे शत्रू आहेत. आमचीच माणसे आम्हाला प्रश्न विचारताहेत, खेचताहेत. अनेक वेळेला मी सांगितलं, अहो गोध्रा, गोध्रा... आता सगळं झालं. आता गोधऱ्याकडे दुर्लक्ष करायचं... आणि अहमदाबादमध्ये काय चाललंय त्याच्याकडे टवकारून पाहायचं. सर्व कॅमेरे मोदींवर, गेलेच पाहिजेत, मोदी गेलेच पाहिजेत असे म्हणतात म्हणे. हे राजकारण जे आहे त्याचे आपण बळी आहोत, त्याला म्हणतात लोकशाही... आता गोधऱ्याला झालं आहे असं धरून चाला. तेव्हा अहमदाबादला म्हणतात रिॲक्शन आली. तुमच्या कोणी कानफाडात दिली म्हणून तुम्ही म्हणता का, काय बाबा, काय मस्त कानफाडात दिली. इतका भुळसटपणा बरा नाही. तिथं पटकन् आपला खाडकन् आवाज आला पाहिजे, तो शिवसैनिक! कारण, नुसतं टाळ्या वाजवण्यासाठी हात नकोत, तो कानफाडात मारण्यासाठीसुद्धा तयार ठेवा... आणि मी असं म्हणतोय यांनी अहमदाबादला एवढं महत्त्व दिलं, रिॲक्शन म्हणून लक्ष दिलं आणि गोधऱ्याकडे दुर्लक्ष केलं. उलटा प्रकार झाला असता तर त्या डब्यामध्ये मुसलमानी संपूर्ण असते तर सगळी राख केली असती तर मग गोध्रा... गोध्रा...

रिॲक्शनला महत्त्व दिलं गेलं. गोधऱ्याला नाही. मग गोधऱ्याची रिॲक्शन तुम्ही मानणार नसणार; तर मग अयोध्यामध्ये तुमची बाबरी मशीद पडली तर त्याची रिॲक्शन मुंबईत का?... त्याची रिॲक्शन मुंबईत कशी आली? मुसलमानांनी दंगल केली ना? मग गोधऱ्याला जसं महत्त्व देता तसं तुम्ही कशाला देता? तिकडं दुर्लक्ष आणि बाबरीकडं लक्ष. बाबरी मशीदवर लक्ष दिलं गेलं तसं गोधऱ्यालासुद्धा महत्त्व दिलं पाहिजे. श्रीकृष्ण आयोगामध्ये हा प्रश्न चर्चेस आला. तेव्हा इकडं म्हटले जस्ट रिॲक्शन. म्हणून तेच म्हटलं गोधऱ्याला रिॲक्शन होती. ही रिॲक्शन तुम्हाला मान्य करावी लागेल. त्या वाजपेयींनी चांगली घेतली त्या सोनिया गांधीला (हास्यलोट), हिंदी वाचून वाचून वाचते... काल-परवाची बाई ती परदेशातून आली आणि वाजपेयींना शिकवते. तेव्हा वाजपेयींनी सांगितले मी १९६० पासून या सेवासदनाचा सेवक आहे. सोनिया गांधींनी मला धडे शिकवण्याची गरज नाही. मग बाहेरची बाजू घ्यायला लागले. वाजपेयींना हे शोभलं नाही, अरे एवढ्या वडीलधाऱ्या माणसांचा ती बाई



अपमान करते आणि तीपण इटलीची, आणि हे आम्ही सहन करायचं, छे! छे!... (नकार देत) हा स्वाभिमान... तुमचा जोपर्यंत जिवंत राहील तेव्हा या देशाला चांगले दिवस येतील, नाहीतर नाही. सगळं रसातळाला चाललंय, बिघडलयं, मी बाजूही घेतो आणि टीकाही करतो. तो एक पत्रकार चावला. त्यांनी मला प्रश्न विचारला, 'आप को हिंदुत्व का अभिमानही है। मी म्हटलं, हो. मैं कडवा हिंदू हूँ। हलकट हिंदू हूँ।' पत्रकारांनी विचारलं, 'आपको क्या चाहिए।' म्हणालो, 'मुझे हिंदू राष्ट्र चाहिए।' कोणाची परवानगी घ्यायची. हे हिंदूंचे राष्ट्र आहे. हिंदुस्थानात हिंदू नसतील तर काय पाकिस्तानी असतील. (जल्लोष, टाळ्या, घोषणा.)

सगळेजण खास करून हिंदूच हलकटपणे प्रश्न विचारत असतात. मला असे वाटते यांच्या रक्तात भेसळ झाली की काय? काय क्रॉसब्रीड आहे की काय? फार वाईट गोष्ट आहे. रघुनाथ मंदिराच्या तिथे काल-परवा ८ ते १० माणसं मारली गेली. आरडाओरडा कुठं झाली नाही. बोंबाबोंब झाली नाही (उपहासात्मक स्वरूपात) तर कायऽऽ हिंदू मारले गेले. (गाण्यामध्ये हिंदू मरण्यासाठी जन्म आपुला, मरण्यासाठी जन्म आपुला) असे भजन म्हणत माणसे बसलीत. रघुनाथ मंदिराबद्दल एकानेही एक अवाक्षरही काढलेलं नाही. कुठं गेले तुमचे भंपक साले, निधर्मवादी? न्याय हा एकच असला पाहिजे. न्यायाच्या फूटपट्ट्या वेगवेगळ्या असून चालणार नाहीत. मुसलमानांसाठी एक, ख्रिश्चनांसाठी एक असे चालणार नाही.

आज एका पानावर आले आहे, कोर्टाने एकाला दंड केला आहे. दंड का केला? तर त्यांनी अपील केलं म्हणे, हे अपील रस्त्यावरच्या नमाजाला नकार दिला म्हणून... लगेच १०,००० दंड. मग तो म्हणाला, रस्त्यावरती नमाज करताहेत, प्लॅटफॉर्मवरती नमाज करताहेत; आमची पंचाईत होते. हे रेल्वे प्लॅटफॉर्मवर नमाज काय, रस्त्यावर काय आणि आमच्या महाआरत्या तुम्ही बंद करताहात. सगळी दांडकी बसताहेत ती आमच्याच टाळक्यात आणि आमच्या कंबरड्यात बसताहेत. न्यायमूर्तींनी १०,००० चा दंड केला तर फिर्यादी उभा राहून बोलायला लागला, तर न्यायाधीश म्हणाले... जास्त बोललास तर आणखीन १०,००० दंड वाढवीन. काय न्याय? आम्ही सहन करायचं?? लाज वाटते या जगण्याची. न्यायमूर्तींचा तरी हा काय हट्ट असावा. सांगतोय ते गैर आहे काय? अरे, त्याचा निवाडा तरी करा! शेवटी १०,००० रु. भरले, बिचारा समाजकार्य करायला गेला आणि त्याच्याच अंगलट आलं. त्या समाजकार्याला १०,०००/- रु. मोजावे लागले... याची चीड आली पाहिजे... अशी चीड कलकी महाराजाला आली. लोकमतवाले होते. धरला, धोपटला, मारला आणि दात तोडला, हेच स्पिरिट असावं. हेच स्पिरिट

तुमच्या आमच्यात असावं आणि हेच स्पिरिट फक्त शिवसैनिकांमध्ये आहे आणि ते मी केलंय निर्माण याचा मला अभिमान आहे.

बाबासाहेब आंबेडकरांनी गॅजेटचा आधार घेऊन मस्त पुस्तक छापलं आहे. त्या पुस्तकात सगळं दलितांचं आहे. स्वत:च्याविषयी काहीही नाही त्याच्यात. त्या पुस्तकात शेवटच्या पानावर एक वाक्य आहे. ही जी घटना तयार झालेली आहे ती मला मुळीच मान्य नाही. मी त्याबद्दल एवढा खूश नाही आणि तशीच जर वेळ आली तर... बाबासाहेब आंबेडकरांचे वाक्य आहे... आणि अशीच जर ही वेळ आली तर मी ही घटना जाळून टाकीन, स्वत:च्या हातांनी जाळून टाकीन... हे बाबासाहेब बोलताहेत आणि त्यांनाच तुम्ही भरडताय आणि म्हणून मी जाणार आहे – १४ तारखेला पुण्याला. विवेकानंदांची जन्मशताब्दी आहे. कोणालाही माहीत नाही. तिथं सांगणार विवेकानंद विसरा. संपूर्ण देशभर अविवेकानंद पसरले आहे. विवेकच नाही राहिला कुठे, काय पूजताय तुम्ही त्या विवेकानंदांना. प्रशिक्षण म्हणतात, कसलं प्रशिक्षण? तुमचं रक्त सळसळायला लागलंय आणि सळसळतंच राहायला पाहिजे. कोणासाठी चाललंय सगळं? यात माझा काय स्वार्थ आहे? मला काही कमवायचं नाही. मला ते तुमचे जयजयकार नको आहेत? हार, टिळा, माळा काही नको आहे? मी फक्त माझ्या हिंदूला जिवंत ठेवा, रसरशीत ठेवा, आणि कोणी त्यांच्याकडे डोळे वटारून पाहणार नाही असे करा, असं सांगतोय. त्या रात्री कल्याणला दंगल झाली. कशाकरता केली? सुरा भोसकाभोसकी, जाळपोळ वगैरे वगैरे चालू होते. तिथे लगेच रॅपिड स्क्वॉड आले, फोर्स आले आणि फोर्सनी फैरी झाडल्या हवेत. चालऽऽलयं ऽऽ खाली आणि फैरी वरती. बरं वरती काय त्या गोळ्या? हे जे जखमी पडलेत ते काय तुमच्या वरच्या गोळ्यांनी पडलेत का? कायदा असा पाहिजे की ज्यांनी सुरुवात केली त्यांना पकडलं पाहिजे. त्या त्यागी नावाच्या पोलिसावर खुनाचा आरोप. कोण पोलिस धजवणार यापुढे? पोलिस म्हणतील, 'च्या आयला, मरेनात का तुम्ही सारे. घाला तुमच्या त्या साऱ्या बंदुका ह्याच्यामध्ये (हास्यलोट)... कोठारामध्ये. बंदुका देऊन काय उपयोग? उद्या तुम्ही सैन्यांवर आरोप कराल, बाबा रे, किती मारले? जवान म्हणतोय, साहेब आज पंचवीस मारले. न्यायाधीश म्हणतात, ''काय पंचवीस''... तुला कितीचा कोटा आहे? च्या आयला, युद्धात कोटा असतो का हो? दिसला शत्रू की मार गोळी, दिसला शत्रू की मार गोळी... (जल्लोष). मला वाटते कोणाची परवानगी घ्यायची गरज नाही आणि कोणी त्या भानगडीतही पडू नये. ही जी एकंदर भाषा बोलली तरच ते शांत बसतील आणि नवीन एक आणखीन लफडं आलंय हिंदूंचं. त्या अयोध्येवर बसलेले सगळे हिंदूच पण सगळी दरिद्री माणसं. आयोग कशाला, तुमच्या घटनेमध्ये



दुरुस्त्या करण्यासाठी? दुरुस्ती कोणती?... आग लावायची आणि शीख, जैन, बौद्ध हे निरनिराळे धर्म आहेत. पण कशाकरता उचापती करताय तुम्ही. सगळं अगोदरच भारी झाले आहेत. हे लांडेच आम्हाला परवडत नाहीत. त्याच्यात कशाला मध्ये हे दांडगे. त्या पूर्वजांनी शेण खाल्लं ते आम्हाला भोगावं लागतंय आता इकडं. निधर्मी हा शब्द घटनेमध्ये कोठेही नसतो. हा शब्द घातला पंडित जवाहरलाल नेहरूंनी, कशाकरता मला माहीत नाही. बाळकृष्ण नेहमी सांगायचे की स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्या सभेमध्ये वल्लभभाई पटेल होते, महात्मा गांधीजी होते, जवाहरलाल नेहरू होते, सगळे होते... सगळे सुपरस्टार... तेव्हा महात्मा गांधीजी म्हणाले की, 'राम के साथ रहीम रहेगा.' कशाला? कशाला रहीम? तुम्ही भजने करा ना, आम्हाला कशाला करायला लावता? तेव्हा वल्लभभाई पटेल म्हणाले, बापूजी तो महान है। पण आम्हाला राज्य करायचे, ते मोठे महान आहेत. पण शेवटी राज्य आम्हाला करायचे. अडीच कोटींचे बावीस कोटींवर गेले. काय दुसरा उद्योगधंदा आहे का नाही तुम्हाला? कोणासाठी आहे. तुम्ही नका आमच्या देशाची लोकसंख्या वाढवू. आम्ही करायला मजबूत आहोत. उलट काही मदत लागली तर आम्हाला सांगा. (हास्यलोट). प्रीतीश नंदी यांनी मला टक्केवारी सांगितली की आज लोकसभेत आता ४०% मतदानाच्या पद्धतीने मुसलमान निवडून येतात. किती– ४०%... हिंदूंचे किती मतदान... आपण जेमतेम ५०% च्या खाली आहोत, म्हणजे जवळजवळच. काय आता तुम्ही या देशाची लोकसभा मुसलमानांच्या हातात देणार आहे? काय घुसूघुसू माणसं शिरलीयेत या देशामध्ये... आणि त्या सरकारने जाहीर केलंय म्हणे मुसलमानांना आम्ही व्हिसा देऊ... अरे ते व्हिसा न देताच घुसलेत आत. तुझ्या व्हिसाला कोण चाटतंय... आज बांगलादेशाचे मुसलमान चार-पाच कोटीपर्यंत झालेले आहेत. मुंबईमध्येच ४-५ लाख आहेत. त्यांना पहिल्यांदा बाहेर हुसकून काढा, लाथा मारा त्यांच्या ढुंगणावर आणि या देशामधून बाहेर काढा. पंतप्रधान कसा म्याडम हॅचरसारखा, असं कायतरी पाहिजे हो. अरे २७ पक्षांचे सरकार चालवणं कठीण आहे, भयंकर आहे. सुरुवातीला वाजपेयींनी एक ठराव आणला आणि तो ठराव असा होता की, ३७० जे कलम आहे काश्मीरचं. काश्मीर आपलं पण एक इंच तुम्हाला विकत घेता येणार नाही. हा शेख अब्दुल्ला यांना खूश करण्याकरता पंडित जवाहरलाल नेहरूंनी आणलेला हा कायदा ठराव. ३७० काढण्याकरता ठराव आल्यानंतर जयललिताने विरोध केला. जयललिता कुठे तर चेन्नईमध्ये. तिला माहिती आहे का इतिहास हा? ६ डिसेंबरला ममता बॅनर्जी काळी फीत लावून बसली. ज्या दिवशी बाबरी मशीद पाडली गेली त्या दिवशी... कशाला? तू कलकत्त्याची... आणि बाबरी कुठंय... त्यातलं

महत्त्व तुला कळलं नाही... त्याचा इतिहास तुला माहिती नाही काय? तुला बारबर माहिती असेल बाबरी नाही... ही अशी विक्षिप्त टाळकी... माझा जुना दोस्त जॉज फर्नांडिस ५० वर्षांपूर्वीचा. ते मांजर असते ना... ते मांजर तुम्ही कसंही फेका... ते चार पायांवरती उभं राहतं... काय असेल ते असेल, निसर्गाचा नियम आहे, चार पायांवरती ते उभे राहतं. ज्या देशामध्ये हिंदुत्वामुळे भाजप पसरला होता, त्या देशामध्ये आता काँग्रेस पसरलाय तो फक्त त्यांच्या नाकारण्यामुळे. हे थांबवू शकाल का नाही? म्हणून ज्यादिवशी भाजपानी हिंदुत्वाची साथ सोडली त्या वेळेला त्यांची घसरण सुरू झालेली आहे. हा हिंदूंचा शाप त्यांना नडलाय (टाळ्या). म्हणे मुसलमानांची बाजू घेतली पाहिजे. त्यांना जवळ केलं पाहिजे. का रे? त्यांना पहिल्यांदा विचारा... लांब का गेला... लांब जा... आणि आणखीन लांब जा... तिकडं पाकिस्तान आहे... मरा...

शिवसेनेचे धोरण म्हणजे वैशिष्ट्य असे आहे ज्या पद्धतीने शिवसेनेचा जन्म झाला, ज्याकरिता झाला त्यापासून ह्या क्षणापर्यंत आम्ही आमचा विचार कुठेही सोडला नाही... चिकटून राहिलो (जल्लोष, घोषणा) कारण आम्हाला सत्याची पर्वा आहे. ते खूप वेळा म्हणतात ना, आम्हाला सत्तेची पर्वा नाही, आम्ही विरोधी पक्षात बसू... तिथंच बसावं लागणार... (हास्यलोट). दुसरी जागा आहे कुठे? आणि आता आकड्याचं राज्य? कारण आता आकड्यावरतीच चाललंय राजकारण. चंद्राभोवतीचा आकडा मोठा ना... (मुसलमानांचा) कारण आता या देशामधलं सरकार जाऊन चालणार नाही. बिलकूल चालणार नाही. का? कारण आता चाळे, घातपात, ताळेबंदी बांगलादेशाच्या मुसलमानांचे... इतकं काही काही... गोव्याचे आता काहीतरी अधिवेशन भरतंय... काय? आता काय चिंतन करताय? आता काय स्फोटकांची जहाजं निघतायत... पोलिस बघताहेत आकाशाकडे... आणि खालून आले त्या पाण्याच्या मार्गाने... तर काय? म्हणे सगळीकडे कडेकोट, अरे कुठपर्यंत बंदोबस्त लावणार तुम्ही? आणि कडेकोट असतानाही आमच्या संसदेवर हल्ला होतो... हेच कारण आहे. आम्ही आता सुस्त झालेले आहोत. खायला नाही, प्यायला नाही, काही काही नाही, पण आम्ही काहीही करणार नाही. आता यांचे धोरण असे आहे... सरकारचं कसं चाललंय आता? आया बहिणींवर बलात्कार होतात आणि आम्हाला उपदेश केला जातोय... एखादा कलकी महाराज-शिवसैनिक उभा राहिला... तर घेतो तुला आडवा, हेच सांगणार... जरा थांब, जरा थांब बलात्कार तर होऊ दे ना... मध्येमध्ये, व्यत्यय कशाला. अरे काय? ही माणसे नाहीत, बिलंदर आहेत इथं. पौराशौर्य खतम करायचं... चालणार नाही... आज या देशाला, तुम्ही आज जेवढे आलेले आहात,



तेवढ्यांनी जरी ताकद दाखवली, तर कोणाची हिंमत नाही वर तोंड करण्याची, नाक वर करून बोलण्याची (जल्लोष, घोषणा)... पण त्याला एक दिशा पाहिजे, प्रत्येकाला एक मार्गदर्शन मिळालं पाहिजे. पण तुम्हाला मार्गदर्शनच मिळत नाही... कुठंतरी कोंबडा असतो – तो आकाशात गोल-गोल फिरतो. त्याला कुक्कुट म्हणतात, कुक्कुट म्हणजे वेदरकॉक. मग सहज आपण त्याला म्हणून जातो 'that fallow in like a weathercock'. तर वेदरकॉकला दोष देऊ नका. जरी तो वेदरकॉक निर्जीव असला तरी त्यांच्या फिरण्यामुळे वाऱ्याची दिशा तरी कळते. पण त्याच्या फिरण्यामुळे तुम्हाला कोणत्या दिशेने जायचे ते तुम्हाला कळत नाही. पुष्कळदा लोकांना कळत नाही. अमरनाथला १०० माणसे मारली गेली. वैष्णोदेवीच्या तिकडे मारली गेली. त्या रघुनाथ मंदिराच्या तिकडे मारली गेली. अरे आमचे देव तरी काय करतील, रामाने आमच्याकरिता धावत यायचं; का आम्ही रामाकडे धावत जायचं हा तरी प्रश्न एकदा सोडवा. देवपण कसे पाहिजेत एकदम जागृत. ह्या लोकांमध्ये तो राम जागृत केला पाहिजे. तो राम मला तुमच्यामध्ये दिसला पाहिजे. तुम्ही रामाच्या रूपामध्ये असला पाहिजे. राम एक ठीक आहे. पण शेवटी आमचीच जमीन, आमच्याच देशातली जमीन. त्यादिवशी वाजपेयी गोधऱ्याला गेले आणि रडले म्हणतात. माझ्यापण डोळ्यातून खूप वेळा पाणी येतं ते कितीवेळा पुसायचं हाच प्रश्न असतो. कारण आता पुसलं तर काहीच उपयोग नाही. गोधऱ्याला गेलं ते बघवलं नाही त्यांना. काश्मीरमध्ये आत्तापर्यंत किती हिंदूंची हत्या झाली. किती लोकांच्या डोळ्यातून पाणी आलं... किती आणि हे निधर्मवादी बोंबलतात. घाटकोपरला दरड कोसळली. त्यात ८ मुसलमान मारले गेले. तर त्याकरिता इंदिरा गांधी स्पेशल विमानाने आल्या. सरळ उतरल्या विमानातून... आणि घाटकोपरला गेल्या दरड बघायला. कोणावर कोसळली? का कोसळली? कोणाला विचारून कोसळली? चौकशी... अमरनाथला माणसे मारली गेली. वैष्णोदेवीच्या तिकडे माणसे मारली. कालपरवा रघुनाथ मंदिराच्या तिकडे मारली गेली. पण बाई फिरकली नाही... ही जी प्रवृत्ती आहे, हा निधर्मवाद आम्ही मानायला तयार नाही. जाळून टाका पण निधर्मी तुम्ही होऊ नका. तुमच्या धर्माचा मान तुम्ही राखू शकत नाही. तो काय चाटायचा आहे कसा आहे हा धर्मवाद?... माझी दीक्षा आहे तुम्हाला... काय हवं काय नको हे ठरवण्याची पाळी निघून गेली तर यादवीयुद्धाला तुम्हाला सामोरे जाण्याशिवाय तुमच्याकडे पर्याय नाही. फेस इट आणि त्या वेळेला ठेवलेल्या मुसलमानांचे तुम्ही दाढ्या कुरवाळल्यात. म्हणून मी त्या वेळेला कडाडलो – त्या मुसलमानाचा मतदानाचा हक्क काढून घ्या. एकसुद्धा निधर्मवादी त्यांच्यासाठी अश्रू ढाळणार नाही.

आजतक चॅनेलच्या त्या प्रभू चावलांनी सांगितले, देशाची फाळणी झाली, जातीय तत्त्वांवर आम्हाला हिंदूंना हिंदू राष्ट्र मिळाले पाहिजे. त्यांना त्यांचा पाकिस्तान मिळाला पाहिजे. त्यानंतर त्यांना पाकिस्तान मिळाला असं असतानासुद्धा माझ्या देशामध्ये मुसलमानाची हुकूमत चालते. पाकिस्तानच्या इस्लाम राज्यामध्ये, देशामध्ये ज्या पद्धतीने हिंदूंना वागवलं जातं. त्याच पद्धतीने मुस्लिमांना येथेही वागवलं गेलं पाहिजे. (प्रतिसाद, जल्लोष, टाळ्या, घोषणा) जे काही नियम आहेत ते तुम्हाला पाळलेच पाहिजेत. मघाशी जे हॅचर बाईचे उदाहरण दिले, त्या बाईंनी फार चांगला कारभार केला होता... इंग्लंडमध्ये जे मुसलमान आहेत... मूठभर आहेत... फारसे नाहीत... तरी त्यांनी एका विषयावरती आंदोलन करायचे ठरवलेय... आणि त्या बाईच्या मंत्रिमंडळामध्ये एक मंत्री होता, त्याला जेव्हा कळाले, तेव्हा त्याने त्यांना पत्र पाठवले. I Would you like meet them तेव्हा हे सगळे आले. Yes, What do you want? त्यांनी काही मागण्या केल्या. अमूक, तमूक, वगैरे... वगैरे... तो मंत्री म्हणाला, No, never, you will not, we have to accept the law. तुम्हाला हा कायदा मानावाच लागेल आणि मानायचा नसेल तर क्विट ब्रिटन. ब्रिटन सोडून जा म्हणे. असे बोलणे... ते थरारले. कोणी आपल्या देशात बोलेल... जाऊ देत. ते पुन्हा हॅचर बाईकडे तक्रार घेऊन गेले. ते म्हणाले तुमच्या मिनिस्टरने आमचा इन्सल्ट केला. काय झाले? काय म्हणे... तर अमुक अमुक नसेल तर निघून जा. आमच्या देशाची घटना मानायची नसेल तर चालते व्हा. बाईंनी पटकन् उत्तर दिले. ते जे बोलले ते बरोबर आहे. तुम्हाला राहायचे असेल तर राहा. पण तुम्हाला घटना आणि कायद्यांना हात लावून देणार नाही. असं सांगणारा आहे का कोणी तुमच्या देशात?... मिळेल का असा कोणी पंतप्रधान?... ठणकावून सांगेल का पटकन् या देशाची घटना? मुसलमान म्हणतात की, वंदे मातरम् म्हणणार नाही... उपकार करता का तुम्ही? येथे लाड चालणार नाहीत... असं ठणकावून सांगणारा या देशाचा नेता पाहिजे. (जल्लोष) म्हणूनच मला सुभाषबाबूंची आठवण येते. ते म्हणाले होते, या देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १० वर्ष तरी या देशाला लोकशाहीच्या भानगडीत पाडू नका, बिलकूल पाडू नका... आणि हे खरं आहे कारण आम्हाला अजून नागरी हक्क काय असतो, ते माहिती नाही. सुविधा हव्यात पण थुंकण्याचा अधिकारही पाहिजे. पचाक थुंकला, कोपराही सगळा आम्हाला थुंकण्यासाठीच हवाय. काय एक-एक कोपरा... असे कुठे सापडू शकत नाही. एअर पोर्टवरसुद्धा कोपरे थुंकलेले आणि यांना नागरी स्वातंत्र्य द्यायचे, सुविधा द्यायच्या, लोकशाहीमधलं मानायचं... वगैरे वगैरे... नाही जमणार, बिलकूल जमणार नाही. आपणहून स्वत: कसे वागतात हे त्याच्या देशामध्ये दिसेल.



सिंगापूरमध्ये काही असू दे. स्वच्छ देश, स्वच्छ बागबगीचे आहेत, हे कधी शिकणार तुम्ही, हे मरण येत नाही म्हणून जगतोय. लूत लागलेल्या कुत्र्यासारखं? नाही जमणार... जगा अशा पद्धतीने जगा आणि दुसऱ्याला जगायला शिकवा. आमच्या देशात असे आहे. तुला असे रहावे लागेल, असे जगायला लागते, इथले कायदे-कानून मानावे लागतील. तुझ्या मर्जीत आणि गुर्मीत चालणार नाही. अशी धमक तुमची तयार झाली पाहिजे आणि ती शिवसेनेमध्ये आहे. कुठल्याही राजकीय पक्षामध्ये नाही. सगळे मिंधे, चाटे, लाचार (उपहासात्मक, चाटे, क्लासेस नाही). आमचं वय वाढतंय. काही लोक सांगताहेत तुमच्यानंतर कोण? मी म्हणतो तुम्ही बसता का?... अजून काही तसं नाही आहे... पण लावालावी करायच्या... लागल्या तर लागल्या... वाजल्या तर वाजल्या... पडलं तर पडलं... तसं काही होणार नाही. ठाकरे घराण्याचे रक्त फार निराळे आहे... (टाळ्या, जल्लोष) सत्यापासून आम्ही कोणीही घाबरलो नाही. आम्ही जाहीर करून टाकलेले आहे. दोघांमध्ये बिघडत असेल तर आम्ही राजकारण सोडू, पण तोडणार नाही. कशाला या उचापत्या करताय? मला आता ७६ वे वर्षे चालू आहे. पण एक निश्चित, सगळं मी ढिलं केल्याशिवाय हटणार नाही (जल्लोष, टाळ्या). ही ताकद तुम्ही मला द्या आणि या ताकतीवरती मी किमया आणि चमत्कार करून दाखवतो. आता माझे सगळे पाईक इकडे बसलेले आहेत. त्याच्यामध्येही मी तेच रक्त टाकलेले आहे. तुमच्यामध्येही मी तेच रक्त टाकलंय आणि हे रक्त सळसळत ठेवा. पडून देऊ नका. थंड पडून देऊ नका, थंड पडून देऊ नका.

जयहिंद-जय महाराष्ट्र !!

# ३८वा शिवसेना वर्धापन दिन मुंबई १९ जून २००४
## बाळासाहेब ठाकरे

बाळासाहेब ठाकरे भाषण करण्यासाठी उभे राहताना प्रेक्षकांमधून घोषणा (हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख, सरसेनापती, श्रीमंत श्री बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो.)

जमलेल्या माझ्या तमाम हिंदू बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो... (जल्लोष, टाळ्यांचा कडकडाट आणि घोषणाबाजी)

वक्ते वाढायला लागले की, मलाच धस्स होतं, आणि असं वाटतं की आतून एखाद्या वेळेस सांगावा यायचा हो...! किती भाषणं, किती भाषणं, लोचा झोपला रे, म्हणून सांगायचे एखाद्या वेळेस ते. ते सांगण्याच्या अगोदरच म्हटलं पटापट थोडके काही मुद्दे मांडा. कविवर्य महापौर यांनी भावनात्मक अशा काही गोष्टी मांडल्या, एक कविता आपल्याला सादर केली, पंतांनी मुंबईबद्दल उल्लेख केला, मोहन रावले सोडल्यास बाकी आपल्या जागा का गेल्या? बरोबर आहे, जबाबदार कोण...? तुम्ही... कसे? ४-५ दिवस लागोपाठ रजा आल्या, केसरी टूर, ही टूर, ती टूर, ही टुर्रटुर्र नडली. आता मला धस्स होतंय, की गणपती आलेत, आणि तुम्ही जाणार, कोकणातले लोक तर पहिले जाणार. अगोदर जाऊन तिथे करता काय? बाप्पा आला नाही आणि तुम्ही अगोदर काय गप्पा मारताय? आणि मग नेताना त्याला गणपती बाप्पा मोरया आणि ते गणपती गेले गावाला अन् चैन पडेना आम्हाला. आमचंही तेच म्हणणं आहे, मतदार गेले गावाला चैन पडेना आम्हाला. बोंबला... आता करायचे काय? मतं कमी झाली, ही मुंबईची अवस्था बरी नाहीये. एक ना एक दिवस हे लांडे तुमचा गळा घोटल्याशिवाय राहणार नाहीत. ती पोरगी ती इसरद, काय तिची अंत्ययात्रा, दफन यात्रा म्हणा वाटल्यास. केवढी मोठी हो. नशीब आमच्या सरकारचं... म्हणजे काँग्रेस... की त्यांनी त्याच्यावर तिरंगा नाही घातला. नाहीतर तोही घालून टाका. कारण इथे या देशात देशद्रोह्यांचा मान पहिला, मग तुमचा. ते पण आठवलं तर... अरे काय चाललंय हे, कसले दोन-दोन दिवस मुंब्रा बंद, खासगी प्रॉपर्टी आहे काय त्यांची? तुम्हाला आश्चर्य वाटेल, एक पुस्तिका दाखवतो तुम्हाला. सगळं पानभर मी लिहिलेलं आहे. काय त्या पुस्तिकेत आहे ते. वाचा. आजचा सामना. ही ती पुस्तिका. त्या पुस्तिकेत अर्धा मोदी आणि अर्धे वाजपेयी असे चित्र आहे आणि मागे हा नेहमीचा एक फोटो. बाप रे बाप आमच्याच मीडियाने... बरं सतत आणि सातत्याने किती



जागतिक महत्त्व दिलंय या व्यक्तीला, गुजरातमध्ये दंगल झाल्यानंतर मुसलमानांचे हाल काय काय झाले ह्याचे हे चित्रण आहे... गर्भार स्त्रियांची पोटे फोडली आणि त्यातील अर्भकं बाहेर काढली आणि त्यांचे तलवारीने तुकडे तुकडे केले. काय भयंकर हिंदू आहात हो तुम्ही. हे बरं नाही. इतका निष्ठुरपणा मुसलमानांच्या बाबतीत तरी दाखवू नका. कारण बिचारे ते खाटिक... इतकं काय करता त्यांच्याबद्दल. गोध्राचा डबा ज्या वेळेला पेटला आणि तो पेटल्यानंतर तरुण मुलींना खेचत नेलं कुठे लांब आणि तिघा-तिघांनी... चौघा-चौघांनी तिच्यावरती बलात्कार केले आणि तिचे स्तन कापून ते रेल्वे रुळावर टाकून देणारी औलाद कुणाची? हे कोणी कृत्य केलं, रामसेवकांनी? सगळ्या पुस्तकामध्ये अहमदाबादच्या दंगलीचे फोटो दिले आहेत. किती भीषण ते, मोदी हटाव मोदी हटाव, आमच्याच हिंदुस्थानामध्ये माझ्या देशाचे तीन तुकडे केले यांनी, मध्ये आपण लटकतो आहे, एक इकडे पाकिस्तान, एक तिकडे पाकिस्तान, त्याचा आता बांगलादेश आपल्याच कृपेने झाला आणि एवढं करूनसुद्धा तुम्ही अजून आमच्या देशावर हुकूमत गाजवायला बघता आहात? वाजपेयी म्हणताहेत, अशोक सिंघल म्हणताहेत, तोगडिया म्हणताहेत, मी म्हणतोय... हे हिंदू राष्ट्र झालंच पाहिजे, झालंच पाहिजे काय... आहेच मुळी. पण तुमची हुकूमत आमच्यावरती की हे होता कामा नये म्हणून? पाकिस्तानामध्ये जाऊन आम्ही बोंबलत नाहीये या गोष्टी. आणि म्हणून मी आजच्या सामन्यात स्पष्ट लिहिले आहे, की राहायचे असेल तर राहा नाहीतर चालू पडा! बरं त्या दिल्या तुकड्यामध्ये सुखी राहा. पण हे सगळं ओढवून आपण आणलंय. मतदानाचं कुठे महत्त्व आपण बघितलं नाही. प्रत्येकाला मी आल्यावर हेच विचारतो की, मतदान केलं का रे? हे काय... आहे ना...! (बोटाची मतदानाची काळी निशाणी दाखवत). पण काही लोकांच्या हातावर नसतं. ते म्हणतात, मी काढून टाकलं. एवढे अंगावर तुझ्या डाग पडलेत आणि त्यात तुला हा नाही सहन झाला का रे? काय काय भानगडी तू करतोस आणि ते डाग तुझ्या अंगावर आहेत आणि तू साला बोटं दाखवतोस. याच्यावरचं काढून टाकलं. झूटं!... मतदान केलं नाही हा बेजबाबदारपणा आहे. हा राष्ट्रद्रोह आहे मी म्हणेन. हिंदूंनी तर तो करता कामा नये. कल्पना चांगली आहे, विधानसभेवर भगवा फडकलाच पाहिजे. मग आमच्या नावाने घोषणा अमुक-तमुक... अरे चांगलं आहे की, ऐकायला बरं वाटतं, गुदगुल्या होतात... पण फडकणार कसा? एकदा गणपती आल्यानंतर गावाला जाऊन बसलात, तर मुंबईत आलेले गणपती तुमच्या नावाने मतदान करतील काय? सगळे रांगेमध्ये निरनिराळ्या आकाराचे गणपती, हातावरती ठिपका मारून घेताहेत. हा याच्या नावाचा, तो त्याच्या नावाचा, असं आहे काय? चैन पडेना आम्हाला, कोणाला चैन पडतंय हे असं झाल्यावर? पंत पडले, चैन

आहे आम्हाला. बरं वाटलं, सगळे गेले, राम नाईक पडले. पडल्याचं दुःख नाही हो, पण कोणी पाडले? कालच्या कारट्यांनी? ह्या नाच्या पोऱ्या. आणि तो लोकसभेमध्ये जाऊन काय करणारे, नाचणारे काय? दर वेळा आपलं आपला पतंग उडवतोय असं असं करून, असं असं करून... नुसत्या ह्या असल्या लोकांमुळे देशाचा कारभार सुधारू शकत नाही. पोरखेळ चाललाय अक्षरशः! काय, केवढ्या नट्या हो. एकेक एकेक जाताहेत. जया बच्चनचं काय झालं कोणास ठाऊक? ते रात्री फोन करून विचारा. जया बच्चन, जयप्रदा, हेमामालिनी, अमुक... तमुक... धर्मेंद्र... सगळं बॉलीवूड आतमध्ये. कार्टून्स् मी काही काढत नाही. मी राजालाच सांगतो, पण राजाला काही दिवस बरंच नाही. एकदा ती पाठदुखी लागली आणि ताप सणकून आला होता, फणफणला होता... तर कार्टून काढायचंय... पायऱ्या, ते लोकसभेचे खांबबिंब, वगैरे वगैरे... आणि बाहेर सगळे प्रोड्यूसर आणि डायरेक्टर बसले आहेत... काही लोक विचारताहेत, हॅ हॅ हॅ बाहेर का बसले आहेत... बाहेर म्हणजे काय सगळे आत नट आहेत ना. नट-नट्या आतच. ॲग्रीमेंट करायचयं, सह्या घ्यायला थांबलो होतो... सगळे आतमध्ये. ह्या बॉलिवूडवाल्यांकडून देशाचा कारभार चालू शकतो? पण आम्हीच ह्या पद्धतीने जे वागतोय... की एकदा ठरवलं की ह्याला पाडायचा. ह्या मुसलमानांनी आदेश दिले सगळ्यांना घराघरामध्ये पुस्तकं वाटली गेलेली आहेत, देशभर वाटली गेलेली आहेत. म्हणून बुरखा घातलेल्या बायका जास्त दिसू लागल्या तुम्हाला, रांगेने उभ्या राहिल्या होत्या. अशी रांग कुठेही आपल्या हिंदूंची दिसली नाही. सगळ्या त्याच. सगळीकडे नजर फिरवल्यावर ते तोकड्या चड्डीवरचे ते मुसलमान आणि ते टोपीवाले आणि दाढ्या. ही जी एक रग लागते, जिद्द लागते, ही तुमची कुठे गेली? झिंदाबादच्या घोषणेपुरतीच मर्यादित? शपथ घ्यायची ती ही घ्या, की जसे ते एकवटले आहेत, तसे आम्हीसुद्धा एकवटल्याशिवाय राहणार नाही. तर... आणि तरच या लांड्यांना तुम्ही टक्कर मारू शकाल. नाही तर मुंबई काय, महाराष्ट्र गिळतील, देश गिळतील... आणि ते पाप आपल्याकडून होता कामा नये. त्यांना आपण पुरून उरू हो. त्याला आपण भीत नाही... पण नुसता एक फतवा गेला... गेल्याबरोबर सगळ्यांनी एकजुटीने रांगेनं... आणि आम्ही? ...आम्ही लंडन बघून आलो, आम्ही हॉलंड बघून आलो, आम्ही न्यूझीलंड बघून आलो, अमुक लंड बघून आलो (हास्यलोट). काय आहे काय हे सालं? घरी बसल्या बघता येतं... तिकडे कशाला जायला पाहिजे? म्हणजे नकाशावरून... नकाशा वरून मी म्हणालो... तसा गैरसमज करू नका. नकाशावरून. जबाबदारी ओळखा आपली काय आहे ती. जबाबदारी एवढीच की मतदानाच्या दिवशी कोणी हिंदूंनी गाव सोडता कामा नये. गणपतीला जाऊ शकता, नाही असं नाही, पण आता आपणच ही



काळजी घेतली पाहिजे की, निवडणूक आयुक्ताला सांगितलं पाहिजे की, एक लागोपाठ अशा रजा आल्यानंतर मात्र निवडणुका घेऊ नका... त्या निवडणुका होता कामा नयेत. तो प्रयत्न तर आम्ही करूच. ...हा पण गेलेला आहे, आपला... संजय राऊत. बोंबल!! हे अशा रांकेने घेऊ नका... मागच्या वेळी आम्ही चांगला फटका खाल्लाय, दुसरा फटका घेऊ नका. आणि विधानसभा म्हणजेच महाराष्ट्राचं नाक आहे. हे नाक आपल्या हातनं कापलं जाता कामा नये. महाराष्ट्र असला तरच हा आपला देश वाचणार आहे, हिंदुस्थान वाचणार आहे. ते वाचवण्याचे काम तुमच्या हातात सोपवून... जास्त मी आता भलामण लावत नाही, नाहीतर लोचा झोपण्याची शक्यता आहे. तर फक्त हे लोच्या झाला रे असं पाहता निवडणुकीत लोकसभेत जसा लोच्या झाला तसा विधानसभेत होता कामा नये, ही जबाबदारी आपल्यावर टाकली आहे... मतदान केल्याशिवाय गणपतीला जाऊ नका.

जय हिंद जय महाराष्ट्र!!

# ३९वा शिवसेना वर्धापन दिन, मुंबई १९ जून २००५
## बाळासाहेब ठाकरे

बाळासाहेब ठाकरे भाषण करण्यासाठी उभे राहिले. बाळासाहेबांनी हात जोडले अभिवादन केले आणि उजवा हात दाखवला. (तुतारीचा आवाज, प्रेक्षकांमधून घोषणा हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख, सरसेनापती, श्रीमंत श्री बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो.)

जमलेल्या माझ्या तमाम हिंदू बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो... (जल्लोष, टाळ्यांचा कडकडाट आणि घोषणाबाजी हा आवाज कुणाचा... शिवसेनेचा! आवाज कुणाचा... शिवसेनेचा! शिवाजी महाराज की जय... जय भवानी... जय शिवाजी...!)

तुम्ही मला शुक्ला (न बोलते) करून टाकले. (हास्यलोट) (दाढी कुरवाळत) बोलू तरी देत..., तो तुतारीवाला फुंकून गेला... (हास्यलोट) मला कधी... काय... संधीच मिळत नाही काही फुंकण्याची. (हास्यलोट) दर वर्षी आता हा सोहळा आहे. कार्यक्रमाला लवकर येणार होतो. परंतु माझा डोळा अजून मार्गावर आला नाही, पण येतोय हळूहळू. गंगूबाई पाहायची म्हटल्यावर डोळा तर मार्गावर पाहिजे ना... (हास्यलोट). मी तिला आतमध्ये बघितली... भेटायला आली होती... आल्याबरोबर मी ओळखलं ही गंगूबाई... (हास्यलोट). पण आता मी राजकारणातल्या गंगूबाई शोधतोय. पण बरेचसे रंगीच भेटले. दोन दिवस माझी मुलाखत चालू आहे, सामनावरून... काल आणि आज पण आलेली आहे. ज्यांची करायची तेवढ्यांची केली, माझे... परममित्र... आदरणीय... आणखी काय?... शरदचंद्रजी पवार... मी उदार अंत:करणाचा माणूस आहे... तसे ते पण उदार आहेत... काहीच शिल्लक ठेवलं नाही. (हास्यलोट) कारण मला वस्तरा असा आत ठेवायला वेळच मिळत नाही. कधी खिशात ठेवता येत नाही. कोण कधी भेटेल ते सांगता येत नाही. मी पवारांची कधी हजामत केली नाही. ...करण्यासारखं काही राहिलंच नाही (हास्यलोट). आणि एक आहे, मात्र मी माझ्या वस्तऱ्याची धार त्यांच्या डोक्यावरून करत असतो (हास्यलोट). ते गुळगुळीत असल्यामुळे (दाढी कुरवाळीत) धार करण्यासाठी चांगलं असतं आणि धारपण अगदी सॉलिड होते. (हास्यलोट). सगळं झालं, बाबरी मशिद झालं, बार्बर झाले, सगळं झालं. बोलण्यासारखं असं काहीचं राहिलं नाही. तरी पण ते खवचटपणे अशा काही गोष्टी चाललेल्या असतात... खासकरून आमचे ते राज



आणि उद्धव या दोघांबद्दल. अजून फुटत नाहीत. आत्ता राजचा वाढदिवस झाला, २७ जुलैला उद्धवचा वाढदिवस. एक व्यंगचित्रकार म्हणून माझ्या डोक्यात काही हलकट कल्पना येतात. मी त्यादिवशी मातोश्रीच्या इथे तीन रांगा काढणार आहे, तीन रांगा. त्या रांगा अशा राहतील, एक उद्धव ठाकरे, त्यांचे समर्थक (हास्यलोट), दुसरे राज ठाकरे, त्यांचे समर्थक (हास्यलोट) आणि मध्ये एक स्वतंत्र लाईन, तिथे लिहिणार... आगलावे पत्रकार (हास्यलोट). कारण प्रत्येकाचा मान राखलाच पाहिजे ना, असं कसं करून चालेल! हे समर्थक बिझनेस काय प्रकार आहे मला काही कळत नाही बाबा! ह्या सगळ्यांना निक्षून सांगू इच्छितो की, शिवसेनेत समर्थक वगैरे भानगड नाही. (टाळ्या) शिवसेनेत फक्त माझ्यापासून ते सगळे शिवसैनिक (टाळ्या, घोषणा). हे सगळे शिवसेनेचे समर्थक आहेत, एकमेकांचे कोणी नाहीत, एवढं लक्षात ठेवा. कुठच्या वर्तमानपत्राला कधी लिहायला अंगात येईल काही सांगता येत नाही. पण कोणाला तरी सुरसुरी आलेली असते. कोणीतरी पेटून आचके देत पडलेला असतो, रोज सकाळी. मध्यंतरी टाइम्स ऑफ इंडियाला आलं होतं... आमचे सुरेश प्रभू शिवसेना सोडून गेले राष्ट्रवादीत... मला न सांगताच गेले. आमचे अढळराव, शिवसेना सोडून राष्ट्रवादीत गेले. तेही असेच गेले. शिस्तीच्या दृष्टीने बाबांनो तुम्ही सांगून जा ना कुठे जायचंय ते. (हास्यलोट). पवार तसा सांगून जातो... की मी सोनिया गांधीला सोडली (हास्यलोट). पुन्हा आल्यानंतर सांगतो मी सोनिया गांधीला धरली (हास्यलोट). प्रामाणिक माणूस आहे. अशी प्रामाणिक माणसं मला हवीत शिवसेनेमध्ये. ते एक सुबोध मोहिते... ते त्यांच्याकडेच अडकलेत विदर्भामध्ये... सुरेश प्रभू गेले आणि बघितलं वातावरण... कंटाळले आणि पुन्हा शिवसेनेत आले. या इकडे, शिवसेनेत... कुठे आहेत, आलेत ना... (सुरेश प्रभूंकडे हात करून) या ना इकडे वरती. त्यांना बघू दे ना खरंच आलात तुम्ही. (प्रचंड टाळ्या). हे सुरेश प्रभू (हास्यलोट). शिवसेनेतून राष्ट्रवादीत गेले आणि राष्ट्रवादीतून परत शिवसेनेत आले. दुसरे आमचे अढळराव... तेही गेले, पण कंटाळले, पुन्हा शिवसेनेत आले. या अढळराव... (हास्यलोट). हा असला हलकटपणा चाललेला असतो, त्यामुळे कोणी हादरून जायचं नाही आणि काही करून जायचे नाही. (टाळ्या). अढळरावांनी टाइम्स ऑफ इंडियाला पत्र लिहिलं, चार दिवस झाले आज, छापलं नाही... टीका करू, पहिल्या पानावर, फोटोसहित. पण ज्या वेळी उत्तर जातं आमच्याकडून तर त्याची मात्र दखलही घेतली जात नाही. सुबोध मोहितेविषयी... त्यादिवशी फोन केल्यानंतर... ते मनोहर जोशींच्या बरोबर एका कार्यक्रमात अडकले होते, विदर्भात गेले होते तेव्हा... का करता असं... फोन करून विचारले, की हे काय

चालवलंय काय, तुम्ही सगळे आमच्या बरोबरचे आहेत... नाही नाही नाही आमच्या ऑफिसमधे चर्चा चालू होती, आणि चर्चेतून बातमी निर्माण झाली. अरे, बातमीतून चर्चा करता...? की, चर्चेतून बातमी तयार करता याबद्दल ठरवा तुमच्या कचेरीत. (हास्यलोट, टाळ्या). शेवटी अढळरावांना पत्र काढून सामनामध्ये छापायला लागलं आणि मग बाकीच्या ठिकाणी आणखीन छापून आणलं. आणि म्हणून या मीडियावरती मी चिडत असतो ना ते याच्यासाठी. का नाही चिडायचं? कशाकरिता हलकटपणा करता आमच्या बाबतीत?... इतर ठिकाणी काय चाललंय? मुरबाडला सहा जणांनी, दहा जणांनी राजीनामे दिले. एकानीही दिला नाही, एकाचाही राजीनामा आला नाही... आणि त्यांनीच उलट फोन करून सांगितलं, फॅक्स येतात त्यांचे... आम्ही कोणीही गेलो नाही, शिवसेनेतच आहोत. याचं कारण मुंबई महानगरपालिका. आमचे परममित्र, जिगरदोस्त, राम खोत. ते... प्रेमानं बोलताना थोडंसं हे होतं जरा... कारण शिव्यासुद्धा प्रेमाने द्यायच्या असतात. मी कधी कधी... ए भडव्या... येतो तो... पाळण्यातलं नाव विसरतो... (हास्यलोट). त्यांना मुंबई महानगरपालिका जिंकायची आहे. जिंकून द्यायची काय...? (शिवसैनिक मोठ्याने... 'नाही'.) मतदान निष्ठेने झालं पाहिजे. रांगा लागल्या पाहिजेत. मुसलमानांच्या बायका बघा... त्यात खरंच बायका असतात, का पुरुष असतात हे स्मृती इराणीला विचारलं पाहिजे (हास्यलोट). कारण ती उभी राहिली होती चांदणी चौकातनं दिल्लीला... त्या बीजेपीची कोणीतरी उमेदवार म्हणून. आणि चांदणी चौकात बराचसा नाही म्हटलं तरी पर्सेंटेज मुसलमानांचंच आहे. सगळीकडेच आहे म्हणा... आणि त्या मुसलमान बायका तिला कवटाळायच्या... प्रेम करायच्या... कुरवाळाच्या. ती खूश एकदम. आणि एवढ्या मुसलमान बायका रोज कवटाळतायत... रोज कवटाळतायत... मी नक्की निवडून येणार. येणार... १०१ टक्के येणार. आणि नंतर कळतं की सगळी आतमध्ये मुलं होती. कुठेतरी बुरखा फाटला आणि त्यात तरुणाच्या मिशाच दिसल्या (हास्यलोट). हे तिला आवळतात, ही त्याला आवळते. (हास्यलोट) आवळाआवळी कशी महाग पडते हे लक्षात ठेवा. या वेळेला मुंबई महानगरपालिकेत नगरसेवकांना चांगलं नाणं कसं वाजवून घेतात तसं वाजवून घेणार आहे, नाहीतर वाजवावी लागेल. (टाळ्या) कोणची कामं करू... करणार आहोत... मंजूर होण्याची शक्यता आहे ... नाही... दृष्य स्वरूपात दाखवा, दृश्य स्वरूपात. हे केलं मी. राजने एक चांगलं सांगितलं. आपलाच एक नगरसेवक, नाव नाही सांगत, कुठेतरी भाषण झालं. आणि तो सांगत होता मी काय केलं तुमच्यासाठी... मी येथे पाइपलाइन टाकली आहे... मी नळ योजना दिली आहे... त्यातून पाणी येतं. गटारे दिली-अमूक दिली, बोअरवेल्स दिलेल्या आहेत वगैरे



वगैरे... आणि शेवटी पचकला... येथे जी वृद्ध माणसे बसलेली आहेत, त्यांच्यासाठी लवकरच मी स्मशानभूमी बांधणार आहे. (हास्यलोट). म्हाताऱ्यांच्या कवळ्या बाहेर पडल्या. म्हाताऱ्यांचा कशाला उल्लेख करतोस. सांगून पण इथे जी वृद्ध माणसं बसली आहेत... त्यांच्यासाठी लवकरच मी स्मशानभूमी बांधणार आहे. असे कार्य पाहिजे काहीतरी... ह्याला म्हणतात नगरसेवक... (प्रचंड हशा) जगायचं कसं हा प्रश्न त्यांच्यासमोर असताना हा मरायची सोय करतोय... मजा असते. पण नगरसेवकांनीसुद्धा त्यांच्या अहवालाचं रेकॉर्ड पाहिजे. आजच मी महापौरांना सांगितले की मला या सगळ्यांचं रेकॉर्ड पाहिजे. त्यांचा नगरपालिकेमधला अॅटेंडन्स... हजेरी. कमेटीवरती जे जे कोणी असतील त्यांच्या तेथूनच्या हजेऱ्या... हे सर्व पाहिजे. नाहीतर... सकाळी सही करता आणि मग कुठे तरी पिक्चरला, ह्याला, त्याला.... अशा वेळी स्वत:चीच बायकोच बरोबर पाहिजे असा नियम नाही. (हास्यलोट). पण चुका काढायची कोणी तरी... आणि संध्याकाळी परत हजर. मी सबंध दिवस हजर होतो. वर खर्च.... खाली सही. कुणाला गंडवताय तुम्ही? पूर्वी मी नगरपालिकेतून जाऊन, येऊन असायचा... तिकडे नाही जात... जाण्यासारखं काही राहिलंच नाही. तेव्हा मी असं म्हणतो की नगरसेवकांनी... आता हे पावसाळ्याचे दिवस येत आहेत... पाऊस लागलाय पडायला चांगला. कडाडलंय ... अशा वेळेला नाले तुंबणं... (महापौरांकडे उद्देशून) महापौरांनी केल्या का पिशव्या बंद (हास्यलोट)... (भुवया उंचावत) आऽ किती झाल्या (हास्यलोट) विनोद नाही सांगत... बरं, त्यांनी पिशवीला हात घातला (हास्यलोट). पण आपण किती खराब, घाण करतो याचा कधीही नागरिक विचार करीत नाहीत. घाण झाली... मी मागे शिवाजी पार्कला राहत असताना, शिवाजी पार्कला माँ आणि मी सकाळी फिरायला जात होतो. कसलं फिरणं हो शिवाजी पार्कवर... लांडी पँट घातलेले ते जॉगर्स, वॉकर्स सगळे यायचे. एक आला, दोन आले तीन आले करता करता कोंडाळं... माँ तिकडे आणि मी इकडे आणि त्यांच्या तक्रारी सुरू... 'अरे साब देखोनी कितना खराबी है, कितना कचरा जम गया साब...' साले कचरा करणारे तुम्ही... आणि त्याचा जाब मलाच विचारताय. (हास्यलोट). हे असले लोक येतात माझ्याकडे कधीकधी त्यांना मी महापालिकेची नागरी डायरी देत नाही. सिंधी असला तर विशेष... मागतात ते, अरे तुम्हारी नागडी डायरी देना... नागडी डायरी... (प्रचंड हशा). कचरा करणारी लोकं आमच्यावर आरोप करताहेत. की कचरा साठलाय, कचरा साठलाय... कचरा साठवणारे कोण...? नाले तुंबवणारे कोण...? पिशव्या कोण टाकतं याचाही जरा अंदाज घ्या. काही रस्ते महानगरपालिकेकडे आहेत. दुसरे रस्ते हाय वे, त्यांच्याकडे अॅथॉरिटी असते. त्यांच्याकडे

आहेत महामार्ग. त्याला आम्ही जबाबदार नाही. तरी पण पुष्कळ वेळेला तक्रार आली असताना मी स्वतः महापौरांना रोज मग ते ठाण्याचे असोत की हे असोत. एकतर फोन तरी असतात नाहीतर वृत्तपत्राची कात्रणं तरी असतात. मी पाठवत असतो. पण निर्धारात... दुर्दैवाने विधानसभेच्या वेळेला माझी ती इंडोस्कोपी झाल्यानं मी आजारी पडलो. ताकद राहिली नाही भाषण करण्याची... आणि आता ह्या वेळेला मुंबई महानगरपालिकेवरचा हा भगवा झेंडा फडकलाच पाहिजे... त्यासाठी मी आणि माझे सर्व नेते, उद्धव आणि सर्वचजण बाहेर पडणार– पण बाकीचं कर्तव्य तुमचं आहे. हा भगवा झेंडा फडकवणं, फडकवावा हे जेवढं सांगण्याचं काम आमचं आहे, तेवढा तो फडकलाच पाहिजे हे करण्याचं काम तुमचं आहे. (टाळ्यांचा कडकडाट). भगवा फडकवल्याशिवाय राहणार नाही आणि शिवसेनेचा हा भगवा झेंडा खाली उतरवण्याची कोणाची हिंमत होणार नाही. एवढी आपल्याकडून ही अपेक्षा बाळगून मी तूर्त आपली रजा घेतो.

‘‘जय हिंद जय महाराष्ट्र.’’



# ४० वा शिवसेना वर्धापन दिन, मुंबई १९ जून २००६ बाळासाहेब ठाकरे

बाळासाहेब ठाकरे भाषण करण्यासाठी उभे राहिले. बाळासाहेबांनी हात जोडले, अभिवादन केले आणि उजवा हात दाखवला. (तुतारीचा आवाज प्रेक्षकांमधून घोषणा हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख, सरसेनापती, श्रीमंत श्री बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो.)

जमलेल्या माझ्या तमाम हिंदू बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो... (जल्लोष, टाळ्यांचा कडकडाट आणि घोषणा. हा आवाज कुणाचा, शिवसेनेचा! आवाज कुणाचा, शिवसेनेचा! शिवाजी महाराज की जय... जय भवानी... जय शिवाजी...!)

मी मघापासून बघतो आहे, शिवसैनिक कमी झालेत का?... (प्रेक्षकांकडून आवाज... नाही... वाढलेत) त्याचा अधिकारपण तेवढाच आहे. अनेकांना चिंता पडली देशाची नाही, तर शिवसेनाप्रमुख आज काय बोलणार, कोठून बोलणार, गोड बोलणार का? कडू बोलणार, वरून बोलणार की खालून बोलणार (हास्यलोट).

ते कोणते तरी गाणे आहे बघा. जादू तेरी नजर... मी काही तुमच्यावर जादू केलेली नाही. पण माझी नजर मात्र तुमच्यावर आहे. (टाळ्यांचा कडकडाट). आज बरेच आले आहेत... गेले होते इकडे तिकडे इकडे तिकडे... मलाही असे वाटते शिवाजी पार्कला असे फिरून यावे. (बोट गोल फिरवत) (हास्यलोट)... आज पुन्हा नेमणुका केल्या. बऱ्याच चौकश्या केल्या. त्यांच्याबाबत माहिती मिळवली असे अप्रतिम हिरे नेमलेत. आणि आता शिवसेना कुठे कमी पडणे शक्यच नाही. कधीच नाही... महाराष्ट्राची जी सेवा केली आहे ही कोणालाही विसरता येणार नाही... (टाळ्या) माझं आता काय झालंय... ते रिमोट कंट्रोलचं लफडं आहे माझं... मी नगरसेवक आमदार, खासदार, मंत्री यांच्यावर रिमोट कंट्रोल वाजवू शकतो. पण माझ्या वयावर मी कसे काय कंट्रोल करू, की... अरे बाबा फार वय वाढलंय, जरा कमी कर (हास्यलोट). हे काही कमी करता येणार नाही. हे शरीर सतत थकतच जाणार. ठीक आहे. आज मी एका नव्या उमेदीने आलोय. तुमचा वार्षिक सोहळा आहे तो दिमाखात साजरा करूया. नगरसेवक, खासदार, आमदार मंत्री यांचं स्वत:चं पोटं खूप वाढलंय, जरा कमी करूया, शरीर ते पचवतच जाणार, मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका ५-७ महिन्यांवरच आहेत. ठाणे महापालिका

व मुंबई महापालिका यांवर भगवाच फडकणार! बऱ्याच जणांनी आपले लंगोट टाइट करून ठेवले आहेत की या वेळेस ते जिंकणारच (टाळ्या). तो टकल्या कामत कितीवेळा स्वत:च्या डोक्यावर घसरतोय. त्या वेळेला मुंबई महानगरपालिका जिंकणारच?... याला काय उपमा द्याल?... (शिवसैनिकांकडून आवाज बेडूक, माकड वगैरे) (हास्यलोट). आता सगळ्या अंगावर गजकरण उठल्यावर कुठे खाजवायचे हा प्रश्नच आहे. (हास्यलोट) अहो काय पाहिजे, जेवढ्या उपमा देईन तेवढ्या कमी आहेत, काही आता वय झाल्यामुळे काही आठवत नाही. आमचे सातत्याने नवे विचार आमच्या वडिलांपासून चालत आलेले आहेत. आता आम्हीपण तेच करतोय, पण आम्ही काही मराठी विसरलो असं नाही.(टाळ्या). इथे पाकिस्तानी आलेले अतिरेकी नाहीत. तर खरे शिवसैनिक आहेत. हिंदुस्थान तुमचा आहे. ते पक्ष नासकी फळे, अंडी टाकताहेत. आयुष्यभर तुम्ही फेडाफेडी केली. दुसरं काय केलं. ज्या वेळेला अफगाणिस्तानामध्ये सगळ्यात मोठा बुद्धाचा पुतळा मुद्दाम फोडून टाकला. तेव्हा कुठे होता तुम्ही. ते लांडे पहा कुठं काय होतं, तिथे प्रचंड त्यांचा मोर्चा ह्या मुंबईत निघतो. याची कुणाला शरम, लाज वाटत नाही. बाईंनी सांगितलं... मुसलमानांना सैन्यामध्ये कोटा मिळाला पाहिजे. (ॲक्टिंग करत... हिजड्याप्रमाणे टाळ्या वाजवायची नक्कल करत...) हाजी!.... पोलिसांमध्ये चांगली भरती केली पाहिजे (ॲक्टिंग करत... हिजड्याप्रमाणे टाळ्या वाजवायची नक्कल करत...) हाजी!... शरम कशी वाटत नाही, मुसलमानांना उसने कोटे देताय. आजपर्यंत या सैन्यामध्ये कधी जात-पात, धर्म शिरले नाहीत आणि तुम्ही जात-पात शिरवताय...? त्या इटलीच्या बाईचे काय जातंय. ती बाई इथे काय वाटोळे झालेय तर जाऊन बसेल इटलीला. उद्या देशावर घाला आला तर माझ्या शिवरायांचा महाराष्ट्र पहिल्यांदा उभा राहील. (टाळ्या, जल्लोष, घोषणा). हत्यारे चोख ठेवा, तयार ठेवा. मी कधी अतिरेक्यांना बोलवायचे झाले तर नंदूरबारापर्यंत जाईन, अरे निदान ते हिंदू, तरी आहेत, या लांड्यांच्या ज्यांच्या घाणेरड्या संघटना आहेत. त्यांच्याशी तुम्ही चर्चेकरिता जाता मग त्या नंदूरबाऱ्यांना का नाही बोलवत? त्या नंदूरबाऱ्यांना बोलवा. त्यांना विचारा तुमचं काय म्हणणं आहे. कशासाठी चालला आहे हा संघर्ष. आमच्या संजय राऊत यांनी सामनाच्या रोखठोकमध्ये चांगले लिहिले आहे. मुजफ्फर हुसैन यांची चांगली माहिती सामन्यांमध्ये लिहिली होती. त्यांच्याने इंग्रजी भाषांतर विक्रांत ठाकूर यांच्याकडून करून मी मनमोहनसिंग यांना पाठविलं आहे. काय चालले आहे या देशामध्ये, ही आग कशी लागते... ती नुसती शेकोटी नाही. मुसलमानांनी ठरवलंय मतभेद विसरून जेवढ्या संघटना



म्हणून आहेत, अशा सर्वांच्या वतीने लोकसभेत आपले प्रतिनिधित्व पाठवायचे. सरकारभोवती या कम्युनिस्टांनी एक पराणी ठेवली आहे. बोलतात चिकार, चावा घेतला की सोडणार नाही. पण चावाच घेत नाहीत... कारण त्यांनी कवळी बसवली आहे. (हास्यलोट). ते चावा घेत नाहीत कारण त्यांच्यावर हे सरकार चालले आहे. कारण त्यांचे जेवढे लोक निवडून आले आहेत, त्यांच्या जोरावर त्यांनी सरकारला वेसण धरलेली आहे. आणि थोडे दिवस सरकार दाखवते की आम्हीपण कमी नाही म्हणून आणि शेवटी कमीच. हा मुसलमानांचा मोठा त्याग, कोण देशातून हिसकावून लावणार, त्यांची फार तयारी चाललीय, तशी तुमची तयारी चालायला पाहिजे, मी जे जे काही बोललो आहे ते खरं ठरलं आहे. मतदारांनी शिवसेनेला फक्त पाच वर्षे दिली आणि त्यांना किती वर्षे झाली?... साधारण ५६-५७ वर्षं झाली. महाराष्ट्राला जवळजवळ ४६ वर्षं... यातली ५ वर्षं बाजूला करा, उरलेली सगळी काँग्रेसचीच सत्ता होती. हे सर्व वाटोळं दिसतंय ते काँग्रेसचं आहे. आणखी ५ वर्षं शिवसेनेला मिळाली असती तर यापेक्षा आणखीन प्रगती करून दाखवली असती. प्रत्येक ठिकाणी आपल्या दलदल, वागणुकीमुळे कपाळावर करंट्या फुटताहेत. हा महाराष्ट्र देश त्यामुळे तसाच दुर्दैवी आहे. तुम्ही आहात म्हणून अपेक्षा करतोय. नंतर महाराष्ट्रात एकही पक्ष उठाव करणारा नाही. नंतर आरक्षण नको, विरोध नको, नक्की काय करायचंय हे ठरवून टाका... त्या आर्थिक निकषावर प्रत्येक जातिधर्माच्या लोकांना आरक्षण देऊन टाका (टाळ्या). केवढी श्रीमंत माणसं आहेत, त्यांच्या मुलांना आरक्षणाची गरज काय? आज अगोदर हिंदू फाटलेले आहेत आणि आता जाती-जमातीचे लढे उभे राहतील, बाकी तुमचे दलित वगैरे काय असतील ते आणि शेवटी याच जाती आणि लढ्यांनी हिंदुस्थान कमकुवत होईल आणि तुमच्या स्वातंत्र्यावर गदा येईल. हे सगळे दिसत असताना, माहीत असताना, हिंमत कोणातही नाही. काहीतरी जबरदस्त केले पाहिजे म्हणजे वेड्यात दौडत जाऊ नका. पण जेव्हा दौडत जाल तेव्हा विजयी होऊनच परत या... माझं भाषण साधं आहे, हे काय शिवतीर्थावरील मैदानी भाषण नाही. सगळ्यांचे डोळे माझ्याकडेच आहेत. कोणी हलायला तयार नाही. काय बाळासाहेब भाषण करायलाच थांबलेत, हलणार नाही आहेत. तो प्रशांत दामले त्यांचंही प्रेम, विचार झालेच पाहिजे. पण आपल्याला माहिती आहे किती टोल घ्यायचा हा आपला प्रश्न आहे. मी आज आपल्याला एक आशीर्वाद देत आहे की मुंबई महानगरपालिका आणि तुमचा भगवा झेंडा शिवसेनेचा तसाच त्वेषाने फडकत राहू दे. सगळीकडे जबरदस्त शिवसैनिक उभे राहिलेले आहेत,

त्यांची आता मी नावे सांगत नाही आहे. आत्तापर्यंत आपणच जिंकत आलो होतो. अत्यंत मेहनत करून जिंकू, दीपक सावंत हे पदवीधर मतदारसंघातून उभे राहिले आहेत. ही जागा आतापर्यंत आपणच जिंकत आलो होतो. परंतु जुन्या व्यक्तींना लोक कंटाळलेले आहेत. (हास्यलोट). दीपक सावंत अत्यंत मेहनती डॉक्टर आहेत. मध्यंतरी जी सुनामी आलेली मुंबईत आणि इतरही महाराष्ट्रामध्ये आली. त्यांनी तिकडं जाऊन एकत्रितपणे उपचार केले हे विसरता येणार नाही. २४ तारखेला मतदान आहे तरी आपल्यापैकी काहींनी फॉर्म भरले असतील त्यांनी इमाने इतबारीने दीपक सावंत यांना निवडून आणायचंय.

''जय भवानी... जय शिवाजी... जय हिंद... जय महाराष्ट्र''



# १ मे २०१०

## बाळासाहेब ठाकरे

बाळासाहेब ठाकरे भाषण करण्यासाठी उभे राहिले. बाळासाहेबांनी हात जोडले अभिवादन केले आणि उजवा हात दाखवला. (तुतारीचा आवाज, प्रेक्षकांमधून घोषणा हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख, सरसेनापती, श्रीमंत श्री बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो.)

जमलेल्या माझ्या तमाम हिंदू बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो...(जल्लोष, टाळ्यांचा कडकडाट आणि घोषणा. हा आवाज कुणाचा, शिवसेनेचा. आवाज कुणाचा. शिवसेनेचा. शिवाजी महाराज की जय...! जय भवानी....जय शिवाजी...!!)


महाराष्ट्र राज्याला आज पन्नासावं वर्षे पूर्ण होतंय असंच मी म्हणतो. सुवर्णवर्ष...! बाबासाहेबांनी अपेक्षा केलेल्या आहेत की, यापुढचा जो महोत्सव येईल तो बेळगाव, कारवार, भालकी, बिदर सगळे सगळे मिळून असा एक मोठा आपला महाराष्ट्र उभा राहिला पाहिजे. करणार कोण? काय बसलेत आणि कोण निवडून दिलेत? काही विचार नाही केला. डबड्यात फक्त टाकलं किंवा बटणंच दाबत बसलात आणि नको ते झालं शेवटी. किती? ५ वर्षे दिली, आणि ५ वर्षे दिली, आणखी ५, पाढे पंचावन्न कधी संपणार तुमचे? एवढ्याने जरी उचललं असतं ना सगळं, तरी... तरी सर्व रंग पालटला असता राजकारणाचा... भगवा झाला असता. (टाळ्या). मला माहीत आहे पूर्वीचं.. त्या वेळचे ते करीअप्पा होते... आपल्या सैन्याचे प्रमुख... ते शिवसेनेमध्ये आले... करीअप्पा! आणि त्यांना आम्ही ठाण्यातून उभं केलं होतं. पडले... आणि शिवाजी पार्कला, शिवतीर्थावरची तुफान सभा झाली. आणि त्यांना बोलायला सांगितलं... त्या वेळेला पहिलं वाक्य त्यांचं? व्हेअर द व्होट्स गॉन... व्हेअर द व्होट्स गॉन... मतं गेली कुठे? आता काय करायचं याला...? आता तेच तर मी म्हणतोय मतं गेली कुठे? हा महाराष्ट्र कोणी जगवला नसून मराठी रक्ताने जगवलेला आहे. तोही शिवसेनेने जगवलेला आहे हे विसरू नका आपण. (प्रचंड टाळ्या, जल्लोष, घोषणा)

हा शिवरायांचा भगवा झेंडा...!
हिंदुत्वाचा भगवा झेंडा...!!
शिवसेनेचा भगवा झेंडा...!!!

हाती घेतल्यानंतर खाली ठेवायचा नसतो. संभाजीराजांचे ज्या वेळेला औरंगजेबानं...

भयंकर क्रूरपणे त्यांचे हालहाल केले. हाल कसे केले त्याची कल्पनासुद्धा येणार नाही तुम्हाला. वाचल्यावरसुद्धा काटा उभा राहील... असला तर? औरंगाबाद नाही... संभाजीनगर. आम्ही नाव दिलंय, शिवसेनेने नाव दिलंय. उस्मानाबाद नाही... धाराशिव. पण बेशरम कार्यकर्ते... काय होतं, माझी ठाकरी भाषा, तुम्ही 'सामना'मधून वाचावं पण इथे देता येत नाही. सगळी सभ्य माणसं बसलीयेत आजूबाजूला. त्यामुळे उगीच त्यांना घाम फुटायचा! पण दिल्लीमध्ये जे बसलेले आहेत..., मागे दिल्लीमध्ये गेलो असताना रस्त्याचं नाव औरंगजेब रोड, औरंगजेब रोड, औरंगाबाद नाही. कशी शरम येत नाही हो तुम्हाला...? लाज नाही? लज्जा नाही... राज्यकर्ते...! आणि तुम्ही निवडून देता. मुंबई जाणार... कोण जाणार म्हणतंय? पन्नास वर्षे झाली... मराठीसाठी रडावं लागतंय तुम्हाला? शी... शी... शी... लांछनास्पद...! भयंकर लांछनास्पद. मराठी ही आमची मातृभाषा आहे आणि तिला तुम्ही मानलंच पाहिजे...! बोललचं पाहिजे...! (प्रचंड टाळ्या) पण आम्हालाच चालतं... आता काय म्हणायचं तुम्हाला? भय्या भेटला तरी चालेल हो.. पण मराठीतच बोला. पण आम्हीच स्वत:हून बोलतो, कैसे भय्या कैसे हो? अरे तुझं इंग्लिश काय? आणि तुझं हिंदी काय? आणि मुळामध्ये मराठी तुझं काय? कुठच्याही भाषेवर प्रभुत्व नाही. काही नाही काही... पण हिंदी का बोलता तुम्ही? हिंदी ठीक आहे... पण ती राष्ट्रभाषा निश्चितच नाहीये. संपर्क भाषा, कम्युनिकेशन, मग असं असताना तुम्ही का नाही मराठीला सुरुवात करत? काय सुवर्ण वर्षं... कसं गाजवायचं? म्हणजे ह्या अशा पालख्या? त्यांनी नाही होणार..!! हुतात्म्यांचं जे आत्ता स्मारक उभं केलंय...! बस्स... आमचं काम झालं. वर्षांनी त्या तारखेला जायचं १ मे ला... ते गोल पुष्पगुच्छ ठेवायचं... आणि हे व्यर्थ ना हो बलिदान... आमचं काम संपलं... पण आज जा, कालच उद्घाटन केलंय मी शिवतीर्थावरती... आणि तिथे जे दालन आम्ही उभं केलेलं आहे, स्मृतिदालन... संयुक्त महाराष्ट्र चळवळीचं...!! पहा, पहा जरा...!!! मला खात्री आहे की, तुमच्या अंगातलं जे थंड रक्त आहे ते सळसळल्या, तापल्याशिवाय राहणार नाही. (टाळ्या) असं ते प्रदर्शन आहे. मी गेलो होतो. मी फार... खूष झालो, समाधानी झालो त्यावरती. उद्धवनी खूप मेहनत घेतली... इतर आता ज्यांचे सत्कार झाले ते फक्त फुलांचे गुच्छ देण्यासाठी झाले नाहीत. फुलांनासुद्धा अभिमान वाटला पाहिजे की योग्य माणसाच्या हातात मी गुच्छ म्हणून गेलेलो आहे. (प्रचंड टाळ्या) आता एवढंच झालं आहे, सध्या की लवकरच मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका येणार... आपणच आहोत तिथे अजूनपर्यंत तुमच्या आशीर्वादाने...!! शिवसेना, शिवसेना आणि शिवसेनाच आहे!!! (प्रचंड टाळ्या, प्रचंड जल्लोष, घोषणा).

मुंबई जाईल म्हणून द्यायची नाही, पण मुंबईच्या हाती... शिवसेनेच्या हाती मुंबई महानगरपालिका जी आहे, मुंबई नाव तिथे आहे... ती मुंबई महानगरपालिकासुद्धा



शिवसेनेच्या हातून जाऊ द्यायची नाही... बरं, बाकी सर्व ठीक आहे, टॉवर येत आहेत, उभे राहताहेत, चाळी पाडताहेत, कोणी विचारत नाही, बोलण्यासारखं खूप आहे, तुम्हाला माहीत आहे तुम्ही माझी पूर्वी भाषणं ऐकलीत, अशा वेळेला तासन्‌तास भाषणं करीत होतो मी! आता सध्या वयं वाढणारंच हो...! माझ्याकडे काही रिमोट कंट्रोल नाही. मंत्रिमंडळ ज्या वेळी आपलं होतं त्या वेळी माझ्या हातात रिमोट कंट्रोल होता... पण वयाकडे नाही... ते वाढतंच जाणार... आम्ही काय? बाबासाहेब काय? लतादीदीसुद्धा आमच्या बरोबरच आहेत थोड्या मागेपुढे... पण जे काही कर्तृत्व गाजवून ठेवलंय... ते कुणीतरी वारसाच्या नात्यानं कोणीतरी पुढे नेलं पाहिजे. तुमच्यातून काही उभे राहिले पाहिजेत...! ते दर वेळेला सी. डी. देशमुख, सी. डी. देशमुख, सी. डी. देशमुख...? ती काय प्लेअरची सीडी आहे काय हो? केव्हाही रिवाईंड करा... केव्हाही फॉरवर्ड करा... काही नाही... अभिमानी मराठी उभे राहिले पाहिजेत. आणि अशा तऱ्हेने तुमच्यातील मराठा जागा करा; म्हणून बाबासाहेबांनी... मी बखरी वाचत होतो, पण मला कंटाळा आला, मला वाचवेनात! काय ते वर्णन...!! बखरी मी वाचल्या नाहीत, म्हणजे वाचायला सुरवात केली पण बाजूला ठेवून दिल्या.... बाबासाहेब पुरंदरे... शिवशाहीर... ह्यांनी इतिहास वाचायला शिकवला... हे त्याचं महत्त्व आहे! काय भाषा आहे... असं वाटतं बाजीप्रभू पालखी घेऊन चालले आहेत. महाराज आत बसलेले आहेत. वर्णन काय...! जणू काही आपणच त्या वेळेला पालखीला हात लावला आहे की काय असं वाटतं... असो. जास्ती काही बोलत नाही. पूर्वी मी बऱ्याच लोकांना दम दिलेला आहे आणि अजूनही देतो...! सध्या जरा मलाच तब्येतीनं दम लागतो. कोणी देण्यापेक्षा लागलेला बरा...! आणि अशा तऱ्हेने आज या सुवर्ण वर्षाच्या निमित्त का होईना मी आज सर्वांचं दर्शन घेऊ शकलो त्याबद्दल मी स्वत:ला भाग्यवान समजतो. (प्रचंड टाळ्या) फक्त टाळ्या मारणारे हातसुद्धा जे पवित्र काम असतं ते काम करायला चुकवून देऊ नका. टाळी एक वेळ पडली नाही तरी चालेल पण तुमचे मतदान हे योग्य ठिकाणीच पडले पाहिजे. दिलं गेलं पाहिजे... आणि शिवरायांचा हा भगवा झेंडा... शिवसेनेचा भगवा झेंडा... हिंदुधर्माचा भगवा झेंडा सतत... सतत... आणि सातत्यानं... अस्मानात फडकत राहिला पाहिजे... फडकत राहिला पाहिजे... फडकत राहिला पाहिजे...

जयहिंद .... जय महाराष्ट्र !...

# १७ ऑक्टोबर २०१० दसरा मेळावा
# बाळासाहेब ठाकरे

बाळासाहेब ठाकरे भाषण करण्यासाठी उभे राहिले. बाळासाहेबांनी हात जोडले, अभिवादन केले आणि उजवा हात दाखवला. (तुतारीचा आवाज, प्रेक्षकांमधून घोषणा हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख, सरसेनापती, श्रीमंत श्री बाळासाहेब ठाकरे यांचा विजय असो.)


जमलेल्या माझ्या तमाम हिंदू बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो... (जल्लोष, टाळ्यांचा कडकडाट आणि घोषणा... हा आवाज कुणाचा. शिवसेनेचा. आवाज कुणाचा... शिवसेनेचा. शिवाजी महाराज की जय... जय भवानी....जय शिवाजी...!)

यायला वेळ झाला. त्याचं कारण आजच्या या मैदानी शिवतीर्थावरील सभेसाठी जरा पैसे गोळा करत होतो, अगदीच वर्धा असा तरी, थोडा तरी, अर्धा तरी, तोही जमला नाही... म्हटलं आता वेळ लावण्यात काही अर्थ नाही. माझा जनसहकार माझ्याकरता वाट पाहत असेल आणि त्यांच्याकरता मी आज माझ्या दृष्टीने लवकर आलो, ठीक आहे. माझ्यापुढे एक प्रश्न पडलाय. मला तसे काही धाड झालेली नाहीये. बिलकूल नाही आणि होणार नाही. दुसऱ्यांना होईल पण मला होणार नाही. एक फक्त दम लागतो मला. पण ते विषयावर अवलंबून आहे. शिवसेना दम देणारी आहे दम खाणारी नाही. होईल... हा जरा माझा श्वासोच्छ्वास मार्गावर आला ना, येतोय... डॉक्टर पण आलेले आहेत इथे माझ्याबरोबर. डॉ. पारकर... यांनी मला वाचवलं. माझी कुलदेवता तर आहेच आणि आज बऱ्याच वर्षांनी मी ह्या शिवतीर्थावर येतोय. कोणीतरी म्हणतात, की तिसरी की कितवी पिढी आपली, तिसरी की चौथी. माझे वडील धरून. अरे वडिलांना का सोडता माझ्या. त्यांच्यामुळेच आपण आहोत... ह्याच्यावर जोरदार चर्चा सुरू झाली आहे, वृत्तपत्रातून... मैदान एक, पिढ्या तीन. आता असे काही येणार असेल हे मला माहीत असतं तर पिढ्या वाढवल्या असत्या (हास्यलोट). कल्पना नव्हती मला आणि मी तरी कुठे शिवसेनाप्रमुख होईन म्हणून मला वाटलं होतं? मी एक व्यंगचित्रकार... पण झालो खरा, आदित्यला तलवार दिली आहे. बाबा रे, काँग्रेसच्या राजवटीत तलवार-बिलवार भानगडी करू नकोस हं. शिवरायांचा पुतळा आहे इथे. माझ्याच बाजूला इथे मागे. तो बनवताना मी होतोच. इथे आमचे इथलेच कलानगरमधले पानसरे आहेत, त्यांनी बनवला आहे. शिवाजी



महाराजांच्या हातात तलवार नाही. हिंसा... आता ह्यांच्या स्वयंपाकघरात बायकोकडे भाजी कापायला चाकू तरी आहे की विळी हे माहीत नाही. की तीही ठेवायची नाही... हिंसा. कशाने काप... पण चाकू, सुऱ्या, कात्री नाही. खरं सांगायचे म्हणजे उद्धवने समाचार घेतलाच असणार. त्यामुळे माझे मुद्दे काय आहेत ते मला माहीत नाही. पूर्वी ज्या स्टाइलमध्ये बोलत होतो अशीही स्टाइल कोणीतरी उचलली म्हणतात. मला माहीत नाही कोण आहे ते (हास्यलोट)... म्हणजे मी माझ्या स्टाइलमध्ये उद्या बोललो तर मी त्यांची कॉपी करतो आहे असं त्यांचं म्हणणं असेल. एक विनोद आठवतो, परीक्षा चालू असताना एका पोराने कोरा कागद दिला, कोरा पेपर. सोडवलाच नाही. कोरा कागद. तर, दुसऱ्या विद्यार्थ्याने तक्रार केली, सर सर बघा ह्याने कोरा कागद दिला... दिला... तर तुला काय झालं ... नाही मी पण कोरा कागद दिलाय... आणि मग... नाही सर... नंतर तुम्हीच माझ्यावर आरोप कराल तू त्याची कॉपी केली म्हणून. कोऱ्या कागदाची कॉपी काय करायची बोंबलायची, स्टाइल वगैरे ठीक आहे हो... विचार... विचारांना महत्त्व आहे. काही वाचन-बिचन आहे का तुमचं, मराठी, मराठी, मराठी. अरे साल्यांनो, तुमचा जन्म झाला नव्हता तेव्हा मी मराठी काढली आहे या महाराष्ट्रामध्ये. ही साक्ष आहे त्यांची. जाऊ द्या... खरं सांगायचं म्हणजे, खूपच मुद्दे आहेत. वाट लावली या देशाची वाट... वाट. यंत्रणांवरून तुम्ही निवडणुका जिंकता आहात मग लोकशाही आली कसली यात बोंबलायची. जसे मोबाइलवरून आपण स्टेशन बदलू शकतो... बोलू शकतो... एकेमकांशी ज्या पद्धतीने सांगता येतं, ह्या पद्धतीनं सांगता येतं... असं ते यंत्र बनवलं आहे. निवडणूक आयुक्तांकडे तक्रार केली, त्यांनी सांगितलं तुमचं मशिन द्या मला. नाही... नाही... आमचं मशिन नाही देणार. तुमच्या मशिनवरच चालवा. आहे केस चालू आहे. ज्याने मशिन चोरलं म्हणतात ते. हो चोरलं... तुमच्या भानगडी काढण्याकरिता.... भानगड आली बाहेर ती. यंत्रांनी मतदान झालं आहे. यंत्रांनी... आणि हे मतदान करून आज सत्ता जिंकली आणि त्याच्यावर बसले आहेत खुर्च्या उबवत. हे सगळे ठीक आहे. पण हे कितपत चालणार. न्यायमूर्तींचे काही निर्णय येऊ लागले आहेत. मला माहीत नाही किती... आता पोलिसांनाच विचारतो, (स्पीकरकरडे बोट दाखवत) काय रे बाबांनो, ५० डेसिबल आहे ना हे! माझं काय आवाजाचं... हा एक जल्लोष झाला, हा आवाज बसतो का तुमच्या ५० डेसिबलमध्ये (जल्लोष). आणि आता आम्हाला झोपवा खाटेवरती आणि भरा खटला. खटला कसला भरताय. लाउडस्पीकर एकाच्यासुद्धा तोंडासमोर नाहीये. तरी बोंबलताहेत. ही डरकाळी. शिवतीर्थावरील डरकाळी ही ५० डेसिबलमध्ये बसणार नाही आणि बसू

शकणार नाही... यंत्र फाटेल पण आवाज नाही थांबणार. शिवसेनेची तयारी आहे. काय दडपणार तुम्ही हा आवाज. ब्रह्मदेवाचा बाप जरी खाली उतरला तरी त्याला दाबता येणार नाही... काश्मीर चांगलं पेटतं आहे, ह्या जवाहरलाल नेहरूंनी घाण करून ठेवली आहे आणि सगळी वाट लावली आहे ह्या देशाची. लांड्यांवरती प्रेम... (टाळ्या, जल्लोष) आणि घातलं त्या अब्दुल्लाच्या घशामध्ये. किती किती घाण म्हणू? काश्मीर अजून धगधगत आहे. अजून चर्चा... हा हिंदुस्थानचा भाग आहे का नाही, तो तुझ्या बापाचा आहे का हे पहिलं ठरव मग आमच्या भागांचा विचार करायला ये. (टाळ्या) चर्चा कसली करताय, गोळ्या घाला. अफजलगुरूबद्दल बोलला असेल उद्धव, ७ वर्षे झाली. फाशी नाही. दोर मिळत नाही. काय हिजड्यांचं राज्य आहे, हिजड्यांचं... मी मागे सुधीरभाऊ – माझी गाडी चालवायचे. स्टेशनवॅगन – मी ती कोकणला देऊन टाकली ॲम्ब्युलन्स म्हणून, सभा झाली. गाडीत बसलो आणि डास शिरले. कोकणातले. कोकणातसुद्धा डास आहेत... आणि प्रत्येकजण आपल्या हाताने डास मारत आहोत (हाताने डास मारण्याची ॲक्शन करीत.) पोलिस होते माझ्या गाडीत, त्यांनी प्रयत्न केला. मी म्हटलं, अहो जाऊ द्या हो... चोरांना पकडता येत नाही तुम्ही डासांना काय पकडणार. मग माझ्याकडे आमचा भालचंद्र ठाकूर... आला आहे की नाही ते माहीत नाही. आजारी आहे; फार जुना. शिवसेनेच्या जन्मापासून... मी म्हटलं ठाकूर, पुढच्या वेळेस येताना दोन-तीन हिजडे घेऊन या आपल्या बसमध्ये... काय होईल... ते टाळ्या मारत बसतील. डास मिळाला काय नाही मिळाला. त्याचं समाधान होईल, टाळ्या मारल्याचं होईल, आपलं डास मेल्याचं होईल. आणि ह्या काँग्रेस राजवटीत आता डासही थकलेत हो. माझं एक वाक्य होतं, नाना पाटेकरनी मला वाटतं त्या क्रांतिवीरमध्ये वाक्य घेतलंय ते... 'अरे एक मच्छर, एक मच्छर आदमी को हिजडा बनाता है!' हे माझं वाक्य... नानाला मी विचारलं, तुझ्याकडे कसं आलं हे वाक्य... आलं म्हणे... मच्छरने दिलं का... नाही म्हणे... आता डास इतके थकले, इतके थकले की विचारू नका. आमच्या सोंडा वाकड्या झाल्यात हो... पण काँग्रेस पक्षामध्ये इतके हिजडे इतके हिजडे की आता चावायचं तरी कोणाला. सगळे झुकताहेत त्या सोनिया गांधींसमोर. ही हिजड्यांची औलाद ह्या देशावर राज्य करतेय, काँग्रेस पक्ष म्हणून... तोपर्यंत ह्या देशाला चांगले दिवस येऊ शकणार नाहीत. आणि यंत्रानी जर तुम्ही निवडणुका जिंकणार असाल तर उद्या मुडदे पडतील मुडदे. तिरंगा उगीच नाही फडकत आणि तिरंग्याच्या साथीला माझ्या महाराजांचा भगवा झेंडा आहे. ते चिदंबरम... साले, एवढे ते नक्षलवादी हल्ले करताहेत, त्यांची लुंगी कशी काय नाही सुटत (हास्यलोट). काही नाही म्हणे, हा भगवा दहशतवाद आहे. असं....



हिरवा दहशतवाद कधी तुम्हाला दिसला नाही. भगवा दिसला, त्याचे कारण हे भगव्याचं तेज आहे. तुम्ही गृहमंत्री असाल कोणी असाल पण तुम्हाला भगव्याचं तेज परवडणार नाही. धाडस कसं काय होतं या लोकांचं? हा हिंदुस्थान... या हिंदुस्थानचा रंग भगवा आहे आणि भगवाच राहणार, लांड्यांची हिंमत होणार नाही हा रंग बदलण्याची. असो... आज काय चाललंय ते... माणिकराव, काय माणिकराव... काय माणिक शोधलंय, आणि मी काही बोललं तर पंचाईत होईल. माणिकरावाच्या डोक्यावर केस नाहीत... सर्व गुळगुळीत (हास्यलोट) सरकार ह्याच्यावरूनच घसरून पडणार आहे... त्या माणिकरावाच्या डोक्यावरून (हास्यलोट). आपापसात डावपेच चाललेले आहेत... मागे आम्ही केलं ना आणि पुढेपण करत राहाणार, माय नेम इज खान, मग ह्याच्यात गेलास... जा, मग पाकिस्तानात जा... बिग बॉस ते काही निघालंय. दोन लवंड्या आणल्या त्यांनी पाकिस्तानातून. का? आपल्याकडे चांगले गायक नाहीयेत... कलाकार नाही आहेत? वेळ आली तर मीपण गायला लागेन. अगदीच काही नाही तर 'वंदे मातरम्' म्हणीन, 'जन गण मन' म्हणेन. कशाकरता? जो पाकिस्तान तुमच्या मुळावर आलेला आहे. अजूनही त्यांचा अंश गिलगिटमध्ये आहे. भारताचाच, हिंदुस्थानाचाच तो भाग... पंडित जवाहरलाल नेहरूंच्या नालायकीमुळेच तो पाकिस्तानंनी जिंकला आहे... आणि आजही तिथे चायना, चीनने तिथे सैन्य घुसवले आहे. अणुभट्टी देतायत, खंदक खणले आहेत, सैन्य आणलं, रस्ते खणलेत... काय आहे काय? कोण ही बाई? इटलीमधली, अरे मुर्दाडांनो... दोन हजार वर्षं मोघलांनी तुमच्या बोडक्यावर राज्य केलंय या देशावर, १५० वर्षं ब्रिटिशांनी राज्य केलं आणि आता पुन्हा इटली राज्य करतेय, परदेशी... काय हे भयंकर चाललं आहे हे, कुपोषणं चालली आहेत, बालकं मरत आहेत, पोटं फुगलेली दाखवत आहेत, लुकडे हातपाय... कल्पना अफाट असतात. मी वाईनबद्दल बोलणार नाही... कोण बोलतंय? शरद पवार... माझे जुने मित्र आहेत. ते काय पितात हे मला माहिती आहे. शिवाम्बू सोडून... धान्यापासून दारू. अरे भडव्यांनो, च्यायला लोकांना खायला मिळत नाही, उपाशी मरताहेत लोकं आणि तुम्हाला धान्यापासून दारू बनवण्याची औदसा आठवते (हास्यलोट) आणि हे मुर्दाड आमच्या देशातले जे मतदान करत असतील त्यांना... ह्याला काय म्हणायचं काय? एवढ्या संपूर्ण आयुष्याची वाट करून टाकली आहे. देशाची वाट लावली आहे. निवडून देता तुम्ही... जे कोणी देत असतील ते, आपण नाही, ते... मग कशाकरता जगताय? झालं, या कॉंग्रेसवाल्यांच्या राजकीय खोपड्या आणि बाहेरून येणाऱ्या लोढ्यांच्या झोपड्या ह्यामधून काय मलेरिया, डेंग्यू, स्वाईन फ्ल्यू, चिकनगुनिया, कोणामुळे?

आमच्यामुळे? आज नशीब... पाऊस छान पडला. तलाव भरलेत. पण पाणी कोण पितायत? जोपर्यंत या सरकारामध्ये पाणी नाहीये, तोपर्यंत तुम्हाला प्यायलासुद्धा उद्या पाणी मिळणार नाही. शिवसेनेचं सरकार आलंच पाहिजे आणि आणणारच... हे आज लिहून घ्या तुम्ही... लिहून घ्या, मी देतोय... पण काय झालेलं आहे, पलीकडे काही घोषणा होतात जिकडे तिकडे... ह्या राज्याचा मुख्यमंत्री मीच ठरवणार. ठरला नाही. डोंबिवली, कल्याणचा उपमहापौर आमचाच होणार. अरे, आम्हाला काही तरी ठेवा. सगळंच तुम्ही घेतलं तर आमचं काय होणार? इतकी वर्षं घासली ती फुकट काय (हास्यलोट)... शिवसेनेने काय कर्तृत्व गाजवलंय... उगीच ४५ वर्षं काढली नाहीत... हुजरे झालो नाहीत कोणाचे. (जल्लोष). स्वाभिमानाने जगलो आणि जगणार... आणि हे मी शिकवलंय तुम्हाला. हे ते रक्त आहे. मराठ्यांचं राज्य ह्या महाराष्ट्रात असतानासुद्धा एक बामण बनवलाय मी महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री... अशक्य... त्रिवार अशक्य... सभापती बनवलाय... कशाला? एका गँगस्टरला मुख्यमंत्री बनवलाय, कोंबडीचोराला... (जल्लोष). मंत्रिपदाचा किती गैरवापर, कायदा आणि सुव्यवस्था राहिली आहे काय? कायदा आणि सुव्यवस्था राहिलीय? मंत्र्याच्या पोरांनी काही केलं तरी चालतं? ॲड. श्रीकांत भटने फार चांगले मुद्देसूद मुद्दे मांडले आहेत वर्तमानपत्रात... का हो, मंत्र्याच्या मुलांकरता निराळा कायदा आहे का ह्या देशात? चांगला प्रश्न आहे... विचार करण्यासारखा आहे, आपण विचार करावा, पत्रकारांनीही विचार करावा... त्यांच्याबद्दल काय बोलायचं? दुखवलं तरी आणि दुखवलं नाही तरी... चालूच आहे. काही ठराविक वर्तमानपत्रं म्हणजे हमखास आपल्या विरुद्ध जाणारच. काही वेळा असं वाटतं... त्या पक्षानी, नवीन जन्मास आलेल्या... ह्यांना नोकरीला ठेवलंय की काय? तुमच्याशी वैर मी कशाला घेऊ? मी तुमच्याच क्षेत्रातला व्यंगचित्रकार, पण कशाकरता हा छळवाद चालवला आहे? काय आम्ही तुमचं घोडं मारलंय..? कशाकरता... त्या कल्याण, डोंबिवली इथे उद्धव कमी पडले, घसरले. आता ही पिढी आम्ही आणलीये... आणायची नाही? उद्धवला मी शिवसेनेत आणलेलं नाही, मला शिवसेनेत घराणेशाही नको. ज्यांनी आणला तो बाजूलाच राहतोय. आम्ही महाबळेश्वरला होतो. आम्ही ह्यांना सांगितलं... माझी नेहमीची प्रथा आहे की तुमची भाषणं आटपून घ्या, मला इकडे विनाकारण थिजवत ठेवू नका. सगळेजण बोलून घेतात. आपली नरडी साफ करतात. मग मी येतो. मी उद्धवला सांगितलं, बाबा तुम्ही तुमची भाषणं आटपा. मी बंगल्यावर राहिलो होतो भोसलेच्या... झाली भाषणं की मला सांगायला या... निरोप पाठवा की भाषणं झालेली आहेत, तुम्ही निघा... आणि मी गेलो तो असा ढीग टेबलावर. मी म्हटलं काय झालं, कसले हार आणि



तुरे... म्हटले तुम्हाला माहीत नाही. मी म्हटलं मला माहीत नाही म्हणून तर तुम्हाला विचारलं ना... तर म्हणे उद्धवसाहेब कार्याध्यक्ष झाले. म्हटलं कोणी केले. कृष्णकुंजवाल्यांनी... म्हटलं ही काही प्रथा नाही शिवसेनेत, शिवसेना भिकार लोकशाही नाहीये, शिवशाही आहे, शिवरायाची शिवशाही आहे... भिकार लोकशाही नाहीये... माझ्या आदेशाशिवाय, आणि मला विचारल्याशिवाय शिवसेनेचं धोरण ठरवता येणार नाही कोणालाही... नाही... ही प्रथा अजून चालू आहे. मग हे का झालं? मग मी उभा राहिलो. महाराष्ट्रातील सगळे लोक आले होते. प्रतिनिधी, नगरसेवक, आमदार, खासदार, विभागप्रमुख वगैरे वगैरे... सगळे. म्हटलं तुम्हाला मान्य आहे का ही निवड... ही नियुक्ती? हो, आम्हाला... म्हटलं घाबरायचं नाही... दबावाच्याखाली नाही... डरायचं नाही, सरळ सांगा आम्हाला हे मान्य नाही... मी आत्ता रद्द करतो... मी आत्ता रद्द करतो... नाही नाही... म्हणे आम्हांला हे मान्य आहे. मी म्हणालो, मी एकच... एकच संधी मी तुम्हाला देतोय. ह्यानंतर हे प्रकार मी सहन करणार नाही शिवसेनेत... काय वाटेल ते मला म्हणा हुकूमशहा... हो हुकूमशहा आहे... हिटलर आहे, हो हिटलर आहे. च्यायला, नाही म्हटलं तरी चावतयंच आहे कुतरडं... तर भ्या कसली? ही घराणेशाही मी केली नाही. आला आत्ता जयदेव, मी त्याला न सांगता... काय रे तुला बोललो का रे... शिवसेनेत ये बाबा... जागा खाली आहे. काही सांगितलं नाही. त्यानी सुरवात केली... तो येतोय आपल्या कर्तृत्वानं, तो पुढे सरकत असेल... मी अडवणार नाही पण मी घराणेशाही म्हणून त्याला पुढे करणार नाही... पिढीचा उल्लेख कसला करताय... दोन मंत्र्यांची मुलंबाळं गेली आहेत... कोणी खासदार झालाय, कोणी आमदार झालाय, कोणाचा खासदार झालाय... दुसरा गोळ्या झाडतोय, हे म्हणे काचेचा तुकडा लागला... आणि हे पोलिस... दबावाखाली वागतायत. बघा, विचारा त्यांना... वागताय की नाही... (टाळ्या). सगळ्या मंत्र्यांचे रिपोर्ट अगदी त्यांना सगळ्यांना क्लिनचीट... ह्याला क्लिनचीट, त्याला क्लिनचीट, किती क्लिनचीट आहेत रे तुमच्याकडे? मंत्र्यांसाठीच, आमच्यासाठी ठेवा ना काही... पण आम्ही गुन्हे करणार नाही... आमच्याकडून हे पाप होणार नाही... कधीच होऊ शकणार नाही आणि करू देणार नाही कोणाला... मुद्दा एवढाच येतो ह्या क्लिनचीट कसल्या? काचेचा तुकडा म्हणे लागला बरोबर गालावरतीच... काय मुका... चुंबन घ्यायला गेला होता काय काचेच्या तुकड्याचं त्या? काय मस्ती चाललेली आहे? (हास्यलोट)... पैसे कमवताहेत... एकेकाकडे कसले... अब्जोपती आहेत अब्जोपती... सगळीकडे एक अशी नजर टाकून बघा. देशाच्या भवितव्याच्या दृष्टीने विचार करा. आता आपले

लष्करप्रमुख म्हणताहेत... चीन आणि पाकिस्तानकडून धोका फार मोठा आहे... त्यांना अजून नीट शस्त्रं नाहीयेत. ह्या पोलिसांकडे शस्त्रं नाहीत.. त्यांच्याकडे ॲटमबॉम्ब आहेत, दिवाळीतले... आणि केपांच्या बंदुका... ढिश्यूं... ढिश्यूं... चांगले होते ते गेले, साळसकर गेले, करकरे गेले, कामत गेले, कुंबरे गेले... चांगली माणसे घालवून बसलो. कोणी कारस्थान केलं की बरोबर मोक्यात जाऊन त्यांना ठार केलं... कारण ते लोक काही इतके बावळट नव्हते ते की, इथूनच गोळी येतेय ना मग इकडेच उभं राहू या, म्हणजे गोळी आपल्या अंगातून जाईल... इतके नव्हते चक्रम... जॅकेट दिलं होतं... तेही भोकं पडणारं... आणि आमचे अशोक चव्हाण... मंत्रालयाच्या भिंती मजबूत करताहेत. अरे देशाच्या भिंती मजबूत करा, ढासळल्या आहेत. विटा बाहेर पडल्याहेत... पाकिस्तान घुसतोय, चीन घुसतोय, अतिरेकी घुसताय्‌त... आपल्या भिंती सही करतायेत. बमब्लास्ट प्रूफ... ह्याच्याच वडिलांनी, अशोक चव्हाण यांच्या वडिलांनी शंकरराव चव्हाण... मुख्यमंत्री त्या वेळचे... महाराष्ट्र राज्याचे. काय हो, महाराष्ट्राची अगदी त्यांनी वाट लावली आहे... कुठचा हा शिवरायांचा महाराष्ट्र, काय करून टाकलं आहे. शंकरराव चव्हाण यांनी विमानतळावरती... मुख्यमंत्री असताना... संजय गांधींच्या पायात घातल्या... चपला... चपला घातल्या... लाज नाही वाटत, मुख्यमंत्री ना म्हणवतोस? पोराचा चान्स गेला कारण ते बागवे सरकले रमाबाई नगरला, त्यांनी राहूल गांधीच्या ह्याच्यात घातल्या... चपला (हास्यलोट). शब्द मागेपुढे होतात त्याबद्दल माफ करा जरा. (हास्यलोट) नंतर तुम्हीच विचाराल साहेब ते विसरलात सांगायला... ते राहुलच्या ह्याच्यात काय घातलं म्हणून... अरे हो विसरलो... (प्रचंड हशा) काय झालं? वय वाढलं आहे, त्यामुळे विसरपणा वाढतोय थोडा. बरं जाऊ दे? ही काय संस्कृती आहे? ते एका पुस्तकावरनं काहीतरी वाद चाललेला आहे. लाँग वे टू गो असे काहीतरी... त्या मिस्त्रीच्या... काय आहे त्याच्यामध्ये, किती घाणरडे शब्द आहेत तुम्हाला माहीत आहे? मी पत्रकारांना एकदा बोलवीन... आणि या आणि हे वाचा... आणि हे सिलॅबस म्हणून कॉलेजला लावायच्या लायकीचं पुस्तक आहे का? काय शिकवताय काय? कोणता संस्कार तुम्ही या तरुणांवरती करता? घाणेरडे शब्द, शिव्या? कॉलेजचे विद्यार्थी इतके हुशार आहेत... या भडव्यांना ते शिव्या जास्त चांगल्या प्रमाणात शिकवतील. खायच्या तर खा... बरं पुस्तक सिलॅबसला कसं काय जाऊ शकतं? हे भयंकर चाललेलं आहे. आणि मग ते विद्वानांच्या... एकंदर तज्ज्ञ... तज्ज्ञांचे एकंदर विचार... भयंकर चाललंय... तुम्ही हे सहन कसं करता तेच कळत नाही... आणखी काय सांगायचे आणि कपाळ आपटायचं तुमच्यासमोर. अरे बाबांनो, देशाचा सत्यनाश असा होतोय, महाराष्ट्राचा सत्यानाश



होतोय आणि या दोघांच्यामुळे तुमचा सत्यानाश असा होतोय... हे सांगत बसायचं का तुम्हाला?– शिव शिव... हे नका होऊ देऊ... मर्दाची औलाद आहे महाराष्ट्र... नपुंसकांची नाही, हिजड्यांची नाही... ते काँग्रेसमध्ये आहे. कोण बाई? कोण आम्हाला हुकूम करणार? कोण राहुल, कोण तो उमर अब्दुल्ला... मग त्यापेक्षा आमची पिढी बरी आहे की... आमच्याकडे विचार आहेत. ह्यांच्याकडे काय आहे?... माझी आई आहे, पण त्या आईला आहे काही किंमत? एका हॉटेलमधली होस्टेस ती (सर्व्ह करणारी). तिथे ह्यांचं प्रेम जमलं... बरं जमलं तर जमलं... ते आमच्या मुळावर का? तुम्ही कोणाचं नेतृत्व स्वीकारता आहात? राहुल हा नेतृत्वाच्या लायकीचा आहे? उमर अब्दुल नेतृत्वाच्या लायकीचा आहे? इथे बाप असा आहे म्हणून मुलगा... नाही... हे ठाकरे घराण्यात होऊ देणार नाही. शिवसेनेवर ठाकरे घराणं लादलं जाणार नाही. तुम्ही त्याचा स्वीकार केला तर आणि तर आणि तरच!!! आणि माझी आणखी एक आहे ना चौथी पिढी. उद्धवचा दुसरा मुलगा तेजस... आला असेल, इकडे बसला असेल. लई कडक डोक्याचा पोरगा आहे. और आहे... माझ्यासारखाच आहे... मला जी आवड आहे ती त्याला आवड आहे... मला बागेचं काम आवडतं, मला ॲक्वारिअम आवडायचं, मी निरनिराळी कुत्री पाळली आहेत, भरपूर... पेडीग्री डॉग्जस... ती त्याला आवड आहे. विशेष आवड म्हणजे जी माझी आवड आहे... पण ती आत्ता अमलात आणता येत नाही... कारण वर्तमानपत्रं आता खूप हुशार झालेली आहेत. तोडफोड सेना... हाण तिच्यायला (हशा). अरे बाशिंग बांधलं तर गुडघे तुमचे दुखत नाही ना? आता तुमचं बाशिंग कुठे लावतात मला माहीत नाही... पुढे लावतात का मागे लावतात?... ते तुमच्या आईबापाला विचारा... का अशी खत्रूड भाषा का? कुजकी... कालपरवा, एका वृत्तपत्रात अशी भयंकर अशी तोडबाजी केली आहे, एकेठिकाणी पहिल्या बाजूला फ्रंटपेजवर बातमी 'बिगबॉसची शिवसेनेची माफी'... म्हणजे त्यानी आपल्याकडे माफी मागितली... शिवसेनेची माफी मागितली... बातमी झाली... दुसऱ्या पानावरती कन्टिन्युएशन... पुढे चालू... तेवढंच घेतलं... शिवसेनेची माफी... पहिलं तोडून टाकलं.. हा इतका हलकटपणानं चाललाय कारभार सगळा... आणि पेड न्यूज... आम्ही केलाय तो प्रकार... एक दिवशी एक वर्तमानपत्र... मुद्दाम नाव घेत नाही कारण त्यांचा मान राखला पाहिजे बाबांनो, असं कसं आहे... कारण मोठी माणसं आहेत ती. पुढे काय होतं मला पर्वा नाही. शेवटी आम्हालाही लाज सोडूनच आता वागावं लागतंय... आम्ही हा प्रयोग केला आणि यशस्वी झाला. त्या वर्तमानपत्राच्या डाव्या बाजूला मनसेवाल्यांची स्तुती... जाम स्तुती. स्तुती करताना त्यांचं काय

फाटलं मला माहीत नाही... आणि एका बाजूला उद्धवची स्तुती... अमुक आहे, तमुक आहे, वक्तृत्व त्यांचं असं आहे, अमोघ आहे... मी म्हटलं अरे असं कसं झाले रे, हे वर्तमानपत्र आपल्याला नेहमी शिव्या देणारं... त्यांची एक स्तुती केली... मला माहीत नाही... मी समजू शकतो... पण उद्धवची कशी? म्हटलं काय रे बाबा, तू काही दिलंस का त्यांना... म्हटला... मलाच माहीत नाही. मीच आश्चर्यचकित झालोय... चौकशी करतो... आणि मग एकजण म्हणाला, होय साहेब, मीच ते केलं. मीच लिहून काढलं आणि एक पाकीट सरकवलं... छापून आलं... ही कोणाची वृत्तपत्रं पत्रकारिता? लोकमान्य टिळकांची? आगरकरांची? बाळशास्त्री जांभेकरांची? कोणाची पत्रकारिता? आमचा रोष, हा आमचा राग आहे. तुम्ही आम्हाला न्यायाने मारा, अन्यायाने मारू नका. हे शिवसेनेचं धोरण आहे... न्यायानं पाहिजे तेवढं... आमचं चुकलं... क्षमा करू नका. क्षमा करा म्हणून मी सांगायलाही येणार नाही. मुळीच करू नका... अन्यायाने झोडू नका. मग मात्र माझे जे आसूड आहेत ना ते मी माझ्या पद्धतीने कडकलक्ष्मीपेक्षा... माझ्याच अंगावर नाही मारणार... तुमच्या अंगावर मारीन... आणि माझ्यावर ती पाळी आणू नका. आज दुर्दैवाने मला तुम्ही कडू बोलायला तुम्ही लावलेलं आहात. ह्या पद्धतीने तुम्ही सजवता नटवता तुमची वर्तमानपत्रं... ती पत्रकारिता तुम्हालाच मान्य आहे का? घणाघाती, अमोघ अरे, दुसरे काही शब्द वापरता... आमच्याकडे काय घणच नाही... काय आहे काय आमच्याकडे? शिवसेनाप्रमुखांच्या सभेला जल्लोष नव्हता. मग आत्ता काय होतं, काय होतं ते? त्यानी काय ग्राउंड ओलं केलं काय? काय झालं काय? कसला हा एवढा जल्लोष?... पूर्वीचा जिवंतपणा नव्हता... शिवसेनाप्रमुखांचं भाषण पूर्वीसारखं रंगलं नाही. अमूक नाही... हे ठरावीक घेणार... आतमध्ये घालणार ती वाक्यं एकेक एकेक... घाला.. कोण पर्वा करतोय... जे डोळस आहेत त्यांना दिसतंय, ज्यांना कान आहेत त्यांनी ऐकलंय... मी कशाला पर्वा करू... मला मस्ती नाही, घमेंड नाही, गर्व नाही... मी अजूनही नतमस्तक आहे, तुमच्यासमोर (टाळ्या). पण मात्र वाट्टेल ते सहन मी करणार नाही. आणि शिवसेनेचाही पेशा नाही, आणि असता कामा नये... तुम्हीसुद्धा थंड डोक्याचे कधीही होऊ नका. नेहमी गरम डोक्याचेच राहिले पाहिजेत ...तर आणि ...तर ...आणि ...तरच तुम्हाला न्याय मिळेल. नाही तर चिरडले जाल. (प्रेक्षकांमध्ये घोषणा). या शिवरायांच्या महाराष्ट्रामध्ये किती मनं मेलेली आहेत, माणसं म्हणजे जिवंत मुडदे आहेत, जिवंत मुडदे... सेतूपूर... तिथूनच मी आलो... तेथून येत असताना जुनी आठवण झाली. चार-पाच महिने असतील किंवा तीन-चार महिने असतील. मॅरेथॉन झाली, मॅरेथॉन... कशी माहिती आहे, मिरजेला... हिंदू-मुसलमानांची



दंगल, ती नेहमीच होते आणि व्हायलाच हवी. पण ज्या वेळी आपली सत्ता असताना ९२ आणि ९३ साली बाबरी मशिदीवरून त्यांनी जी दंगलीला सुरुवात केली आणि जो शिवसैनिक माझा रस्त्यावर पडला बाहेर... पुढच्या शेपट्या त्यांनी घातल्या मागे आणि पशार झाले. पशार... एकाची हिंमत झाली नाही शिवसेनेवरती चाल करून येण्याची. हा तो मर्द मावळा, मी इथे तयार केलेला बसलेला आहे. आणि आमची साडेचार वर्षं महाराष्ट्रात सत्ता होती, पण हिंदू-मुसलमानांची एकही दंगल होऊ शकली नाही. हिंमत झाली नाही त्यांची दंगल करण्याची. ही शिवसेना... बरंच... मिरजेला दंगल झाली तर झाली... दोन दिवस विसर्जनाला असतानाच दंगलीला सुरुवात... दंगल कशावरून... अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला... तुमचा निघाला का? काढण्याची इच्छा आहे... अफझलखानाचा कोथळा बाहेर काढला म्हणून बाबासाहेब भोसले... भोसले घराणं... मुख्यमंत्री असताना, पुस्तकातून तो धडा काढून टाकला. मुसलमानांच्या भावना दुखावतील म्हणून. काही नाही, चूपचाप... कुठे गेले ते मराठे? त्या आपल्या महाराजांचे ते गुरू, तो पुतळा... (कोणाशी तरी बोलत) छापून आला आहे ना, तो असा तलवार हातात घेतलेला... दादोजी कोंडदेवांचा पुतळा काढा. काय तर म्हणे तो ब्राह्मण आहे. अरे, तुम्ही जातीपातीवरून शौर्य ठरवता? मग नेताजी पालकर कोण होता, बाजीप्रभू देशपांडे कोण होता? खंडू खोपडे कोण होता, आणि तुमचा बाजी घोरपडे कोण होता? तुमचीच औलाद, पण हे निष्ठावंत. असो, नावं खूप आहेत. पण एवढं होऊनसुद्धा लाज नाही, लज्जा नाही... सेतू पुलावरती मॅरेथॉनला कोण धावतंय माहिती आहे? अफझलखान आणि शिवाजी महाराज (श्रोत्यांना ते पत्रक दाखवीत... पत्रकारांना माहिती आहे, त्यांनीच हे छापलं आहे... आणि ह्यामध्ये एक प्रकारचं म्हणजे नाऱ्याचा - नारायण राणेचा - प्रहारसुद्धा आहे. हे छापताहेत...) चांगलं वाटतं काय तुम्हाला पाहून? थंड बसणार तुम्ही? हे जरा वाचून दाखव रे... मजकूर तो... (पत्रक उद्धव यांच्याकडे देत...) हे वसंत कानिटकरनं लिहिलं आहे त्यांच्या पुस्तकात... गवताला फुटले भाले, त्यांच्या पुस्तकातलं वाक्य मी काढलेलं आहे... कानेटकर, प्राध्यापक... वाच रे...

(आदेश बांदेकर पत्रक वाचतात.... हे मरगठ्ठे या पहाडी मुलखात तमाम दुनियेला भारी आहेत. कारण या पहाडी मुलखात पराक्रम मुळी पेरावाच लागत नाही. इथे तर गवता गवताला भाल्याची पाती फुटतात. पण फितुरीची आणि दुहीची बीजे नुसती भिरकावली तरी इथे ती खडकावरसुद्धा रुजतात आणि फोफावतात. आणि हां हां म्हणता तमाम दौलत तबाह करून टाकतात. हे मरगठ्ठे लढाई करून कोणाला आटोपणार

नाहीत. ते चिवट आहेत, जिवट आहेत, डोंगर कपारी उंदरासारखे लपून गनिमांचे कसे लचके तोडावे याचे त्यांना उपजतच ज्ञान आहे. पण आपापसात तंटा करण्यात... थोड्या नफ्यासाठी धन्याशी फितुरी करण्यात उभ्या दुनियेत यांना दुसरी तोड नाही...)

...हे तुमचं वर्णन आहे. औरंगजेबानं केलेलं वर्णन. बसा थंड बसा, जाऊ द्या... अफजलखानाला शिवाजी महाराजांच्या हातात हात घालून सेतू पुलावरून धावू द्या... महाराष्ट्रातनं धावू द्या... हिंदुस्थानात दिल्लीपर्यंत धावू द्या... कसं सहन करता तुम्ही? मी तुमच्याकरता एकटा... एकाच माणसानं जळत राहायचं का? आत्ता किती वर्ष राहिलीत मला माहीत नाही. पण आहे तिथपर्यंत मात्र मी तुमच्यासाठी आणि तुमच्यासाठीच काम करत राहणार... जोपर्यंत माझ्या कुलदेवतेने मला जेवढे म्हणून आयुष्य दिलंय, सगळ्यांना जेवढं म्हणून आयुष्य दिलंय... तेवढं आपण जगणारच... कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. पण हे असं जगू नका. की डोळ्यासमोर अफझलखान आणि महाराज हातात हात घालून मॅरेथॉन स्पर्धेमध्ये भाग घेत आहेत. तुमच्या डोळ्यांनी हे पाहता कामा नये, सहन करता कामा नये... धडाडून उठलं पाहिजे... बंद करा हे आता सगळं.

आज मलाही माहीत नाही की मी किती वेळ बोलणार. घाबरत आलो की श्वास घात करणार की काय माझा? पण आई जगदंबेच्या कृपेने ठीक आहे सगळं. पण एकाने भाकित केलं की आज शिवतीर्थावर शिवसेनाप्रमुख एक तास भाषण करणार. झाला का रे एक तास? माझ्याकडे घड्याळ आहे पण मला घड्याळ समजत नाही. एक तास भाषण करणार, झालंही असेल, मलाही माहीत नाही... कोण बघतंय घड्याळाकडे, तुम्ही आहात, मी आहे. जोपर्यंत तुम्ही बसताहात, ऐकताहात तोपर्यंत मी बोलत राहीन... पण आता मात्र आवरतं घेतो. कारण आपल्यालाही गाड्या पकडायच्या आहेत. कारण ही काय सोनिया गांधींची सभा नाही की, जमवलेली माणसं, पैसे देऊन आणलेली माणसं, भाड्याने गाड्या देऊन आणलेली माणसं नाहीत. ही रक्तामांसाची माणसं आहेत. भगव्या झेंड्याखाली जमलेले हे मरगट्टे आहेत, शिवरायांचे मावळे... आणि हे दृष्य जोपर्यंत महाराष्ट्र आहे... आणि महाराष्ट्र आपल्यामुळेच राहणार, ह्यांच्यामुळे जाणार नाही... आणि त्याच्या हातात जाऊ देणार नाही... आणि म्हणून मी तुम्हाला सांगतो, महाराष्ट्रासाठी जगायलाच पाहिजे. त्यादिवशी मला आमचे जुने जाणिते... त्यांनी पाठीत वार केले, मला अटक करण्याचा प्रयत्न वगैरे, वगैरे..., ते छगनराव भुजबळ... त्यांचा फोन आला... साहेब, मला आशीर्वाद द्या. आज माझा वाढदिवस आहे. म्हटलं आनंद आहे. महाराष्ट्रासाठी झटा आणि महाराष्ट्रासाठी लढा हाच माझा आशीर्वाद... काय आशीर्वाद देणार, कसली



आरक्षणं आहेत. कसली काय, अरे पहिल्यांदा संरक्षण द्या, महिलांना संरक्षण द्या पहिल्यांदा... बलात्कार चालले आहेत. बरं झालं दुर्गा नावाची काहीतरी एक संघटना निघाली आहे महिलांची. हाण तिच्यायला... त्यांनी ठोकलं.. फर्निचर उद्ध्वस्त केलं... ही पाळी येणार आहे आज... मंत्र्यांना ह्याच महिलांनी झोडल्याशिवाय राहणार नाहीत, रस्त्यावरती... ते पोलिसबिलीस बघतील मागून. त्यातून एखादी बाई मंत्र्याची बायको असेल तर सोडून द्यायचं, क्लीन चीट द्यायची, भानगड मिटली. काय चाललंय... प्रत्येक महिलेला असं मी म्हणेन, शस्त्रपरवाना द्या. प्रत्येक महिलेला देऊन टाका, चला... घराघरात जाऊ द्या..., येऊ द्या त्या काश्मीरचे अतिरेकी, आणखी कोणी येऊ द्या... किंबहुना या महाराष्ट्रातील पोलिसांना, मुंबईच्या पोलिसांना जे जमत नाही ते ह्या महिला करून दाखवतील (जल्लोष, टाळ्या) फक्त हातात शस्त्र द्या त्यांच्या... आणखी किती बोलायचं, खूप सांगितलं, खूप बोललो आणि बोलकाच राहू शकतो... अजूनतरी जगदंबेनं माझी शरीरयष्टी तशी चांगली... आजही माझा श्वासोच्छ्वास मार्गावर आला ना... महाराष्ट्राचे दौरे काढीन, भाषणं करीन, जाग आणीन (जल्लोष, टाळ्या, घोषणाबाजी)... कारण माझा श्वास जरी घात करत असला मध्येमध्ये, तरी माझी शक्ती माझ्या शरीरात नसून, माझी शक्ती माझ्यासमोर बसली आहे, ही माझी शक्ती आहे, हे माझं टॉनिक आहे, हे माझं शक्तिवर्धक आहे आणि ह्याचा पुरवठा असाच होत राहो अशी मी आपल्या चरणी नतमस्तक होऊन प्रार्थना करतो (टाळ्या)... आणि आज एका निष्ठेने आलात, प्रेमानं आलात... निवडणुका काय येतात जातात हो... तुम्ही नाराज बिराज होऊ नका, तिकीट नाही मिळाले... चालले...; ही कसली निष्ठा? निष्ठा पक्षावर आहे की तिकिटावर आहे? आम्ही इतक्या वेळा हे गाळलं, तितक्या वेळा ते गाळलं... अरे गाळलं असशील रे, पण निष्ठेसाठी गाळलं की पक्षासाठी गाळलं? का तिकिटासाठी गाळलं...? हे नाही चालणार, असल्या धमक्या देऊ नका कुणी, बिलकूल नाही... काय होईल? बाजूला होतो ना, आम्ही सगळेच बाजूला होतो... चालवा... नाराजांनी चालवावी, शिवसेना चालवावी, महाराष्ट्र चालवावा, सत्ता आणून दाखवावी, पण घरफोड्यांना मदत करू नका. घरफोड्यांच्या पाठीशी राहू नका. कल्याण, डोंबिवलीमध्ये जे चाललेलं आहे, हरामखोरी, कपटकारस्थानं... अरे, शिवसेनेला आमनेसामने करून पाडा ना... जिंका, हिंमत नाही, यंत्रणा ठरवणार, आमच्यातील पाडाव, शिवसेनेचा पराभव इतका साधा नाहीय... आणून दाखवतो... सत्ता आणून दाखवतो. एक व्हा, यंत्रामध्ये संशय आला तर लाथ मारा यंत्राला... काय व्हायचे ते होईल, खटले चालवू (टाळ्या). पण महाराष्ट्राचा मुख्यमंत्री तुमच्या लोकांच्या निष्ठेने, शिवरायांच्या भगव्या

झेंड्याखाली मंत्रिमंडळ येणारच (टाळ्या), सत्ता येणारच ही निष्ठा आणि ह्या पद्धतीने मजबूत विचार करून उठायचे आहे. दसऱ्याचं सोनं लुटता नां ! हेच सोनं मी तुम्हाला देतोय की, यापुढे प्रत्येकाने निष्ठेने असे मतदान करा की, शिवसेनेची सत्ता महाराष्ट्रामध्ये आलीच पाहिजे आणि शिवसेनेचा भगवा झेंडा, शिवरायांचा भगवा झेंडा, हिंदू धर्माचा भगवा झेंडा मंत्रालयाच्या घुमटावरती डौलानं, स्वाभिमानाने, अभिमानाने, जबरदस्त बहुमताने फडकलाच पाहिजे, फडकलाच पाहिजे, फडकलाच पाहिजे!

''जय हिंद जय महाराष्ट्र...''



## पंचलाइन्स

* बाळासाहेब ठाकरे - या आठ अक्षरी नावाची जादू मराठी मनावर तब्बल ४५ ते ५० वर्षे गारूड करून राहिली आणि इथून पुढेही राहील असे दिसते.

* बाळासाहेबांचा शब्द म्हणजे तलवारीची धार.

* बाळासाहेबांचा निर्णय म्हणजे काळ्या दगडावरची रेघ ठरली.

* मराठी तरुणांनो, मनात काही ना काही व्यवसाय करण्याचे ध्येय समोर ठेवून त्यासाठी चिमणी-कावळ्यासारखी नको, तर गरुडासारखी झेप घ्या.

* जनता हा ज्वालामुखी आहे.

* जनता जागी होऊन आकाशात निखारे ओकायला लागते तेव्हा अनेक शासने भस्मसात झाली आहेत.

* पैसा ही गोष्ट आम्ही आमच्या आयुष्यात कधीही महत्त्वाची मानली नाही.

* एखाद्या अडल्यानडल्याचे काम होते, त्यांच्या चेहऱ्यावर जी प्रसन्नता दिसते, तेच आमचे आयुष्य!

* मी कोणत्याही सभेला जातो तेव्हा पूर्वतयारी करून जात नाही, कारण घरात समोर बसलेल्या लोकांसमोर जसे बोलतो तसेच सभेतही बोलतो.

* लेखक हा त्याच्या भाषेवरून ओळखला जातो.

* व्यंगचित्रकार हा त्याच्या रेषेवरून ओळखला जातो.

* मुंबईचे अस्तित्व नष्ट होऊ शकणार नाही. अजूनही मराठी माणूस गेलेला नाहिये, तो जिवंत आहे, तो पुन्हा उभा राहील.

* माझं मोल व शिवसेना नावाची किंमत मी कधीही भेंडीबाजारात गहाण ठेवणार नाही.

* माझं वाचन मर्यादित आहे. वाचून मी माझे विचार घडवीत नसतो. मला स्वत:ला काही विचार आहेत की नाहीत, याचा मी शोध घेत असतो.

※ प्रांताप्रांतांतील लोक फक्त हिंदू म्हणून एक होत नाहीत तोपर्यंत तरणोपाय नाही.

※ हिंदू हा जादूचा शब्द आहे. हिंदू म्हणूनच आपण जिंकलो पाहिजे आणि आपण जिंकणारच!

※ मराठी माणूस आणि त्यांचा विकास हेच माझे आणि शिवशाहीचे एकमेव ध्येय आहे.

※ माझा शिवसैनिक म्हणजे माझी कवचकुंडले!

※ शिवसेनेत पदाला किंवा जातील महत्त्व नसते तर त्यागाला आणि कामालाच महत्त्व असते, हा मंत्र मनात बिंबवा.

※ आपण यशस्वी होणारच असा जबरदस्त विश्वास मी बाळगतो, तुम्हीही बाळगा.

※ दे दणका – मराठी माणसाची जिथे कोंडी होईल तेथे तेथे शिवसेना धावून येईल.

※ गर्व से कहो हम हिंदू हैं ।

※ भाषण करताना ते जणू काही आमच्याशीच बोलत आहेत असेच प्रत्येक शिवसैनिकाला वाटत होते.

※ अहमदनगर येथे बाळासाहेबांची सभा असताना एक १८ वर्षीय तरुणाने खासकरून नोकरीची एकदिवसीय सुट्टी घेतली आणि रात्रीतून आपले पांढरे कपडे धुतले. रात्री २ वाजता तो काय करतो असे विचारले असता, माझ्या साहेबांची माझ्यावर नजर पडली असता पांढरे शुभ्र कपडे दिसले पाहिजेत अशी त्या तरुणाची इच्छा होती. दसरा मेळावा म्हणजे भारताचा एक महत्त्वाचा सण. हा सण बाळासाहेबांचे विचारांचे सोने लुटण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येत असत.

※ बाळासाहेबांच्या शब्दावर अवघा महाराष्ट्र बंद होत होता. असा बुलंद वाघ्याढाणा म्हणून बाळासाहेबांची ओळख झालेली होती.

※ बाळासाहेबांना मानणारा वर्ग सर्व स्तरांतील होता मग तो तरुण वर्ग असेल किंवा अगदी ८० ते १०० वर्षापर्यंत माणसे असोत.

※ बाळासाहेबांनी आपल्या अनुयायांना नेते केले.

※ बाळासाहेब हे अत्यंत खुल्या मनाचे नेतृत्व होते. त्यांनी अगदी मी वाइन बिअर पितो हेसुद्धा अगदी दिलखुलासपणे बोलत.

※ बाळासाहेब अगदी राजेशाही थाटामाटात पाइप सिगारसुद्धा पीत



असत.

* बाळासाहेबांनी नातं निर्माण केले होते प्रत्येकाच्या समस्येशी, प्रश्नाशी. * बाळासाहेब सतत म्हणत, देवापुढे वाकण्यापेक्षा आई-बापांपुढे वाका. त्यांनी तुला जन्म दिला आहे.

* सर्वसामान्यांची सातत्याने काळजी घेणारा नेता म्हणजे बाळासाहेब ठाकरे.

* रिक्षाचालकांपासून ते महापौर पदापर्यंत सर्वसामान्य शिवसैनिकांना बाळासाहेबांनी नेते केले.

* कवी म्हणतात, 'मुझे इतनी ऊँचाई मत देना की मैं किसी को गले ना लगा सकूँ।।'

* बाळासाहेब कोणत्याही गोष्टींचा खोलवर अभ्यास करत, निर्णय घ्यायचे,

* बाळासाहेब परखडपणे खरं बोलायचे, त्यामुळे त्यांच्या भाषणातून लोकांना सतत प्रेरणा मिळत.

* उत्स्फूर्तपणा हा त्यांच्या भाषणाचा मोठा भाग होता.

* कोणत्याही प्रकारची भीती न बाळगता अगदी निर्भीडपणे बाळासाहेब आपले विचार मांडत.

* रोखठोक बोलणे आणि त्यावर अंमलबजावणी करणे आणि पूर्ण करणे ह्यामुळे करोडो लोकांच्या हृदयावर प्रेम केले.

* बाळासाहेबांनी इतिहास घडवला कधी शाईने तर कधी रक्ताने.

* बाळासाहेब ठाकरे हा विषय अनेक वर्षे अनेकविध लोकांसाठी अभ्यासाचा विषय ठरणार आहे.

* एकदा एका पत्रकाराने बाळासाहेबांना विचारले की, आपण आत्मचरित्र का लिहीत नाही त्या वेळेसे बाळासाहेब म्हणाले, आत्मचरित्र हे कपाटामध्ये नसावे तर लोकांच्या मनाच्या कपाटात असायला हवे.

* दिलेला शब्द हा शेवटच्या क्षणापर्यंत पाळायचा हे बाळासाहेबांचे ब्रीद होते.

* शिवसेनाप्रमुख बाळासाहेबांनी शिवसैनिकांना आदेश दिला आणि तो पाळला गेला नाही असे कधीही घडले नाही.

* 'साहेब या आयुष्यात नेहमीच तुमची आठवण राहील पण तुमच्याविना

हिंदुहृदयसम्राट हा शब्द अधुराच राहील.'

* आज खऱ्या अर्थाने भारतात वाघांची संख्या कमी झाली. मराठे खऱ्या अर्थाने पोरके झाले.

* येणाऱ्या हजार पिढ्यांना मी छाती ठोकून सांगेन की मी शिवाजी महाराजांना पाहिले नसले तरी त्यांचा अंश असलेल्या बाळासाहेब ठाकरे नावाच्या झंझावाताला पाहिले आहे. वाघ तो वाघच असतो. त्याला कोणी भारी नसतो.

* बाळासाहेबांनी जो ठेवा ठेवला, राष्ट्रनिष्ठेचा जो धडा ठेवला तो आपण जपला पाहिजे, तरच आपण त्यांचे ऋणी आहोत, हे व्यक्त होईल. श्रद्धांजली ही सक्रिय असायला हवी, तरच त्या व्यक्तीप्रती आपल्या भावना किती जुळल्या होत्या हे दाखवते.

**–शिवशाहीर बाबासाहेब पुरंदर**

* वाघासारखं कसं जगावं आणि व्यंगचित्रातून एखाद्या शत्रूलाही कसं आपलंसं करावं, याचं उत्तम उदाहरण शिवसेनाप्रमुखांनी घालून दिलं होतं.

**–मंगेश तेंडुलकर, ज्येष्ठ व्यंगचित्रकार**

* त्यांच्या शब्दांने वणवा पेटायचा
  त्यांच्या बोलण्याने झंझावात यायचा

* स्वत:च स्वत:ला शिस्त लावायला हवी हा बाळासाहेबांचा आग्रह!

* उंबरठ्याबाहेरच्या चपला हीच आपली संपत्ती. शिवसेनेप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना त्यांचे वडील यांनी एक शिकवण दिली होती. ती म्हणजे उबंरठ्याबाहेर जितक्या चपला असतात ती आपली संपती आहे. ती कायम जप.

* कामासाठी भेटायला जी माणसे येतात त्यांनाच आपली संपत्ती समजण्याची ही शिकवण कायम जपली व माणसे वाढवली. या माणसांचाच पुढे शिवसेनारूपी महासागर झाला.

* बाळासाहेबांचे प्रत्येक बोलणे हाच शिवसैनिकांसाठी आदेशच होता.

* प्रबोधनकारांनी बाळ ठाकरे यांना दिला मंत्र.

ज्योतिषाकडे जाऊ नकोस, कुंडली दाखवू नकोस, हात दाखवू नकोस.



तुझा कुठचा ग्रह कुठच्या घरात बसलाय याची पर्वा करू नकोस. तुझ्याकडे जर आत्मबल असेल, तर जगाच्या पाठीवर कुठेही जा तुला मरण नाही.

* दिलखुलास माणूस, निर्भीड पत्रकार, परखड वक्ता, सहृदयी मित्र आणि कार्यकर्त्यांवर पित्याप्रमाणे जीव लावणारा नेता, महाराष्ट्रावर भरभरून बोलणारा द्रष्टा नेता असंच बाळासाहेबांचे वर्णन करावं लागेल.

* जन्म-मृत्यू हे जरी अटळ असले तरीही जगणारा माणूस किती जगला यापेक्षा तो कसा जगला याचे अधिक महत्त्व आहे.

* बाळासाहेबांचे हे वाक्य, 'आय लाइक पीपल व्हू कॅन गेट दी थिंग्ज डन!' या वाक्याने कामाची दिशाच बदलून जाईल.

* बाळासाहेब नेहमी म्हणायचे की, प्रत्येकाने वेळेची आणि समोरच्या व्यक्तीची किंमत ठेवली पाहिजे. आपल्यामुळे कुणाला ताटकळत बसत ठेवणे हे बिलकूल योग्य नाही.

# पुस्तकाबाबत आपल्या प्रतिक्रिया पत्राद्वारे वा ईमेल पाठवू शकता.

आपला नम्र

**यशराज पारखी**



ऑफिस नं. २४, महाराजा कॉम्प्लेक्स, पौड रोड,
कोथरूड, पुणे - ४११०३८,
फोन :०२० २५२८३०११/९९२२६०४४४२
yeshrajparkhie@gmail.com
Facebook / twitter yeshrajparkhie.